(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>नर्मदा सरोवराच्या प्रश्नाबाबत</u>

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला एक मिनिट बोलावयाचे आहे. काल आपण नर्मदा सरोवराच्या संदर्भात निर्णय दिला होता.

सभापती : मी काल दिलेला निर्णय तसाच ठेवलेला आहे. आज प्रश्नोत्तराच्या तासानंतर त्या संदर्भात 1-2 सन्माननीय सदस्यांना बोलावयास मी परवानगी देणार आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. : तोंडी उत्तरे

(दिनांक 4 एप्रिल, 2006 रोजीचा पुढे ढकलण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 12963)

जिल्हा परिषद आरोग्य विभाग अर्ध वेळ स्त्री परिचरांच्या मागण्याबाबत

(३) * १२९६३ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद आरोग्य सेवेतील अर्धवेळ स्त्री परिचरांना किती मानधन दिले जाते,
(२) अर्धवेळ स्त्री परिचर अर्धवेळ काम करत नसुन पुर्ण वेळ काम करतात हे खरे आहे काय,
(३) शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतना एवढे तरी मानधन मिळावे याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) अंगणवाडी सेवीका, हजेरी सहाय्यक यांना ज्या प्रमाणे शासन सेवेत सामावून घेतले त्या प्रमाणे अर्धवेळ स्त्री परिचरांना चतुर्थ श्रेणीत सामावून घेण्याबाबत काही टक्केवारी निश्चित केली आहे काय,
(५) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता : १) जिल्हा परिषद आरोग्य सेवेतील स्वयंसेवी कार्यकर्ती (अर्धवेळ स्त्री परिचर) यांना दिनांक १.१०.१९९६ च्या शासन निर्णयानुसार रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) अधिक केंद्र शासनाकडून प्रतिपूर्तीद्वारे मिळणारे रुपये १००/- (रुपये शंभर फक्त) असे एकूण रुपये ६००/- (रुपये सहाशे फक्त) दरमहा इतके मानधन दिले जाते.
२) हे खरे नाही.
३) शासनाने निश्चित केलेले किमान वेतन जिल्हा परिषदेतील अर्धवेळ काम करणाऱ्या स्वयंसेवी कार्यकर्ती (अर्धवेळ स्त्री परिचर) यांना लागू होत नाहीत.
४) स्वयंसेवी कार्यकर्ती (अर्धवेळी स्त्री परिचर) यांना चतुर्थश्रेणीत सामावून घेण्याबाबत कोणतीही टक्केवारी निश्चित केलेली नाही.
५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या आरोग्य सेवेत अर्धवेळ स्त्री परिचर आहेत. खरे पाहिले तर, अर्धवेळ स्त्री परिचर असल्यातरी त्या पूर्ण वेळ काम करतात. त्यांना पूर्ण वेळ काम करावे लागते. पण त्यांना मानधन मात्र 600/- रुपये देण्यात येते. सभापती महोदय, दिनांक 1 मार्च, 2006 पासून अर्धवेळ स्त्री परिचरांना मानधन म्हणून 1200/- रुपये दिले जातील अशा प्रकारची घोषणा करण्यात आलेली होती. त्याची अंमलबजावणी का झालेली नाही ? एवढ्या तुटपुंज्या मानधनावर त्यांनी काम करावे अशी शासनाची अपेक्षा आहे काय ? तरी, या संदर्भात माझ्या माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, केंद्राने मंजूर केलेल्या 1200/- रुपयांप्रमाणे त्यांना मानधन दिले जाईल काय ?

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12963 ....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, केंद्राचे ते 1200/- रुपये वर्षासाठी आहेत, महिन्यासाठी नाहीत. तो केंद्र शासनाचा हिस्सा आहे. आपण त्यांना सध्या 1200/- रुपयांप्रमाणे वर्षभरासाठी देत आहोत.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, केंद्राचे वर्षासाठी 1200/- रुपये आणि आपण महिन्याला त्यांना 600/- रुपये देता ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्यांना ऑलरेडी दर महिन्याला 600/- रुपये मानधन आहे. त्यामध्ये राज्य शासन 500/- रुपये देते आणि केंद्र शासनाचा 100/- रुपयांचा हिस्सा असतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या अर्धवेळ स्त्री परिचरांनी किती तास काम करावे, अशी शासनाची अपेक्षा आहे ? त्या संदर्भात आपण त्यांना काही आदेश दिलेले आहेत का ? सभापती महोदय, त्या अर्धवेळ स्त्री परिचर दोन तास काम करतात, एक तास काम करतात की 8 पैकी 4 तास काम करतात ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, आपण अर्धवेळ स्त्री परिचरांना पार्ट टाईम वर्कर म्हणून घेतलेले आहे. फॅमिली प्लॅनिंग, इम्यूनायझेशन अशा प्रकारच्या कामांसाठी त्यांना एन.एम. बरोबर सहाय्यक म्हणून व्हिजीटला जावे लागते. सभापती महोदय, त्यांच्याकडून अर्धवेळच काम करुन घेतले जाते. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे, केंद्र शासनाचे 1200/- रुपये त्यांना देण्यात येतात.

श्री. शरद पाटील : सभापती महोदय, या अर्धवेळ स्त्री परिचरांना किती तास काम करावे लागते, याबाबत सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून मिळालेले नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अर्धवेळ स्त्री परिचरांना 4 ते 5 तास काम करावे लागते.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये आरोग्य सेवेमध्ये काम करणाऱ्या या स्वयंसेवी कार्यकर्त्यांच्या, अर्धवेळ स्त्री परिचरांच्या किती मागण्या प्रलंबित आहेत ? आणि त्या

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12963 ....

श्री. श्रीकांत जोशी ....

संदर्भातील वस्तुनिष्ठ परिस्थितीची तपासणी सरकारने केलेली आहे का ? तसेच, त्यांना करावे लागणारे काम व वेळ या संदर्भात शासनाकडे एक्झॅक्ट माहिती उपलब्ध आहे का ? व त्याबाबत तपासणी समिती नेमून काही कार्यवाही करण्याचा शासनाचा मानस आहे का ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, अर्धवेळ स्त्री परिचरांना एन.एम. बरोबर जाऊन अर्धवेळ काम करावे लागते. आपण त्यांना पार्ट टाईम वर्कर म्हणतो. त्यांना 5 ते 6 तास काम करावे लागते. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी विचारल्याप्रमाणे, या संदर्भातील वस्तुनिष्ठ माहिती आपल्यासमोर देण्यात आलेली आहे.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित करण्याची कारवाई न होणे

(१) * १२७४२ श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. रमेश निकोसे , श्री. सुधाकर गणगणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : दिनांक ६ डिसेंबर, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक ५ डिसेंबर, २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक ९२९१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अशा अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधीन निवेदनावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) झालेला असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) ही पदे अनारक्षित करुन अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे इतर अनुषंगिक लाभ लागू करण्याच्या प्रश्नाची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) होय.

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाने असे निर्देश दिले आहेत की, महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावा व शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावी, परंतु विद्यापीठाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दिनांक ५/१२/१९९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. कांबळे... 13:05

ता.प्र.क्र. 12742..

श्री. नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, अधिव्याख्याता के पद अनारक्षित करने के संबंध में उच्च न्यायालय द्वारा निर्णय दिये जाने के बाद भी उस पर अमल नहीं हो रहा है. बुलढाणा जिले के खामगांव तालुका में एक महाविद्यालय में ऐसे तीन पद थें, वहां स्टे दिया गया था लेकिन उसके बाद वे पद रेगूलर किये गए हैं. क्या इसी आधार पर यानी खामगांव की धरती पर और उच्च न्यायालय के आदेश के अनुसार इस तरह के अधिव्याख्याता के पद रेगूलर किए जाएंगे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी खामगांव येथील केसचा उल्लेख केलेला आहे. खामगांवचे काय प्रकरण आहे हे मला तपासून पहावे लागेल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, खामगांवच्या प्रश्नांच्यासंदर्भात या प्रकरणात नोटीस दिलेली आहे. Mr. Chairman, Sir, it is not that the hon. Member is asking the question without giving notice. The notice is given. Yes. It is already given. प्रश्न असा आहे की, 30 मे, 2005 रोजी सह सचिवांचे निवेदन मिळाले, 1,2,3 4 वेळा या निवेदनामध्ये आरोप केलेले आहेत. निवेदनासोबत कागदपत्रे जोडलेली आहेत. तीन पदे अनारक्षित करण्यात आलेली आहे. या निवेदनानुसार पदे अनारक्षित करण्याबाबत मंत्रालयातून स्टे दिलेला आहे. सदर लोकांनी मंत्रालयामध्ये चकरा मारल्यानंतर काही लोकांची पदे अनारक्षित केलेली आहेत, ही पध्दत बरोबर नाही असे मी त्यांना सांगितले. या निर्णयाच्या विरोधात डझनभर लोक हायकोर्टात गेलेले आहेत, हायकोर्टाने निर्णय देऊन सुध्दा मंत्रालयातून पदे अनारक्षित करण्याची कार्यवाही करण्यात येत नाही. हायकोर्टाच्या निर्णयामध्ये 1990 च्या शासन निर्णयाप्रमाणे ट्रिटमेंट देण्यात यावी असे म्हटले आहे. हायकोर्टाच्या निर्णयात पुढे असेही म्हटलेले आहे की, "...Under the Government Resolution dated 25th January,1990, the State Government has to approve the de-reservation of the post, if the post could not be filled in by appointing a reserve category candidate for a period of five years." परंतु मंत्रालयामध्ये जस्टीस श्री. केंद्रे हे अधिकारी बसलेले आहेत त्यांचे म्हणणे असे आहे की, 1990 च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता 1994 च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी. दुर्देवाने प्रश्नाच्या उत्तरात आता 1994 च्या शासन निर्णयातील अटी परिपूर्ण नसल्यामुळे हायकोर्टाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले आहे. यासंदर्भात सुप्रिम

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोर्टात जाणे हा वेगळा भाग आहे. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणाची गांर्भीयाने नोंद घेऊन खामगांवच्या प्रकरणामध्ये डायरेक्टरमार्फत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मंत्रालयातून जो स्टे दिलेला आहे तो उठवून महाविद्यालय व विद्यापीठाने सांगितल्याप्रमाणे हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे 1990 च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करुन आदेश काढले जातील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अनेक वेळा वेगवेगळे शासकीय महामंडळे, स्वायत्त संस्था याची जी आरक्षित पदे आहेत ही पदे भरण्याची कार्यवाही आयोग पुरस्कृत निवड समित्यांद्वारे करण्यात येते. उमेदवारांच्या निवडीची विहित प्रक्रिया ठरविण्यात आलेली आहे. त्या प्रक्रियेमधून उमेदवार उपलब्ध होत नसल्यास काही प्रमाणात तात्पुरत्या स्वरुपात......

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, येथे आयोगाचा विषय नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, 25 ऑगस्ट, 2005 रोजी सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भात एक शासन निर्णय काढलेला आहे, बऱ्याचवेळा असे घडते की, नियुक्त्या हया तात्पुरत्या स्वरुपात केल्या जातात. तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त्या केल्यानंतर ...... (Interruptions). Sir, let me complete

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12742...

श्री. दिलीप वळसे पाटील...

ज्यावेळी रेगुलर अपॉईंटमेंट करण्याची वेळ येते त्यावेळी एखाद्या संस्थेला आरक्षण कॅटॅगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या शिक्षण संस्थेतील त्या उमेदवाराची ती जागा रिक्त राहू नये यासाठी काय केले पाहिजे, याकरिता राज्य सरकारने वेळच्या वेळी निर्णय घेतले आहेत. त्याप्रमाणे 30 मार्च 1981 मध्ये मागास वर्गीयांसाठी आरक्षण ठेवण्याचा निर्णय झाला. आणि 1983 मध्ये आरक्षित कॅटॅगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर बिगर मागासवर्गीयांच्या उमेदवाराची नियुक्ती त्या संस्थेने करावी अशाप्रकारची भूमिका घेण्यात आली. 29 सप्टेंबर 98 ला एक वर्षामध्ये मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर वेगळी भूमिका घेतली गेली. माननीय सदस्यांनी त्यासंबंधी 25 जानेवारी 1990 च्या जी.आर. चा उल्लेख केला. हायकोर्टाने त्या जी.आर. प्रमाणे कारवाई करावी असे म्हटले आहे. त्याच आधारावर 5 वर्षे ते पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाही तर ती जागा बीन राखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तीला ती जागा द्यावी. या संपूर्ण विषयामध्ये एखाद्या पदावर रिझर्व्ह कॅटॅगरीमधील उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ते पद डिरिझर्व्ह करुन ते ओपन कॅटॅगरीतील उमेदवारांना देण्याच्या संदर्भातील निर्णय घेण्याचा हा प्रश्न आहे...

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदय सांगत आहेत ते बरोबर नाही. आपण समजून घ्या. हायकोर्टाच्या ऑर्डर्स मी कशाला सांगू? Why should I argue about it? Mr. Chairman, Sir, I will quote the judgement of the High Court. Sir, I will tell you the judgement. Sir, I quote: "The Government Resolution dated 25.1.1990 makes it imperative for the State..." Here the wording is: " for the State." to de-reserve the post in the event the candidate from the reserved category is not available for a period of five years the posts should be de-reserved from the sixth year." याठिकाणी जज्जमेंट असे दिले आहे की, "Within two weeks from the date of receipt of the proposal from respondent no.6 College and the State Government in turn is directed to issue necessary orders in regard to de-reservation of the post held by the petitioner's service."

ता.प्र.क्र. 12742...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

माझे असे म्हणणे आहे की, हे ऑर्ग्युमेंट इथे करण्यापेक्षा तिथे केले पाहिजे, त्याठिकाणी तुम्ही केले. माझे असे म्हणणे आहे की, अशा अनेक केसेसमध्ये हा निर्णय दिलेला आहे. माझे म्हणणे असे की, मंत्रालयामध्ये चकरा मारण्याचे चक्र आपण तोडा. यामध्ये मी तुम्हाला नोटीस दिली आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती मी सांगत होतो.. मुळात एखादा आरक्षित पदावर उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ते पद कसे भरावयाचे या संदर्भातील हा विषय आहे. त्या संदर्भात माननीय सदस्य 25 जानेवारी 1990 च्या जी.आर. चा संदर्भ सांगत आहेत. त्यासाठी तुम्ही कोर्टाच्या जज्जमेंटची प्रत आणली आहे, ती प्रत माझ्याकडेही आहे. 1990 चा जी.आर. कोर्टामध्ये प्रोडयूस करण्यात आला व त्या आधारावर कोर्टाने निर्णय दिला. त्याच्यापुढे काही गोष्टी आहेत...

(माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख बसून बोलतात.)

(अडथळा)

सभापती महोदय, माननीय सदस्यांचे एकदा विचारुन पूर्ण झाल्यानंतर मी उत्तर देतो...

सभापती : माननीय सदस्यांनी माननीय मंत्र्यांना त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे. आपल्याला जर शंका असेल तर मी पुन्हा आपणास प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, 25 जानेवारीच्या जी.आर. मध्ये 5 वर्षापर्यंत हे पद राखीव ठेवावे आणि सहाव्या वर्षी जर मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाला नाहीतर ती जागा बीन राखीव करुन विहित पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराला कायम करावे अशाप्रकारचा जी.आर. आहे. त्या आधारे कोर्टामध्ये रिलिफ मागितले आहे. 1991 मध्ये या संदर्भातील आणखी एक जी.आर. काढला गेला, 1994 मध्ये आणखी एक जी.आर. काढला गेला. दुर्दैवाने हा जी. आर. कोर्टामध्ये दाखविला गेला नाही. एखादे आरक्षित असलेले पद डिरिझर्व्ह ठेवायचे असते त्यावेळी त्या बाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाकडून आल्यानंतर तो प्रस्ताव सामाजिक न्याय, आदिवासी कल्याण विभाग या दोन्ही विभागाकडे जातो व नंतर मुख्य सचिवांकडे जाऊन वरच्या पातळीवर त्या संदर्भात निर्णय होत असतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 13:15

ता.प्र.क्र.12742 (पुढे सुरु...

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

बऱ्याच केसेसमध्ये असे आढळून आलेले आहे की, राखीव कॅटेगरीतील उमेदवार उपलब्ध झाला नाही वा तो उमेदवार उपलब्ध होतोच असे असे नाही, त्या जागेवरी ज्यांचे पोस्टींग केले जाते, ते उमेदवार तात्पुरत्या स्वरुपामध्ये असतात तरी देखील त्यांना प्रमोशन दिले जाते. तो त्या ठिकाणी पाच-सहा वर्षे काम करीत आहे, असे म्हटल्यानंतर डी-रिझर्व्हेशन करुन, त्याला कायम स्वरुपामध्ये नेमणूक द्याव्यात अशाप्रकारची भूमिका आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : तसे कोर्टाचे आदेश आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : न्यायालयाचे आदेश आहेत,याची सरकारलाही जाणीव आहे. न्यायालयाचे आदेश असतांना देखील या संदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक 25 ऑगस्ट 2005 रोजी या संदर्भातील प्रस्ताव पाठविलेला होता. ज्यावेळेला विद्यापीठाकडून संस्थांकडून अशाप्रकारचा प्रस्ताव येतो, त्यावेळेला त्यांनी चेक-लिस्टप्रमाणे प्रोसिजर पूर्ण करुन राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर केला पाहिजे. तसा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केल्यानंतर त्या संदर्भात जी काही प्रोसिजर आहे, ती पूर्ण करुन शासन निर्णय घेते. तरी देखील प्रश्न शिल्लक रहातो.या संदर्भात हाय कोर्टाचे जज्जमेंट आल्यानंतर, सुप्रीम कोर्टाचे एक जज्जमेंट आले. ते म्हणजे त्या संस्थेमध्ये रिझर्व्हेशनच्या पदावर लागलेला उमेदवाराला कायम करता येणार नाही. त्या पदाकरिता फ्रेश ऑर्डर काढून नव्याने नियुक्त केले पाहिजे, अशाप्रकारची सुप्रीम कोर्टाने भूमिका घेतलेली आहे. त्या आधारावर 25 ऑगस्ट 2005 चा जी.आर. सरकारने काढलेला आहे. त्यावेळेस अशाप्रकारच्या केसेस सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविल्या जातात. त्यावेळेला 1990 च्या जी.आर.चा आधार घ्यायचा की 1994 चा जी.आर.चा घ्यायचा किंवा 2005 सालच्या जी.आर.चा आधार घेऊन, कारवाई करावयाची या संदर्भामध्ये निश्चित प्रकारे निर्णय घेण्यासाठी, काही कालावधी लागणार आहे. या संदर्भात सरकारला अधिक वेळ लागणार आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आता जे सांगितले, त्यामुळे फार मोठा अन्याय होणार आहे. शैक्षणिक संस्थेला त्या रिझर्व्हेशनच्या पदावर, एखाद्याची कायम नेमणूक करत असतांना विद्यापीठाची परवानगी घ्यावी लागते. आठ आठ वर्षे तो उमेदवार त्या रिझर्व्हेशनच्या पदावर काम करतो. त्या संदर्भातील दर वर्षी जाहिरात काढली जाते, त्याप्रमाणे दुसरा कोणी उमेदवार मिळत नाही, तोच उमेदवार सिलेक्ट होतो. अशा पध्दतीने तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.12742 (पुढे सुरु...

उमेदवार त्या पदावर कायम रहात असेल तर ती जागा डी रिझर्व्हेशन ची होईल म्हणून पुन्हा जाहिरात देण्यात येते. त्याही वेळेला तोच उमेदवार सिलेक्ट होतो. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, ज्यावेळेस डी रिझर्व्हेशनचा प्रस्ताव पाठवितो. ाातो आपण चेंजत ऑफ रिझर्व्हेशन किंवा ते पद आपण ओपन कॅटेगरीतील उमेदवाराकरिता ट्रान्स्फर करावे काय ? आताच मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले की, 2005 चा जीआर काढलेला आहे. त्याच्या आधारे सगळे प्रस्ताव निकाली काढणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन 2005 च्या जी.आर.चा आधारावर आदेश काढण्यात आला. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने अे- मुलानी, रजिस्टार ऑफ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या विरुध्द तामिळनाडू या केसमध्ये जुलै 2004 रोजी जज्जमेंट दिलेले आहे. ते जज्जमेंट माझ्याकडे आहे ते मी व्हरबायटम सभागृहास वाचून दाखविण्यास तयार आहे. म्हणून ही बाब सरकारला तपासून घ्यावी लागेल. म्हणून यामध्ये तातडीने निर्णय करणे शक्य होणार नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, विशिष्ट राखीव प्रवर्गातील एखादा उमेदवार पाच वर्षापर्यन्त मिळत नसेल तर ते पद इतर आरक्षणाच्या प्रवर्गाकडे स्थानांतरित होते काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, अनेक संस्था चालक मागासवर्गीय उमेदवारांच्या जागेवर उमेदवार मिळत नसले, तर खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची आपल्या संस्थेत भरती करतात...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.12742.... प्रा. जोगेंद्र कवाडे ...

आणि सातत्याने ते सुरु ठेवतात. आपल्या विशिष्ट लोकांच्या फायद्यासाठी अशा प्रकारची प्रथा काही शैक्षणिक संस्थांमध्ये सुरु केली जाते. एका वर्षी राखीव संवर्गातील उमेदवार मिळत नसेल तर पुढच्या वर्षी जाहिरात दिली पाहिजे. त्यांच्या नेमणुका तात्पुरत्या स्वरुपात होतात. अशा प्रकारची प्रक्रिया त्यांनी सतत पाच वर्षे केली काय ? हा प्रश्न माननीय मंत्रिमहोदय तपासून बघतील काय ? ज्या शैक्षणिक संस्थेंमध्ये राखीव जागेवर उमेदवार मिळत नाही म्हणून ते पद डी-रिझर्व करुन खुल्या प्रवर्गाला देणे ही बाब आमच्या शासनाच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाला शोभणारी आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : यासंदर्भातील शासनाची भूमिका मी या सभागृहामध्ये अतिशय स्पष्ट केलेली आहे. 1981 सालामध्ये कृषितर विद्यापीठांमध्ये आरक्षण ठेवण्याच्या संदर्भात राज्य सरकारने निर्णय घेतला. त्यानंतर पदे आरक्षित आहेत पण टिचिंग पोस्ट साठी उमेदवार मिळत नाहीत अशा वेळी काय करावयाचे ? यासंदर्भात वेळोवेळी काही निर्णय घेणे गरजेचे होते आणि शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत. यामध्ये 20 ऑक्टोबर, 1983 चा निर्णय आहे. 29 ऑक्टोबर, 1989 चा निर्णय आहे. 25 जानेवारी, 1990 चा निर्णय आहे. 27 मार्च, 1991 चा निर्णय आहे तसेच 5 डिसेंबर, 1994 चा निर्णय आहे. यामध्ये राज्य सरकारसमोर दोन प्रश्न होते. एका बाजूला आरक्षित पद डी-रिझर्व करुन खुल्या प्रवर्गाला द्यावयाचे की अन्य मागासवर्गीय संवर्गातील लोकांना द्यावयाचे ? उदा. अनुसूचित जातीचे पद असेल तर ते पद डी-रिझर्व करुन अनुसूचित जमातील किंवा ओबीसीला द्यावयाचे काय ? त्यासंदर्भात राज्य सरकारने भूमिका घेतली होती तरी सुध्दा शासनाच्या या सगळ्या निर्णयानंतर आणि सन्माननीय हायकोर्टाच्या तसेच सन्माननीय सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर या विचारामध्ये आता स्पष्टता आलेली आहे. यासंबंधी आणखी नवीन निर्णय राज्य सरकारला घेणे आवश्यक आहे. हा विषय सामान्य प्रशासन विभागाच्या संबंधात आहे. मी या सभागृहामध्ये स्पष्ट केलेले आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्यासाठी राज्य सरकारला काही कालावधी लागणार आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : या प्रश्नात अंतर्भूत नसलेल्या बाबींचा निर्णय घेण्यासाठी शासनाला कालावधी लागेल हे मी समजू शकते. या प्रश्नाचा निर्णय हायकोर्टाने दिलेला आहे. माननीय

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

ता. प्र. क्र. 12742 .... प्रा. बी.टी.देशमुख ....

मंत्रिमहोदय सांगत आहेत की, ते टेम्पपरी होते. परंतु ही गोष्ट खरी नाही. त्यांना ड्युली कॉन्स्टीटयूटेड कमिटीने ॲप्रूव्ह करुन रेग्युलर अपॉइन्ट केले होते. दरवर्षी जाहिरात दिली पाहिजे. रिझर्व कॅटेगरीतील उमेदवार मिळाल्यानंतर त्याला जावे लागेल असे प्रत्येक ऑर्डरमध्ये आहे. हायकोर्टाने ते तपासले आहे. शासनाच्या जी.आर.मध्ये असे आहे की, पाच वर्षे त्या कॅटेगरीतील उमेदवार मिळाला नाही तर ताबडतोब ते पद डी-रिझर्व केले पाहिजे. हे सर्व लोक 1990 च्या अगोदरचे आहेत. हायकोर्टाचा निर्णय सुध्दा 2003 मधील आहे. हायकोर्टाचा 2003 चा निर्णय सन 1985 च्या जी.आर.ने ओव्हर रुल करणे बरोबर नाही. अशा प्रकारे काही लोकांना संचालकांनी पद दिले. मंत्रालयाने स्टे दिला. मंत्रालयात चकरा मारल्या. स्टे व्हॅकेट केला आणि ते देऊन टाकले.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, यामध्ये प्रश्नाच्या बाहेरचे बरेच मुद्दे आलेले आहेत. त्याचा निपटारा करुन मी माझा प्रश्न विचारतो. हे लोक दरवर्षी टेम्पररी होते हे म्हणणे चुकीचे आहे. ते ड्युली अपॉइन्टेड तसेच ड्युली ॲप्रूव्हड होते. मग आपण खामगावच्या ज्या 3 लोकांना पद दिले त्यांना आजच्या आज सस्पेंड करा. 4 लोकांनी मंत्रालयामध्ये चकरा मारल्या आणि तुम्ही त्यांना पद दिले. ते देण्याच्या अगोदर स्टे दिला. माझा असा प्रश्न आहे की, माननीय मंत्रिमहोदय जे म्हणत आहेत त्या सर्व मुद्यांचा विचार करुन हायकोर्टाने निर्णय दिला. तो निर्णय एकाच बाबतीत नाही तर अनेक बाबतीत दिलेला आहे. त्यातील काही बाबींच्या कॉपीज निवेदनाला जोडून पाठविलेल्या अहोत. जस्टीस केंद्रे यांनी पत्र लिहिले आहे. हायकोर्ट असे म्हणते की....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपला प्रश्न विचारावा. मी यासंदर्भात असे करतो की, सन्माननीय मंत्रिमहोदय तसेच सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड, सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि इतर अन्य सन्माननीय सदस्य असतील त्यांची 20 तारखेला बैठक बोलवतो.

यानंतर श्री. शिगम ....

(ता.प्र.क्र.12742...)

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, आपण जे सांगितले ते माननीय मंत्री महोदयांना मान्य असेल आणि माननीय मंत्री महोदय हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करणार असतील तर माझी त्याला ना नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आपण जे सुचविले ते योग्य आहे. मिटींग घेण्यास माझी हरकत नाही. तरी देखील ज्या केसेस सादर केलेल्या आहेत त्या विहित कालावधीमध्ये तपासून घेण्यात येतील. तसेच सरकारच्या निर्णयाचा अनादर करुन एखाद्या अधिका-याने निर्णय केला असेल तर त्या अधिका-याला निलंबित केले जाईल.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:25

मौजे विटा (जि.सांगली) येथील माऊली इन्स्टिटय़ूट
या संस्थेतील विद्यार्थ्यांबाबत

(२) * १४१०२ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. यशवंतराव गडाख : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विटा (जि.सांगली) येथे २००३ साली माऊली इन्स्टिटय़ुट ॲड रिसर्च सेंटर पॅरामेडिकल कॉलेजला शासनाने मंजूरी दिली आहे काय,
(२) नसल्यास, या महाविद्यालयाने वृत्तपत्रात जाहिरात देऊन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे काय, असल्यास, किती विद्यार्थीनी प्रवेश घेतला,
(३) सदर महाविद्यालय बोगस असल्याचे सांगून रुग्णालय व्यवस्थापनाने अभ्यासक्रम बंद केल्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा व आर्थिक नुकसानीचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने याबाबत राज्यशासनाची भूमिका काय आहे ?

श्री. सुरेश शेट्टी , श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (१) नाही.
(२) होय. १४ विद्यर्थ्यांनी प्रवेश घेतला होता.
(३) होय.
(४) होय.
(५) सदर संस्था अनधिकृत असल्याचे स्पष्ट आहे. संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द भारतीय दंड संहितेतील कलम ३४ व कलम ४२० अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

श्री. संजय दत्त : या संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पैसे संस्था चालकांनी परत केलेले आहेत काय ? नसल्यास, याबाबत शासन काय कारवाई करणार आहे ? अशा प्रकारे मान्यता नसलेली महाविद्यालये सुरु झाल्यानंतर त्यांच्या विरुध्द तात्काळ कारवाई करण्यासंबंधी शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : याप्रकरणी 18 नोव्हेंबर 2005 रोजी विटा पोलीस स्टेशन, सांगली या ठिकाणी जिल्हाधिका-यांनी गुन्हा दाखल केलेला असून कारवाई चालू आहे. विद्यार्थ्यांनी भरलेले 60 हजार रु. त्यांना परत करण्यात आलेले नाहीत. पोलीस इन्व्हेस्टिगेशन संपल्यानंतर आणि कोर्टाचा निर्णय लागल्यानंतर त्याबाबतीत पुढील कारवराई करण्यात येईल. ज्या नॉन रेकग्नाईज्ड इन्स्टिटयूट महाराष्ट्रामध्ये सुरु होतात त्याबाबतीत जिल्हाधिका-यांकडे तक्रार केली तर तातडीने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारवाई होते. अशी कोणेतीही संस्था विनापरवाना सुरु असेल तर त्याबाबतीत शासन योग्य कारवाई करील.

डॉ. दीपक सावंत : पॅरामेडिकल तसेच अन्य कोर्सेसच्या संदर्भात जून महिन्यामध्ये अशा प्रकारच्या अनेक जाहिराती वृत्तपत्रातून प्रसिध्द होत असतात. अशा प्रकारच्या जाहिरातींच्या संदर्भात कमिटी नेमून आणि त्या जाहिरांतीची सु-मोटो चौकशी करण्याचे धोरण शासन राबविणार आहे काय ? 2003 ते 2005 या वर्षत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असेल तर त्यांचे पुढचे भवितव्य काय आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर सजेशन फॉर ॲक्शन. दुस-या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता त्यांनी परीक्षा दिलेल्या नाहीत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. पॅरॉमेडिकील कोर्सेस, सर्टिफिकेट कोर्सेसच्या संदर्भात अशा जाहिराती येतात ही गोष्ट खरी आहे. प्रश्नाधीन प्रकरणी ॲडिशनल डीएसचओ मार्फत गुन्हा दाखल केलेला असून त्याचा तपास चालू आहे. चौकशी एक्स्पीडाएट करण्यात येईल. राज्यामध्ये आणि देशामध्ये झालेल्या ग्लोबलायझेशन नंतर अनेक वेगवेगळया संस्था, परदेशातील शिक्षण संस्था, युनिव्हर्सिटी ह्या आपापले डिग्री कार्सेस, सर्टिफिकेट कोर्सेस सुरु करतात. हे सुरु झालेले कार्सेस रजिस्ट्रेशन करण्याच्या संदर्भात आपल्याकडे व्यवस्था आहे. हायकोर्टाने देखील याबाबतीत जजमेंट दिलेले आहे. तसेच यासंदर्भात राज्य शासनाने कायद करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. या राज्यामध्ये अशा प्रकारचे कोर्सेस सुरु करण्याबाबत बंधन नसले तरी कोणती शिक्षण संस्था सुरु झालेली आहे, ती काय शिकविते, किती फी घेते या बाबीं बाबत कायद्यामध्ये समावेश असणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. कानडें...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 13:30

ता.प्र.क्र. 14102 पुढे सुरु ....

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

याच्यामध्ये आरक्षण आहे,प्रवेश प्रक्रिया आणि प्रवेश नियंत्रण आहे, तसेच संस्थांची नोंदणी सुध्दा आहे, असे अनेक विषय आहेत. या सगळया गोष्टींचा एकत्रितपणे विचार करुन राज्य सरकार यासंबंधात लवकरच कायदा करणार आहे. या प्रश्नांच्या बाबतीत आगामी शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी राज्य शासन काही ना काही तरी निर्णय निश्चितपणाने घेईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

प्राथमिक शिक्षकांना अशैक्षणिक कामासाठी वेठीस धरल्याबाबत

(३) * १३०२६ श्री. रामनाथ मोते , श्रीमती संजीवनी रायकर , डॉ. अशोक मोडक : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षकांना सार्वत्रिक निवडणुका व जनगणना या व्यतिरिक्त कोणतीही अशैक्षणिक कामे देऊ नयेत असे शासनाने आदेश दिलेले आहेत हे खरे आहे काय,

(२) सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये प्राथमिक शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊन वेठीस धरल्याबाबत सर्व प्राथमिक संघटनांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(३) प्राथमिक शिक्षकांना अशैक्षणिक कामासाठी वेठीस धरणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली ?

श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता (१) होय.

(२) होय, परंतु शौचास उघड्यावर बसू नये अथवा एड्सपासून सावधगिरी बाळगावी याबाबत शिक्षकांनी जनतेस प्रबोधन करणे हा शिक्षणाचा भाग असल्याचे शासनाचे मत आहे.

(३) संघटनेची तक्रार विचारात घेऊन जिल्हा परिषद सिंधुदुर्गने सर्व क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी यांना अशैक्षणिक कामासाठी शिक्षकांना सक्ती न करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक कामाव्यतिरिक्त जी काही अन्य कामे दिली जातात त्यासंदर्भातील हा प्रश्न आहे. अशा प्रकारची अशैक्षणिक कामे देऊ नयेत म्हणून शासनाचे आदेश आहेत. फक्त दोन कामे शिक्षकांनी मान्य केलेली आहेत आणि ती म्हणजे "जनगणना" आणि "सार्वत्रिक निवडणुका" ही कामे शिक्षकांनी स्वीकारली आहेत. या दोन कामांव्यतिरिक्त अन्य कामे शिक्षकांना देऊ नयेत अशा प्रकारचे शासन आदेश आहेत परंतु ते पाळले जात नाहीत. स्थानिक पातळीवर संबंधित प्रशासकीय अधिकारी,गटशिक्षणाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी हे शिक्षकांवर जनगणना,ग्रामपंचायत निवडणुका,महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका ही कामे जबरदस्तीने सोपवितात. ही कामे शिक्षकांनी नाकारली तर तुमच्यावर पोलीस केस करु असा दम दिला जातो. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, वर उल्लेख केल्याप्रमाणे मान्य केलेल्या दोन कामांव्यतिरिक्त शिक्षकांना जी अन्य कामे दिली जातात त्यासंदर्भात ही कामे देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ? तसेच यासंदर्भातील

....२

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३०२६ ....

श्री.रामनाथ मोते ...

सुधारित आदेश शासन पुन्हा एकदा निर्गमित करणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नयेत यासंदर्भात शासनाने २००० मध्ये आदेश निर्गमित केलेले आहेत आणि त्यात स्पष्टपणे सांगितलेले आहे की, शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक कामाव्यतिरिक्त अन्य कोणतेही काम देऊ नये. फक्त जनगणना आणि सार्वत्रिक निवडणुका यासंदर्भातील कामे द्यावयाची आहेत. परंतु स्वच्छता अभियान हे सार्वजनिक काम आहे. शिक्षकांचा समाजामध्ये एक वेगळा दर्जा आहे.....

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, शिक्षकांचा समाजामध्ये ज्याप्रमाणे एक वेगळा दर्जा आहे तसा तो सभागृहात सुध्दा आहे.

सभापती : शासनाने शिक्षकांना जी दोन कामे दिलेली आहेत त्या व्यतिरिक्त अन्य कामे त्यांना स्थानिक पातळीवर देणे योग्य नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यासंदर्भात शिक्षकांच्या युनियनबरोबर चर्चा झाली होती. त्यावेळी लेखी स्वरुपात आणि तोंडी सुध्दा त्यांनी मान्य केले आहे की, आम्ही स्वच्छता अभियानाबाबत सहकार्य करु. तरी सुध्दा पुन्हा एकदा सुधारित आदेश काढून ते जिल्हा परिषदांना पाठविण्यात येतील.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, शिक्षणाची एकदा व्याख्या करण्याची वेळ सरकारवर आली आहे. शौचालयास उघडयावर बसू नये,एड्सपासून बचाव हे विषय शिक्षणामध्ये कधीपासून आले ? हे काम कोण करते ? या कामासाठी शिक्षकांना वेठीस धरावयाचे काय ? एक वेळ शिक्षकांना वेठीस धरतो. अॅपॉलॉजिक बना पण शिक्षणाच्या कामात या विषयांचा समावेश करणार काय ? हे कोणते शिक्षण तज्ज्ञ आहेत ? म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात दिलेल्या उत्तरामध्ये शासन बदल करणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13026 ...

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सामाजिक शिक्षण हा शिक्षकांच्या जबाबदारीचा भाग आहे. सेक्स एज्युकेशन.....

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मी हा प्रश्न राखून ठेवत आहे.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) वडापुरी येथील इंदिरा आवास घरकुल योजनेस मंजूरी मिळण्याबाबत

(४) * १६६०१ डॉ. निलम गोऱ्हे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर तालुक्यातील (जि.पुणे) वडापुरी येथील इंदिरा आवास घरकुल योजनेच्या मंजूरीस प्रशासन जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याच्या निषेधार्थ इंदापूर पंचायत समिती किंवा तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी माहे जानेवारी,२००६ रोजी वा त्या सुमारास दिला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंदिरा आवास घरकुल योजनेस अद्याप मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे,श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता : (1) होय.

(२) उद्दिष्टापेक्षा अधिक लाभार्थीची निवड ग्रामसभेने केली. त्यामुळे मंजूरी देता आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, इंदापूर तालुक्यातील वडापुरी गावातील जे बेघर लोक आहेत, त्यांना इंदिरा आवास घरकुल योजने अंतर्गत घर मिळण्यासंबंधीचा प्रश्न आहे. सदर घरकुल मिळण्यासंबंधी भटक्या विमुक्य संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी गेले वर्षभर आंदोलन सुरू केले आहे. शासनाने लेखी उत्तरात नमूद केले आहे की, 'उद्दिष्टापेक्षा अधिक लाभार्थीची निवड ग्रामसभेने केली, त्यामुळे मंजुरी देता आली नाही.' तेव्हा या गावामध्ये एकूण किती घरकुल मंजूर झाली व प्रत्यक्षात किती लाभार्थींना घरांचे वाटप आता पर्यंत झाले आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, अनुसूचित जाती व जमातीसाठी 9 व इतरांसाठी 6 अशी मिळून एकूण 15 घरकुल मंजूर झाली होती. यापैकी 13 जणांना घरे मिळाली आहेत. यात 5 अनुसूचित जमातीचे, 2 अनुसूचित जातीचे आणि 6 अन्य लाभार्थी आहेत.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, हा प्रश्न इंदापूर तालुक्यामध्ये नसून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून घरकुलांची यादी निश्चित केली जाते. परंतु, उद्दिष्टांएवढी नावे पाठविली जात नाहीत. तेव्हा जेवढे उद्दिष्ट असते तेवढीच नावे पाठविण्यासंबंधीचे आदेश शासन देणार आहे काय ? उद्दिष्टांपेक्षा जास्त नावे पाठविली जात असल्यामुळे डी.आर.डी.ए.कडे व्यवसाय म्हणून बघितले जात आहे.

....2..

ता.प्र.क्र.16601 .....

श्री.चंद्रकांत रघुवंशी....
जो पैसा देतो त्यालाच घरकूल मंजूर होते. त्यामुळे जेवढे उद्दिष्ट असते तेवढीच नावे पाठविण्यासंबंधीचे आदेश शासन देणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाचे आदेश स्पष्ट आहेत. जेवढे उद्दिष्ट असते, तेवढीच नावे ग्रामपंचायतीने पाठविली पाहिजेत. तरी सुध्दा यासंबंधीचे आदेश पुन्हा देण्यात येतील.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.16601....

श्री.पांडुरंग फुंडकर : या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. मी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शासनाच्या जी.आर.मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ग्रामसभेच्या ठरावानुसार घरकुले द्यावयास पाहिजेत. मी जबाबदारीने वक्तव्य करीत आहे की, अकोला आणि वाशिम जिल्हयांमध्ये शासनाचा जी.आर.डावलून, ग्रामसभेचा प्रस्ताव डावलून इतकेच नव्हे तर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सदस्यांनी पैसे घेऊन घरकुलांची शिफारस केली. त्यामुळे अशा गैरमार्गाने ज्यांना घरकुले मिळाली आहेत त्यांची चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली आहे त्याची चौकशी ताबडतोब करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील पर्यटन स्थळांच्या विकासाबाबत

(५) * १३२१० श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. अनंत तरे : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यटनस्थळांच्या विकासाकरीता केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने ८.२१ कोटीच्या निधीला दिनांक ४ जानेवारी, २००५ वा त्या सुमारास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीतून कोणत्या पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येणार आहे,
(३) महाराष्ट्रात एकूण किती पर्यटन स्थळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अखत्यारित आहेत,
(४) सर्वच पर्यटन स्थळांच्या विकासाबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.सुरेश शेट्टी, **श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता** : (१) नाही. तथापि केंद्र शासनाने रु. ११९५.९३ लक्ष इतका निधी सन २००४-२००५ करिता महामंडळास वितरीत केलेला आहे.
(२) आर्थिक वर्ष २००४-०५ मध्ये केंद्र शासनाने खालील पर्यटन स्थळांना निधी मंजूर केला आहे. १) महाबळेश्वर स्थळ विकास २) कोकण रिव्हेरा सर्कीट-२ आंबोली , धामापूर, उभादांडा-जि. सिंधुदुर्ग एरंगळ-जि. मुंबई, अक्षी-नागांव, दिवेआगार-जि. रायगड ३) मालशेजघाट स्थळ विकास ४) मुंबई महोत्सव ५) एलिफंटा महोत्सव ६) एलोरा महोत्सव ७) संगणीकीकरण ८) पर्यटक अभ्यागत केंद्र, मुंबई ९) अजंता फूटहिल उपहारगृह नुतनीकरण
(३) म.प.वि. महामंडळाने महाराष्ट्रात एकूण ५४ ठिकाणी पर्यटकांसाठी सुविधा निर्माण केल्या असून यामध्ये निवास व्यवस्था, उपहारगृह इत्यादींचा समावेश आहे. यापैकी काही ठिकाणी महामंडळामार्फत सुविधा पुरविल्या जातात.
(४) शासन निर्णय क्र. एमटीसी-१०९६/प्र.क्र. ५२३ /पर्यटन दि. ८.११.१९९६ अन्वये पर्यटन स्थळाचे निवड व निकष ठरविण्यात आलेले आहे. वर्गवारी अ,ब,क, अशी करण्यात आली आहे. "अ" वर्गामध्ये आंतरराष्ट्रीय किर्तीच्या स्थळांचा समावेश आहे. उदा. अजंठा-एलोरा-एलिफंटा लेणी इ. "ब" वर्गामध्ये शासनाने विकसित करावयाच्या स्थळांचा समावेश आहे. एकूण ३७ स्थळे आहेत. "क" वर्गामध्ये स्थानिक पातळीवरील स्थळांचा समावेश करण्यात आलेला आहे. या "क" वर्ग स्थळांचा विकास जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत केला जातो.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने माझे दोन उपप्रश्न आहेत. केंद्र सरकारने सन 2004-05 मध्ये पर्यटन विकास महामंडळाला दिलेल्या निधीपैकी आतापर्यंत किती रक्कम खर्च झाली ? तसेच उत्तरामध्ये नमूद केलेल्या पर्यटन स्थळांपैकी किती पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या संदर्भातील सविस्तर माहिती उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13210....

श्री.मुझफ्फर हुसेन : महोदय, प्रश्नातील उपप्रश्न क्र.4 ला असे उत्तर देण्यात आले आहे की, "क" वर्ग स्थळांचा विकास जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फत केला जातो. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ठाणे तालुक्यातील डहाणू बीच आणि वसई तालुक्यातील वज्रेश्वरी यांचा समावेश या पर्यटन स्थळांमध्ये केला आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "क" वर्ग स्थळांचा पर्यटन विकास डी.पी.डी.सी.मार्फत करावा लागतो. त्यामुळे या पर्यटन स्थळांचा विकास करण्याचे प्रस्ताव त्यांनी डी.पी.डी.सी.मधून घ्यावेत. अतिरिक्त मदत लागली तर डी.पी.डी.सी. मार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे प्रस्ताव पाठवावेत, शासन योग्य ती मदत करेल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " "अ" वर्गामध्ये आंतरराष्ट्रीय कितीच्या स्थळांचा समावेश आहे. उदा.अजंठा-एलोरा-एलिफंटा लेणी इ. "ब" वर्गामध्ये शासनाने विकसित करावयाच्या स्थळांचा समोवश आहे." परंतु आतरराष्ट्रीय किर्तीची कार्ला लेणी सुध्दा आहे. त्यामुळे या लेणीसाठी किती निधी देण्याचे शासनाने मान्य केले आहे. कारण माननीय मंत्री महोदयांनी लोणावळा येथे घोषणा केली होती की, कार्ला लेणी पर्यटन क्षेत्र म्हणून निर्माण करु. मग या घोषणेचे काय झाले ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कार्ला लेणी या कार्यक्रमामध्ये घेतली नाही. तरी सुध्दा या बाबतचा प्रस्ताव आम्ही तपासून पाहू. कार्ला लेणी पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याबाबत मी घोषणा केली होती हे मान्य आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे सुध्दा उपस्थित होते. आपण जेव्हा महाराष्ट्राची पर्यटन पॉलिसी ठरविणार आहोत, त्यामध्ये हिल स्टेशनचा सेप्रेट विचार करु. टुरिझम पॉलिसी तयार झाली असून, कॅबिनेटमध्ये त्या पॉलिसीला ॲप्रूव्हल घेण्याची आवश्यकता आहे. त्या पॉलिसीमध्ये हिल स्टेशन संदर्भातील बाब समाविष्ट केली आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, आपण महाराष्ट्रातील संपूर्ण पर्यटन स्थळांसाठी निधी दिला आणि त्यातील काही खर्च सुध्दा केला आहे. मी या निमित्ताने विचारु इच्छितो की, यामध्ये विदर्भातील कोणकोणत्या पर्यटन स्थळांचा समावेश करण्यात आला आहे ? त्यासाठी किती निधी मंजूर झाला आहे ? आणि किती निधी खर्च केला आहे ?

..4..

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 13:40

ता.प्र.क्र.13210....

श्री.सुरेश शेट्टी : महोदय, माझ्याकडे विदर्भाच्या पर्यटनस्थळांसंदर्भातील फिगर्स सध्या उपलब्ध नाहीत. पर्यटनासंदर्भात या सभागृहामध्ये चर्चा होणार आहे. त्यामुळे त्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देता येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी अनेक पर्यटन स्थळांच्या संदर्भात उल्लेख झाला आहे. परंतु मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, "मुंबई महोत्सव" हा सुध्दा एक महत्वाचा भाग आहे. आपण उत्तरामध्ये नमूद केले आहे की, राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारकडून 1195.93 लाख रुपये वितरित झालेले आहेत. त्याचे ॲलोकेशन कसे आहे ? माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, मुंबई महोत्सव कोण आयोजित करतो ? ती शासकीय यंत्रणा आहे की, खाजगी यंत्रणा आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : मुंबई फेस्टीवल सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला जातो.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ SBT/ MAP यापूर्वी श्री. बोर्डे .. 13.45

ता.प्र.क्र. 13210 ....

श्री. सुरेश शेट्टी ....

यावर्षी सुध्दा झाला. तो सुंदर फेस्टिव्हल होता. मुंबई फेस्टिव्हल ऑर्गनायझेशन एक एन.जी.ओ. आहे. यांनी केंद्र सरकारला ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, ही संस्था खाजगी आहे की शासकीय आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही शासकीय संस्था नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा होता की, या सगळ्या रकमेचे ॲलॉकेशन कशापध्दतीने केले आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, ही सर्व प्रपोजल आम्ही केंद्र सरकारला पाठवितो. तेथून ती प्रपोजल्स सँक्शन होऊन येतात.

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, या ठिकाणी उत्तरामध्ये, 1195 कोटी रुपयांचे वाटप केले असल्याबाबत सांगण्यात आले आहे. केंद्र सरकारकडून आलेली मदत ही फक्त महाबळेश्वरसाठी आहे अशी आमची माहिती आहे. त्यामध्ये राज्य शासनाने त्यांचा वाटा समाविष्ट केलेला नाही. तरी, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाबळेश्वर पर्यटन स्थळाच्या विकास कामासाठी केंद्र सरकारने पाचशे कोटी रुपये निधी मंजूर केला होता. त्या संदर्भात मला असे वाटते की, त्यासाठी 250 कोटी व 150 कोटी रुपयांचा निधी वितरित झालेला आहे. या स्कीममध्ये राज्य शासनाचा कोणताही वाटा नाही. ही स्कीम पूर्णपणे केंद्र शासन पुरस्कृत आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी उत्तरामध्ये, सिंधुदुर्गासंदर्भात कोकण रिव्हेरा सर्कीट - 2 अंतर्गत काम घेतलेले आहे, असे सांगण्यात आले आहे. सभापती महोदय, कोकण रिव्हेरा सर्कीट - 2 यांसारख्या कामांसाठी 11 कोटी 95 लक्ष रुपये आलेले आहेत. तरी, या संदर्भात शासनाने मॅचिंग ग्रॅन्ट घातलेली आहे का ? सभापती महोदय, दुसरे असे की, कोकण रिव्हेरा सर्कीट - 2 अंतर्गत केंद्र शासनाने, विजयगडसाठी 2 कोटी रुपये, जयगडसाठी 2 कोटी रुपये आणि सिंधुदुर्गासाठी 1 कोटी रुपये अशा 5 कोटी रुपयांचा या पैशामध्ये अंतर्भाव केलेला आहे का ? की, या रकमा स्वतंत्र आहेत ? ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13210 ....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कोकण रिव्हेरा सर्कीट 1 व 2 संदर्भात पैसे आलेले आहेत. त्यांचे काम सुरु आहेत. ही एन.जी.ओ.ची स्कीम आहे. सभापती महोदय, सभागृहात पर्यटनासंदर्भात एक प्रस्ताव आहे, त्यावेळी या संदर्भातील माहिती मी आपल्याला देईन.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन 2004-2005 मध्ये केंद्र शासनाने पर्यटनासाठी वितरित केलेल्या रकमेमध्ये विदर्भातील किती ठिकाणे आहेत ? आणि नसतील तर का नाहीत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आज पर्यटनासंबंधी प्रस्ताव आहे, त्यावेळी मी या संदर्भातील सर्व डिटेल्स देईन.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाची नोटीस दिलेली आहे. संबंध राज्यासाठी हा निधी उपलब्ध झाला आहे. मग त्यामध्ये अशाप्रकारे दुर्लक्ष होण्याचे कारण काय आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन 2004-05 मध्ये केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला जो निधी आला, तो महाबळेश्वर पर्यटनस्थळासाठी आला आहे, कोकण रिव्हेरा सर्कीट - 2 साठी आलेला आहे. विदर्भासाठी यामध्ये कोणतीही तरतूद नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, टुरिझम पॉलिसीसंदर्भात तरतूद केली आहे. त्यामध्ये विदर्भामधील ठिकाणे पर्यटन स्थळे करण्यासाठी इको टुरिझम कौऊन्सिल प्रपोजल तयार केले आहे. त्या अंतर्गत संपूर्ण विदर्भात कशाप्रकारे पर्यटन स्थळे विकसित करावयाची आहेत या संदर्भात विचार केला जाणार आहे.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, सन 2004-05 मध्ये किती पर्यटनस्थळांना मंजूरी देण्यात आली आहे, याचे उत्तर देण्यात आले आहे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ SBT/ प्रथम श्री. कांबळे... 13:50

ता.प्र.क्र.13210..

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील...

निरनिराळया योजनांचे प्रस्ताव पाठविलेले आहेत, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबत सरकारची भावना निश्चितपणे आपुलकीची आहे, सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, यानंतर जी चर्चा होणार आहे, त्यामध्ये सविस्तर माहिती देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण पुढे काय करणार हा प्रश्न मी विचारलेला नाही माझा प्रश्न असा आहे की, सन 2004-2005 मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये पर्यटनासाठी निधीचे वाटप करीत असतांना विदर्भाला निधी न देण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, केंद्र शासनाकडून पर्यटन विकासासाठी पैसा येतो, तो कीती प्रोजेक्टला वाटप केला त्यासंदर्भातील प्रश्न विचारण्यात आलेला आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, केंद्र सरकारकडे तुम्ही जे प्रस्ताव पाठवितात ते प्रस्ताव शासनाकडून जातात, त्यामध्ये विदर्भाच्या पर्यटनांचा समावेश आपण केलेला नाही, अशी माझ ी माहिती आहे, माझी माहिती चुकीचे असेल तर आपण तसे सांगा, पर्यटन स्थळे कोठे घ्यावयाची याची निवड केंद्र सरकार करते काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, केंद्र सरकारकडे महाराष्ट्र सरकारकडून प्रस्ताव पाठविण्यात येतात.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवितांना विदर्भातील एकही पर्यटनस्थळ सरकारले दिसले नाही काय ? यासंदर्भातील उत्तर देण्यात यावे, उत्तर घेण्याचा आमचा अधिकार नाही काय ? केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवितांना विदर्भाचा आम्हाला विसर पडला असे तरी आपण सांगा ?

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना मी जबाबदारीने विचारात घेत आहे, महाराष्ट्रातील सर्व विभागांना समान न्याय मिळाला पाहिजे या मध्ये कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. कोणताही हेतू ठेऊन येथे काम झालेले नाही. राज्य सरकारकडून मोझरी पर्यटन स्थळाचा प्रस्ताव पाठविला होता, परंतु केंद्र सरकारकडून अजून त्या प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही. आता पुढील वर्षी पर्यटन स्थळांच्या विकासासाठी 12 व्या वित्त आयोगाकडून निधी येणार आहे, युको टुरिझमच्या माध्यमातून पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येणार आहे.

......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13210..

सभापती : दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांची भावना अशी आहे की, राज्यामध्ये एखादा कार्यक्रम निश्चित करतांना सर्व विभागाला त्याचे प्रतिनिधित्व दिले गेले पाहिजे. त्या त्या विभागातील पर्यटन स्थळांच्या विकासासाठी तो निधी दिला गेला पाहिजे, या अनुषंगाने विदर्भातील पर्यटन स्थळांची नांवे केंद्र सरकारकडे पाठविली होती काय ? असतील तर त्याची यादी सांगा, व त्यावर राज्य सरकारने काही तरतूद केलेली आहे काय ? असा दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, मोझरी पर्यटन स्थळाच्या विकासाचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला होता, त्यास अजून मान्यता मिळालेली नाही. तसेच बुलढाणा जिल्हयातील लोणार पर्यटन स्थळाच्या विकासासाठी 2 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे तेथे काम सुध्दा सुरु झालेले आहे. यापुढे 12 व्या वित्त आयोगातून राज्य सरकारला पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी निधी मिळणार आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) L 1

DGS/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ 13:55

ता.प्र.क्र. 13210...

श्री. विजयसिंह मोहिते पाटील...

पर्यटन विभागासाठी गेल्या वर्षी फार कमी निधी मिळाला त्यामुळे पर्यटनाच्या संदर्भात आपण फार काम करु शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु आता 12 व्या वित्त आयोगाकडून आपल्याला पैसे मिळणार आहेत. ते पैसे मिळाल्यानंतर घ्यावयाच्या कामांमध्ये माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे विदर्भातील पर्यटन स्थळांच्या कामांचा समावेश करण्यात येईल.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने दुसऱ्या एका महत्वाच्या मुद्दयाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. या राज्यामध्ये काही ऐतिहासिक किल्ले आहेत, नैसर्गिकदृष्टया सुंदर असलेली तीर्थस्थळे आहेत. या तीर्थस्थळांचा विकास करण्याची योजना आखून बराचा कालावधी लोटला. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील पंढरपूर, कोल्हापूर, विदर्भातील शेगाव या तीर्थस्थळांचा समावेश होता. या तीर्थस्थळांच्या विकासासाठी ठराविक रक्कम मंजूर करण्यात आली होती. त्याप्रमाणे या तीर्थस्थळांच्या विकासासाठी दरवर्षी निधी दिला जात आहे काय?

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याकरिता वेगळा प्रश्न विचारला पाहिजे. तरीसुध्दा सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, किल्ल्यांच्या दुरुस्तीचे काम हे सांस्कृतिक कार्य विभागाचे असून तीर्थक्षेत्र विकासाचे काम ग्राम विकास विभागाचे आहे. आणि महानगरपालिका क्षेत्रातील कामे नगर विकास विभागाच्या अखत्यारीत येतात.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी अतिशय साधा प्रश्न विचारला आहे. सन 2004-05 मध्ये केंद्र सरकारकडून 1195.93 लक्ष रुपये महामंडळाकडे आल्यानंतर त्या पैशाचे वाटप करीत असतांना त्यामध्ये विदर्भाचा समावेश केला होता काय? असल्यास, किती रकमेचा प्रस्ताव करण्यात आला? असा प्रश्न विचारण्यात आला. सभापती महोदय, या राज्यामध्ये प्रत्येक बाबतीत विदर्भावर अन्याय होत आहे. सिंचनाच्या बाबतीत अन्याय होत आहे. त्याप्रमाणे पर्यटनाच्या बाबतीत सुध्दा अन्याय होत आहे. निधीचे वाटप करीत असतांना विदर्भाला एका नव्या पैशाची देखील मदत करण्यात आली नाही. लोणार महोत्सवामध्ये माननीय ग्राम विकास मंत्री उपस्थित होते. बुलढाणा जिल्हयातील लोणार सरोवर पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यासंबंधी वर्षानुवर्षे मागणी आहे. त्यासाठी आपण प्रस्ताव तयार केलेला नाही...

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) L 2

DGS/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ 13:55

ता.प्र.क्र. 13210...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : मी त्या ठिकाणी गेलो होतो. माझ्या माहितीप्रमाणे लोणार सरोवर विकासासाठी 2 कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली असून त्या ठिकाणी काम चालू आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : या 11 कोटी रकमेचे वाटप करीत असतांना त्यामध्ये विदर्भाला योग्य वाटा देणार काय?

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, प्रत्येक पर्यटन क्षेत्राचा प्रस्ताव तयार करुन तो केंद्र सरकारकडे पाठविला जातो. लोणार सरोवरासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्याठिकाणी जमिनीची धूप होऊन नुकसान होऊ नये यासाठी कंपाऊंड बांधणे इत्यादी कामांसाठी 2 कोटी रुपयांच्यावर आणखी काही रक्कम मंजूर करण्यात आली आहे. त्यासंबंधीची निश्चित आकडेवारी आता माझ्याकडे उपलब्ध नाही. प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणी लोकांची रहाण्याची व्यवस्था पर्यटन विभागाने केली आहे.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चाबके-तळावली, (ता.विक्रमगड, जि. ठाणे) येथील शासन अनुदानीत निवासी आश्रमशाळेचा वीजपूरवठा सुरळीत करण्याबाबत

(६) * १६७५३ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाबके-तळावली, (ता.विक्रमगड, जि. ठाणे) येथील शासन अनुदानीत निवासी आश्रमशाळा (वात्सल) सन २००३ पासून सुरु असताना शाळेला वीज पुरवठा केला जात नसल्याची तक्रार सदर संस्थेने मा. ऊर्जा मंत्री, सचिव आदीना सन २००६ मध्ये दिलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही या शाळेला वीज पुरवठा केलेला नाही हे ही खरे काय,

(३) १० वर्षाखालील वयाची १७६ मुले रात्री अंधारात तेथे राहत असल्याने त्यांच्या जीवीतांच्या रक्षणासाठी त्वरीत वीज पुरविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) होय, अशी तक्रार ऊर्जा विभागास दिनांक ८ फेब्रुवारी, २००६ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) चाबके-तळावली येथील शासन अनुदानीत आश्रम शाळेसाठी विद्युत पुरवठ्याच्या मागणीबाबतचा रितसर अर्ज (अे-१ अर्ज) मा. मुख्याध्यापक (वात्सल्य) प्राथमिक आश्रमशाळा यांचेकडून विद्युत वितरण कंपनीकडे दिनांक ८-३-२००६ रोजी प्राप्त झाला आहे. सदर शाळेस विद्युत पुरवठा करण्यासाठीच्या अंदाजपत्रकास जिल्हा नियोजन व विकास समिती निधीतील तरतूदीतून रु. २८,३००/- एवढ्या रक्कमेस दिनांक २४-३-२००६ रोजी सर्वसाधारण विकास (आदिवासी) अंतर्गत मंजूरी देण्यात आली आहे. तसेच विद्युत पुरवठा जोडणीसाठी आवश्यक असलेली रक्कम रु. ३,१००/- भरण्यासाठी मागणीपत्र देण्यात आले आहे. मा. मुख्याध्यापकांकडून मागणीपत्राची सर्विस कनेक्शनची रक्कम रु. ३,१००/- व विद्युत चाचणी अहवाल प्राप्त होताच सदर शाळेस विद्युत पुरवठा करण्याचे काम हाती घेऊन विद्युत पुरवठा देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** १६७५३ ...**

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तराच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये मी आपल्या अनुमतीने पुढील प्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो, "सर्व्हिस कनेक्शनची रक्कम रु.३१०० दिनांक १२.४.२००६ रोजी प्राप्त झाली असून या योजनेसाठी लागणारा टेस्ट रिपोर्ट दिनांक १०.४.२००६ रोजी प्राप्त झाला आहे व संस्थेला दिनांक २२.४.२००६ पर्यंत कनेक्शन देण्यात येईल"

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या संस्थेने माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांना निवेदन दिले होते. ही आश्रमशाळा २००३ मध्ये सुरु झाली तेव्हापासून जवळपास १७६ मुले त्या ठिकाणी राहात आहेत. त्या आश्रमशाळेला विद्युत पुरवठा झाला पाहिजे अशी वारंवार मागणी होत आहे. प्रश्न स्पेसिफिक आहे की, गावातील ग्रामपंचायतीच्या राजकारणामुळे त्यांना ना हरकत प्रमाणपत्र विद्युत मंडळाने मागितले ते ना हरकत प्रमाणपत्र विद्युत मंडळाला दिले गेले नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 14:00

ता.प्र.क्र.16753 (पुढे सुरु...

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

अशा आश्रमशाळांच्या संस्थांना ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र, जागा मालकाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याच्या अडचणीमुळे तीन-चार वर्षे तेथील मुले अंधारात रहात असतील तर अशा आश्रमशाळांना विद्युत पुरवठा करण्याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, त्या संस्थेकडून विद्युत पुरवठ्याची मागणी दिनांक 8-3-2006 रोजी आली.

श्री.पांडुरंग फुंडकर : या संस्थेने वारंवार मागणी केलेली आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : त्यांच्याकडून दिनांक 8 मार्च रोजी विद्युत पुरठा करण्याच्या संदर्भातील अर्ज आला. या संदर्भातील टेस्टींग रिपोर्ट 17 मार्चपर्यन्त आला. त्यांना 22 तारखेपर्यन्त कनेक्शन देण्याचे मान्य केलेले आहे. सदरची आश्रमशाळा ही खाजगी मालकीच्या जागेमध्ये असल्यामुळे वीज मंडळाचा नियम आहे की, विद्युत कनेक्शन पाहिजे असेल तर मूळ मालकाचे ना हरकत प्रमाण पत्र आहे. त्याशिवाय विद्युत पुरवठा करता येत नाही. तरी देखील आदिवासी आणि समाजकल्याण विभागाच्या आश्रमशाळांना विद्युत पुरवठा करण्याच्यासंदर्भातील अडचणींचा विचार करुन आदिवासी आणि समाजकल्याण विभागाचे आयुक्त आहेत, त्यांच्यामार्फत 3001 रुपये भरण्याच्या दृष्टीने तसेच त्यांच्याकडून अशा आश्रमशाळांचे अर्ज घेण्याच्या संदर्भात येत्या महिना,दीड महिन्यामध्ये बैठक घेतली जाईल. या शासकीय एजन्सीनी त्याबाबतची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर ताबडतोबीने त्यांना वीज पुरवठा करण्याच्याबाबतीत धोरण स्वीकारण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्रीमहोदयांकडून अशाप्रकारचे उत्तर अपेक्षित नव्हते. त्या ठिकाणी 2003 साली "वात्सल्य" या संस्थेने आश्रमशाळा सुरु केली. त्या संस्थेचा व्यवसाय नाही. 10 वर्षाची 176 मुले त्या ठिकाणी आहेत. 2006 पर्यन्त त्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीकडून त्याबाबतची एन.ओ.सी. मिळाली नाही. आदिवासी क्षेत्र आहे. आदिवासी आयुक्तांनी 3,001 रुपये भरण्याबाबतची अपेक्षा केलेली आहे. त्या संबंधाने आदिवासी आयुक्त आणि समाजकल्याण आयुक्तांशी चर्चा करणार आहात. हे सगळे करण्याच्या ऐवजी हा लहान प्रश्न आहे. तीन वर्षे झाली 176 मुलांना अंधारामध्ये रहावे लागते. हे शासनाला भूषणावह नाही. ती आदिवासी मुले आहेत. त्यांच्याबाबतीत अशापध्दतीने राजकारण होणे बरोबर होणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण संवेदनशील मंत्री आहात, आपल्याकडून उत्तर हवे आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.16753 (पुढे सुरु...

श्री.दिलीप वळसे-पाटील : त्या आश्रमशाळेने वीज नाही म्हणून वीज मंडळाकडे अर्ज केला पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : त्यांनी अर्ज केलेला आहे. मला संस्थेचे प्रतिनिधी भेटलेले अहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज करुन विनंती केलेली आहे, परंतु त्यांच्याकडून न्याय मिळालेला नाही.

श्री.दिलीप वळसे-पाटील : विशिष्ट प्रकरणाच्या संदर्भात संबंधित संस्थेने अर्ज केला असेल आणि वीज मंडळाचे कर्मचारी जाणूनबुजून वीज पुरवठा करण्यास विलंब करत असतील तर संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द कारवाई करण्यात येईल. या राज्यातील समाजकल्याण आणि आदिवासी कल्याण विभागाच्या आश्रम शाळांतील मुले अंधारामध्ये राहू नयेत, म्हणून त्या संस्थांनी आमच्याकडे अर्ज करण्याऐवजी आदिवासी कल्याण आयुक्त आणि समाजकल्याण आयुक्त यांच्याकडून माहिती घेण्यासाठी चर्चा करण्यात येईल. कोणकोणत्या आश्रम शाळांमध्ये विद्युत पुरवठा झालेला नाही, याची माहिती घेऊन पुढील कार्यवाही केली जाईल.

सभापती : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

<u>हरकतीच्या मुद्यासंबंधी</u>

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्नाविषयी हरकतीचा मुद्दा आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 10 वर "गुड मेडिकल प्रॅक्टीसची अंमलबजावणी करण्या"च्या संबंधातील प्रश्न आहे. परंतु या संबंधात विधिमंडळ कार्यालयातील कक्ष अधिकाऱ्यांकडून मला पत्राने कळविलेले आहे की, "विभागाने पाठविलेला खुलासा पहाता, आपला प्रश्न माननीय सभापतींनी अस्वीकृत केलेला आहे." परंतु या ठिकाणी माझा 10 क्रमांकावर प्रश्न आहे. याबाबत चौकशी करण्यात यावी.

सभापती : याबाबत निश्चित चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी माझ्या कार्यालयात येऊन मला भेटावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही लक्षवेधी सूचना आपल्या कार्यालयात देतो परंतु त्या सभागृहाच्या पटलावर चर्चेला येत नाहीत.....

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

माझी अशी माहिती आहे की, आम्ही प्रश्न दिल्यानंतर ते लोक आम्हाला भेटतात. ते लक्षवेधी सूचना आणि प्रश्नाशी संबंधित असलेल्या खात्यांकडे जातात. प्रश्न लागेल की, नाही ते आम्ही ठरवू असे सांगितले जाते. अनेक प्रश्न रिजेक्ट होतात. याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ही गोष्ट आपल्या विधिमंडळाची प्रतिष्ठा वाढवणारी नाही. आपण लक्षवेधी सूचना आणि प्रश्नांच्या बाबतीत लक्ष घालावे. आम्ही जे दिलेले आहे ते स्वीकारले पाहिजे.

सभापती : मी याबाबतीत माननीय विरोधी पक्षनेते आणि गट नेते यासगळ्यांची बैठक उद्या बोलवण्याची व्यवस्था करतो. त्यामध्ये आपण याबाबतीत चर्चा करु.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, याबाबतीत लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती : मी लक्ष देईन.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

पृ.शी.: राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्यावर विधानसभेत आणलेला हक्कभंगाचा प्रस्ताव

मु.शी.: राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्यावर विधानसभेत आणलेल्या हक्कभंगाच्या प्रस्तावाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील निवेदन करीत आहे.

राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्यावर विधानसभेत हक्कभंगाचा प्रस्ताव देण्यात आल्यानंतर त्यांनी विधिमंडळ व मुख्यमंत्री यांच्या संदर्भात वृत्तपत्रादी माध्यमातून जे निवेदन दिले आहे त्याविषयी काही बाबी या सभागृहात मांडणे संयुक्तिक ठरेल असे मला वाटते.

श्री. नंदलाल यांनी शासनाला पत्र लिहून (1) मुंबई महानगरपालिका अधिनियम 1988, (2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, (3) नागपूर महानगरपालिका अधिनियम 1950, (4) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 आणि (5) महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम, 1961 या 5 अधिनियमांमध्ये बदल करुन ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्यानंतर पुढे पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकांवरही पर्यवेक्षण अधिकार देण्यात यावे अशी मागणी केली होती. त्यासंदर्भात राज्याच्या तत्कालीन महाअधिवक्ता याचे मत घेण्यात आले असता त्यांनी असे कायदे बदलणे शक्य नाही असे मत दिले होते.

श्री. नंदलाल हे प्रत्यक्ष महाअभियोक्ता यांना भेटून या संदर्भात आपली बाजू मांडली होती. सध्याचे महाअभियोक्ता यांचेही मत वरील कायद्यासंदर्भात तत्कालीन महाअभियोक्ता यांच्या मतासारखेच आहे. श्री. नंदलाल यांनी महाअभियोक्ता यांनी दिलेला सल्ला मान्य नसल्याचे स्पष्ट करुन या अनुषंगाने माननीय राज्यपालांनी राज्य शासनाला निर्देश द्यावेत असे पत्र दिले होते. मात्र माननीय राज्यपालांकडून या पत्राच्या उत्तराची वाट न बघता त्यांनी वरील कायद्यात बदल करण्याचा अधिकार आपणास आहे असे समजून पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार आपल्याकडे घेतले.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

कायदा करण्याचा आणि त्यात बदल करण्याचा अधिकार विधिमंडळाला आहे. हे अधिकार कोणी हिरावून घेत असतील तर याबाबत विधिमंडळ सदस्य संतप्त होणे स्वाभाविक आहे. सदस्यांच्या दृष्टीने ही संवेदनशील बाब असल्यामुळे हक्कभंग प्रस्ताव जेव्हा विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्य प्रा. चांदूरकर यांनी ठेवला त्यास कोणीही विरोध केला नाही व तो प्रस्ताव एकमताने संमत करण्यात आला. हा ठराव संमत झाल्यानंतर श्री. नंदलाल यांनी पत्रकार परिषदेमध्ये आपणावर हक्कभंग आणण्याचा अधिकार विधिमंडळाला नसल्याचे निवेदन दिले तसेच हा हक्कभंग ठराव आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सभागृहावर दबाव आणला असेही त्यांनी वक्तव्य केले. सन्माननीय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, या सर्वोच्च सभागृहावर कोणत्याही मुख्यमंत्र्याला दबाव आणणे व प्रभाव पाडणे शक्य आहे काय ? या सर्वोच्च सभागृहावर मुख्यमंत्री दबाव आणतात असे म्हणणे सुध्दा या सभागृहाचा हक्कभंग ठरतो असे मला वाटते. या सर्वोच्च सभागृहात कोणत्याही प्रकारचा दबाव वा प्रभाव कोणीही आणू शकत नाही याची मला स्पष्ट जाणीव आहे. म्हणून मला हा खुलासा करावा लागत आहे.

महाराष्ट्र हे देशातील लोकशाही प्रथा व परंपरांचा आदर करणारे एक आदर्श असे राज्य आहे. या राज्यात लोकशाही मूल्यांच्या जपणुकीला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. कोणताही पक्ष सत्तेत असला तरी स्थनिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या वेळेवरच झाल्याचे आपणा सर्वांना ठाऊक आहे.

अतिवृष्टी, दुष्काळ, महापूर अशासारख्या काही अपवादात्मक परिस्थितीत या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या आहेत. 2005 मध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन ऑगस्ट, 2005 मध्ये जाहीर केलेल्या निवडणुका पुढे ढकलण्याची विनंती राज्य शासनाने निवडणूक आयोगास केली होती. सभापती महोदय, त्यावेळी 11 जिल्हे पाण्याखाली होते. अशा काळात निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. तेव्हा त्यांना विनंती केली की, आपण या निवडणुका पुढे ढकलल्या पाहिजेत. कारण सगळी शासकीय यंत्रणा पुनर्वसन आणि मुदत कार्यामध्ये गुंतलेली होती. ती विनंती राज्य निवडणूक आयुक्तांनी मान्य न केल्याने शासनाला

..4...

RDB/ MHM/ KGS/

श्री. विलासराव देशमुख ....

त्यांच्याविरुध्द न्यायालयात जावे लागले. उच्च न्यायालयाने 10 ऑगस्ट, 2005 च्या आदेशात असे नमूद केले की, अतिवृष्टी व पुरामुळे राज्यात निवडणुका घेणे शक्य नाही असे नमूद करुन राज्य निवडणूक आयुक्तांनी जाहीर केलेला निवडणूक कार्यक्रमही रद्दबातल ठरवला व नव्याने निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. याचाच अर्थ न्यायालयाने राज्य शासनाचे म्हणणे ग्राह्य धरुन राज्य निवडणूक आयोगाचा निवडणूक घेण्याचा आग्रह हा दुराग्रह असल्याचेच या निर्णयाव्दारे स्पष्ट केले असे म्हणावेसे वाटते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 14:10

(श्री. विलासराव देशमुख...)

श्री. नंदलाल यांच्यावर हक्कभंग ठराव आणल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन माझ्यावर काही आरोप केले त्याचा खुलासा या ठिकाणी करणे मला आवश्यक वाटते. त्यांनी केलेल्या काही आरोपांबाबत मी पुढीलप्रमाणे खुलासा करीत आहे.

"वन खात्याचा प्रधान सचिव असताना 2001मध्ये रायगड जिल्ह्यात माफिया व राजकीय नेत्यांनी हडप केलेली सुमारे एक हजार कोटी रुपये किंमतीची 60 हजार एकर जमीन पुन्हा शासनाच्या नावावर करण्याची प्रक्रिया सुरु केली. त्यामुळे राजकीय नेते संतप्त झाले. एक मंत्री व सहा आमदारांनी आपल्या बदलीची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली. तेव्हाही मुख्यमंत्री पदावर असलेल्या विलासरावांनी आपली लगेचच बदली केली." अशा प्रकारचे आरोप श्री. नंदलाल यांनी केलेले आहेत. वस्तुस्थिती वेगळी आहे. वस्तुस्थिती सोडून मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत गैरसमज होता कामा नये म्हणून हे निवेदन करण्याचा प्रपंच मी केलेला आहे.

वस्तुस्थिती अशी आहे. रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र खाजगी वन (संपादन) अधिनियम 1975 मधील अनियमिततेबाबत कार्यवाहीची प्रक्रिया श्री. नंदलाल हे प्रधान सचिव वने या पदावर येण्यापूर्वीच सुरु करण्यात आली होती. केवळ श्री. नंदलाल यांनी स्वत:हून ही प्रक्रिया सुरु केली, हा त्यांचा दावा खरा नाही.

रायगड जिल्ह्यातील वन जमिनीसंबंधात वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने शासनाने सन 1997मध्ये चौकशी करण्यासाठी सिन्हा-मित्रा समितीची नियुक्ती केली होती. या समितीने 15 प्रकरणांची चौकशी केली. त्यापैकी मौजे कळंब व मौजे वाजापूर या दोन प्रकरणांची सी.आय.डी. चौकशी करण्याचा निर्णय 1999 साली घेतला तेव्हा श्री. नंदलाल वन खात्याचे सचिव नव्हते. रायगड जिल्हयात महाराष्ट्र खाजगी वन अधिनियम 1975 नुसार वन खात्याच्या ताब्यात येणारे क्षेत्र 29,818 हेक्टर आहे.

मौजे कळंब, ता. कर्जत येथील श्री. मिराणी व इतर 80 यांची क्षेत्र 443 हेक्टर जमीन उपविभागीय अधिकारी, महसूल यांनी वन खात्याच्या नावावर 1998ला दाखविली. परंतु महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने सन 1999 रोजी आदेश रद्द केला.

महसूल न्यायाधिकारणाच्या निर्णयाविरुध्द दिनांक 14.12.2000 मध्ये उच्च न्यायालयात अपील दाखल केले, रि.क्र. 7203/2000.

...2..

(श्री. विलासराव देशमुख...)

सदर प्रकरणात महसूल विभागाने जिल्हाधिकारी यांना चुकीचे आदेश दिल्यामुळे अनियमितता झाली म्हणून तत्कालीन सचिव,महसूल श्री. नंदलाल यांच्या विरुध्द तक्रार करणारी पत्रे मुख्यमंत्री यांना 6.12.2000 व 7.12.2000ला प्राप्त झाली. त्यामध्ये श्री. नंदलाल यांनी बदली करण्याची मागणी केली होती.

श्री. नंदलाल हे ऑगस्ट 2000 पासून प्रधान सचिव, वने या पदावर रुजू झाले. त्यांनी तक्रार पत्रांवर आपली बाजू स्पष्ट करणारी टिपणी मुख्यमंत्री यांना दिनांक 19.1.2001 रोजी सादर केली. या टिपणीमध्ये श्री. नंदलाल यांनी या प्रकरणी सी.आय.डी. मार्फत चौकशी करावी अशी मागणी केली होती त्यास मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली होती.

सहा आमदारांविरुध्द मानहानीचा दावा करण्यासाठी रितसर परवानगी मागितली. मुख्यमंत्र्यांनी 2 वर्षे फाईल आपल्याकडे ठेवली असा मुद्दा त्यांनी उपस्थित केलेला आहे.

या विषयासंदर्भातील महसूल व वन विभागाच्या नस्तीची तपासणी केली असता असे निदर्शनास येते की, महसूल व वन विभागाच्या नस्तीतील तत्कालीन मुख्य सचिवांचा शेरा असलेल्या पृष्ठाची जी छायांकित प्रत, श्री. नंदलाल यांनी पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांना दिली, त्यावर 20 ऑगस्ट 2001 अशी तारीख आहे. यासंदर्भात कायदेशीर तरतूद काय आहे, याबाबत तल्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा) व मुख्य सचिव यांचे मत विचारले असता अखिल भारतीय सेवा वर्तणूक नियमय 1968च्या नियम 17 नुसार अखिल भारतीय सेवा अधिका-याने परवानगी मागितल्याच्या दिनांका पासून 12 आठवड्याच्या आत अशा प्रकारची परवानगी मिळाली नाही तर ती परवानगी मिळाली असे गृहीत धरण्याचा अधिकार संबंधित अधिका-यास आहे असे मत अतिरिक्त मुख्य सचिव (सेवा) यांनी दिनांक 16.10.2001 रोजी व्यक्त केले व असे नमूद केले की, श्री. नंदलाल यांनी परवानगी मागितल्यापासून 12 आठवड्याचा कालावधी उलटून गेला असून श्री. नंदलाल अशी परवानगी मिळाली असे गृहीत धरु शकतात. त्यावर तत्कालीन मुख्य सचिवांनी दिनांक 23.10.2001च्या टिपणी अन्वये माझ्या असे निदर्शनास आणले की, सदर प्रकरणाबाबत श्री. नंदलाल यांनी त्यांच्या समवेत चर्चा केली असून श्री. नंदलाल हे अखिल भारतीय सेवा वर्तणुकीनुसार पुढील कार्यवाही करणार आहे. सदर प्रस्तावास मी तात्काळ मान्यता दिली. त्यामुळे सदर प्रकरण मुख्यमंत्री कार्यालयात 2 वर्षे प्रलंबित होते, असे म्हणणे पूर्णत: चुकीचे आहे.

...नंतर श्री.कानडे...

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 14:15

श्री. विलासराव देशमुख ...

एखाद्या व्यक्तीच्या विरोधात मानहानीचा दावा करण्याची परवानगी 12 आठवडयात महाराष्ट्र शासनाने दिली नाही तर संबंधिताला अशी परवानगी दिली आहे असे गृहीत धरता येते असा नियम असल्याने आणि श्री.नंदलाल यांनाही त्याची कल्पना होती आणि किंबहुना श्री. नंदलाल यांनी तसे तत्कालिन मुख्य सचिवांना दिनांक 19.2.2001 च्या पत्रान्वये कळविले होते. त्याहून कळस म्हणजे श्री. नंदलाल यांनी दि. 11.10.2001 च्या टिप्पणीमध्ये असे नमूद केले होते की, त्यादिवशी दुपारी 4.00 वा मुख्य सचिव व त्यानंतर 4.10 वा. त्यांनी माझी भेट घेतली व या संबंधितांविरुध्द ते न्यायालयात जात असल्याचे मला सांगितले व माझी तोंडी मान्यता आहे असे त्यांनी आपल्या टिप्पणीत नमूद केलेले आहे. त्यामुळे मान्यता नाकारली किंवा मान्यता अडविली असे जे ते आज सांगत आहेत ते त्यांच्या स्वत:च्या टिप्पणीमधून आणि फाईलमधून स्पष्ट होत नाही. म्हणून असा आरोप श्री. नंदलाल करीत आहेत तो किती बिनबुडाचा आणि बेजबाबदारपणाचा आहे हे दिसून येईल. गोरेगावच्या डेअरीची जमीन ही रॉयल पाल्मला देण्यासाठी दबाव आणला असे वक्तव्य त्यांनी केलेले आहे. खरे म्हणजे हे प्रकरण कधीही माझ्यापर्यंत पोहोचले नाही आणि तो विषयही माझ्याकडे नव्हता. हया सगळया प्रकरणांची त्या त्या वेळी त्या त्या अधिकाऱ्यांकडे सुनावणी सुरु झाली होती. मेसर्स अमीर पार्क ॲड एम्यूजमेंट प्रायव्हेट लिमिटेड,गोरेगांव(सध्याचे रॉयल पाम इंडिया) यांनी जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे अर्ज करुन त्यांच्या जागेचे सीमांकन करुन मिळण्याबाबत विनंती केली होती. कारण जमिनीमध्ये डिस्पूट होता. त्यांची स्वतत्ची जमीन आणि आरे मिल्कची जमीन यामध्ये वाद होता. म्हणून सीमांकन करुन मिळावे अशा प्रकारची विनंती केली होती. जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांनी त्यांच्या 29.11.99 च्या आदेशान्वये आरे वसाहतीकडील 19 एकर जीन मेसर्स अमीर पार्क यांच्या मालकी क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत आदेश पारित केले. त्याविरुध्द आरे दुग्ध वसाहतीने केलेल्या अपिलामध्ये अप्पर आयुक्त कोकण विभाग यांनी दिनांक 4.9.2000 च्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांचे 29.11.99 चे आदेश रद्दबादल केले. म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या बाजूने निकाला दिला आणि अप्पर आयुक्तांनी तो रद्द केला. त्याविरुध्द कंपनीने माननीय मंत्री महसूल यांच्याकडे केलेला फेरतपासणी अर्ज प्रकरणी तत्कालिन महसूल मंत्री यांनी दिनांक 31.7.2003 रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळून लावले व अप्पर आयुक्तांचे दिनांक 4.9.2000 चे आदेश कायम केले. त्यामुळे दबाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ...

आणण्याचा आणि त्यांना जमीन देण्याचा कुठेही प्रश्न उपस्थित होत नाही. या सगळया प्रकरणाची संबंधित नस्ती कधीही माझ्याकडे आली नाही आणि तशी येण्याची आवश्यकताही नाही. त्यामुळे याप्रकरणात माझा कसलाही संबंध नाही. त्यामुळे अशा प्रकारचे वक्तव्य करुन नाहक काही प्रश्न उपस्थित केले आहे. माझी टर्म पूर्ण व्हावयाच्या आत माझी बदली केली असा त्यांनी आरोप केला. खरे म्हणजे हा प्रशासकीय विषय आहे. कुणाची बदली कुठे करावी हा प्रशासकीय विषय आहे. अजूनही बदल्यांचे नियम आपल्याकडे मंजूर व्हावयाचे आहेत आणि ते मंजूर झाल्यानंतर भविष्यात त्याचा वापर करता येईल. लातूर मतदारसंघ हा सगळयाचा महत्वाचा विषय आहे. लातूर मतदारसंघ आरक्षित करण्यासाठी माझ्यावर दबाव आणला असा एक आरोप करण्यात आला. येथून खरी त्याची सुरुवात झालेली आहे. लातूर मतदारसंघाचे आरक्षण बदलण्यात यावे असा अप्रत्यक्षपणे कोण्ताही दबाव टाकण्यात आलेला नाही. कारण प्रत्यक्षपणे मी त्यांना कधी टेलिफोन केला नाही कधी भेटलो नाही. कोणत्याही प्रकारचा माझा संबंध नाही. लोकशाहीमध्ये घटनात्मक संरक्षण आहे या नावाखाली हे होते आहे. घटनात्मक संरक्षण लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आहे. हे सभागृहत घटनेतून निर्माण झालेले आहे. सभापतींची जागा घटनेतून निर्माण झालेली आहे. मुख्यमंत्री घटनेतून आलेले आहे. घटनात्मकदृष्टया एकच व्यक्ती या महाराष्ट्रामध्ये सगळा कारभार बघते आहे अशा प्रकारचे चित्र निर्माण होत आहे. ते होऊ नये म्हणून हा खुलासा करण्याची आवश्यकता आहे. कृषीमंत्री श्री. बाळासाहेब थोरात हे त्या समितीचे सदस्य आहेत. एखादी सूचना करणे म्हणजे दबाव आणला असा सरळ सरळ अर्थ आपण करु लागलो तर लोकशाहीमध्ये कुणालाही कसलाही सजेशन देण्याचा अधिकार प्राप्त होणार नाही. श्री. नंदलाल यांना मी अनेक वर्षापासून ओळखतो आहे. त्याच्यावर कुणीतरी असा वेगळया मार्गाने दबाव आणेल असे मला तरी वाटत नाही. अशा पध्दतीने कारण नसताना परिस्थितीमध्ये विनाकारण वाद निर्माण करुन मी काही तरी मुख्यमंत्र्यांच्या विरोधात स्टेटमेंट दिले म्हणजे त्याला प्रसिध्दी ही निश्चितपणाने अधिक मिळणार कारण त्यांचे घटनात्मक पद आहे आणि माझे घटनात्मक पद आहे त्यामुळे घटनात्मक पेच निर्माण झाला अशा प्रकारचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. प्रसिध्दी निश्चितपणाने अधिक मिळते आहे. कारण कोणत्या तरी व्यक्तीविरुध्द बोलले असते तर निश्चितपणाने एवढे छापून आले नसते. परंतु मुख्यमंत्र्यांबद्दल काही वक्तव्य केले की त्याला लवकर प्रसिध्दी मिळते ही सुध्दा

....3

श्री. विलासराव देशमुख ...

त्यामागील भूमिका नाकारता येत नाही. या आयोगाचे सदस्य असल्यामुळे त्यांनी आपली बाजू मांडणे व निवेदन देणे विविध राजकीय पक्षांचे नेते त्यांना भेटतात आणि आपली मते मांडतात. मते मांडली म्हणजे दबाव आणला अशातला भाग नाही आणि ती काही अंतिम ॲथॉरिटी नाही.

नंतर भारवि...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख....

सूचना मांडल्यात याचा अर्थ दबाव आणला असे बोलले जाते, ते मान्य होण्यासारखे नाही. श्री.नंदलाल हे राज्याचे अतिरिक्त सचिव म्हणून निवृत्त झाले आहेत. सभापती महोदय, आपण व मी या सदनामध्ये सन 1980 पासून काम करीत आहोत. 20 वर्षे विविध खात्यातील मंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून मी काम केले आहे. प्रत्येकाला अधिकार आणि मर्यादा याची जाणीव मनामध्ये ठेवून काम करावे लागते. मतदार संघाच्या प्रारूप संबंधी आता ऑब्जेक्शन आणि सजेशन्स मागितले आहे. मी लोकसभेचा सदस्य नाही. मी विधान सभेचा सदस्य आहे. मला दिल्लीला जायचे असा जर अर्थ काढला असेल तर तो चुकीच आहे. पूर्वी लातूर लोकसभा मतदार संघ 15 वर्ष राखीव होता. त्यानंतर उस्मानाबाद हा लोकसभेचा मतदार संघ राखीव झाला. आता पुन्हा लातूर लोकसभा मतदार संघ राखीव मतदार म्हणून प्रस्तावित आहे. त्यामुळे यासंबंधी आपली भूमिका मांडणे म्हणजे दबाव आणला अशातला भाग होऊ शकत नाही. कारण आम्हाला सुध्दा 50 लोक त्यांच्या प्रश्नासाठी येऊन भेटतात. ते लोक आमच्यावर दबाव आणतात असे मी म्हटले तर ते चुकीचे होईल. शेवटी मला सुध्दा श्री.नंदलाल यांच्या अधिकाराच्या मर्यादा माहित आहेत. एक व्यक्ती काही करू शकत नाही. या कमिशनमध्ये अन्य सदस्य देखील आहेत. हा सगळा जाणीवपूर्वक प्रकार मांडला जात आहे, तो योग्य आहे असे मला स्वत:ला वाटत नाही. घटनेने संरक्षण दिले म्हणजे वरून आलो असे कोणी समजू नये. कोणाच्या तरी शिफारशीवरून त्यांची आयुक्तपदी नेमणूक झाली असेलच. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीवरून त्यांची नियुक्ती झाली असेल. कदाचित त्यावेळी मी मुख्यमंत्री म्हणून नसेन. त्यांची नियुक्ती झाली म्हणून मला दु:ख वाटण्याचे काहीच कारण नाही. ते एक चांगले अधिकारी होते. म्हणूनच मी माझ्याच काळामध्ये चार आऊट स्टँडिंग गोपनीय रिपोर्ट श्री.नंदलाल यांचे लिहिले आहेत. माझ्या मनात त्यांच्या संबंधी आकस असता तर मी अनेक गोष्टी करू शकलो असतो. मागच्या कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी त्यांचे आऊट स्टँडिंग रिपोर्ट लिहिले नाहीत. पण मी सलग आऊट स्टँडिंग रिपोर्ट लिहिल्यामुळे त्यांना प्रधान सचिव या पदावरून अतिरिक्त सचिव या पदावर पदोन्नती मिळाली. कुठल्याही प्रधान सचिवांना अतिरिक्त प्रधान सचिव पदी जाण्यासाठी सलग तीन वर्षाचा गोपनीय अहवाल हा आऊट स्टँडिंग असणे महत्त्वाचे असते. सगळया वरिष्ठ अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल जीएडी मार्फत मुख्यमंत्री लिहितात याची कल्पना आमच्या मित्रांना असेल. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख....

सुरूवातीला आमचे मित्र म्हणाले की, आय.ए.एस.अधिकाऱ्यांना फटकारले पाहिजे. परंतु, नंतर त्यांनी आपली भूमिका बदलून मुख्यमंत्री पदाचा राजीनामा मागितला. दु:ख याचे आहे की, आपल्या सारख्या जबाबदार माणसांकडून मला ही अपेक्षा नाही. आपले म्हणणे ऐकून मी फटक मारले असते तर...

श्री.नितीन गडकरी : ज्यांना फटक मरायचे होते, त्यांना आपण फटके मारले नाहीत.

श्री.विलासराव देशमुख : मी छोटया माणसांशी भांडत नाही. मी माझ्या बरोबरच्या माणसांशी भांडतो. माझ्या मनात आकस असता तर एखाद्याचे करिअर संपवायला वेळ लागला नसता. शेवटी त्यांचे जसे करिअर असते तसे आपले देखील असते. त्यामुळे मी कधीही लहान गोष्टींचा विचार करीत नाही, हे येथे मुद्दाम सांगितले पाहिजे. श्री.नंदलाल सारखा चांगला अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या विरोधात पत्रकारांशी का बोलतो ? ते कुठे दुखावले आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा माझ्या एक गोष्ट लक्षात आली.

राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त म्हणून आपणास उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी श्री.नंदलाल यांनी केली आहे. श्री.नंदलाल यांना राज्य निवडणूक आयुक्त म्हणून घटनात्मक संरक्षण आहे. असे असूनही ते वारंवार शासनाकडे आपणास उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचा दर्जा द्यावा अशी मागणी करीत आहेत. त्यांच्या मागणीला शासन प्रतिसाद देत नसल्याने त्यांनी मुख्यमंत्री व राज्य शासनाच्या विरोधात वक्तव्य केले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्री.नंदलाल यांना संविधानीक दर्जा असूनही त्यांना उच्च न्यायालायाच्या न्यायमूर्तींचा दर्जा का हवा हे कळत नाही. राज्य निवडणूक आयुक्तांना उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांचा दर्जा देणे उचित ठरणार नसल्याचा अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 14:25

श्री.विलासराव देशमुख....

तसेच राज्य निवडणूक आयुक्तांना राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांचा दर्जा देण्याची आवश्यकता नसल्याचे मत तत्कालीन मुख्य सचिव यांनी दिले होते. श्री.नंदलाल यांच्या आधीचे राज्य निवडणूक आयुक्त श्री.राजवाडे आणि श्री.चौधरी यांना सुध्दा उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचा दर्जा देण्यात आला नव्हता. या निमित्ताने मला नमूद करावेसे वाटते की, देशाचे तत्कालीन निवडणूक आयुक्त श्री.टी.एन.शेषन यांनी सुध्दा मुख्य निवडणूक आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचा दर्जा मिळावा अशी विनंती करुन, राज शिष्टाचाराच्या यादीत वरचे स्थान देण्याची मागणी केली होती. परंतु श्री.शेषन यांचा हा प्रयोग सर्वोच्च न्यायालयाने 1995 साली धुडकावून लावला होता. 2001 मध्ये हाच दृष्टिकोन केरळ उच्च न्यायालयानेही केरळ राज्य निवडणूक आयोगाबाबत ठेवला होता. श्री.नंदलाल यांना दर्जा नसताना इतके झालेले आहे, मग त्यांना दर्जा दिल्यावर काय होईल ? महाराष्ट्र राज्य जिल्हा नियोजन समित्या आणि महाराष्ट्र महानगर नियोजन समित्या भारतीय संविधानातील तरतुदी अंमलात आल्यावरही 12 वर्षांचा काळ लोटला तरीही गठीत करण्यात आल्या नाहीत. ही गोष्ट खरी आहे. याचे कारण आपणा सर्वांनाच माहीत आहे. कारण त्यामध्ये आमदारांना फारसे प्रतिनिधीत्व दिले जात नाही. आपण असे का करु शकलो नाही ? 80 टक्के प्रतिनिधीत्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी निवडून दिलेले असावेत ही घटनात्मक जबाबदारी आहे. डी.पी.डी.सी. वर आमदार आणि पालक मंत्री असतात. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे डी.पी.डी.सी. चे अध्यक्ष असले पाहिजे, अशा अनेक सुधारणा आहेत. आपल्याकडे जी पध्दत आहे त्यामध्ये ते बसत नाही. ही गोष्ट झाली नाही हे मी नाकारीत नाही. अनेक दिवस या संदर्भात आपण आपली भूमिका कळवीत आलेलो आहेत. घटनात्मकदृष्टया ही जबाबदारी निश्चितपणाने राज्य सरकारकडे आहे.

श्री.नंदलाल यांनी अजून एक आरोप असा केला आहे की, मी त्यांच्याशी सूडबुध्दीने वागत आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, 1982 सालापासून, मी विविध खात्याचा मंत्री म्हणून काम करीत आहे. कोणत्याही अधिकाऱ्यांच्या संदर्भात आपले संबंध मर्यादीत, प्रेमाचे आणि सलोख्याचे असणे आवश्यक आहे. खरे म्हणजे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी ही एका गाडीची दोन चाके आहेत. ही दोन्हीही चाके एकमेकांसमवेत वेगाने गेली तरच अधिक प्रगती होऊ शकते. जर ही दोन चाके थोडी जरी मागे-पुढे राहीलीत तर, प्रगती होऊ शकणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख....

महोदय, मी सांगू इच्छितो की, श्री.नंदलाल यांचे मूल्यमापन मी वस्तुनिष्ठ पध्दतीने केले आहे. त्यांच्या गोपनीय अहवालातील चार अहवालांना मी "आऊटस्टँडींग ऑफिसर" म्हणून मान्यता दिलेली आहे. मी जर त्यांच्याशी सूडबुध्दीने वागलो असतो तर असे शेरे देण्याचे कारणच नव्हते. त्यांनी दुसरा असाही आरोप केला आहे की, मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात मी त्यांची बदली केली. मी सांगू इच्छितो की, चांगला अधिकारी या नात्याने मी त्यांना महसूल विभागात, नंतर वन, त्यानंतर नगरविकास विभागात आणि नंतर सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव म्हणून काम करण्याची संधी दिली. त्यांची बदली महत्वाच्या विभागात केली. छोटया विभागात त्यांची बदली करुन, त्यांच्या सिनॅरिटीला गालबोट लावले नाही. त्यांना शिक्षाच द्यावयाची असती तर अनेक विभाग असे आहेत की, जे कमी महत्वाचे आहेत. त्या ठिकाणी त्यांची बदली करता आली असती. ते विभाग कोणकोणते आहेत हे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना चांगलेच माहीत आहे. त्यामुळे मी श्री.नंदलाल यांच्याशी पूर्वग्रहदूषितपणाने वागलो असे त्यांचे म्हणणे योग्य नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ....

म्हणून सभापती महोदय, मी शेवटी एकच गोष्ट सांगू इच्छितो की, श्री. नंदलाल यांचा गैरसमज झाला असल्याची शक्यता आहे. त्या संदर्भात सभागृहामध्ये हक्कभंग आणता येतो किंवा आणता येत नाही याबाबत जी खालच्या सभागृहात चर्चा करण्यात आली, त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही. परंतु सभापती महोदय, सदनामध्ये हक्कभंग मांडण्याचा सन्माननीय सदस्यांना अधिकार आहे. तो हक्कभंग सभागृहाने एकमताने स्विकारलेला असेल, माननीय अध्यक्षांनी त्यास मान्यता दिली असेल तर त्या संदर्भात समितीमध्ये चर्चा होईलच. त्या संदर्भातील चर्चा आजच करण्याची गरज नाही. सभापती महोदय, राज्य निवडणूक आयोगाला घटनात्मक जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने सर्वतोपरी सहाय्य केले जाईल. कोणत्याही प्रकारची अडवणूक केली जाणार नाही. लोकशाहीवर सर्वांचा विश्वास आहे. याही पुढील काळात त्यांना आमचे सहकार्य निश्चितपणे राहील. सभागृहामध्ये हा जो प्रश्न उपस्थित झालेला होता, त्या प्रश्नासंबंधी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नेहमीप्रमाणे माझ्या राजीनाम्याची मागणी केली होती. सभापती महोदय, त्यांना माहिती होते की, ते राजीनामा देणार नाहीत आणि सन्माननीय सदस्यांचीही मनातून तशी इच्छा नव्हती. परंतु कधी कधी असे करावे लागते. सभापती महोदय, त्यांची आणि माझी भूमिका एक आहे. त्यांच्याबद्दल मला काहीही म्हणावयाचे नाही. मला शेवटी एवढेच सांगावयाचे आहे की, मुख्यमंत्री हा राज्याचा प्रमुख असतो. कॅप्टन ऑफ टीम असतो. माझी बाजू योग्य आहे की नाही, हे सर्वांनी पहाणे गरजेचे होते. त्यातून समाधान झाले नाही तर असे करणे उचित झाले असते. परंतु या ठिकाणी ताबडतोब रिॲक्शन झाली. सभापती महोदय, रिॲक्शन फोर्स कशाला म्हणतात ते आता मला समजले. बाकी इतर गोष्टींच्या फारसे खोलात जाण्याची काही गरज नाही. मला दु:ख एवढ्याच गोष्टीचे वाटते की, जे सहकारी एखाद्याला दररोज पाहतात, अनुभवतात, त्याच्याविषयीच असे बोलतात आणि ज्यांची कधी भेटही होत नाही, असे लोक योग्य असल्याबाबत सांगतात हे बरोबर नाही. सभापती महोदय, हे टाळता आले असते. शेवटी सर्व सन्माननीय सदस्यांना त्यांचे विचार व्यक्त करण्याचा अधिकार आहे. धन्यवाद !

..2

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, निवडणूक आयोगाने माननीय मुख्यमंत्र्यांवर जे आरोप केले, त्यासंदर्भात त्यांनी जो खुलासा केला, त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करतो. त्यांचा हा खुलासा सभागृहासमोर येऊन त्यांची भूमिका स्पष्ट झाली, हे एकप्रकारे चांगलेच झाले. सभापती महोदय, मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो की, ज्यामुळे कॉन्स्टिटयूशनल प्रॉब्लेम्स निर्माण होणार आहेत. सभापती महोदय, मला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत बोलावयाचे आहे. परवा नाशिकमध्ये भाजपाच्या महापौरांनी आपले सदस्य निवडून येत नाहीत म्हणून निवडणूक पुढे ढकलली. सभापती महोदय, महापौर आणि नगराध्यक्ष या संदर्भात वेगवेगळ्या क्लुप्त्या काढून बहुमत नसेल तर निवडणुका पुढे ढकलतात. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांना हे माहितच असेल. नागपूर महानगरपालिकेची निवडणूक हात वर करुन घेण्यात यावी असे राज्य शासनाने सांगितले होते. परंतु श्री. नंदलाल साहेबांनी असा आदेश दिला की, सदर निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात यावी. सभापती महोदय, त्याचवेळी सचिव, श्री. नाना पाटील यांनी बैठक घेतली आणि नागपूरच्या कमिशनरला रात्री 12 वाजता फॅक्स पाठविला की, ह्या निवडणूका हात वर करुन घ्याव्यात. सभापती महोदय, या संदर्भातील कायदे आपण येथे करतो. परंतु या कायद्यांचे एक्झिक्युशन करण्याचे काम प्रशासनाचे आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री. नारायण राणे साहेब देखील आहेत, त्यांनाही या संदर्भात माहिती आहे. अशाप्रकारे किती सदस्यांना डिसक्वॉलिफाय करण्यात आले हे त्यांना माहित आहे. आमच्याही काळात अशा घटना घडलेल्या आहत. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, ह्या निवडणुका इनडिपेन्डन्ट, इमपार्शियल व फेअर झाल्या पाहिजेत. अशाप्रकारे रात्री 12 वाजता मिटींग घेऊन कमिशनरांना या संदर्भात फॅक्स पाठविणे हे बरोबर नाही. म्हणून या संदर्भात फेरयंत्रणा असली पाहिजे. सभापती महोदय, विधानमंडळाला कायदे करण्याचा अधिकार आहे, परंतु अंमलबजावणीचा अधिकार नाही. त्यामुळे असे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MHM/ KGS/ प्रथम श्री. कांबळे... 14:35

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, आपण नेहमीच अडचणीच्या विषयाच्या संदर्भात ॲडव्होकेट जनरलचे मत मागवितो, यासंदर्भात मत मागवावे असे मी म्हणणार नाही. यासंदर्भात काय झाले ते मी आपणाला सांगू इच्छितो, विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम व सन्माननीय सदस्य मला भेटले, त्यांनी सांगितले की आमच्या हायकमांडने मला हक्कभंग मांडावयास सांगितला होता, मी त्यांना सांगितले हा हक्कभंग होत नाही...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, सभागृहाच्या बाहेर झालेली चर्चा सन्माननीय सदस्यांना येथे सांगण्याची काय गरज आहे ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहात बाहेरचा संदर्भ देता येत नाही काय ? येथे मला बोलण्याचा अधिकार नाही काय ? आम्ही तुमचे म्हणणे ऐकूण घेतले आमचे म्हणणे आपण ऐकूण घेणार नाहीत काय ?

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, एवढे जबाबदार व सिनियर सदस्य असतांना बाहेरची माहिती त्यांनी सभागृहात सांगावी हे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण सुध्दा आपल्या दालनामध्ये मला सन्माननीय सदस्य भेटले, अशी अशी चर्चा झाली असा संदर्भ आपण देत असतात. मी जर येथे असत्य माहिती दिली आणि ती असत्य निघाल्यास मी राजीनामा देण्यास तयार आहे, मी खात्री असल्याशिवाय माहिती देत नाही, मी जबाबदारीने येथे बोलत आहे. मला जी माहिती आहे ती मी येथे सांगू नये काय ? मी येथे कोणावर आरोप केलेले नाहीत. हक्क ंग का मांडला असे मी म्हणत नाही तो त्यांचा अधिकार आहे. सभागृहाबाहेरील चर्चेचा संदर्भ आपण सभागृहात देत नाही काय ? तो माझा अधिकार नाही काय ? लोकशाही संपलेली आहे काय ?

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य येथे बाहेरचे बोलत आहात व हायकमांडचे नाव घेत आहात, हे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला सभागृहात माझे म्हणणे मांडण्याचा अधिकार नाही काय ? येथे अशी कोणती इमर्जन्सी लागलेली आहे.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, येथे रेकॉर्डवर येण्यासाठी हे बोलत आहेत, हायकमांडनी काय सांगितले त्याची चर्चा येथे करीत आहेत. मग मी जर असे म्हटले की, सन्माननीय अडवाणी यांनी भारत निवडणूक आयुक्तांना असे सांगितले की, गुजरातच्या निवडणुका घेऊ नका असे काहीही सांगणे योग्य आहे की, त्याचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे काय ? त्यासंदर्भातील चर्चा येथे उपस्थित करणे योग्य होणार नाही, ते बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ते जर तसे बोलले असतील तर आपण तसे सांगा, माझ्या बद्दल तुमचा गैरसमज झालेला आहे, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांची बाजू घेऊन बोलणार होतो. सदनामध्ये बोलण्याचा अधिकार आपण काढून घेणार आहात काय ?

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांचे असे म्हणणे आहे की, सदनाच्या बाहेर आपली जी चर्चा झालेली आहे ती सदनामध्ये आपण शक्यतोवर बोलत नाही ही वस्तुस्थिती आहे, एखाद्या विषयाच्या संदर्भात आपण बोलतो. त्याचबरोबर एखाद्या अन्य ठिकाणी खाजगी चर्चा झाली असेल तर तिचा उल्लेख शक्यतोवर या ठिकाणी टाळावा. सन्माननीय सदस्यांचा या सदनाशी वैयक्तिक काहीही संबंध नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अनेक वेळा व्हेग चर्चा झालेली आहे. मी हे सांगतो ती एक पध्दत आहे. सन्माननीय सदस्यांची अडचण होते म्हणून मी येथे ती माहिती सांगू नये, त्या मुद्दयावर मी बोलू नये हे बरोबर नाही. श्री. नंदलाल ही व्यक्ती योग्य आहे असे मी म्हणत नाही. त्यांनी आमचे 96 नगरसेवक अपात्र ठरविलेले आहेत, ठाण्यामध्ये सुध्दा अशी प्रकरणे झालेली आहेत तेच मी येथे सांगत होतो.

श्री. उल्हास पवार : आपण येथे हायकमांडचे नाव घेत आहात, आपण येथे नाव घेऊन बोलावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये असे प्रकार 100 वेळा रेकॉर्ड झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कोणत्या नियमान्वये हरकत घेतली ते त्यांनी सांगावे ? कोणत्या नियमान्वये मला बोलता येत नाही ते सांगावे ? आपण तो नियम सांगा मी माझे बोलणे बंद करतो.

यानंतर श्री. सरफरे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी दोघांनाही थांबवितो...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा नंदलाल यांना विरोध आहे. त्यांनी आमच्या 96 नगरसेवकांना जेलमध्ये टाकले आहे...

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, एकमुखाने ठराव संमत करण्याची परवानगी दिली असतांना एखाद्या माननीय सदस्यांचे नाव घेऊन त्यांच्यावर अशाप्रकारचे आरोप करणे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आरोप करीत नाही, मी त्यांचे नाव घेतले नाही. मी आपणास एवढेच सांगतो की, मी त्यांचे नाव घेऊन बोललो असेन तर तुम्ही द्याल ती शिक्षा घ्यायला मी तयार आहे, मी हात जोडून तुमची क्षमा मागायला तयार आहे....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विधानसभागृहामध्ये या संदर्भात हक्कभंगाचा प्रस्ताव देण्यात आला. आणि त्या प्रस्तावाला विधानसभागृहाने मान्यता दिल्यानंतर तो प्रस्ताव मांडण्यात आला एवढेच मी या सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. विधानसभागृहामध्ये माननीय अध्यक्षांनी विशेष हक्कभंगाचा प्रस्ताव मांडण्यासाठी परवानगी दिल्यानंतर माननीय सदस्यांनी तो प्रस्ताव सभागृहामध्ये मांडला.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला त्या प्रस्तावाबद्दल काही बोलायचे नाही आणि त्या माननीय सदस्यांबद्दलही बोलायचे नाही, आणि त्या सभागृहाबद्दलही काही बोलायचे नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम यांचे चेंबर विधान मंडळामध्ये आहे, त्याठिकाणी माननीय श्री. रामदास कदम यांनी मला बोलाविल्यानंतर मी त्याठिकाणी गेलो तेव्हा माननीय श्री. रामदास कदम मला म्हणाले की, गडकरी साहेब आपण बसा...

सभापती : माननीय श्री. नितीन गडकरीजी आपण 12 मिनिटे बोलला आहात, आता आपण आपले म्हणणे संपवून टाका...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी बोलू शकत नाही कां? मला न्याय देण्याची आपली भूमिका आहे काय?

सभापती : नक्कीच आहे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी कायद्याप्रमाणे बोलणे जर चुकीचे असेल तर आपण मला सांगा. खरे म्हणजे नंदलाल कशी वाईट व्यक्ती आहे...

श्रीमती सुधा जोशी (बसून बोलतात) : तेवढे बोला...

श्री. नितीन गडकरी : म्हणजे तुमच्या सोईचे बोला आणि तुमच्या अडचणीचे बोलू नका. त्यापेक्षा आपण असे करा की, इंदिराजींसारखी आणीबाणी जाहीर करा आणि श्री. विलासराव देशमुख यांचे कौतुक करावयाचे असेल तर बोला, आणि श्री. नारायण राणे यांच्यावर टीका असेल तर...

सभापती : तुम्ही काय बोलावे हे सांगण्याचा कुणालाही अधिकार नाही, तो तुमचा हक्क आहे. तुम्ही आतापर्यंत 12 मिनिटे बोलला आहात...

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे 8 मिनिटे बोलले आहेत...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे म्हणणे जर रेकॉर्डवर आणायचे नसेलतर मी बाहेर चाललो...

सभापती : याठिकाणी तुमचे कोणतेही वाक्य रेकॉर्डवर आणायचे नाही असे मी सांगितले आहे काय? तर मग तुम्हाला असे कां वाटते? तुम्ही या ठिकाणी दहा ते बारा मिनिटे बोलला आहात...

श्री. नितीन गडकरी : मी बोललो नाही...

सभापती : माननीय सदस्य श्री. उल्हास पवार हे 3 मिनिटे बोलले आणि आपण 12 मिनिटे बोलला आहात. आपले वाक्य रेकॉर्डवरुन काढावे असे मी सांगितले नाही आणि मी सांगणारही नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला कोणत्याही सभागृहातील माननीय सदस्यांचा अवमान करावयाचा नाही. कोणत्याही सभागृहाविषयी टिप्पणी करावयाची नाही, मला कोणत्याही हक्कभंगाविरुध्द मतप्रदर्शन द्यावयाचे नाही, ते योग्य आहे की अयोग्य आहे यावर मला बोलायचे नाही. माननीय विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम यांनी मला त्यांच्या चेंबरमध्ये बोलाविले होते. त्यावेळी विधानसभेचे माननीय सदस्य श्री. चांदूरकर त्याठिकाणी आले. त्यांचे असे म्हणणे होते की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

श्री. नंदलाल यांच्याविरुध्द देण्यात आलेल्या हक्कभंगाच्या प्रस्तावाला आपण सपोर्ट करावा. त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे असे म्हणणे होते की, याबाबत मी श्री. गडकरी साहेबांना विचारुन सांगतो. त्यावेळी आपण म्हणालो की, सपोर्ट करणे आमचे काम नाही. माननीय सदस्य हे प्राध्यापक आहेत ते असे म्हणाले की, आमच्या हायकमांडचा आदेश आहे. तेव्हा ते म्हणाले की, तुमचे काम तुम्ही करा. तुमच्या हायकमांडच्या आदेशाला विरोधी पक्षाने कसे सहकार्य करावयाचे? आम्ही सहकार्य करणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे.. 14:45

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरु..

मला याबाबत काही म्हणावयाचे नाही. सभापती महोदय, श्री.नंदलाल साहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या संबंधाने जे काही आरोप केले, त्याबाबतचा माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला, हे चांगले झाले. जेव्हा आमच्यावर श्री.नंदलाल उलटले तेव्हा ते फार निस्पृह आहेत, निःपक्षपाती आहेत असे आपल्याकडून सांगण्यात येत होते. आता आपल्यावर ते उलटले, त्यांनी काही आरोप केले ते आपल्याला अडचणीचे आहेत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (बसून) : आपण त्यावेळेस जात्यात होता.

श्री.नितीन गडकरी : आता राष्ट्रवादीला जात्याचा अडसर का आला ? माझी एकच विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबतीमध्ये त्यांच्यावर डिफेमेशनची केस दाखल करावी. माननीय मुख्यमंत्री म्हणाले त्याप्रमाणे ते सनदी अधिकारी आहेत, त्यांनी आरोप करणे बरोबर नाही. असे असेल तर खरोखरच दुध का दुध आणि पाणी का पाणी हे सिध्द करण्यासाठी त्यांनी आरोप केले असतील तर निवृत्त न्यायमूर्तीकडून त्याबाबतची चौकशी करावी आणि श्री.नंदलाल यांच्यावर कारवाई करावी. इम्पीचमेंट करण्यासाठी पार्लमेंटमध्ये प्रस्ताव मांडण्यास सांगावे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपली भूमिका मांडली. मला एकच विनंती करावयाची आहे की, या वादामध्ये माझा काही संबंध नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या सरकारच्याच हातामध्ये आहेत. त्या निवडणुका फेअरली होत नाहीत. नाशिकच्या महापौराची निवडणूक आणि नागपूर येथील महापौरांच्या निवडणूकीच्या संबंधातील निर्णय रात्री 10 वाजता घेण्यात येतो. राजकीय निर्णय घेतल्यामुळे निवडणूकीमध्ये विश्वासार्हता राहिलेली नाही. लोकशाहीची बूज राखण्याच्या दृष्टीने आणि यासंबंधातील फेअरली निर्णय होण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्याचा अधिकार तिसऱ्या एजन्सीला द्यावेत, तो अधिकार निवडणूक आयोगाला द्यावा, अशी मी विनंती करतो. विधिमंडळाने जे कायदे पास केलेले आहेत त्याचे इंटरप्रिटेशन एक्झीक्युशनने करावे, हे बरोबर नाही. ते विरोधी पक्षावर अन्याय करणारे आहे. रात्री 11-00 वाजता निर्णय घेतला जातो अशा प्रकारे राजकीयदृष्ट्या कॉन्ट्रॅडिक्टरी आदेश काढले जातात. हे लोकशाहीला खीळ बसणारे आहे. त्या ठिकाणी एक जण गुप्त पध्दतीने मतदान घ्यावे असे म्हणतात तर कोणी हात वर करुन मत द्यावे, अशापध्दतीने निर्णय घ्या असे सांगतात. याबाबतीत नागपूरचे उदाहरण देता येईल. तेव्हा इंडिपेंडंटली फेअरली निर्णय व्हावा या दृष्टीने जरुर विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.विलासराव देखमुख : सभापती महोदय, मी एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो की, निवडणूका मर्यादित घेण्याचा अधिकार आयोगाला आहे. महापौरांची निवडणूक, जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांची निवडणूक कोणी घ्यावी या संबंधीचे प्रोसिजर ले डाऊन आहे. या संबंधातील कायदा केला नाही. परंतु त्यांचा अधिकार काढून घेतला असे कोणालाही करता येत नाही.

श्री.नितीन गडकरी : कायदा बदलणार हा पुढचा भाग आहे.

श्री.विलासराव देशमुख : आपला अधिकार त्यांना द्यायचा असेल तर तसे सर्वांनी बसून ठरवावे, माझा काही विरोध नाही. प्रश्न असा आहे की, इलेक्शन कमिशनरना ओव्हररायडींग पावर नाहीत. यामध्ये असे म्हटलेले आहे की, "इलेक्शन टू पंचायत, नॉट इलेक्शन इन पंचायत^ खासदारांच्या आणि आमदारांच्या निवडणुका या केंद्रीय निवडणूक आयोग घेते. परंतु त्याच्या आतील ज्या निवडणुका आहेत, त्या आपण घेत असतो. त्याचप्रमाणे स्पीकरांची निवडणूक आपण घेतो. यापूर्वीचे आयुक्त श्री.डी.एन.चौधरी यांनी पत्र पाठवून शासनाला कळविले की, या निवडणुका आम्ही घेण्याची तरतूद नाही त्या सरकारने घेतल्या पाहिजेत, महापौरांची निवडणूक असेल, जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांची निवडणूक असेल या आपण घेतो.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख ....

परंतु ज्या अप्रत्यक्ष निवडणुका आहेत, त्या ठिकाणी एकदा सदस्य निवडून आल्यानंतर सरपंच, उपसरपंचांची निवडणूक किंवा अध्यक्षांची निवडणूक असेल या सगळया ज्या बाकीच्या गोष्टी आहेत त्याबाबतचे अधिकार कायद्यामध्ये सरकारकडे आहेत. हे अधिकार आपल्याला जर त्यांना द्यावयाचे असतीत त्याचा निर्णय घेण्याच्या बाबतीत वेगळ्या पध्दतीने सर्वपक्षीय बैठक घेऊन त्यामध्ये चर्चा करता येईल. डिसक्वालिफिकेशनचे अधिकार तिकडे जाणार. सगळे अधिकार आयुक्त घेऊ शकत नाही. रोजच्या येणाऱ्या ज्या तक्रारी आहेत त्या आयुक्त पाहात बसले तर ते योग्य नाही. याचा आपल्याला वेगळा विचार करावा लागेल. परंतु आजच्या मर्यादेमध्ये त्यांना ते अधिकार नाहीत. ते सरळ पत्र पाठवितात की, मी माझ्याकडे अधिकार काढून घेतले. असे आयुक्तांनी कळविले असेल तर त्यांनी आमच्या अधिकारावर अतिक्रमण केलेले आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हे सर्वोच्च सभागृह आहे, सार्वभौम सभागृह आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

पृ.शी.: लेखी उत्तरे.

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 17 एप्रिल, 2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

सभापती : दिनांक 17 एप्रिल, 2006 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्याकडे हा विषय उपस्थित करण्याच्या संदर्भात परवानगी मागितली होती. एका बाबीच्या संदर्भात कन्फ्युजन निर्माण झाले आहे. डान्सबार बंदीच्या संदर्भात श्री. संजय निरुपण यांची प्रतिक्रिया आली आणि त्यामध्ये त्यांनी सांगितले की, कॉंग्रेस पक्ष या निर्णयाचे स्वागत करीत आहे. त्यांनी सांगितले की, आम्ही सुप्रीम कोर्टात जाणार नाही. नंतर माननीय मुख्यमंत्र्यांना विचारले. त्यांनी काही कॉमेन्ट्स केल्या नाहीत. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील असे म्हणाले की, याबाबत सुप्रीम कोर्टात अपील करु. म्हणजे तुम्ही एक म्हणता आणि ते वेगळे म्हणत आहेत. याबाबतीत नेमके काय आहे ? ते समजले पाहिजे. सरकार हायकोर्टाच्या निर्णयाविरुध्द पुढे अपिलामध्ये जाणार आहे की नाही ? तुमच्या पक्षाच्या प्रवक्त्यांनी तुमच्याशी बोलून तसे सांगितले काय ? त्यांनी श्रीमती प्रभा राव यांच्याशी बोलून तसे सांगितले ? त्यांनी दोघांशीही बोलून नंतर प्रतिक्रिया व्यक्त केली काय ? माननीय मुख्यमंत्र्यांची अडचण मला माहीत आहे. माझी विनंती आहे की, शासन डान्सबार बंदीच्या संदर्भात सुप्रीम कोर्टात जाणार आहे की नाही ? यासंदर्भात जे कन्फ्यूजन आहे त्याबाबत खुलासा झाला तर योग्य होईल.

श्री. विलासराव देशमुख : (बसून) योग्यवेळी खुलासा करु.

श्री. नितीन गडकरी : माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना खुलासा करावयाचा असेल तर त्यांनी करावा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे या सभागृहाचे माजी विरोधी पक्ष नेते आहेत. आपल्या सभागृहाची प्रतिष्ठा, सार्वभौमत्व, स्वाभीमान, प्रथा, नियम, परंपरा यांसंदर्भात ते आपल्याला वारंवार जाणीव करुन देतात. त्यावेळी आम्हाला बरे वाटते. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात जे निवेदन केले त्या निवेदनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी बोलले. मी कालचेच उदाहरण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

देतो. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या संदर्भात सीमा भागातील बांधव उपोषणाला बसले होते आणि त्या अनुषंगाने विधानसभा सभागृहाची बैठक तहकूब झाली. त्यासंदर्भातील मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी हरकत घेतली आणि सांगितले की, विधानसभा सभागृहामध्ये काय झाले त्याबाबत या सभागृहामध्ये काही घेणेदेणे नाही. त्यासंबंधी या सभागृहामध्ये बोलू नका अशी भूमिका त्यांनी घेतली होती. मग आज या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनावर अत्यंत चाणाक्षपणे, बेमालूमपणे त्यांनी "बाहेरुन दबाव आला, हायकमांडचा दबाव आला" अशा प्रकारचे वक्तव्य करुन श्री. नंदलाल यांच्या कृत्याचे अप्रत्यक्षपणे समर्थन करण्याचे काम केले असा माझा आरोप आहे. हे रेकॉर्डवर आलेले आहे. विधानसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम यांच्या दालनामध्ये काय चर्चा झाली ते या ठिकाणी सांगण्याची गरज नव्हती.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 14:55

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हेत्वारोप असतील तर ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे अशी माझी आपणास विनंती आहे.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : या संदर्भात दोन्ही बाजूकडून काहीसे वक्तव्य झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे. मी हे सर्व रेकॉर्ड तपासतो. जर एखादे वाक्य किंवा एखादा शब्द चुकीचा असेल तर त्याबाबतीत मी निर्णय घेईन.

श्री. नितीन गडकरी : मी जबाबदारीने सांगितले. विधानसभेतील माननीय सदस्य श्री.जे.सी.चांदूरकर यांना जाऊन विचारावे...

सभापती : काल सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जेव्हा विधानसभेचा संदर्भ दिला त्यावेळी त्यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेण्यात आला ही वस्तुस्थिती आहे. असे असले तरी अशा पध्दतीचे एखादे वक्तव्य या ठिकाणी केले म्हणून सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या बाबतीत काल जो नियम लावण्यातय आला तोच नियम या ठिकाणच्या वक्तव्याला लावणे आवश्यक आहे. हे रेकॉर्ड मी तपासून पाहून जे अयोग्य असेल ते काढून टाकले जाईल.

(सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी बोलत असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी काल सीमा प्रश्नाच्या अनुषंगाने जो संदर्भ दिला त्यावेळी त्यांच्या वक्तव्यावर आक्षेप घेण्यात आला आणि त्यामुळे ते थांबले. त्याच पध्दतीने या ठिकाणचे जे काही वक्तव्य केले गेले असेल ते मी तपासून पाहीन आणि ते जर चुकीचे असेल तर कामकाजातून काढून टाकले जाईल.

(सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी बोलत असतात.)

श्री. नितीन गडकरी : राजकीयदृष्टया अडचणीचे आहे ते रेकॉर्डवर ठेवायचे नाही आणि जे सोयीचे असेल ते ठेवायचे असा नियम नाही. सभागृहाचे कामकाज नियमाने चालते... माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे हे कोणाची लायकी काढतात?...

प्रा. जोगेंद्र कवाडे : मी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्याबाबतीत बोललो नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी.: "मुंबई मिरर" या इंग्रजी दैनिकात, विधान परिषदेमध्ये "फॅशन शो" संदर्भात झालेल्या चर्चेचा विकृत आणि आधार नसलेला मजकूर प्रसिध्द करणे

मु.शी.: "मुंबई मिरर" या इंग्रजी दैनिकात, विधान परिषदेमध्ये "फॅशन शो" संदर्भात झालेल्या चर्चेचा विकृत आणि आधार नसलेला मजकूर प्रसिध्द करणे याबाबत श्री. प्रमोद नवलकर वि.प.स. यांनी "मुंबई मिरर" या वृत्तपत्राच्या संपादकाविरुध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

उपसभापती : सन्माननीय ससदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनी "मुंबई" मिरर" या इंग्रजी दैनिकात विधान परिषदेमध्ये "फैशन शो" संदर्भात झालेल्या चर्चेचा विकृत आणि आधार नसलेला मजकूर प्रसिध्द करणे याबाबत "मुंबई मिरर" या वृत्तपत्राच्या संपादकाविरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री. प्रमोद नवलकर : सभापती महोदय, अत्यंत खेदपूर्वक हा हक्कभंगाचा प्रस्ताव मी आपल्यापुढे ठेवलेला आहे. गेल्या आठवड्यामध्ये या ठिकाणी फॅशन शो किंवा लॅक्मेचा जो शो ाला होता त्यावर सविस्तर चर्चा झाली. ती चर्चा झाली त्यावेळी मी या सभागृहामध्ये नव्हतो. परंतु सभापती महोदय, आपण असे आदेश दिले की, या प्रकरणी पोलिसांनी चौकशी करावी आणि त्या चौकशीचा अहवाल सभागृहासमोर ठेवावा. त्यानंतर दुस-या दिवशी तो अहवाल याठिकाणी आला. त्या अहवालावर मी परत असा आक्षेप घेतला की, एका दिवसामध्ये चौकशी होणे शक्य नाही. कारण ज्या संदर्भात चौकशी करावयाची आहे ते लोक मुंबई शहरामध्ये हजर नाहीत. ते मुंबईमध्ये हजर नसल्यामुळे त्यांची टेलिफोनद्वारे चौकशी केली असे अहवालामध्ये सांगण्यात आले. त्यावेळी मी पुन्हा आक्षेप घेतला आणि सांगितले की, टेलिफोनवरुन चौकशी करण्याचा प्रकार केव्हा सुरु केला ? त्यावेळी सभापती महोदय, आपण माननीय गृहमंत्र्यांना सांगितले की, पुन्हा सविस्तर चौकशी करा आणि सभागृहापुढे या. येथे हा विषय संपला.

...नंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ श्री.शिगम नंतर 15:00

श्री. प्रमोद नवलकर .....

पण दुसऱ्या दिवशी "मुंबई मिरर" या वर्तमानपत्राने सभागृहातील कामकाजाचे जे वर्णन केलेले आहे ते ठळक अक्षरात प्रसिध्द झालेले आहे. या सभागृहात त्यादिवशी या विषयावर चर्चा करताना जे घडले ती सगळी "सिली स्टोरी" होती असे वर्णन या वर्तमानपत्राने केलेले आहे. मूर्ख लोकांनी केलेली चर्चा होती असे म्हटले आहे. माझ्यावर जे आक्षेप घेण्यात आलेले आहेत त्याचा माझ्याशी काहीही संबंध नाही. माझा आक्षेप हा पोलिसांनी केलेल्या चौकशीपुरता होता. कल्चरल ॲक्टीव्हीटीबद्दल माझा आक्षेप नाही. या विषयावरील माझी मते जगजाहीर आहेत आणि त्या मतांशी मी ठाम आहे. सभागृहाचे पावित्र्य आणि या सभागृहात आपण आपल्या खुर्चीवरुन जे आदेश देता त्याचे महत्व असताना देखील" दोन मॉडेल्सना मनस्ताप होईल" अशा प्रकारचे भाष्य सभागृहात झाले असा आरोप या वर्तमानपत्रातून केलेला आहे. पत्रकारांनी संयम पाळलेला आहे. सभागृहामध्ये जे कामकाज चालते त्याला टिंगल-टवाळी असे संबोधिले गेले तर आम्हांला सभागृहात कोणताही विषय मांडता येणार नाही. कोणताही विषय मांडल्यानंतर त्याचा उपहास करावयाचा आणि त्याला सिली स्टोरी असे म्हणावयाचे हे बरोबर होणार नाही. सभापतींच्या खुर्चीवरुन आपण आदेश दिले होते. आपण त्यावेळी त्या खुर्चीवर होता. असे असताना देखील सिली स्टोरी असा त्याचा उल्लेख करण्यात आला आहे. माझा फोटो छापला आहे त्याला माझा आक्षेप नाही. सभागृहातील कामकाजाची टिंगल-टवाळी करुन अशा प्रकारे त्याचे अवमूल्यन करण्याचा अधिकार कोणत्याही पत्रकाराला दिलेला नाही. आपण त्यांना समज दिली पाहिजे. अशा प्रकारे सभागृहाच्या कामकाजावर भाष्य करता येणार नाही. जे झालेच नाही त्यावर भाष्य करता येणार नाही. यासंदर्भात जी चर्चा झाली ती पोलीस खात्याने सादर केलेल्या अहवालावर झाली आणि त्यावेळी आपण योग्य पध्दतीने गृहखात्याला आदेश दिले आणि सांगितले की यासंबंधात पुन्हा चौकशी करुन अहवाल सादर करावा. त्यावेळी माझा आग्रह एवढाच होता की, नीट चौकशी करा. शासनाला योग्य वाटेल त्या पध्दतीने चौकशी करावी. परंतु चर्चेचे निष्कर्ष अशा पध्दतीने पत्रकार काढू लागले तर कोणत्याही विषयावर सभागृहात बोलणे अवघड होईल. या ठिकाणी होणाऱ्या कामकाजाचे अवमूल्यन करावयाचे आणि निष्कर्ष काढावयाचे हे योग्य होणार नाही. "दोन मॉडेल्सना मनस्ताप देण्याचा हेतू होता" अशा प्रकारचे वर्तमानपत्रातून भाष्य करण्याबाबत आपण सहमत होऊ नये. वेगळया प्रथा निर्माण होतील आणि प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य राहणार नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहामध्ये जो हक्कभंग प्रस्ताव दाखल केला आहे त्याला पाठिंबा देताना मुंबई मिररने वर्तमानपत्रातून जी वाक्ये वापरली आहेत त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की," It is also inexplicable that the State authorities should accede to that rants of two M.L.Cs. Navalkar and Neelam Gorhe, both from the Shiv Sena and actually ordered two police inquiries in two days into incidents." मला मुख्यत: हक्कभंगाच्या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, सभागृहामध्ये या विषयावर दोन वेळा केवळ 10 ते 15 मिनिटे चर्चा झालेली आहे. असे असताना देखील " मुंबई मिररने " ही चर्चा कशी निरुपयोगी आहे त्यावर भाष्य केले आहे. इतर अनेक विषय असताना म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्या,कांद्याचा प्रश्न असताना " फॅशन शो "वर चर्चा करीत आहेत असे वृत्त या दैनिकात छापून आले आहे. म्हणजे आमच्या हेतूबद्दल शंका व्यक्त करणारी भूमिका या वृत्तपत्राने घेतली आहे. सभागृहामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्याचा हेतू हा होता की, अजूनही सीडीवर आणि सगळया प्रसार माध्यमांतून हा विषय मांडला जात आहे. हे प्रसारण करणे कायद्याचे भंग करणारे आहे काय याबद्दल शासनाने निर्णय घ्यावा. परंतु आमच्या हेतूबद्दल शंका व्यक्त करु नये. केवळ 15 मिनिटांची या विषयावर चर्चा झाली असताना इतर साडेसात तास चर्चा झाली ती सोडून केवळ या विषयावरील चर्चेला प्रसिध्दी माध्यमांनी महत्व देऊन प्रसिध्दी दिली आणि आता असा आरोप प्रसिध्दी माध्यमे करीत आहेत.

यानंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आमचे काय म्हणणे आहे, हे समजून न घेता, आमच्या हेतु बद्दल वारंवार गैरसमज पसरवून बोलले जात आहे. अशा प्रवृत्तीच्या लोकांची दखल सदनाने घेतली पाहिजे एवढीच माझी अपेक्षा हक्कभंग सादर करताना आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गुरूनाथ कुलकर्णी)

पृ.शी./मु.शी.: शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी...

श्री.दिवाकर रावते : दिनांक 13 एप्रिल 2006 दिनेश विनायक कडू, रा.बेतखेडा, ता.चांदूर, जिल्हा अमरावती, सुरेश रमेश ठोकळ, रा.वणी, बेसरवेडा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती, विजय भाऊसिंग जाधव, रा.शिंदी महाडा ता.बार्शीटाकळी, जि.अकोला, सुरेश दिगंबर सोलव, रा.खडकी (शहीद) ता.आष्टी, जि.वर्धा, सुंदरलाल माधवराव टेंबरे, रा.मांगली. ता.तुमसर, जि.भंडारा,

दिनांक 14 एप्रिल 2006, संदेश भिकाजी शिरसाट, रा.पोळासा, ता.बाळापूर, जि.अकोला, दत्तराव कडूजी कोतकर, रा.सेनगाव, ता.जि.हिंगोली, वसंत गोविंदा लबाडे, रा.पातुर्डा, ता.अमळनेर, जि.जळगाव,

दिनांक 15 एप्रिल 2006 लक्ष्मा गणूजी तिडके, रा.शहापूर, ता.खामगाव, जिल्हा बुलढाणा, राहूल रामदास भोयर, रा.पायगाव, ता.वरोरा., जि.चंद्रपूर,

दिनांक 16 एप्रिल 2006 नितीन सुरेश काळबांडे, रा.चांदूसरा, ता.जि.अमरावती, सौ.प्रभावती प्रल्हादराव दुबे, रा.कोतेगाव, ता.अंजनगाव सुर्जी, अमरावती,

दिनांक 17 एप्रिल 2006, विश्वनाथ नागोजी घुगे, रा.ब्राह्मणवाडा, ता.मालेगाव, जि.वाशिम, जगदिश खुशाल असोने, रा.वरूर, जिल्हा अमरावती, सुरेश सदाशिव औताडे, रा.राळेगाव, जि.यवतमाळ, गोपाळ गुलाब साबळे, वरूथ, ता.सातारा एकूण शेतकऱ्यांच्या आत्महत्येची संख्या 464.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी हक्कभंग प्रस्तावावरील आपले म्हणणे मांडले आहे. त्यांच्या हक्कभंगाची सूचना आपण स्वीकारली आहे किंवा काय ?

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी हक्कभंगाच्या सूचनेसंबंधी आपले म्हणणे मांडले आहे. सदर हक्कभंग होतो किंवा नाही यासंबंधीचा निर्णय नंतर देण्यात येईल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, हक्कभंग सूचनेवर किमान दहा जणांनी पाठिंबा दिला पाहिजे अशी कार्यपध्दती आहे. तसा पाठिंबा दिल्या शिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही. तेव्हा आपण कोणती कार्यपध्दती अनुसरणार आहात ?

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांच्या हक्कभंगासंबंधी पाठिंबा दर्शविणाऱ्या सहया घेण्यात आल्यानंतर सदर विषय हक्कभंगाच्या सूचनेत मोडतो किंवा नाही यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्र सभागृहासमोर ठेवणे.

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकआयुक्तांचे दिनांक 15 मार्च 2001, 8 मे 2001, 14 मे 2001, 24 एप्रिल 2002, 30एप्रिल 2002, 19 जून 2002, 5 जुलै 2002, 22 ऑक्टोबर 2002, 1 नोव्हेंबर 2002, 17 मे 2004 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभापती : स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले.

...

श्री.हसन मुश्रीफ (शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

शासकीय विश्वस्त (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, 2005 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एजीओ-1001/71-अ/(17-अ) - पंधरा, दिनांकित 23 डिसेंबर 2005.

तालिका सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

...

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

महाप्रशासक (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम 2005 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एजीओ-1000/294(76) का - पंधरा, दिनांकित, 17 डिसेंबर 2005.

तालिका सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

...

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादितचा सन 2001-2002, 2002-2003, 2003-2004 चा अनुक्रमे अठ्ठाविसावा, एकोणतिसावा व तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2004-2005 या वर्षाचे (1) महसुली जमा अहवाल (2) नागरी अहवाल (3)(अ)विनियोजन लेखा व (ब) वित्तीय लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभापती : वित्तीय लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च, 2005 रोजी संपलेल्या वर्षाचा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : (वाणिज्यिक) अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 1986 चे पहिले अधिवेशन ते सन 2005 चे दुसरे अधिवेशन या कालावधीमध्ये देण्यात आलेल्या एकूण 548 आश्वासनांच्या पूर्ततेसंसबंधी कार्यवाहीच्या विवरणपत्रांची यादी, तसेच विधानपरिषदेच्या सन 2005 च्या तिसऱ्या अधिवेशनात दिनांक 5 डिसेंबर, 2005 ते 16 डिसेंबर, 2005 या कालावधीत माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेल्या एकूण 515 आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : विवरणपत्रांची आणि आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2003-2004 चा अडतिसावा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

तालिका सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 15:10

पृ.शी./मु.शी.: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.अरविंद सावंत (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर करतो.

महोदय, हा अहवाल सादर करीत असताना मला या अहवालातील काही महत्वाच्या बाबी सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. हा अहवाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ यांच्या कामकाजासंबंधात भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन 2001-2002 तसेच 2002-2003 च्या वाणिज्यिक अहवालातील आक्षेपांबाबत आहे.

महालेखापरिक्षकांच्या आक्षेपांबाबतचा उहापोह अहवालात सविस्तरपणे करण्यात आला असल्यामुळे मी त्याचा येथे पुनरुच्चार करीत नाही. परंतु सार्वजनिक उपक्रम समितीने गेल्या वर्षभरात केलेल्या कामांची माहिती आपणास करुन देणे मला इष्ट वाटते.

सार्वजनिक उपक्रम समितीने गेल्या वर्षभराच्या कालावधीत सुमारे 30 ते 40 महामंडळांच्या कामकाजाचा आढावा घेतला असून, समितीने विभागांकडून पुरविल्या जाणाऱ्या ज्ञापनातील माहितीवर विसंबून राहण्यापेक्षा प्रत्यक्ष साक्षीपुरावे नोंदवून घेण्यावर जास्त भर दिलेला आहे. अनेक महामंडळे तोटयात जाण्याला अन्य कारणांपेक्षा मानवी चुकाच जास्त जबाबदार असल्याचे समितीस आढळून आले आहे. संचालक मंडळाचा अवास्तव हस्तक्षेप, व्यवस्थापकीय संचालकांच्या मतांकडे संचालक मंडळाचे होणारे दुर्लक्ष, व्यवस्थापकीय संचालक पदावर अस्थिर नेमणुका, अनावश्यक खरेदी, पुरवठादारांना संगनमताने दिल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह सवलती, तसेच सामाजिक बांधिलकीची जाणीव न ठेवता केले जाणारे आर्थिक व्यवहार हे अनेक महामंडळांच्या तोटयास प्रामुख्याने जबाबदार असल्याचे समितीस आढळून आले आहे. आर्थिक गैरव्यवहार करुन महामंडळ डबघाईस आणून महामंडळ बंद पाडण्याचे प्रयत्न अनेक ठिकाणी होत असल्याचे देखील समितीस आढळून आले आहे. त्यामुळे जोपर्यंत महामंडळाचे संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक व महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी सामाजिक बांधिलकीने आपली जबाबदारी पार पाडणार नाहीत, तोपर्यंत तोटयात जाणारी महामंडळे आर्थिक सुस्थितीत येऊ शकणार नाहीत. त्यामुळे

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

महामंडळाच्या व्यवस्थापनात ही सामाजिक बांधिलकीची भावना रुजवणे समितीस जास्त आवश्यक वाटते. शासनाने त्या दृष्टीने महामंडळाच्या कारभारात योग्य त्या सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. जेणेकरुन, राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या उद्देशाने स्थापन झालेली ही महामंडळे बंद पडण्याचा धोका टाळता येईल.

या अहवालाद्वारे करण्यात आलेल्या शिफारसींची नोंद घेऊन महामंडळाच्या कारभारात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न संबंधित महामंडळे तसेच शासनामार्फत केला जाईल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

तालिका सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा तिसरा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

नंतर श्री.कांबळे....

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री. विलासराव शिंदे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर करतो.

तालिका सभापती : अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. अब्दुल सत्तार (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा चौथा अहवाल सभागृहाला सादर करतो.

तालिका सभापती : अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी खालीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो.

" विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्र्यांनी ऑनलाईन लॉटरीवर बंदी घालण्याचे आश्वासन दिले आहे. तरीही, या लॉटऱ्या सुरु असल्याचे वृत्त नामवंत दैनिकांतून प्रसिध्द झाले आहे. त्याचबरोबर मोबाईल फोन कंपन्यांनी प्रत्येकी दहा रुपयेप्रमाणे सॅटेलाईट लॉटरी सुरु केली आहे. तिच्या बक्षिसांची रक्कम एक लाख रुपये असून तिचा निकाल एक दिवस आड करुन असतो. ह्या लॉटरीला खेळण्यासाठी आपल्या हच मोबाईलवरुन 7007 नंबरवर SMS केल्यानंतर मोबाईलधारकाच्या खात्यातून दहा रुपये वजा होतात. मोबाईलद्वारे चालत असलेल्या ह्या जॅकपॉट लॉटरीसाठी शासनाकडून परवानगी घेतली आहे काय ? नसल्यास, अवैधपणे चालणाऱ्या मोबाईल लॉटरीवर शासनाने तातडीने कारवाई करावी. "

सभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी या संदर्भात दखल घ्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : होय.

सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपले धन्यवाद मानतो. महाराष्ट्रातील शिक्षकांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क परतावा योजनेंतर्गत शेकडो पाल्यांचे अद्यापही शिक्षण शुल्क परतावा केलेले नाही. बऱ्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना परीक्षेस न बसू देण्याचा चंग महाविद्यालयांनी बांधलेला आहे. बऱ्याच प्रकरणी व्याजाने पैसे काढून प्राथमिक शिक्षकांनी उच्च शिक्षणासाठी वेगवेगळ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेला आहे. सभापती महोदय, त्यांना हॉल टिकिट्स न देणे, परिक्षेस न बसविण्याचे प्रकार चालू आहेत. तरी, या संदर्भात त्वरेने कार्यवाही करुन अशा पाल्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे. तरी, या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी ताबडतोब ॲक्शन घ्यावी, अशी विनंती आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी नोंद घ्यावी.

प्रा. वसंत पुरके : होय.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, काल मुंबईमध्ये एम.एम.आर.डी.ए. तर्फे मरिन ड्राईव्हचे सुशोभिकरण करण्याचा मोठा कार्यक्रम साजरा झाला. त्या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून दक्षिण मुंबईमधील सन्माननीय आमदार सर्वश्री मंगलप्रभात लोढा, राज पुरोहित यांना आमंत्रित केले होते. परंतु शिवसेनेचे सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद नेरकर व प्रमोद नवलकर यांना या कार्यक्रमाचे आमंत्रण दिले नव्हते. सभापती महोदय, या सुशोभिकरणाची त्यांच्याच माध्यमातून सुरुवात झाली. चौपाटीचे सुशोभिकरण हा मुद्दा देखील सन्माननीय सदस्य श्री. प्रमोद नवलकर यांनीच काढला होता. सभापती महोदय, त्याच भागामध्ये हे सुशोभिकरणाचे काम होत आहे. तरी, सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना माझे विचारणे आहे की, अशाप्रकारचा भेदभाव का होत आहे ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी दखल घ्यावी, अशी विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : होय.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. कांबळे... 15:20

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या व अनुदानास पात्र ठरलेल्या तुकडयांना 30 एप्रिल, प्रयत्न अनुदान देण्याचे व पात्र तुकडयांची यादी जाहिर करण्याचे आश्वासन शासनाने दिले होते. मात्र अद्यापही यादी जाहिर झालेली नाही. तसेच 10 जून 2005 च्या शिक्षण सेवकांच्या जी.आर. मधील आक्षेपार्ह मुद्दा वगळून सुधारीत आदेश 2 दिवसात काढण्याचे मान्य केले होते, या सर्व आश्वासनांची तातडीने पूर्तता व्हावी यासाठी सभापतीने निर्देश द्यावते अशी माझी औचित्यांच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नोंद घेतली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या अनेक वर्षापासून दारुबंदी व्हावी म्हणून ठीकठीकाणी महिलांनी आंदोलने केलेली आहेत. त्या आंदोलनातून अनेक ठिकाणी महिलांवर केसेस झालेल्या आहेत....

तालिका सभापती : डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या औचित्यांचा मुद्दा त्यांनी तो उद्या मांडावा तो पुढे ढकलण्यात आलेला आहे.

श्री. अरविंद सांवत : सभापती महोदय, परवा मुंबईच्या विषयावर चर्चा चालू असतांना मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या तानसा व वैतरणा धरणातून जलवाहिन्याद्वारे मुंबईला पाणी मिळत आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणा-या भिवंडी व शहापूर परिसरातील तानसा व वैतरणा धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त भागातील जे भूमिपुत्र आहेत त्यांना नोकऱ्या देण्याचा प्रश्न उद्‌भवलेला आहे या मागण्यांसाठी गेल्या 6 ते 7 वर्षापासून ते आंदोलने करीत आहेत, आजही त्यांचे आंदोलन चालू आहे, मुंबईला पाणी पुरवठा करण्यासाठी 1972, 1954 व 1975 मध्ये ही धरणे बांधण्यात आलेली आहेत. भिवंडी तालुक्यामधील 84 गावांचा समावेश असतांना तेथील प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यात आलेल्या नाहीत, तसेच कोणत्याही सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, गेल्या 5 ते 6 वर्षापासून या प्रश्नावर आंदोलने करुन भुमिपुत्र शासनाचे लक्ष वेधू इच्छित आहेत परंतु शासन त्यांच्या आंदोलनाची दखल घेत नाही. सदर आंदोलनकारांनी अशी घोषणा केलेली आहे की, आमच्या आंदोलनाची दखल जर शासनाने घेतली नाहीत तर मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या ज्या जलवाहिन्या आहेत त्या फोडून पाणीपुरवठा बंद करण्यात येईल, प्रकल्पग्रस्त संघटनेचे नेते श्री. विश्वनाथ पाटील यांनी अशी घोषणा केलेली आहे. या प्रकल्पग्रस्तांना जर न्याय मिळाला नाही व त्यांनी जर पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या फोडल्यातर मोठा हाहा:कार माजेल यासाठी शासनाने याबाबत दक्षता घ्यावी अशी माझी औचित्याच्या मुद्दयाद्वारे विनंती आहे. ....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आजच्या लोकसत्ताच्या मुंबई वृत्तांतमध्ये एक बातमी आलेली आहे. 26 जुलैच्या महाप्रलयी पावसाने राज्यात हाहा:कार उडाला होता, लाखों लोकांचे संसार उदध्वस्त झाले होते. शासनाने अनेकांना नुकसान भरपाई दिली होती. परंतु श्री. अरुण बेळे मात्र आज नऊ महिन्यांनंतरही मदतीच्या प्रतिक्षेत आहेत, श्री. अरुण बेळे गेल्या 25 वर्षापासून तमाशाचे कलाकेंद्र थिएटर चालवत आहेत, पुणे नगर मार्गावर असलेल्या हवेली तालुक्यातील 71 रानवारा, पेरणेफाटा येथे अरुण बेळे यांचे तमाशाचे कलाकेंद्र होते. 26 जुलैच्या महापुरात भीमा नदीला आलेल्या महापुरात हे कलाकेंद्र वाहून गेले आणि श्री. अरुण बेळे उघडयावर आले. त्यांच्या गावातील शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळाली मात्र अरुण बेळे गेल्या 9 महिन्यांपासून मंत्रालयात चकरा मारीत आहेत. कलाकेंद्रासाठी घेतलेल्या कर्जाचा डोंगर दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत होत नसल्यामुळे श्री. अरुण बेले यांनी 27 एप्रिलपर्यंत नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदत मिळाली नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

अनेक शासकीय महोत्सव, तमाशाचे अनेक कार्यक्रम, लावणी महोत्सव अशा अनेक क्षेत्रामध्ये त्यांचे नाव आदराने घेतले जाते. पारंपारीक लावण्या, लोककलेचा वारसा जतन करण्याचे काम गेल्या 25 वर्षापासून ते सातत्याने करीत आहेत. अशा या कलावंताला अनेक महिन्यापासून कोणत्याही प्रकारची मदत केली गेली नाही. म्हणून त्यांनी 27 एप्रिलला आत्मदहनाचा इशारा दिला आहे. तेव्हा आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, या कलावंताचे प्राण वाचविण्यासाठी तातडीने मदत देण्याचे आदेश आपण शासनाला द्यावेत अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : सन्माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी याची नोंद घ्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माझा औचित्याचा मुद्दा उद्या उपस्थित करतो.

तालिका सभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, अनंत तरे, डॉ. नीलम गोऱ्हे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "वसई, जि. ठाणे येथील विंडस ऑफ रिफ्यूज ऑफनेज या आश्रमातील विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार होत असल्याच्या घटना उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी "दिनांक 13 एप्रिल 2006 रोजी औरंगाबाद महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक मुजीब आलम शहा यांनी श्री. राठोड या अधिकाऱ्यास केलेली मारहाण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी यांनी "चिल्ड्रन्स फ्यूचर, नॉर्वे या परदेशी सामाजिक संस्थेने राज्यातील विश्वस्त संस्था कम्युनिटी एड ॲन्ड स्पॉन्सरशिप प्रोग्राम या संस्थेवर पुणे येथील न्यायालयात केलेली भ्रष्टाचाराबाबतची तक्रार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी "मुंबईतील जे. जे. रुग्णालयात एड्स निर्मूलनासाठी कार्यरत असणाऱ्या ॲरकॉन या संस्थेने जागतिक बँकेकडून मिळालेल्या निधीत केलेला आर्थिक गैर व्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर त्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहिले पाहिजे. परंतु सूचना देणारे माननीय सदस्य जर सभागृहामध्ये उपस्थित नसतील तर त्यांची सूचना आपण कशासाठी घ्यावयाची?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे असे मला वाटते...

तालिका सभापती : मी फक्त शासनाने निवेदन करावे असे म्हटले आहे, तातडीने निवेदन करावे असे म्हटलेले नाही.

माननीय सदस्य सर्वश्री प्रा. बी. टी. देशमुख व इतर वि.प.स. यांनी "अमरावती जिल्हयातील मान्यताप्राप्त निम्नपेढी प्रकल्पाच्या कामास अद्यापही सुरुवात झालेली नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या दोन्ही प्रकल्पांच्या बाबतीत टाईम बाऊंड असे 31 मार्चपर्यंत शासनाने आश्वासन दिले होते. तेव्हा यावर उद्या निवेदन करण्यात आले तर या प्रश्नाला न्याय मिळेल.

तालिका सभापती : शासनाने लवकरात लवकर निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी "राज्य शासनाने केंद्राप्रमाणे वृध्द निराधारांच्या निवृत्ती वेतनात वाढ करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुले देण्याच्या योजनेत विविध जिल्हयांत अनेक गैरप्रकार उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री. अनंत तरे, वि.प.स. यांनी "पनवेल (जि. रायगड) सेवायोजन कार्यालयात पर जिल्हयातील नातेवाईकांची बोगस नोंदणी करुन त्यांना सार्वजनिक बांधकाम विभागात नोकऱ्या लावल्याचा प्रकार दिनांक 13 एप्रिल 2006 रोजी उघडकीस येणे" या विषयावर

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा. तालिका सभापती..

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

माननीय सदस्य प्रा. शरद पाटील व इतर वि.प.स. यांनी "करमाळा तालुक्यातील (जि. सोलापूर) येथील पोथरे परिसरातील ढेकळेवाडी भागात जनावरांना झालेल्या लाळ खुरकुताच्या साथीत 550 जनावरे दगावणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय तालिका सभापती....

माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी गुटखकिंग जगदिश जोशी व रसिकलाल धारीवाल यांनी आपले नाव चार्जशीटमध्ये येऊ नये म्हणून मुंबई पोलिसांना 12 कोटी रुपये दिल्याचा गौप्यस्फोट "आजतक" वाहिनीवर झाल्याबाबत", या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी " चंद्रपूर जिल्ह्यात केरोसिनच्या अवैध व्यवसायामध्ये गुंतलेल्या भद्रावतीच्या एका एजन्सीच्या प्रूमुखाला वाचविणाऱ्या पोंभुर्णीचे तहसिलदार यांना निलंबित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य व्ही.यू.डायगव्हाणे, वि.प.स. यांनी "पंडित दीनदयाळ उपाध्याय विद्यालय, डोंगर्ला, तालुका तुमसर, जिल्हा भंडारा या शासनमान्य माध्यमिक शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुलै 2004 पासूनचे वेतन अनुदान अद्यापही अदा झाले नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-

श्री.अनंत तरे : सभापती महोदय मी मोखाडा पंचायत समितीचे सभापती यांचे लेटरपॅड वापरुन उप सभापतींनी खोट्या सहया घेऊन त्यांचा राजिनामा मंजूर केल्याबाबतच्या गंभीर विषयावर 93 ची सूचना दिलेली होती.

तालिका सभापती : सभापतींनी ज्या 93 च्या सूचना मंजूर केल्या त्या मी येथे सांगितलेल्या आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी मिठी नदीच्या संदर्भात 93 ची सूचना दिलेली होती. त्या संदर्भात गेल्या आठवड्यात 7 दिवसात निवेदन केले जाईल असे शासनाकडून सांगण्यात आले होते परंतु त्याबाबत शासनाने निवेदन केलेले नाही.

श्री.राजेश टोपे : उद्या त्याबाबतचे निवेदन करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण : त्यानंतर मुंबईमध्ये अतिवृष्टी झाली त्या संदर्भात 17 मार्चला दोन दिवसात निवेदन केले जाईल, असे सांगण्यात आले होते. परंतु अजून निवेदन करण्यात आलेले नाही,आता अधिवेशन संपण्याची वेळ आलेली आहे त्यानंतर एका पोलीस इन्स्पेक्टरनी पोलीस कर्मचाऱ्याच्या फंडातील पैशाचा गैरव्यवहार केल्या प्रकरणी मी 93 ची सूचना दिली होती त्याबाबतही निवेदन करण्यात आलेले नाही. त्याबाबत पुढच्या आठवडयात निवेदन करण्यात येईल अशाप्रकारचे सांगण्यात आले होते परंतु अधिवेशन संपत आलेले आहे. नेमके त्या निवेदनाचे काय झाले ? जनतेचे प्रश्न आम्ही मांडलेले आहेत, त्या संदर्भाने खुलासा करण्यामध्ये अडचण काय आहे ?

तालिका सभापती : अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने या संबधाने निवेदन करावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लातूर शहरातील एका मागासवर्गीय शाळकरी मुलीचे जबरदस्तीने केलेले मुंडन.

मु.शी. : लातूर शहरातील एका मागासवर्गीय शाळकरी मुलीचे जबरदस्तीने केलेले मुंडन, याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,श्रीकांत जोशी,विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीमती कांता नलावडे व श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,श्रीकांत जोशी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीमती कांता नलावडे व श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी "लातूर शहरातील एका मागासवर्गीय शाळकरी मुलीचे जबरदस्तीने केलेले मुंडन" याबाबत.या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निती-न □ड□री : सभापती महोदय, □लेल्या निवेद-ााबाबत माझे समाधा-न झालेले आहे.

श्री.पांडुरं□ फुंड□र : सभापती महोदय, विषय फार □भीर आहे. □मारी स्वाती दत्तात्रय जो□दंड ही 16 वर्षाची मुल□ी आहे. दसरा चौ□ातील □श □र्त-ा□ार श्री.सूर्य□ांत चि□ाली□र यां-ाी आपल्या दो-ान साथीदारांच्या मदती-ने त्या मुलीच्या डोक्यावरील □स □ापू-न तिचे मुंड-न □ले. त्या-नंतर त्या मुली-ने पोलीस स्टेश-नमध्ये त□ार □ली. त्या संदर्भात उत्तर दिलेले आहे □ी," सदर मुली-ने दिलेल्या त□ारी-नुसार □श □र्त-ा□ाराविरुध्द □ु-हा दा□ाल □र□यात आला असू-न □ु-ह्याच्या चौ□शीत सदर मुली-ने आपल्या मैत्रि□ीसोबत □श □र्त-ा□ारा□डे जावू-न स्व□ुशी-ने □स □ाढू-न घेतल्याचे निष्पन झाले आहे. □श □र्त-ा□ाराविरुध्द त्या मुली-ने दिलेली त□ार ही तिला तिच्या वडिलां□ी मारहा□ □ल्यामुळे दिल्याचे □िष्पन झाले आहे. त्यामुळे त्या □श□र्त□□ारास अट□ □लेली -नाही."

या-नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, 16 वर्षाची मुलगी तक्रार देते. त्या मुलीने काही स्टेटमेंट केले आहे काय ? वडिलांनी मारले म्हणून तक्रार दिली काय ? तिच्या आईने शासनाला काही कळविले आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कु. स्वाती दत्तात्रय जोगदंड या मुलीने जबरदस्तीने केस काढले अशी तक्रार अगोदर दिली होती. नतर चौकशीमध्ये तिने स्वत: जबाब दिला आहे की, मी स्वत:हून केस काढले. तसेच तिच्या मैत्रिणीनेही जबाब दिला आहे की, त्या मुलीने स्वत:हून केस काढले. काही लोकांनी सांगितले की, संपूर्ण केस काढल्यानंतर तुझे केस येतील म्हणून तिने स्वत: जाऊन केस काढून घेतले. केस काढल्यानंतर ती घरी गेली. घरी आल्यानंतर आईने तिला विचारले की, असे का केले ? हे चुकीचे केलेले आहे. त्या मुलीने स्वत: जबाब दिलेला आहे की, मी स्वत:हून केस काढलेले आहेत. तिच्या मैत्रिणीचाही जबाब आहे की, त्या मुलीने स्वत:हून केस कढलेले आहेत.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

पृ. शी. : श्री. छोटीराम अर्जून बागुल यांचा झालेला संशयास्पद मृत्यू.

मु. शी. : श्री. छोटीराम अर्जून बागुल यांचा झालेला संशयास्पद मृत्यू याबाबत श्री. विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट, डॉ. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, यांनी "श्री. छोटीराम अर्जून बागुल यांचा झालेला संशयास्पद मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : या निवेदनामध्ये माननीय मंत्रिमहोदयांना काही सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये शेवटच्या चौथ्या ओळीतील "मयताचे वारस" हे दोन शब्द वगळण्यात यावेत तसेच शेवटच्या ओळीत शेवटी "मयताच्या मुलाने एका व्यक्तीवर संशय व्यक्त केला आहे " असे वाचावे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, या नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने शासनाने जे निवेदन दिलेले आहे त्याबाबत "अजब न्याय गृह खात्याचा" असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. वरुन दबाव आल्यानंतर पोलीस खात्याची चक्रे कशी फिरतात याचा नमुना मी आपल्यासमोर ठेवतो. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, सदर घटनास्थळी मयताचे प्रेतावर करण्यात आलेला इन्क्वेस्ट पंचनामा व घटनास्थळ पंचनामा हा समक्ष उपस्थित असलेल्या पंचांच्या उपस्थितीत करण्यात आलेला असून या पंचांनी परिस्थिती पाहूनच पंच म्हणून सदर पंचनाम्यावर सह्या केलेल्या आहेत. त्या ठिकाणी साक्षीदार श्रीमती लक्ष्मीबाई गुलाब बहिरम यांनी पोलीस महासंचालकांना दिनांक 3 फेब्रुवारी, 2006 रोजी पत्र लिहिलेले आहे. त्या पत्रात असे म्हटले अहो की, "मी सदर घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिली व घाबरले. मला (1) रतन भाबडू चौधरी, (2) पोपट दशरथ चौधरी हे मारुन टाकतील या भीतीने घरी पळून आली. परंतु आज मी सत्य सांगण्यास प्रवृत्त झाली आहे. कारण मी सर्व घटना पाहिली आहे आणि त्यामुळे वरील लोक माझ्या जीवाला केव्हाही काहीही करु शकतात म्हणून स्वत:च माझ्या गावचे पोलीस पाटील बाबुराव काशीराम बागुल यांना सदर घटना सांगितली आहे." तिने पत्रात असेही म्हटले आहे की, " मी दि. 17.1.06 रोजी सायं. 7.30 वाजता माझ्या शेतातील खळ्यात चारा घेण्यासाठी गेले असता गावातील माजी पोलीस पाटील श्री. छोटीराम अर्जून बागुल हे चीर बंधाऱ्याकडे येताना मी पहिले. तेवढयात (1) रतन भाबडू चौधरी, (2) पोपट दशरथ चौधरी हेत्यांच्या शेतातून समोर आले व छोटीराम अर्जून बागुल यांना पकडले आणि त्यांच्या गळ्यातील मफलरने गळा आवळला.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. विलास अवचट : त्या ठिकाणी आय विटनेसने माहिती दिलेली आहे. साक्षीदाराने असे म्हटले आहे की, माझ्या डोंळ्यासमोर या दोन आरोपींनी मफलरने गळा आवळून खून केला. ही

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ....

गोष्ट खरी आहे काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये पंचनामा झाल्याचे सांगितले आहे. माझ्याजवळ 50 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर केलेले ॲफिडेव्हीट आहे. त्या साक्षीदारांनी असे म्हटले आहे की, आमचे नाव साक्षीदार म्हणून नोंदले आहे पण आम्ही त्या ठिकाणी उपस्थितच नव्हतो. ज्या दोन पंचांनी सह्या केल्या त्यांनी असे म्हटले आहे की, "दिनांक 19.1.2006 रोजी सायं. 4.30 ते 6.00 या कालावधीत मी सुतारे शिवारातील कान नदीच्या चीर बंधाऱ्यावर हजर नव्हतो. माझ्या हजेरीत छोटीराम अर्जून बागुल यांच्या प्रेताचा पंचनामा व घटनास्थळ पंचनामा करण्यात आला नाही. सदर पंचनामे तयार होते." पोलीस स्टेशनवर बोलवून पंचनाम्यावर सही घेतली असे त्यांनी म्हटले आहे. अशा प्रकारची तीन निवेदने आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलास अवचट...)

सभापती महोदय, साक्षीदारांनी सी.डी. दिलेली असून ती सी.डी. मी स्वत: पाहिलेली आहे. त्यामध्ये धुळे भागातील भाषा आहे. मी ह्या सर्व बाबी माननीय राज्यमंत्री महोदयांकडे देतो. पंचानी माझ्याकडे प्रतिज्ञापत्र दिलेले असून त्याद्वारे त्यांनी सांगितलेले आहे की, आम्ही तेथे हजर नव्हतो. माझा प्रश्न असा आहे की, ज्यावेळी पंचनामा झाला त्यावेळी आम्ही हजर नव्हतो असे जे साक्षीदारांनी सांगितलेले आहे, ते खरे आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : हा पंचनामा झाला त्यावेळी त्याठिकाणी चौघे हजर होते. माननीय सदस्यांनी याठिकाणी प्रतिज्ञापत्राचा उल्लेख केलेला आहे. तेव्हा या सर्व प्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिका-याकडून चौकशी केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : जेव्हा पंचनामा केला त्यावेळी आम्ही तेथे हजर नव्हतो असे साक्षीदारांनी सांगितलेले आहे. माननीय सदस्यांकडे सी.डी.देखील आहे. ह्या सर्व गोष्टी सदनामार्फत शासनापुढे आलेल्या आहेत. म्हणून या खुनाच्या प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या संपूर्ण प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी केली जाईल.

डॉ. नीलम गो-हे : या प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी केली जाईल असे माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. या खुनाच्या प्रकरणी निवेदनामध्ये अकस्मात मृत्यू झाल्याचे म्हटलेले आहे. तेव्हा अशा प्रकारे चुकीची माहिती देणा-या अधिका-यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या घटनेतील आरोपी हे एकमेकांचे पाहुणे आहेत, जवळचे नातेवाईक आहेत. त्यांनी एकदा एक जबाब दिलेला आहेत तर दुस-या वेळी दुसरा जबाब दिलेला आहे. या प्रकरणी सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात येईल असे मी सांगितलेले आहे.

ॲड. अनिल परब : पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये विसंगती आहे. माणसाचा जेव्हा बुडून मृत्यू होतो त्यावेळी त्याचे प्रेत पाण्यावर तरंगते आणि पोटामध्ये पाणी असते. याप्रकरणी प्रेत पाण्यातून सरळ वर आले होते आणि त्या प्रेतातून पाणी निघाले नाही. तेव्हा याप्रकरणी सत्य माहिती काय आहे ?

..2..

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : म्हणूनच मी मघाशी सांगितले की, या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : श्री. एन.डी.आसेकर यांना नियमबाह्यपणे मुख्याध्यापक म्हणून मान्यता देणे

मु.शी : श्री. एन.डी.आसेकर यांना नियमबाह्यपणे मुख्याध्यापक म्हणून मान्यता देणे याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक व श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ. अशोक मोडक व श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "श्री. एन.डी.आसेकर यांना नियमबाह्यपणे मुख्याध्यापक म्हणून मान्यता देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर : या प्रकरणी हिवाळी अधिवेशनामध्ये नियम 93 अन्वये सूचना दिली होती. त्यावेळी दिशाभूल करणारे उत्तर मिळाल्यामुळे पुनश्च ही सूचना द्यावी लागली आहे, हे दुर्दैव आहे. चुकीच्या उत्तरामुळे सदनाचा वेळ अशा प्रकारे वाया जाणे इष्ट नाही. श्री. एन.डी. आसेकर हे बी.कॉम.बी.पी.एड. झालेले असून त्यांचा पुरेसा कार्यभार झालेला नसताना त्यांना मुख्याध्यापक म्हणून शिक्षणाधिका-यांनी मान्यता दिलेली आहे. ही चूक झालेली आहे. खरे म्हणजे 5 वर्षे सेवा झाल्यानंतर मुख्याध्यापक पदी नेमणूक करता येते. श्री. आसेकर यांची सेवा केवळ दोन वर्षे झालेली असताना त्यांची मुख्याध्यापक पदी नेमणूक करण्यात आलेली आहे. यामध्ये काय काय गैरव्यवहार झालेले असतील ते आपण समजून घ्यावेत. या मुख्याध्यापकाला वेतन देणा-या शिक्षणाधिका-याच्याबाबतीत आपण कोणता निर्णय घेणार आहात ? अपात्र मुख्याध्यापकाची नेमणूक रद्द करुन पात्र व्यक्तीची पूर्वलक्षी प्रभावाने नेमणूक करण्यात येणार आहे काय ? शिक्षण उपसंचालकांनी या प्रकरणी 13.7.2002ला सुनावणी घेतली असून त्या बाबतीत अद्याप निर्णय घेतलेला नाही. त्यांची 16 लाख 64 हजार 70 रुपये ही थकबाकी कोणाकडून वसूल करण्यात येणार आहे ?

...नंतरश्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 15:45

श्रीमती संजीवनी रायकर ...

सभापती महोदय, अपात्र शिक्षकाला मान्यता दिली इतकेच नाही तर मुख्याध्यापक पदाला सुध्दा मान्यता देणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्याला शासन निलंबित करणार आहे काय ? उत्तरामध्ये म्हटले आहे की, संबंधित शिक्षणाधिकाऱ्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. हा खुलासा किती दिवसात प्राप्त होणार आहे ? या सर्व प्रश्नांबाबत शासन तातडीने निर्णय घेणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यासंदर्भात शासन दोन महिन्यात निर्णय घेईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, संबंधित शिक्षक श्री. आसेकर हे शिक्षक पदासाठी पात्र नव्हते तसेच मुख्याध्यापक पदासाठीही पात्र नव्हते. म्हणजेच हा निष्कर्ष शासनाने काढलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, श्री. आसेकर या शिक्षकाला अनुभव नसतानाही नेमणुकीस मान्यता दिली आणि मुख्याध्यापक पदी सुध्दा मान्यता दिली आहे या दोन्ही पदांच्या मान्यता शासन तातडीने रद्द करणार आहे काय ? चुकीच्या पध्दतीने शिक्षकांना मान्यता देण्यात आलेली आहे. संबंधित शिक्षणाधिकाऱ्यावर शिक्षण उपसंचालकांनी आरोप ठेवले आहेत आणि ते सिध्द झालेले आहेत. म्हणून संबंधित अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई केली जाणार आहे काय ? संबंधित शिक्षकाला दिलेली मान्यता आणि त्याच्या पदोन्नतीला दिलेली मान्यता शासन तातडीने रद्द करणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, संबंधित शिक्षणाधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत नोटीस दिलेली आहे. त्याच्यावर निश्चितपणाने कारवाई करण्यात येईल. पात्रता नसताना श्री.आसेकर यांची नियुक्ती केली त्यांच्या नियुक्तीवर जो खर्च झालेला आहे तो वसूसल केला जाणार आहे. ज्यांनी खोटी माहिती दिली त्यांच्यावर देखील शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. नियुक्ती नियमित केलेली आहे आणि पेमेंट दिलेले आहे. अपात्र शिक्षकाच्या बाबतीत येत्या दोन महिन्यात निर्णय घेऊन कारवाई करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.:महानगरपालिका,नगरपालिका क्षेत्रात आकारला जाणारा
जकात कर रद्द करणे.

मु.शी.: महानगरपालिका,नगरपालिका क्षेत्रात आकारला जाणारा
जकात कर रद्द करण्याबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी,वि.प.स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी "महानगरपालिका,नगरपालिका क्षेत्रात आकारला जाणारा जकात कर रद्द करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....3

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 15:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, जकात कर रद्द करण्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. महाराष्ट्रातील 152 व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी आझाद मैदानावर उपोषणासाठी बसले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांबरोबर एक बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये सांगण्यात आले होते की, या प्रश्नाच्या बाबतीज 10-15 दिवसात निर्णय घेतला जाईल. परंतु निवेदनामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "महानगरपालिकांना जकात कराऐवजी अन्य पर्यायाचा विचार करण्यासाठी शासनाने प्रधान सचिव(वित्तीय सुधारणा-वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन केला आहे. हा अभ्यास गट व्यापारी संघटनेच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा करुन आणि त्यांचे अभिप्राय विचारा घेऊन आपला अहवाल शासनास सादर केल्यानंतर जकात कर पर्यायाबाबत निर्णय घेण्यात येईल." सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, हा जकात कर रद्द करण्याचा निर्णय शासन किती दिवसात घेणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 10 हजार कोटी रु. जकात कराच्या माध्यमातून शासनाला उत्पन्न मिळत आहे. महानगरपालिकांच्या माध्यमातून 2400 कोटी रुपये मिळत आहेत. सर्व शहरांना नागरी सुविधा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून ही उत्पन्नाची बाब आहे. हा जकात कर रद्द करण्याचा शासनाचा स्पष्ट विचार आहे. परंतु याला पर्याय शोधण्याच्या दृष्टिकोनातू काम सुरु आहे. प्रधान सचिव(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली यासाठी समिती नेमलेली आहे. मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, या समितीचे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासकीय योजनांचा फायदा कुपोषणग्रस्त आदिवासींना न मिळणे.

मु.शी.: शासकीय योजनांचा फायदा कुपोषणग्रस्त आदिवासींना न मिळणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यानी 'शासकीय योजनांचा फायदा कुपोषणग्रस्त आदिवासींना न मिळणे' या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कुपोषणाच्या प्रश्नासंबंधी सभागृहामध्ये चर्चा होत असते. कुपोषणामुळे अनेक मृत्युमुखी पडतात. यासंबंधीची माहिती डॉ.बंग यांनी आपल्या अहवालामध्ये दिलेली आहे. कुपोषणाचा प्रश्न हा पाच जिल्हयांपुरता मर्यादित नाही असे देखील डॉ.बंग यांनी आपल्या अहवालामध्ये नमूद केले आहे. तशा संबंधीचे स्टेटमेंट देखील त्यांनी पुण्यामध्ये केले आहे. तेव्हा कुपोषणाच्या प्रश्नासंबंधी शासन पुनर्विचार करणार आहे काय ? राज्यातील बालकांमधील कुपोषंणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन सुरू करण्यात आले आहे. या मिशनसाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे व आता पर्यंत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे ? बऱ्याच ठिकाणी अन्नधान्य न पोहोचल्यामुळे कुपोषणामुळे मृत्युचे प्रमाण वाढले आहे, असे अनेकांचे म्हणणे आहे. तेव्हा पुढच्या चार महिन्यासाठी अन्नधान्य वितरणाच्या संबंधी शासन संनियंत्रण ठेवणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, पाच जिल्हयांपुरता ही योजना लागू केली होती. तो पहिला फेज होता. दुसरा फेज हा 10 जिल्हयांसाठी लागू करणार आहे. 3 वर्षामध्ये 15 आदिवासी जिल्हयांतून कुपोषण निर्मूलनाचे करण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशनचे मुख्यालय औरंगाबाद येथे आहे. ग्रामविकास, आरोग्य विभाग, महिला व बालक विकास, आदिवासी विकास विभाग या सर्वांची एक संयुक्त समिती गठित केली आहे. कुपोषणासंबंधीचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार या मिशनच्या प्रमुखाला दिलेले आहेत आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मॉनेटरींग कमिटी नेमली आहे, तर माझ्या अध्यक्षतेखाली एक्झिक्युटीव्ह कमिटी नेमली आहे. यासंबंधी गेल्या 7-8 महिन्यामध्ये चांगले काम सुरू आहे. परवा माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावरसुध्दा बैठक झाली. आता शासन पुन्हा 40 ते 42 कोटी रुपये सर्व विभागांना देण्याचा निर्णय घेणार आहे. तसेच पावसाळयापूर्वी आदिवासी भागातील गोदामांमध्ये अन्नधान्याचा पुरवठा करण्यासंबंधी संबंधित विभागाच्या मंत्र्यांबरोबर चर्चा करून तेथे धान्य पोहचेल अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभपती महोदय, कोणकोणत्या आजार कुपोषणाला कारणीभूत यासंबंधीची माहिती लेखी उत्तरामध्ये देण्यात आली आहे. खरे म्हणजे मागच्याच आठवडयामध्ये या विषयावर चर्चा झाली होती. आदिवासी भागामध्ये बालविवाहाची प्रथा आहे. त्यामुळे देखील कुपोषित बालके जन्माला येतात. तेव्हा आदिवासी भागातील बालविवाह प्रथा बंद करण्यासाठी शासन पावले उचलणार आहे काय ? स्तनदा माता आणि गर्भवती महिला यांना शासनातर्फे पोषण आहार दिला जातो. परंतु, पावसाळयामध्ये अशा महिलांच्या घरापर्यंत आहार पोहचत नाही. मात्र रेकॉर्डवर आहार मिळाल्याचे दाखविण्यात येते. यामध्ये देखील शासन लक्ष घालणार आहे काय ? आज स्तनदा माता व गर्भवती माता यांना अन्न देखील खायला नीट मिळत नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी व्यापक प्रश्न विचारलेला आहे. कुपोषणाला कारणीभूत असलेल्या आजारांची माहिती निवेदनामध्ये दिलेली आहे. कुपोषणाला अनेक कारणे आहेत. त्याच्या खोलामध्ये जाऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

दुसरा प्रश्न अन्न शिजवून देण्याबाबत उपस्थित करण्यात आला. प्रायोगिक तत्वावर शून्य ते सहा वर्षांच्या मुलांना 300 कॅलरिजचे लिक्विड प्रोटीन्स देण्यासंदर्भात विभाग प्रयत्न करीत आहे. आम्ही केंद्र सरकारला विनंती करणार आहोत की, रिमोट एरियामध्ये परिस्थिती किंवा नैसर्गिक परिस्थितीमुळे अन्न शिजवून देण्याचे काम व्यवस्थित होत नाही. म्हणून त्या परिसरामध्ये मुलांना लिक्विड प्रोटीन्स पुरविण्याचा विभाग प्रयत्न करीत आहे. पोषण आहाराच्या संदर्भातील कामे महिला बचत गट, अंगणवाडी सेविका आणि महिला मंडळांना देण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार चार-पाच जिल्हयांमध्ये संपूर्ण कामे ठेकेदाराच्या माध्यमातून न करता, महिला बचत गटाच्या माध्यमातून करण्यास सुरुवात झालेली आहे. या संदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाची सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याने अंमलबजावणी केलेली आहे. महिला बचत गट, अंगणवाडी मदतनीस, अंगणवाडी सेविका आणि महिला मंडळांच्या सहकार्याने पोषण आहार कार्यक्रम पार पाडत आहोत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी, जिजाऊ मीशनसंदर्भात या ठिकाणी उल्लेख केला आहे. त्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर आढावा बैठक घेण्यात आली. अंगणवाडी सेविकांमार्फत धान्य वाटप आणि इतर योजना राबवीत असताना अनेक वेळा अडचणी येत असतात. त्यांना काही त्रुटी येतात, या त्रुटींचा पाठपुरावा त्यांनी कसा करावा ? जिल्हा परिषदेची महिला बालकल्याण समिती प्रत्येक ठिकाणी आहे. जिल्हा परिषदेच्या आणि आरोग्य विभागाच्या ज्या योजना आहेत, त्या योजनांचा समन्वय करुन, ज्या ज्या ठिकाणी ज्या त्रुटी दिसतात, त्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी त्यांना अधिकार देण्याच्या संदर्भात तसेच नियमितपणे आढावा घेण्यासंदर्भात शासनाने काही आखणी केली आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, महिलांच्या समित्यांसंदर्भात नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तालुका आणि जिल्हा स्तरावर महिलांना सक्षम करण्याचे आपले धोरण आहे. हा प्रश्न पोषण आहाराच्या संदर्भात आहे. या कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊ शकत नाही हे मान्य आहे. त्यामुळे हा कार्यक्रम प्रभावीपणे यशस्वी व्हावा म्हणून, सरकार जरुर योग्य ती कार्यवाही त्वरित करेल. तसेच खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना अधिकार देण्याच्या संदर्भात आय.सी.डी.एस. चे आयुक्त व मंत्रालय स्तरावर निश्चितपणाने विचार करण्यात येईल.

-------- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वन विभागाने टाकलेल्या धाडीमध्ये हरिण व इतर प्राण्यांचे मांस जप्त करणे.

मु.शी.: वन विभागाने टाकलेल्या धाडीमध्ये हरिण व इतर प्राण्यांचे मांस जप्त करणे याबाबत श्री.नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते (वन मंत्री) : सभापती महोदय, श्री.नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "वन विभागाने टाकलेल्या धाडीमध्ये हरिण व इतर प्राण्यांचे मांस जप्त करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आधीच वितरित केलेल्या असल्याने, मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, फिल्मस्टार सलमान खानने काळविटीची शिकार केल्यामुळे त्याची काय हालत झाली हे आपण सर्व जाणतो आहोत. इकडे मात्र आमचा वन विभाग सोयिस्करपणे कठोर कारवाई करीत नाही. दिनांक 4 एप्रिल, 2006 रोजी आर्णी पोलीस स्टेशन व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे केळझरा, जि.यवतमाळ येथे इसा मोहमद इकबाल मालाणी यांच्या घरी रात्रीच्या सुमारास धाड घातली. यामध्ये हरिण व इतर काही प्राण्यांचे मांस जप्त करण्यात आले. शिवाय त्यांना मुद्देमालासह पकडले. आरोपीकडून दोन काडतुसे, शिकारीसाठी वापरात येणाऱ्या तलवारी, भाले या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. महोदय, या परिसरात हरिण, मोर, लांडोर, जंगली मांजर, यांची दररोज शिकार होत आहे अशी माझी माहिती आहे. या संदर्भात त्या भागातील विधानसभा सदस्य श्री.संदीप धुर्वे यांनीही ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. परंतु आमचे वन विभागाचे अधिकार मात्र फार हुशार आहेत. असे सर्व प्रकार घडत असताना वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या आरोपींसाठी पोलीस कस्टडी न मागता, मॅजेस्टिक कस्टडी मागितली आहे. तेथील वन अधिकारी श्री.शैलेंद्र बहादूर, राजेश पांडव आणि आर.के.चव्हाण यांची भूमिका या प्रकरणी संशयास्पद आहे. योग्य प्रकारे चौकशी करण्यासाठी पोलीस कस्टडी न मागता मॅजेस्टिक कस्टडी मागणे ही त्यांची भूमिका संशयास्पद आहे. मला तर अशी माहिती आहे की, आरोपींनी या प्रकरणी आंध्र प्रदेशातील चार व्यक्तींची नावे सांगितली आहेत.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

वन विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत, एका आंतरराष्ट्रीय टोळीचा याच्याशी संबंध आहे. सगळया वनविभागांची नावे मी येथे घेत नाही. या सगळया कामांसाठी अधिकाऱ्यांचा इनडोअर सपोर्ट आहे. मी येथे तीन अधिकाऱ्यांची नावे सांगितलेली आहेत ती परत सांगतो. श्री शैलेंद्र बहादूर, श्री. आर. के. चव्हाण, व श्री. राजेश पांडव या तीन वन अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांना निलंबित करणार आहात काय ? वन विभागातील भ्रष्टाचार दूर व्हावा म्हणून सदर प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या तीन अधिकाऱ्यांची नावे सांगितली आहेत त्याची चौकशी करुन ते जर दोषी आढळले तर त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात येईल माझ्याकडे जे उत्तर आलेले आहे ते समाधानकारक नसल्यामुळे या सर्व प्रकरणाची सीआयडीमार्फत चौकशी करुन जे कोणी वरिष्ठ अधिकारी दोषी आढळतील त्यांना ताबडतोब निलंबित करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मी सन्माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अलिबाग तालुक्यातील धेरंड येथे उघाडी कमकुवत झाल्यामुळे झालेले नुकसान

मु.शी.: अलिबाग तालुक्यातील धेरंड येथे उघाडी कमकुवत झाल्यामुळे झालेले नुकसान याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दयानंद मस्के (खारभूमी बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी अलिबाग तालुक्यातील धेरंड येथे उघाडी कमकुवत झाल्यामुळे झालेले नुकसान या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

......3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील धेरंड येथे काही मजूर काम करीत असतांना रात्री भरतीच्या वेळी उघाडी मधून पाणी बाहेर येऊन 125 एकर शेतजमीन पाण्याखाली गेली. ठेकेदारांनी हे काम कमकुवत बांधलेले आहे. म्हणून ज्या शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झालेले आहे त्यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील धेरंड खारभूती योजना सन 1954-55 च्या कालखंडामध्ये बांधलेली आहे. आज त्यास जवळपास 55 वर्षे झालेली आहेत. येणारे पाण्याचे लोंढयांमुळे तेथील उघाडी ही कमकुवत झालेली असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन उघाडी बांधण्यात अलेली आहे त्यासाठी 6 लाख 70 हजार रुपये खर्च केलेला आहे तेथील शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबत इतर विभागाद्वारे शेतकऱ्यांना ज्या प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येते त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ही घटना घडली ते माझे गांव आहे, खारभूमी बंदीस्ती ही गावातील लोकांनी एकत्र येऊन केलेले आहे. या गावामध्ये गेल्या 25 ते 30 वर्षापासून खारभूमी बंधाऱ्यांची कोमे गावकोळयांना देण्यात येत होती. परंतु आताच्या खारभूमी बांधाचे काम हे गावकोळयांना न देता ठेकेदारास देण्यात आलेले आहे. 20 लाख रुपयापर्यंतचे काम हे स्थानिक गावकोळयांना देणे आवश्यक आहे. समुद्राच्या पाण्यामुळे जवळपास 425 एकर जमिनीवरील बांध बंदिस्तीची व्यवस्था करणे आवश्यक असतांना 250 एकर जमीन ही गेल्या 3 वर्षापासून नापिकी झालेली आहे. म्हणून सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ? तसेच यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत त्यांची चौकशी शासन करणार आहे काय ?

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, या ठिकाणी उघाडी बांधण्याचे काम पूर्ण होत आलेले आहे, त्यामुळे.......

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी जरी सांगितले असले तरी मी स्वत: त्याठिकाणी गेलो आहे. ते माझे स्वत:चे गाव आहे. त्याठिकाणी ज्या पध्दतीचे काम चालू आहे ते अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. त्या दृष्टीकोनातून या ठिकाणी चुकीचे निवेदन केले जात आहे. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. त्यासाठी शासन काही कारवाई करणार आहे काय?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना भू संपादन निधी न मिळाल्यामुळे त्यांनी दिलेला आत्मदहनाचा इशारा

मु.शी. : यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना भू संपादन निधी न मिळाल्यामुळे त्यांनी दिलेला आत्मदहनाचा इशारा याबाबत सर्वश्री. दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. दिवाकर रावते व इतर वि.प.स. यांनी "यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना भू संपादन निधी न मिळाल्यामुळे त्यांनी दिलेला आत्मदहनाचा इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वारंवार गावकऱ्यांना अपिल करावे लागते आणि ते नंतर फेटाळण्यात येते. आणि त्यानंतर न्यायालयाने निवाडा द्यावयाचा हे शासनाने निवेदनामध्ये मान्य केले आहे. याठिकाणी पुर्ननिर्धारित निवाडा 3 कोटी 24 लाख 21 हजाराचा मंजूर करण्यात आला. या निवाडयाप्रमाणे व्याजाची रक्कम 2 कोटी 28 लक्ष 22 हजार रुपये इतकी मंजूर झाली. आपण दिनांक 17.6.2004 रोजी निवाडा जाहीर केला. आणि जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिनांक 1.7.2004 अन्वये निधी उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले. मला या गोष्टीचा खेद होतो की, 1988 मध्ये ही जमीन घेण्यात आली आणि 19.2.1988 ला निवाडा जाहीर केल्याप्रमाणे गावकऱ्यांना 11 लाख 33 हजार रुपये मंजूर करण्यात आले. त्या गावकऱ्यांनी घर आणि इतर बाबींचा मोबदला मिळण्यासाठी शासनाकडे वारंवार अपिल केले. त्याने समाधान झाले नाही म्हणून न्यायालयामध्ये दोन वेळा प्रकरण दाखल केले. याबाबत कोर्टाने अंतिम निवाडा दिल्यानंतर सुध्दा तेथील लोकांचे पुनर्वसन केले जात नाही. प्रकल्प उभा करीत असतांना निर्वासित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन करण्यासंबंधी कोर्टाने वारंवार आदेश देऊन सुध्दा आपण या बाबतीत घेत असलेली भूमिका दुर्दैवी आहे. आपण याठिकाणी दिनांक 28.2.2006 रोजी नियामक मंडळाची बैठक घेतली व त्यामध्ये सचिव स्तरीय समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु केली. या ठिकाणी निर्णय घेण्यासाठी दहा वर्षे लागत आहेत. निर्णय लागत नाही म्हणून लोक कोर्टामध्ये अपिल करतात. कलम 28(अ) नुसार गावकऱ्यांना कोर्टाने मंजूर केलेली रक्कम देण्याऐवजी आपण त्यांना पुन्हा लिटिगेशनमध्ये जाण्यास भाग पाडीत आहात. म्हणजे या प्रश्नासाठी त्यांना पुढील पिढीपर्यंत लढत ठेवण्याची भूमिका न स्वीकारता या वर्षी आपण त्यांना निवाडा अदा करणार काय?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात उच्च स्तरीय समिती तीन महिन्याच्या आत निर्णय घेणार असून त्यांनी घेतलेला निर्णय शासन मान्य करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) LL 4

DGS/ KGS/ MHM/ 16:05

पृ.शी. : मुंबई शहरामध्ये रस्तोरस्ती लावण्यात येणारे अश्लिल पोस्टर्स

मु.शी. : मुंबई शहरामध्ये रस्तोरस्ती लावण्यात येणारे अश्लिल पोस्टर्स याबाबत सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "मुंबई शहरामध्ये रस्तोरस्ती लावण्यात येणारे अश्लिल पोटर्स" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये गेल्या महिना दोन महिन्यामध्ये अश्लिल पोस्टर्सनी हैदोस घातला आहे. विशेषत: महाविद्यालये, शाळा-कॉलेजेस त्याचप्रमाणे मुंबईतील झोपडपट्टयांच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणामध्ये अश्लिल व्हिडिओ पार्लर्स चालतात. तेव्हा या विभागामध्ये कोंबिंग ऑपरेशन करुन संबंधितांवर आपण कडक कारवाई करणार काय? त्याचप्रमाणे चित्रपट वितरक, निर्माते हे देखील अश्लिल चित्रपटाचे पोस्टर्स् प्रदर्शित करीत असतात. त्याच्या विरोधात आपण कठोर कारवाई करणार काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी झोपडपट्टी विभागामध्ये अश्लिल पोस्टर्स लावले जातात अशी तक्रार केली आहे. त्या दृष्टीने कोंबिंग ऑपरेशन केले जाईल. ज्या ज्या ठिकाणी अश्लिल पोस्टर्स लावले आहेत त्या ठिकाणी निश्चितपणे कडक कारवाई केली जाईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बुलढाणा जिल्ह्यातील शाळांमधून निकृष्ट संगणक पुरविणे

मु.शी. : बुलढाणा जिल्ह्यातील शाळांमधून निकृष्ट संगणक पुरविणे, यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि.प.स. यांची दिलेली 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, वि.प.स. यांनी " बुलढाणा जिल्ह्यातील शाळांमधून निकृष्ट संगणक पुरविणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकणी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.पांडुरं□ फुंड□र : सभापती महोदय, स□ 2005-2006 या वर्षामध्ये सर्व शि□ अभिया□ □र्य□मांत□ प्रती शाळा 50 हजार रुपये इत□ अ□ुदा□ अ□ुेय आहे. त्या□ुसार बुलढाणा जिल्हयामध्ये 126 ल□ रुपयाचे अ□ुदा□ प्राप्त झाले. त्या संदर्भात बुलढा□ जिल्हापरिषदे□ वि□म □ला. जिल्हापरिषदेअंत□ सं□ा□ □रिदी करण्यात आले. त्या संदर्भातील □िविदा ही ए□च पुरवठादारां□ दिलेली आहे. या प्रकरणामध्ये बुलढा□ जिल्ह्यातील □ाम□ाव, बुलढा□, चि□ली व मल□पूर या तालुक्यातील शाळां□ सं□ा□ पुरवि□यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. □ट शि□ा□धि□री यां□ शाळांच्या मु□ाध्याप□च्या बैठ□ घेतल्या आ□ सर्व शि□ मोहिमेअंत□ □ट शि□ा□धि□री, सरपंच आ□ शाळेचे मु□ाध्याप□ यां□ सं□ा□मता□ सं□ा□ □रिदी □लेले आहेत. ज्या शाळां□ हे सं□ा□ पुरवि□यात आलेले आहेत. त्यांच्या□डे सं□ा□मध्ये तज्ज्ञ असलेले शि□ □ाहीत धोत्रा □ाई□ या उर्दू माध्यमाच्या शाळेमध्ये लाईटची सोय □ही, अशा शाळां□ सं□ा□ दिले आहेत. या संदर्भात उत्तर दे□यात आलेले आहे □, सं□ा□च्या दर्जाबाबत तज्ज्ञामार्फत चौ□शी चालू आहे. माझा प्रश्□ असा आहे □, 25 हजाराचा सं□ा□ □रिदी □लेला असतां□, 50हजारामध्ये सं□ा□ □रिदी □ल्याचे बील घेतलेले आहे. जबरदस्ती□ मु□ाध्याप□ं□ हे सं□ा□ घे□यास भा□ पाडलेले आहे. आता चौ□शीची □रज □ही. यामध्ये चार □ट शि□ा□धि□री सामील आहेत. ए□च पुरवठादारा□डू□ हे सं□ा□ घेतलेले आहेत. ज्या शाळेमध्ये लाईट □ही, त्या शाळांनी मा□ा□ □लेली □सता□ही, त्यां□ जबरदस्ती□ सं□ा□ दिलेले आहेत. या संपू□ प्र□र□ची ताबडतोबी□ चौ□शी □र□याची आवश्य□ता आहे. यामध्ये □ट शि□ा□धि□री म्ह□ू□ श्री. □ते □ावाच्या व्यक्ती□ □ट शि□ा□धि□री म्ह□ू□ गट शिक्षणाधिकाऱ्यांचा स्टॅम्प मारुन सही □लेली आहे. या संपू□ प्र□र□ची उच्च स्तरिय अधि□ऱ्यामार्फत चौ□शी □रु□ दोषी व्यक्तीं□ □िलंबित □र□र आहात □य ?

या□ंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे या चारही तालुक्यांमध्ये संगणक खरेदीमध्ये गैरव्यवहार झालेला आहे हे निश्चित आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगित्याप्रमाणे वीज पुरवठा नसताना 10 ठिकाणी संगणक पुरवले गेले. दूरध्वनी नसताना मॉडेम द्यावयास नको होते ते 13 ठिकाणी खरेदी केले.

श्री. पांडुरंग फुंडकर : तेथील गट शिक्षण अधिकाऱ्यांना निलंबित करा.

प्रा. वसंत पुरके : एकाच कंपनीकडून ही खरेदी केलेली नाही. ज्या कंपन्यांकडून खरेदी केलेली आहे त्यासंदर्भातही चौकशी केली जाईल. 253 शाळांना अनुदान दिले होते. त्यापैकी 187 शाळांना संगणक खरेदी केले. 44 शाळांची चौकशी झालेली आहे. यासंदर्भात उच्चस्तरीय अधिकारी, तांत्रिक एक्स्पर्ट असतील त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून दोन महिन्याच्या आत चौकशी करुन जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी नोटीस दिल्याशिवाय जर काही विचारले तर माननीय मंत्रिमहोदय असे सांगू शकतात की, मला माहिती घ्यावी लागेल. यामध्ये सरकारला नोटीस दिलेली आहे. वीज कनेक्शन नसताना सुध्दा संगणक दिले गेले. या मुद्याचे उत्तर यावयास नको काय ? याचे उत्तर आलेले नाही. ही गोष्ट बरोबर नाही. वीज कनेक्शन नसतांना संगणक देणे यासंदर्भात शासनाने काय माहिती घेतली ?

प्रा. वसंत पुरके : वीज कनेक्शन नसताना अनेक ठिकाणी संगणक दिले गेले. मी याबाबतीत अधिक माहिती घेतली. यामध्ये नेमक्या काय त्रुटी आहेत, काय दोष आहेत ते शोधून काढले. वीज कनेक्शन नसताना 10 ठिकाणी संगणक दिले. दूरध्वनी नसताना त्या ठिकाणी संगणक दिले गेले. किमान क्षमतेचे संगणक असताना जास्त किंमत दाखवून संगणक घेतले गेले. प्राधान्य नसताना सुध्दा अनेक बाबी घेतल्या गेल्या. असेंबल केलेले संगणक घेतले गेले. यामध्ये जे दोषी असतील त्यांच्या बाबतीत कारवाई करु. निश्चितपणे दोन महिन्यात कारवाई करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : या गोष्टी झाल्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांकडे सर्व माहिती आहे. त्या गट शिक्षण अधिकाऱ्यांविरुध्द ताबडतोब कारवाई का करीत नाही ? त्यांना ताबडतोब निलंबित करुन या प्रकरणाची चौकशी करणार काय ?

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

प्रा. वसंत पुरके : यामध्ये एकच गट शिक्षण अधिकारी नाही. 187 शाळेमध्ये खरेदी झाली. त्यापैकी 44 शाळांची चौकशी झालेली आहे. उर्वरित शाळांची त्वरित चौकशी करु आणि जे शिक्षण अधिकारी जबाबदार असतील त्याच्यावर कारवाई करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : ही गंभीर बाब आहे. याची चौकशी कोणाकडून करणार ?

प्रा. वसंत पुरके : मी मघाशी सांगितले की, उच्चस्तरीय अधिकाऱ्याकडून चौकशी करु.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या निवेदनासंबंधी.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आमच्या खात्याशी संबंधित असलेल्या नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन सन्माननीय सदस्यांना वितरित केलेले आहे. मी सव्वा तास या ठिकाणी उत्तर देण्यासाठी उपस्थित आहे. असे असतांना हे निवेदन चर्चेसाठी येणार नसेल तर ते अयोग्य आहे. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे या ठिकाणी उपस्थित आहेत.

उपसभापती : आज जी दहा निवेदने घ्यावयाची होती त्यामध्ये आपल्या विभागाचे निवेदन नाही. माननीय मंत्रिमहोदय तयारी करुन आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे सुध्दा सभागृहामध्ये उपस्थित आहेत. आपली तयारी असेल तर मी त्या निवेदनाच्या बाबतीत परवानगी देतो.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, आम्हाला निवेदनाची प्रत मिळालेली नाही. हे निवेदन उद्या ठेवावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.45 वाजाता पुन: भरेल.

(4.20 ते 4.45 मध्यंतर)

--

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 16:45

मध्यंतरानंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: परभणी जिल्हयातील बोरी येथील सुवर्णकार श्री.सुभाष मैड यांना झालेली अटक.

मु.शी.: परभणी जिल्हयातील बोरी येथील सुवर्णकार श्री. सुभाष मैड यांना झालेली अटक यासंबंधी सर्वश्री सुरेशदादा देशमुख,संजय दत्त,वसंतराव चव्हाण,धनाजी साठे,जितेंद्र आव्हाड,रमेश निकोसे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेशदादा देशमुख (परभणी स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करतो.

"परभणी जिल्हयातील बोरी(ता.जिंतूर) येथील सुवर्णकार श्री. सुभाष सेतराम मैड याच्यावर कोणत्याही प्रकारची गुन्हा नसताना हिंगोली गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी त्यांना अटक करणे,अटक केल्यानंतर श्री. मैड हा बेपत्ता असल्याची मार्च,2006 मध्ये उघडकीस आलेली धक्कादायक माहिती,गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. मोहसिन खान व संबंधित कर्मचाऱ्यांनी सौ.राधा मेड हिच्याकडे खंडणीसाठी तगादा लावणे,मैड कुटुंबियांच्या जिवितास धोका निर्माण झालेला असल्याने या प्रकरणी तात्काळ कारवाई करण्याची मराठवाडा सुवर्णकार संघटनेने जिल्हाधिकारी,परभणी यांचेकडे दिनांक 16 मार्च,2006 रोजी तसेच वेळोवेळी मागणी करुनही कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ,याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष,परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष ,जनतेने तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा,या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता,यावर शासनाची प्रतिक्रिया व भूमिका".

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. जे निवेदन केलेले आहे त्यामध्ये मी आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनामध्ये "10 ग्रॅम सोन्याचे दागिन्यांसह अटक केली" असे नमूद करण्यात आले आहे. त्याऐवजी "100 ग्रॅम सोन्याच्या दागिन्यासह अटक केली" असे वाचण्यात यावे.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, श्री. सुभाष मैड यांना आंधप्रदेश पोलीस बोरी, (जि.परभणी) येथून 16 फेब्रुवारी,2006 रोजी घेऊन गेले. त्यानंतर सुध्दा पोलीस खाते माहिती देण्यास तयार नव्हते. या आरोपीला आंध्र प्रदेश पोलीस घेऊन गेले त्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यानंतर आंध्र प्रदेशमधून निरोप आला की त्यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडे 100 ग्रॅम सोने मिळाले. पोलीस श्री.मैड यांना बोरी येथून घेऊन गेल्यामुळे रेल्वे स्टेशनवर अटक करण्याचा प्रश्न नव्हता. या सुवर्णकाराला आंध्र प्रदेश पोलीस घेऊन गेले असल्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी. अटक केल्यानंतर सुध्दा पोलीसांनी तीन दिवस श्री.मैड यांना रेकॉर्डवर का दाखविले नाही ? जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला आणि निवेदन दिले त्यानंतर आरोपीला पोलीस रेकॉर्डवर रेकॉर्डवर दाखविण्यात आले.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री. सुभाष मैड या आरोपीला आंध्र प्रदेश पोलीस बोरी येथून घेऊन गेले ही गोष्ट खरी आहे. जवळजवळ 1 महिना 2 दिवस या आरोपीला कोर्टासमोर उभे केले नाही. परभणी पोलीस स्टेशनला माहिती दिली नाही. परभणी न्यायालयासमोर त्याला उभे करावयास पाहिजे होते ते केले नाही. पत्नीने आरोप केल्यानंतर चालढकल केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यानंतर चौकशी झाली आणि 11.3.2006 पासून या आरोपीला अटक दाखविण्यात आली. आरोपी सध्या जेलमध्ये आहे.

यानंतर भारवि...

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मंत्री महोदय ने यहां पर कहा है कि सुभाष मैड के ऊपर गंभीर प्रकार के गुन्हे दाखिल किए गए हैं, इसलिए मैं उनसे यह पूछना चाहती हूँ कि ये गुन्हे किस प्रकार के हैं ? आन्ध्र प्रदेश की पुलिस 8 दिन तक परभणी जिले में रहती है, लेकिन हमारी पुलिस को पता नहीं चलता है. मर्डर जैसे बड़े बड़े गुन्हे इस आरोपी के ऊपर हैं, हिंगोली के नगराध्यक्ष श्री सुधीर अप्पा श्राफ के ऊपर प्राणघातक हल्ला हुआ था, इस केस के बारे में अभी तक कार्रवाई हो रही है. आन्ध्र प्रदेश की पुलिस वहां पर आकर काम कर रही है और हमारे राज्य की पुलिस को पता तक नहीं है. मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहती हूँ कि क्या यह पुलिस की असफलता नहीं है ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आंध्र प्रदेश राज्यात चोरी झाली होती. त्यामुळे तेथील पोलिसांनी कलम 395 खाली आंध्र प्रदेशातील काही लोकांना अटक केली होती. या चोरांनी श्री.मैड यांना सोने विकल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. त्यामुळे आंध्र पोलिसांनी परभणी जिल्हयातील ए.सी.पीं.ची मदत घेऊन श्री.मैड यांना अटक केली व त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विदर्भ विभागातील आदिवासी नक्षलग्रस्त भागातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांना दिली जात असलेली भेदभाव पूर्ण वागणूक.

मु.शी.: विदर्भ विभागातील आदिवासी नक्षलग्रस्त भागातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांना दिली जात असलेली भेदभाव पूर्ण वागणूक यासंबंधी श्री.व्हि.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंतराव खोटरे नानासाहेब बोरस्ते, जी.एल.ऐनापूरे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.व्हि.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"विदर्भ विभागातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यातील आदिवासी नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील क्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक कर्मचारी यांना दिनांक 6 ऑगस्ट, 2002 च्या शासन निर्णयानुसार "भाडेमाफ निवास स्थानाची सुविधा" असणे, या शाळेतील सर्व पदांसाठी एकस्तर पदोन्नती योजना शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू केलेली नसणे, सामान्य प्रशासन व गृह (विशेष) विभागाच्या दिनांक 29 मे, 2003, 18 ऑगस्ट, 2004, 8 नोव्हेंबर, 2004, 7 डिसेंबर, 2004 व इतर शासन आदेशान्वये जी गावे आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित केली आहेत, त्यापैकी अनेक ठिकाणच्या खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक-कर्मचारी, आश्रमशाळा, एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यासक्रमाकडील शिक्षक-निदेशक यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्त्यापासून वंचित ठेवणे, नक्षलग्रस्त भागात नक्षलग्रस्त चळवळ वाढली असणे, अशा विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिल्या जात असलेल्या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे शिक्षक कर्मचाऱ्यांत पसरलेला असंतोष, याबाबत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने दिनांक 18 मार्च, 2006 रोजी सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर आयोजित केलेला बैठा सत्त्याग्रह/धरणे आंदोलन, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, नक्षलग्रसत भागातील हा प्रश्न आहे. विदर्भातील नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील क्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या संदर्भातील ही लक्षेवधी सूचना आहे. माझ्या सूचनेतील एका विषयाला शासनाकडून उत्तर देण्यात आलेले नाही. विदर्भातील नक्षलग्रस्त भागातील नगरपालिका, जिल्हा परिषद तसेच अन्य जी शासकीय कार्यालये आहेत, त्यातील कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व भाडेमाफ निवासस्थानाची सुविधा देण्यात आली आहे. मात्र शालेय शिक्षण विभागाला या दोन्ही सवलतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. यासंबंधी गडचिरोली जिल्हयात काही कर्मचारी आमरण उपोषणाला बसले असून जवळ जवळ 30 ते 35 कर्मचाऱ्यांना दवाखान्यामध्ये देखील दाखल करण्यात आले आहेत. मागच्या अधिवेशनाच्या वेळी देखील या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधले असतो, आपण जिल्हाधिकाऱ्यांनी पेंडॉलला भेट देण्याचे निदेश दिले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली होती. परंतु, सदर प्रश्न निकाली निघाला नाही. तेव्हा माझा शासनाला असा प्रश्न आहे की, आदिवासी नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील क्षेत्रात काम करणाऱ्या खाजगी माध्यमिक व शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी एकस्तर पदोन्नती व भाडेमाफ निवासस्थानाची सुविधा लागू करणार आहे काय ? तसेच ज्या प्रश्नासंबंधीचे उत्तर शासनाच्या लेखी उत्तरामध्ये आलेले नाही, त्यासंबंधी मी नंतर प्रश्न विचारणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, विदर्भ भागातील गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ व अमरावती या सहा जिल्हयांतील आदिवासी नक्षलग्रस्त भागातील अतिसंवेदनशील भागात काम करणाऱ्या खाजगी व उच्च माध्यमिक शाळातील शिक्षकांसाठी शासनाने जी.आर. काढलेला आहे. त्या भागात काम करणाऱ्यासाठी "कार्यक्षम अधिकारी नियुक्त करणे, मार्गदर्शक तत्वे विहित करणे आणि विविध सवलतीचे एकत्रित विशेष कृती कार्यक्रम" असा जी.आर. काढलेला आहे. त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ज्या कर्मचारी/अधिकाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिलेला असेल त्यांना, आणखी वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल ही एकत्रित पदोन्नतीची योजना 1 जूलै 2000 पासून अंमलता येईल आणि ती संबंधीत अधिकारी/कर्मचारी आदिवासी नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असे पर्यंतच अनुज्ञेय राहील. म्हणजे ज्यांची बदली होते त्यांच्यासाठी हा जी.आर. किंवा विशेष कृती कार्यक्रम आहे. खाजगी शाळेचे शिक्षक तेथेच असल्यामुळे त्यांना हे अनुज्ञेय नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, दिनांक 6 ऑगस्ट, 2002 च्या जी.आर.मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, एकस्तर पदोन्नतीच्या बाबतीत त्यांनी भेदभाव केलेला नाही. एकस्तर पदोन्नतीच्या संदर्भात सर्वांना ही योजना लागू आहे असे म्हटले आहे. भाडेमाफ निवास्थान सुविधेच्या संदर्भात परिच्छेद-2 डिलीट करण्याबाबतचा उल्लेख परिच्छेद 3 मध्ये आहे. तिसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, "याच्या व्यतिरिक्त पुन्हा सवलती देण्यात येतील". चार-पाच वेळा हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासनाला नक्षलग्रस्त भागामध्ये नक्षलवादी चळवळ वाढवावयाची आहे की, कमी करावयाची आहे ? कारण शासन एका भागाला एक योजना लागू करते आणि दुसऱ्या भागाला भेदभावपूर्ण वागणूक देत आहे, हे बरोबर नाही. समानतेच्या न्यायाने सामान्य प्रशासन विभागाने जो जी.आर. काढलेला आहे तो या शिक्षकांना लागू करण्यामध्ये काय हरकत आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, नक्षलाईट भागामध्ये अधिकारी जात नाही. त्या भागात राहणारे शिक्षक त्या भागात राहतात. त्यांच्यासाठी मात्र ही सवलत अनुज्ञेय नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, हे शिक्षक बाहेरुन आलेले आहेत आणि ते विचार करुन आलेले आहे. गोळया खावयाच्या आहेत हा विचार करुन ते या भागात आलेले आहेत. शासन एका भागाला सवलती देते आणि दुसऱ्या भागाला देत नाही. नक्षलाईट भागामध्ये काम करणाऱ्यांमध्ये दुजाभाव का केला जातो ? शासनाचा यामध्ये काही तरी गैरसमज झालेला आहे. त्यामुळे प्रथम तो गैरसमज दूर केला पाहिजे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, दिनांक 6 ऑगस्ट, 2002 रोजीच्या जी.आर. च्या परिच्छेद-6 मध्ये म्हटले आहे की, "सर्व विभागांनी आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या त्यांच्या विभागातील महामंडळे, इतर स्वायत्त संस्थांमधील तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालये अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत वर नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून, सुयोग्य व्यक्तिच्या त्या त्या क्षेत्रात नियुक्त्या कराव्यात. तसेच त्या क्षेत्रात काम करीत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सर्व सुविधा/सवलती देण्याबाबतच्या सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. मग शालेय शिक्षण विभागातील शिक्षक का सुटले ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बदल्या होतात म्हणून त्यांना हे लागू आहे. खाजगी शाळांमध्ये बदल्या होत नाहीत. शासकीय कर्मचाऱ्यांच्या समतुल्य वेतनश्रेणीच्या वेळीच तसेच पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी त्यांना आधीच जादा वेतनश्रेणी दिली आहे. त्यांना प्रोत्साहनपर भत्ता सुध्दा देत आहोत.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : प्रोत्साहन भत्ता खाजगी शाळांना सुध्दा दिला आहे. मग यांना का नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : महोदय, एकाच संस्थेच्या शाळा त्या विभागात असतील आणि शिक्षक त्या ठिकाणावरुन बदली करुन, दुसरी कडे जाणार असेल तर त्याबाबत विचार करु.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी.: पुणे जिल्हयातील निरा, देवधर, पवना व गुजवणी येथील प्रकल्पग्रस्तांचे अजूनही पूर्णपणे पुनर्वसन न होणे.

मु.शी.: पुणे जिल्हयातील निरा, देवधर, पवना व गुजवणी येथील प्रकल्पग्रस्तांचे अजूनही पूर्णपणे पुनर्वसन न होणे यासंबंधी प्रा.शरद पाटील, श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्हयातील निरा, देवघर, पवना व गुंजवणी या धरणासाठी ज्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या त्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन व्हावे व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कायद्यांतर्गत सर्व लाभ मिळतील. या मागणीसाठी डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त परिषदेच्यावतीने दिनांक 2 फेब्रुवारी, 2006 रोजी आयोजित करण्यात आलेले ठिय्या आंदोलन, वर्षानुवर्षे या धरणग्रस्तांना राहण्यासाठी भुखंड व कसण्यासाठी जमीन उपलब्ध झालेली नसणे, निर्वाह भत्त्याची रक्कम धोषणा करुनही अद्याप मिळालेली नसणे, पुनर्वसन झालेल्यांना नागरी सुविधा उपलबध नसणे, प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तींना शासकीय सेवेत सामावून न घेणे, अशा अवस्थेत धरणग्रस्तांची झालेली ससेहोलपट, त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष व निर्माण झालेली गंभीर परिस्थिती याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची भुमिका."

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील निरा, देवधर, पवना व गुंजवणी धरणाशी निगडीत हा प्रश्न आहे. ही धरणे होऊन अनेक वर्षे झालेली आहेत. ज्यांनी ज्यांनी या धरणासाठी जमिनी दिल्या, त्यांचे पुनर्वसन अद्यापी झालेले नाही. वास्तविक पाहता प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन कायद्या अंतर्गत लाभ मिळाला पाहिजे, पर्यायी भूखंड मिळाला पाहिजे, निर्वाह भत्ता मिळाला पाहिजे.

नंतर श्री.व्ही.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील...

ज्या गावाचे गावठाणावर पुनर्वसन झाले त्या गावांना नागरी सुविधा मिळाव्यात अशी तेथील लोकांची मागणी आहे, ती मागणी मान्य न झाल्यामुळे 2 फेब्रुवारी, 2006 रोजी डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त परिषदेच्यावतीने आंदोलने करण्यात आलेली आहेत. त्या मागण्यांच्या अनुषंगाने ही लक्षवेधी या ठिकाणी आलेली आहे. माझा आपल्या माध्यमातून शासनाला असा प्रश्न आहे की, निरा, देवधर व पवना या तीन गावांतील 402 प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप झालेले आहे, परंतु उर्वरीत प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप करण्याचे शिल्लक आहे असे आपण निवेदनात म्हटलेले आहे. तर उर्वरित प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप केव्हा करण्यात येणार आहे ? तसेच या प्रकल्पांच्या पुनर्वसनासाठी 13 गावठाणे विकसित करण्यात आली असून 9 गावठाणांना नागरी सुविधा देण्यात आलेल्या आहेत, उर्वरीत 4 गावठाणांमध्ये नागरीसुविधा देण्याचे काम कधी पूर्ण होणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, निरा, देवधर, पवना व गुंजवणी या प्रकल्पांना अनेक वर्षापूर्वी मंजूरी मिळालेली आहे, त्यातील काहींची कामे झालेली आहेत व काहींची कामे चालू आहेत. या परिसरातील लोकांचे पुनर्वसन करण्याच्या माध्यमातून ही लक्षवेधी येथे मांडण्यात आलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, प्रकल्पग्रस्तांचे नेते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा यासाठी आंदोलने झाली होती. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री व माननीय पुनर्वसन मंत्री महोदयांनी बैठक घेऊन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व भूमिसंपादनाचे काम करण्यात येईल व नवीन गावठाणांना नागरी सुविधा देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्या ठिकाणी सांगितले होते. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणे निरा, देवधर प्रकल्पामधील काही लोकांना जमीनी देणे बाकी आहेत. ही जमीन फलटण व खंडाळा तालुक्यात उपलब्ध आहे, या जमिनी मिळाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना निश्चितपणे ताबडतोबीने जमिनीचे वाटप करण्यात येईल. यासंदर्भातील कार्यवाही चालू आहे. नागरी सुविधा देण्याचे काम 4 गावठाणांना देण्याचे बाकी आहे, त्यासाठी आता 20 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे, आता पैशाची अडचण नाही. उरलेल्या गावठाणांना नागरी सुविधा पुरविण्याचे काम ताबडतोब सुरु करण्यात येईल.

......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, पवना धरणाचे काम सन 1975 मध्ये पूर्ण झालेले आहे, या प्रकल्पामधून 1203 खातेदार बाधित झाले असून 340 खातेदारांना तत्कालीन धोरणानुसार 447 हेक्टर जमिनींचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरीत 863 प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन देणे बाकी आहे, यासंदर्भात दिनांक 8/2/2006 रोजी संबधित अधिकाऱ्यासोबत बैठक घेण्यात आलेली आहे. पर्यायी जमीन देण्याची तयारी आहे, त्यासंदर्भात कारवाई करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. ऊर्वरित 863 प्रकल्पग्रस्तांना जमीन देण्याचे काम किती दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहे ? तसेच गुंजवणी प्रकल्पाचा प्रश्न सुध्दा तसाच आहे, तेथील बाधित खातेदारांना पैसा मिळालेला आहे, परंतु त्यांनी पसंत केलेली जमीन त्यांना त्वरीत देणार आहात काय ? त्याचप्रमाणे गुंजवणी प्रकल्पाचे काम शेतकऱ्यांनी बंद पाडलेले आहे आपल्या मागण्या मान्य झाल्या नाही तर प्रकल्पाचे काम करु देणार नाही असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून तेथील बाधित खातेदारांना नुकसान भरपाई देण्यात येणार आहे काय ? तसेच काही गावांतील प्रकल्पग्रस्तांना निर्वाह भत्त्याचे वाटप झालेले नाही त्यांचे वाटप किती दिवसांत करण्यात येईल ?

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पवना प्रकल्पाच्या बाबतीत माननीय सदस्यांनी दोन महत्वाचे प्रश्न विचारले. खरे म्हणजे पवना प्रकल्प 1975 मध्ये पूर्ण झाला. परंतु 1976 चा पुनर्वसन कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी हा प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे खऱ्या अर्थाने त्या लोकांना सवलती मिळाल्या नाहीत. त्या ठिकाणी 1203 खातेदार बाधित असतांना 340 खातेदारांना त्यावेळच्या नियमानुसार, धोरणानुसार मावळ तालुक्यामध्ये शासकीय गायरान जमीन दिली. आणि उरलेल्या 863 प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन देण्यासंदर्भात कारवाई चालू आहे. माननीय सदस्यांनी त्यांच्या प्रश्नामध्ये ज्या बैठकीचा उल्लेख केला ती बैठक दिनांक 8.2.2006 रोजी झाली. त्या बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे पवना धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेर संपादीत केलेली 1 हजार एकर जमीन शासनाकडे आहे. 863 खातेदारांना एक एकरप्रमाणे एक वर्षाच्या कराराने 2 हजार रुपये वर्षाचे त्या ठिकाणी भरावे लागतील. या प्रमाणे त्या ठिकाणी जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या संदर्भात सांगू इच्छितो की, काही लोकांचे त्याकरिता अर्ज सुध्दा आले आहेत. या प्रकल्पासाठी त्या ठिकाणी इतर कामे सुध्दा पूर्ण करीत आहोत. गुंजवली प्रकल्पाच्या बाबतीत 10 कोटी रुपयांचा निधी अलिकडे शासनाने प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी, भूसंपादनासाठी दिला आहे. माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे ज्या खातेदारांना जमीन देणे शिल्लक आहे अशी जवळपास 1500 एकर जमीन उपलब्ध असून खेड तालुक्यात कालूस, शिरुर तालुक्यात जानेगाव बु. खंदाळे, गणेगाव खालसा, मुरवई, दौंड तालुक्यात कोरेगाव शिवन,राहू, पिलारवाडी या ठिकाणी जमीन उपलब्ध आहे. खातेदारांच्या पसंतीप्रमाणे त्यांना ही जमीन देण्याची कारवाई केली जाईल.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी)

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, गुंजवली प्रकल्पामध्ये बोगस जमीन संपादीत करुन पैशाचे वाटप करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: त्या भागातील पहाणी केली आहे. त्याबाबत अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. बुडीत क्षेत्रापेक्षा अधिक 110 एकर जमिनीचे बोगस संपादन करुन पैशाचे वाटप करण्यात आले हे खरे आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या संदर्भात शासनाकडे तक्रारी आल्या असतील तर निश्चितपणे त्याबाबत चौकशी केली जाईल. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकल्पामध्ये बोगस जमिनीचे संपादन करुन बोगस पैशाचे वाटप केले गेले असेल तर त्यासंबंधी निश्चितपणे चौकशी करुन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी देण्यात आल्या आहेत. मंत्रिमहोदयांनी त्यांच्याकडून माहिती घ्यावी.

डॉ. राजेंद्र शिंगणे : यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून निश्चितपणे माहिती घेऊन संबंधितांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यासंबंधी शासनाने धोरण तयार केले असून त्यानुसार मंत्रालयामध्ये प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली. त्यानुसार उमेदवारांना नावे कळविली जातात. या सर्व प्रकल्पग्रस्तापैकी किती लोकांची प्रतिक्षा यादी आपल्याकडे आहे? आणि त्यांचे वय किती झाले आहे? याचे कारण असे की, 20-25 वर्षापूर्वी पासून प्रतिक्षा यादी प्रलंबित असेल तर तो उमेदवार 60 वर्षाचा झाल्यानंतर त्याला आपण शासकीय सेवेमध्ये घेणार काय? तेव्हा या प्रतिक्षा यादीची आजची स्थिती काय आहे? दुसरा प्रश्न असा की, ज्या ठिकाणी आपण प्रकल्प हाती घेत आहात तेथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण केले जाईल अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय आपण घेतला आहे काय? नसल्यास, त्याबाबत आपण विचार करणार आहात काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, नुकताच राष्ट्रीय पुनर्वसन धोरण कायदा महाराष्ट्र शासनाने मान्य केला. या कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या वतीने अगोदर पुनर्वसन आणि नंतर धरण अशाप्रकारे नवीन प्रकल्पांच्या बाबतीत आपण धोरण अंमलात आणीत आहोत. त्यामुळे येथून पुढील काळात नवीन प्रकल्प घेतले जातील त्यावेळी निश्चितपणे पुनर्वसनाचे काम अगोदर पूर्ण केले जाईल व त्यानंतर धरणाच्या कामाला सुरुवात करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेमध्ये 5 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे प्रतिक्षा यादी आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. त्याबाबतची माहिती निश्चितपणे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मोखाडा,जिल्हा ठाणे येथील पंचायत समितीच्या सभापतींच्या लेटरहेडवर त्यांची खोटी सही करुन पदाचा राजिनामा घेणे.

मु. शी : मोखाडा,जिल्हा ठाणे येथील पंचायत समितीच्या सभापतींच्या लेटरहेडवर त्यांची खोटी सही करुन पदाचा राजिनामा घेणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्ह्यातील मोखाडा येथील मोखाडा पंचायत समितीचे सभापती प्रकाश कृष्णा यांच्या विरोधात दाखल केलेल्या अविश्वासाच्या ठरावावर दिनांक १० मार्च, २००६ रोजी मतदान असतांना उपसभापती मोखाडा सौ. भाग्यश्री भगवान कोरडे पक्ष सदस्य यांनी आर्थिक संगनमताने सभापती श्री. प्रकाश निकम यांच्या लेटर पॅडचा गैरवापर करुन सदर लेटर पॅडवर सदस्य व सभापती पदाचा राजीनामा दिला, असे पत्र तयार करुन त्यावर सभापती श्री. प्रकाश निकम यांची खोटी सही करुन, अध्यक्ष, जिल्हापरिषद, ठाणे यांना ते दिनांक ६ मार्च, २००६ रोजी सादर करुन गैरप्रकार केल्याचे दिनांक ८ मार्च, २००६ च्या सुमारास उघडकीस येणे, याबाबत त्यांनी तात्काळ जिल्हापरिषद अध्यक्ष आणि वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मोखाडा पोलीस ठाणे यांचेकडे दिनांक ९ मार्च, २००६ रोजी तक्रार देऊनही अद्यापपर्यंत सदर प्रकरणाची चौकशी करुन गैरप्रकार करणाऱ्या संबंधितांविरुद्ध कोणतीच कारवाई न करणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भुमिका".

श्री.रणजित कांबळे(ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सीमा प्रश्नाच्या संदर्भात लोकशाहीचा कसा गळा घोटला जातो हे आपण पाहिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी निवडणुका शासन पुढे ढकलते याबाबत सांगितले.

. या निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "दिनांक 6 मार्च2006 रोजी ठाणे जिल्हा परिषद अध्यक्ष, श्री.काशिनाथ पाटील हे त्यांच्या कार्यालयात कामकाज पहात असताना पंचायत समिती उपसभापती, मोखाडा, श्री.शंकर गोविंद भले व पंचायत समिती सदस्या, श्रीमती भाग्यश्री भगवान कोरडे यांनी समक्ष येऊन अध्यक्षांचे नावाने निर्देशित केलेले पंचायत समिती मोखाडाचे सभापती श्री.प्रकाश कृष्णा निकम यांचे लेटरपॅडवरील त्यांचे स्वाक्षरीचे राजिनामा पत्र ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, श्री.पाटील यांना सादर केले." माझा प्रश्न असा आहे की, 21 फेब्रुवारी 2006 रोजी पंचायत समितीच्या सभापतींच्या विरोधामध्ये अविश्वासाचा ठराव दाखल केलेला आहे. यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, दान्ही सदस्य हे सभापतींच्या विरोधात आहेत. असे असताना उपसभापती आणि समिती सदस्या यांनी समक्ष येऊन सभापती श्री.निकम यांच्या स्वाक्षरीचे राजिनामा पत्र जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांकडे सादर केले. प्रश्न असा आहे की, राजिनामा सादर करायचा असेल तर प्रोसिजरप्रमाणे कोणाकडे तो सादर केला पाहिजे. त्यांचा 6 मार्चला राजिनामा सादर केला. 10 मार्चला अविश्वासाचा ठरावासाठी विशेष सभा आयोजित केलेली होती. त्यामध्ये 6 मार्चला मंजूर केलेला राजिनामा रद्द करण्यात आला. याचा अर्थ असा आहे की, 9 मार्चला सभापतींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली की, माझी खोटी सही करुन राजिनामा सादर केलेला आहे. माझा या सबंधातील प्रश्न असा आहे की, खोटी सही करुन राजिनामा घेतल्याची तक्रार 9 मार्चला सभापतींनी केल्यानंतर त्याची चौकशी झालेली आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, दोन सदस्यांनी 31 फेब्रुवारी रोजी अविश्वासाचा ठराव दाखल केलेला होता, त्याबाबत काय झाले ? मूळ प्रश्न असा की, प्रोसिजरप्रमाणे राजिनाम्याचा अर्ज कोणाकडें सादर करायला पाहिजे, तसा सादर केला नसेल तर त्याबाबत कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, सभापतींच्या विरोधात श्री.शंकर भले आणि सदस्या श्रीमती भाग्यश्री कोरडे यांनी 21 फेब्रुवारीच्या अविश्वासाच्या ठरावावर सही केलेली होती. त्यानंतर दिनांक 6 मार्च रोजी उपसभापती श्री.भले आणि सदस्या श्रीमती कोरडे यांनी सभापतींचे लेटरहेडवर सभापतींचीच सही असलेले पत्र घेऊन आले....

श्री.अरविंद सावंत : ते स्वत: हजर नसतांना त्यांचे पत्र हे दोघेजण कसे घेऊन आले ?

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) UU-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.दिवाकर रावते : त्या सभापतींचीच सही होती असे आपण ठामपणाने सांगत आहात काय ?

(एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य उभे रहातात.)

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी कृपया माझे बोलणे ऐकून घ्यावे.

तालिका सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांचे बोलणे पूर्ण ऐकून घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : त्या पत्रावर त्यांचीच सही आहे हे आपण ठामपणाने सांगता काय ? त्यांची सही व्हेरिफाय केलेली आहे काय ? तसे सांगत असाल तर पुढचे प्रश्न विचारता येतील.

श्री.रणजित कांबळे : राजिनाम्याचा प्रिस्क्राईब फॉर्म आहे. त्यावर दोन साक्षीदारांच्या सह्यांची आवश्यकता असते. संबंधित सभापतींनी जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांकडे तो फॉर्म पाठविला. अध्यक्षांनी तो सी.इ.ओ. यांच्याकडे पाठविला. तो त्यांनी स्वीकारला. सन्माननीय सदस्य जो प्रश्न विचारत आहेत ते बरोबर आहे. ती त्यांचीच सही आहे की नाही याबाबत डिस्पूट आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

त्यांनी 9 तारखेला येऊन असे सांगितले की, मी राजीनामा दिलेला नाही. त्यानंतर त्यांनी पोलीस केस दाखल केली. यामध्ये सेक्शन 420, 465, 469, 470 लावलेले आहेत. आता हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. पोलिसांनी त्यांच्या सहीच्या व्हेरिफिकेशनसाठी प्रकरण पाठविले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मला यावर बोलणे योग्य होणार नाही.

श्री. अरविंद सावंत : हे प्रकरण न्यायप्रविष्ट का झाले ? आपण न्याय दिला असता तर प्रकरण न्यायप्रविष्ट झाले नसते.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये गेलेले असून ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

श्री. दिवाकर रावते : कोर्टाने एखाद्या बाबीला स्टे दिला असेल तर त्याबाबत चर्चा करता येत नाही. इतर बाबतीत चर्चा करत येते.

तालिका सभापती : त्या सभापतींनी रिट-पिटीशन दाखल केले आहे. यामध्ये ॲग्रिव्हड् पार्टीच उच्च न्यायालयामध्ये गेलेली आहे. हे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये असल्यामुळे ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

श्री. दिवाकर रावते : या सदनामधून जर योग्य मार्गदर्शन झाले नाही तर उद्या महाराष्ट्रामध्ये सगळीकडे कोणीही सह्या करुन राजीनामे मान्य करतील. मग कोर्टात जाऊन लढत बसावे लागेल. यामध्ये सी.आय.डी. चौकशी करावी.

तालिका सभापती : आपले म्हणणे बरोबर आहे पण ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे आता सरकारकडे अधिकार राहिलेला नाही.

श्री. अरविंद सावंत : हे प्रकरण कोर्टात का गेले ? आपण न्याय दिला असता तर प्रकरण कोर्टात गेले नसते. राजीनामा मान्य झाला असे समजून 10 मार्चला निवडणूक लावली. त्यानंतर 21 मार्चला निवडणूक लावली. ही बाब कोर्टात आहे तरीही त्यांनी निवडणूक लावली. सरकारने 21 मार्चला सभापतीपदाची निवडणूक जाहीर केली. ही निवडणूक कशी लावली ? आता पुन्हा निवडणूक पुढे ढकललेली आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. रणजित कांबळे : सभापती हायकोर्टामध्ये अपिलात गेलेले आहेत. त्याचे पद रिक्त आहे त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना निवडणूक घ्यावीच लागते. जिल्हाधिकाऱ्यांनी तारीख सुध्दा दिलेली आहे.

तालिका सभापती : कोर्टात जाऊन पिटीशन दाखल करणे हे पुरेसे नाही. त्या पिटीशनच्या बाबतीत उच्च न्यायालयाने काही निर्देश दिलेले आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जर कोर्टाने स्टे दिला तर आम्ही निवडणूक घेऊ शकत नाही. त्या ठिकाणी कोर्टाने स्थगिती दिलेली नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करीत आहेत. त्या ठिकाणी जागा रिक्त आहे. जिल्हाधिकाऱ्यांना ठराविक कालावधीत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी लागते. ठराविक काळापेक्षा जास्त काळ आपण कोणतेही पद रिक्त ठेऊ शकत नाही. सभापतींना अपील करावयाचे असेल तर ते करु शकतात. त्यांच्या केसमध्ये दम असता तर हायकोर्टाने स्टे दिला असता. हायकोर्टाने फक्त ते प्रकरण स्वीकारलेले आहे. कोर्ट जो निर्णय देईल त्यामध्ये जर सही खोटी असल्याचे सिध्द झाले तर जे काही सेक्शन लागावयाचे असतील ते त्या दोन्ही सदस्यांवर लागणार आहेत. त्यांच्यावर पोलीस कारवाई होणार आहे. सध्या कोर्टाने त्यांना स्थगिती दिलेली नाही त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या ठिकाणी सदनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत आहे. एका बाजूला कोर्टाने कोणत्याही प्रकारचे आदेश दिलेले नाहीत असे माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत आणि दुसऱ्या बाजूला जी निवडणूक लावली होती ती पुढे ढकलली.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अनंत तरे पुढे सुरु...)

21 मार्चला निवडूणक लावली. त्यासंबंधीची पत्र ताबडतोब पाठविले. मग 21 मार्च पासून आतापर्यन्त निवडणूक का लावली नाही ? निवडणूक का लावली नाही असे मी जिल्हाधिका-यांना फोनवरुन विचारले तेव्हा त्यांनी 8 दिवसात निवडणूक लावतो असे सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, ज्या दोन सदस्यांनी खोट्या सह्या केल्या त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : जो पर्यन्त सह्यांचे व्हेरिफिकेशन होत नाही तोपर्यन्त ॲक्शन घेता येत नाही. कदाचित खोटया सह्या केल्या असतील तर त्याबाबतीत कडक कारवाई केली जाईल. 21 तारखेला "जगदंबा" उत्सव होता त्यामुळे निवणूक पोस्टपोन करण्यात आली.

श्री. नितीन गडकरी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सह्या ख-या आहेत की, खोट्या आहेत हा कळीचा मुद्दा आहे. हे प्रकरण जिल्हाधिका-यांमार्फत पोलिसांकडे पाठवून सह्या ख-या आहेत की खोट्या आहेत हे तपासून घेता येते. याबाबतीत जोपर्यन्त माहिती मिळत नाही तोपर्यन्त निर्णय घेणे कठीण आहे. सह्या ख-या आहेत की खोट्या आहेत याबाबत कॉम्पीटण्ट ॲथॉरिटीकडून शहानिशा करुन घ्यावी. पात्र, अपात्रता, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा यांच्या निवडणुका याबाबतीत जिल्हाधिका-यांना रात्री फोन करुन निर्णय घेण्यास सांगणे हे योग्य नाही. ही लोकशाहीची थट्टा आहे. जे नियमाप्रमाणे असेल ते केले पाहिजे. माझी अशी विनंती आहे की, सह्या खोट्या आहेत की ख-या आहेत याबाबत जिल्हाधिका-यांमार्फत तीन दिवसात रिपोर्ट घेऊन कारवाई करावी.

श्री. रणजित कांबळे : जिल्हाधिका-यां मार्फत पोलिसांना असे आदेश दिले गेले तरी तीन दिवसात रिपोर्ट येत नाही.

श्री. अनंत तरे : या प्रकरणी पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतरही पोलिसांनी चौकशी केली नाही.

श्री. रणजित कांबळे : चौकशी केल्या शिवाय कोर्टामध्ये केस येणार नाही. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तीन दिवसात व्हेरिफिकेशन होत नाही. या प्रकरणी मी स्वत: चौकशी करीन आणि कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल

श्री. दिवाकर रावते : तोपर्यन्त निवडणुकीला स्थगिती द्या.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : ही कारवाई पूर्ण होईपर्यंत या निवडणुक प्रक्रियेला स्थगिती देणार काय असा माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, कोणतेही इलेक्शन प्रोसेस सुरु झाल्यानंतर त्याला स्थगिती देऊ शकत नाही असे सुप्रीम कोर्टाचे जजमेंट आहे. कदाचित असे सिध्द झाल्यानंतर जे सभापती किंवा उपसभापती होणार आहेत त्यांना राजीनामा द्यावा लागतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बिहार सरकार बरखास्त झाले. सुप्रीम कोर्टाने ही बरखास्ती बेकायदेशीर ठरविल्यानंतर पुन्हा निवडणुका झाल्या आणि नवीन सरकार आले. त्यानंतर बरखास्त झालेले सरकार पुन्हा अधिकारावर आले नाही. सभापती आणि उपसभापतींना काढणारे तुम्ही कोण असा प्रश्न निर्माण होतो.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, इलेक्शन प्रोसेस सुरु झाल्यानंतर त्याला स्थगिती देऊ शकत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पोलिसांमध्ये तक्रार झाली आहे. पोलिसांना सूचना देणे आवश्यक होते की या प्रकरणामध्ये तातडीने लक्ष घालून निर्णय घ्या पण तसे झालेले नाही. पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जे काम करावयाला पाहिजे होते ते केले नाही. साईन व्हेरीफिकेशन केलेले नाही. म्हणून नाईलाजाने लोकांना कोर्टात जावे लागले. अजून निवडणुकीची प्रक्रियाच सुरु झालेली नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी डिटेल माहिती सभागृहामध्ये देऊ इच्छितो. 6 तारखेला दोन सदस्य राजीनाम्याचा अर्ज घेऊन जिल्हा परिषद अध्यक्षांकडे आले. नियम 57 मध्ये स्पष्ट म्हटले आहे की दोन साक्षीदारांच्या सहया यासाठी आवश्यक आहेत. राजीनाम्याचा प्रश्न नाही. तो पोष्टाने देखील पाठविता येतो त्यासाठी स्वत: हजर राहण्याची आवश्यकता नाही. बाय पोस्ट पाठवू शकतो. Sir, Section 71(1) of Maharashtra Zillha Parishads Act, it has been stated that: " Resignation of Chairman and Deputy Chairman of Panchayat Samitis - The Chairman may resign his office by writing under his hand addressed to the President (and his office shall thereupon become vacant)."राजीनामा दिला की ते पद रिक्त झाले.

Shri Arvind Sawant: Where it is said?

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Ranjeet Kamble: Sir, it has been stated in the Act itself. There is a clarification given to the above clause also. Sir, clause 77(1) bears a clarification and it reads as under: " Clarification 44 - The clause " and his office shall thereupon become vacant." shows that a letter of resignation can not be withdrawn by him once it has gone out of his control." याचा अर्थ स्पष्ट आहे.

Shri Arvind Sawant: In case, if he posts the letter and not by other people.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सदनामध्ये सुध्दा एखाद्या सदस्याला राजीनामा द्यावयाचा असेल तर त्याला तो स्वत:च्या हस्ताक्षरात लिहून माननीय सभापतींना भेटून द्यावा लागतो. येथे राजीनामा स्वीकारण्याची ही कोणती पध्दत आहे ? सहीची पडताळणी केल्याशिवाय राजीनामा मंजूर केला जातो. Sir, my point of order is on the procedure of submitting the resignation. What is the procedure for submission of the resignation? What is that procedure? Sir, without verifying the signature, is it the way of submission of resignation?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्याला जबाबदारीने सांगतो की, He may send resignation either by registered post or by acknowledged post or by delivery through somebody. हा कायदा आहे.

Shri Arvind Sawant: To whom it should be submitted?

Shri Ranjeet Kamble: The resignation is to be submitted to the President.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सिग्नेचर व्हेरिफिकेशनचे हे प्रकरण आहे. The Hon. Minister of State for Rural Development Department should get this signature examined and verified as soon as possible.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, कागदपत्र खोटी निघालीत तर आम्ही कडक कारवाई करू.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासनाने कांदा उत्पादकांकडे केलेले दुर्लक्ष.

मु.शी.: शासनाने कांदा उत्पादकांकडे केलेले दुर्लक्ष यासंबंधी सर्वश्री गोविंदराव आदिक,संजय दत्त,रमेश निकोसे,धनाजी साठे, कन्हैयालाल गिडवाणी, अनंत तरे,डॉ.दीपक सावंत, सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, सुधीर सावंत, रणजितसिंह मोहिते-पाटील, नितीन गडकरी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभाद्वारे निर्वाचित) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"यावर्षी राज्यात कांदा पिकांचे मुबलक प्रमाणात आलेले पीक, प्रचंड कांदा उत्पादनामुळे कांद्याचे पडलेले भाव, नाईलाजास्तव शेतकऱ्यांना अतिशय कमी भावात कांदा विकावा लागणे, अशाच परिस्थितीत मनमाडच्या हवालदिल कांदा उत्पादक शेतकऱ्याने सहा क्विंटल कांदा विकल्यानंतर त्या बदल्यात मिळालेल्या 432 रुपये या तुटपुंज्या आणि अत्यल्प मोबदल्यात कुटुंबाने खायचे काय, मुलांचे शिक्षण, शेतीला खतपाणी, इत्यादींसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते फेडायचे कसे, इत्यादि अनेक प्रश्न या शेतकऱ्याला पडणे, या बिकट परिस्थितीत शासनाने त्वरित हस्तक्षेप करुन शेतकऱ्यांना किमान 500 रु. प्रति क्विंटल एवढा हमी भाव ठरवून द्यावा, कांदा आयात-निर्यात धोरणात बदल करावा व आवश्यकता भासल्यास शासनाने कांदा खरेदीत उतरावे, अशा मागण्या शेतकऱ्यांनी संघटीतपणे करुन अनेक जिल्हयात महाराष्ट्र कृषक समाजाच्या वतीने केलेली आंदोलने व रास्ता रोको, त्यामुळे निर्माण झालेला वा होणारा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, शासनाने कांदा उत्पादकांकडे केलेले दुर्लक्ष, त्यामुळे याबाबत कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये पसरलेली संतापाची लाट, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, कांदा खरेदी तसेच, कांद्याच्या हमी भावा संदर्भात केंद्र शासनाने अलीकडे धोरण जाहीर केले आहे काय ? असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे ? महाराष्ट्र शासनाने कांद्याला प्रतिकिलो 5 रुपये हमी भाव द्यावा असा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे, त्या संदर्भत केंद्र शासनाने कोणती भूमिका घेतली आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून केंद्र शासनाकडे जवळ जवळ तीन वेळा कांद्याला रुपये पाच किलो हमीभाव देण्यासंबंधीची विनंती केली आहे. यासाठी राज्य सरकार केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत आहे. 2-3 दिवसांपूर्वी नवीन धोरण जाहीर करण्यात आले आहे. नाफेड मार्फत रुपये 325 प्रति क्विंटल या प्रमाणे एक्सपोर्ट क्वालिटीचा कांदा खरेदी करावा अशा सूचना आलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, कांद्यासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. कांद्याच्या प्रश्नासंबंधी राज्य शासनाच्यावतीने माननीय मंत्रिमहोदयांनी चार महिन्यापूर्वी बैठक बोलाविली होती. त्यावेळी कांद्याला हमी भाव देण्यासंबंधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली होती. त्याप्रमाणे प्रस्ताव केंद्र शासनाकडे गेला. परंतु, आता केंद्र सरकार काहीही निर्णय घेत नाही. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात येणार नाही, असा उल्लेख लेखी निवेदनामध्ये करण्यात आलेला आहे. असे असली तरी देखील राज्य व केंद्र शासनसुध्दा कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी काहीही निर्णय घेत नाही. एकीकडे राज्य शासन कांद्याला पाच रुपये हमी भाव मिळाला पाहिजे असे म्हणत असताना दुसरीकडे रुपये 3.25 पैशाने नाफेडने कांदा खरेदी करण्यास अनुकूलता दर्शविते. हा कुठला न्याय आहे ? गहू, साखर इत्यादीला शासन हमी भाव देते. मात्र कांद्याला हमी भाव का दिला जात नाही ? यात राज्य व केंद्र शासनाची एकमेकांवर ढकलण्याची भूमिका आहे. याचा अर्थ कांदा उत्पादक शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे असा होतो. तेव्हा राज्य शासन कांद्याला रुपये पाच इतका हमी भाव देण्याचा निर्णय घेणार आहे की, वेळ काढूपणाचे धोरण स्वीकारणा आहे ?

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधीचे निवेदन शांतपणाने, विचारपूर्वक वाचले असते तर निवेदनामध्ये राज्य शासनाने कोणती भूमिका घेतली आहे हे कळले असते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी वक्तव्य केले की, सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी या लक्षवेधी सूचनेसंदर्भातील निवेदन वाचलेले नाही. असा हेत्वारोप माननीय मंत्री महोदयांनी करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री.गिडवाणी अभ्यासू सदस्य आहेत. त्यांचा आणि माझा जुना परिचय आहे. साखरेशिवाय इतरही अनेक महत्वाचे विषय त्यांनी सदनामध्ये व सदनाबाहेर मांडलेले आहेत. या विषयाची त्यांना जाण आहे. एखाद्या विषयात खोलात जाणारे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे अशा प्रकारे त्यांच्यावर हेत्वारोप करणे योग्य नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी या संदर्भात दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांचा साखर, गहू, कांदा, तांदूळ या विषयांचा गाढा अभ्यास आहे. निरनिराळया प्रश्नांच्या संदर्भात त्यांची अनेक पत्रे माझ्याकडे आलेली आहेत, त्या संदर्भात मी अनेक वेळा बैठका घेऊन निर्णय देखील केलेला आहे. परंतु त्यांनी बोलताना असे म्हटले की, राज्य सरकारने कांदा प्रश्नी काहीच केले नाही. त्यामुळेच मी त्यांना म्हटले की, निवेदनामध्ये हे सगळे दिले आहे. महोदय, फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये .....

श्री.नितीन गडकरी : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. निवेदनामध्ये "कांद्यावर प्रक्रिया उद्योग राज्यात स्थापन व्हावेत म्हणून योग्य ते धोरण ठरविण्यात येत आहे." असा उल्लेख आहे. परंतु ते धोरण काय आहे ? केवळ एक वाक्य लिहीले म्हणजे सर्व काही संपले अशातला हा भाग आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, राज्य सरकारच्या वतीने या सभागृहामध्ये मी निवेदन केले होते की, फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये ज्या शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा विकला असेल, लिलावाने विकला असेल, त्यांना प्रती क्विंटल 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णय झाला आहे. बाजार समित्यांना कांदा चाळी उभारण्यासाठी 1500 रुपये अनुदान पणन महामंडळामार्फत देण्याचा उल्लेख निवेदनात आहे. तसेच कांदा एक्स्पोर्ट करण्यासाठी अनुदान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

देण्याबाबतचा देखील उल्लेख निवेदनात करण्यात आलेला आहे. कांद्याला प्रती किलो 5 रुपये हमी भाव देण्याची भूमिका राज्य सरकारची आहे. या प्रश्नासंदर्भात मी केंद्रीय कृषी मंत्र्यांना भेटलो आहे. या प्रकरणी केंद्र सरकारने हस्तक्षेप करावा अशी विनंती सुध्दा त्यांना केलेली आहे. केंद्र सरकारने कांद्याच्या हमी भावासंदर्भात निर्णय करावा अशी मी त्यांना विनंती केलेली आहे. कालच केंद्र सरकारने नाफेडला सूचना दिली आहे की, 325 रुपये प्रती क्विंटलप्रमाणे कांदा खरेदी करावा. 325 रुपयांपेक्षा कमी दराने कांदा खरेदी करु नये अशा सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी सांगितले की, राज्य सरकार 500 रुपये प्रती क्विंटलप्रमाणे भाव जाहीर करीत आहे आणि नाफेड 325 रुपये प्रती क्विंटलप्रमाणे खरेदी करीत आहे. त्यामुळे ही तफावत राहू नये म्हणून, नाफेडने 325 क्विंटल ऐवजी 500 रुपये क्विंटलप्रमाणे कांदा खरेदी करावा. या संदर्भात राज्य सरकारची सुध्दा तीच भूमिका राहील.

श्री.कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय मला म्हणाले की, श्री.गिडवाणी यांनी निवेदन पूर्णपणे वाचावे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, केवळ एक-दोन उपाय करुन, हा प्रश्न सुटणारा नाही. एक-दोन वर्षांनी हा प्रश्न पुन्हा उभा राहतो. कांद्याच्या दरवाढीची जशी दखल घेतली गेली, तशीच भाव कमी झाली असताना सुध्दा घेतली गेली आहे. हा प्रश्न कायमचा मार्गी लावावयाचा असेल तर राज्य सरकार व केंद्र सरकारने हमी भाव देणे हा एकमेव उपाय आहे. आज शासन जे उपाय करीत आहे ते केवळ तात्पुरते स्वरुपाचे आहेत. कायमस्वरुपी उपाय करण्यासाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकार मिळून कांद्याला हमी भाव जाहीर करणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : महोदय, आम्ही केंद्र सरकारला विनंती केली आहे. लवकरच या संदर्भात पाठपुरावा केला जाईल. या प्रश्नातून कायमस्वरुपी मार्ग काढण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांचा प्रदीर्घ अनुभव सुध्दा लक्षात घेण्यात येईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

सभापती महोदय, या सर्व गोष्टींचा विचार करुन कांद्यासंदर्भात एक सर्वसमावेशक धोरण स्विकारण्याचा तयारीत शासन आहे. आम्ही या संदर्भात लवकरच कार्यवाही करु.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यात कृषिसंदर्भात तसेच प्रक्रिया उत्पादनाच्या संदर्भात कसे धोरण ठरविले जाईल, रेल्वेच्या प्रश्नाबाबत रेल्वे मंत्रालयाशी पाठपुरावा केला जाईल, केंद्र सरकारच्या प्रस्तावासंदर्भात पाठपुरावा केला जाईल, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात येणार नाही, असे बरेच काही माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले आहे. सभापती महोदय, ऊस उत्पादक शेतकरी कांदा उत्पादनाकडे वळल्यामुळे साडे पाच लाख टन कांदा जास्त उत्पादित झालेला आहे. कांदा विकला जाणाऱ्या बंगाल, आसाम या राज्यांशी आपण लवकरच रेल्वे संदर्भात बोलू व या संदर्भात पाठपुरावा करु असेही सांगितले. सभापती महोदय, असे केले तरच शेतकऱ्यांना न्याय मिळणार आहे. एक्सपोर्टसाठी प्रयत्न करु असेही सांगण्यात येते. सभापती महोदय, 50 रुपये अनुदान देऊन हे शासन आरडाओरड करणार आहे. तरी, मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, खरोखरच आपली अशाप्रकारे प्रामाणिक इच्छा आहे का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्य सरकार किंवा पणन विभाग शेतकऱ्यांना मदत करते की नाही, हे सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना माहितच आहे. सन्माननीय सदस्य महोदय, आपला आंबा महोत्सव सुरु आहे. आंबा आणि कांदा ही शेतकऱ्यांचीच उत्पादने आहेत. पणन मंडळ तसेच कृषी विभाग या संदर्भात निश्चितपणे धोरण स्विकारत आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे रेल्वे व्हॅगनसंदर्भात बोलले. एका व्हॅगनमध्ये 40 मेट्रिक टन कांदा असला तरीही 65 मेट्रिक टनचे भाडे द्यावे असे ठरल्यामुळे भाड्यामध्ये वाढ झालेली आहे. तरी, या संदर्भातील निर्णय घेणेही अतिशय महत्वाचे आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशीही बोलण्यात येईल. केंद्रात देखील आपले माननीय केंद्रीय मंत्री आहेत. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, या संदर्भात निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : रसायन मिश्रित सांडपाणी सावित्री नदीच्या पात्रात सोडले गेल्याने नदीचे पाणी प्रदूषित होणे.

मु.शी.: रसायन मिश्रित सांडपाणी सावित्री नदीच्या पात्रात सोडले गेल्याने नदीचे पाणी प्रदूषित होणे यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, नितीन गडकरी, सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर, सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" महाड येथील एमआयडीसीतील रसायन मिश्रित सांडपाणी सावित्री नदीच्या पात्रात सोडले गेल्याने नदीचे पाणी प्रदूषित होणे, वेळोवेळी या प्रश्नावर आंदोलने करणे, परंतु कोणताही उपयोग न होणे, घातक रसायनांनी नदीच्या पाण्यासोबत नदी शेजारील शेतजमीन, पाण्याचे स्त्रोत, वातावरण कायमस्वरुपी प्रदूषित झाल्याने त्या परिसरातील नागरिकांना वेगवेगळ्या श्वसनाच्या समस्यांना तोंड द्यावे लागणे, नदीतून मासेमारी करणारे आदिवासी बेरोजगार होणे, सावित्री नदी बचाव कृती समिती आणि भारतीय दलित बहुजन महासंघ या दोन संघटनांनी दिनांक ६ मार्च, २००६ रोजी ६१ गावातील नागरिकांना सोबत घेऊन तहसिल कार्यालयावर मोर्चे काढणे, मोर्चे काढणाऱ्यांवर पोलिसांनी केलेला लाठीहल्ला, त्यामुळे जनमानसांत पसरलेला तीव्र असंतोष व चिंतेची भावना, शासनाने या प्रकरणी तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण कोकणातील आहात. महाडच्या सावित्री नदीवर आपण गेला असाल. सावित्री नदीवरुनच महाडमधील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होते. माननीय मंत्रिमहोदयांना हे माहितच असेल. या ठिकाणी तेथील माननीय पालकमंत्री श्री. सुनील तटकरे देखील उपस्थित आहेत. सभापती महोदय, सेंट्रल एफ्ल्युएन्ट ट्रीटमेंट प्लँट सन 1985 मध्ये माननीय पर्यावरण मंत्र्यांनी मान्य केला. त्यावेळी त्याची क्षमता काय होती आणि आज काय आहे ? सभापती महोदय, सांडपाणी बाहेर पडत आहे. ते खाडीपर्यंत नेऊन सोडण्याचे ॲप्रुव्हड प्लॅनमध्ये ठरलेही होते. यासंबंधी काही नेत्यांनी आग्रही धरला होता. महाड येथील एम.आय.डी.सीतील रसायन मिश्रित सांडपाणी सावित्री नदीच्या पात्रात सोडले गेल्याने नदीचे पाणी प्रदूषित होत आहे. सभापती महोदय, तेथे विभागीय अधिकारी नाही. फिल्ड ऑफिसरकडे ॲडीशनल चार्ज दिलेला आहे. पर्यावरण मंत्री सावित्री नदीचा प्रश्न सिरिअसपणे घेत नाही. सभापती महोदय, यामध्ये नेमकी कोणती अडचण आहे. त्या ठिकाणी नेमणूक दिलेली आहे, परंतु त्यांना वेगळा चार्ज दिलेला आहे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. कांबळे... 17:45

श्री. विनोद तावडे...

सावित्री नदीतील प्रदूषण थांबले पाहिजे, तेथील लोकांची अवस्था फार बिकट झालेली आहे, यासंदर्भातील दखल पर्यावरण मंत्री महोदय घेणार आहेत काय ? तसेच तेथे पूर्णवेळ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी महाड येथील एमआयडीसीमध्ये विविध प्रकारचे प्रदूषण होत आहे. असा मुद्दा मांडलेला आहे. तेथे 7 कारखान्यामध्ये ॲफ्ल्युअन्ट प्लॉन्ट बसविलेला आहे व त्यातून जलप्रदूषण कमी करण्यात येत आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रत्येक कारखान्यात स्वत:ची सांडपाण्यावर ट्रिटमेंट करणारा सी.ए.पी प्लॅन्ट बसविलेले आहेत, त्यातून 7.5 दशलक्ष लिटर्स पाण्यावर प्रक्रिया होत असते. ज्या प्रेशरने खालच्या स्तराकडे पाणी येत असते ती गोष्ट खरी आहे, कारण सावित्री नदीच्या वरच्या भागामध्ये औद्योगिक परिसर आहे. तेथील सांडपाणी हे समुद्रामध्ये 31 किलोमीटरपर्यंत सोडण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु तेथील मच्छिमार बांधवाचा त्यास तीव्र विरोध होता म्हणून हे पाणी समुद्रामध्ये 23 किलोमीटरवर सोडण्यात आलेले आहे. काही ठिकाणी पाईप लावून हे पाणी पुढे नेण्यात आलेले आहे, निवेदनात त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. अधिकाऱ्यांनी याबाबतीत सांगितले की, ही यंत्रणा बसविणे कठीण आहे व ती फुटण्याची शक्यता असते, मी त्यांना सांगितले की, यासठी तुम्ही स्टँडबाय यंत्रणा उभी करा अशा प्रकारचे आदेश मी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. त्या संदर्भातील कार्यवाही सुरु झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी प्रश्न विचारतांना अशी म्हटले आहे की कोणत्या कालखंडात साथ आली होती. यासंदर्भात निवेदनात म्हटलेले आहे, सांडपाण्याच्या पाईपलाईन मधून होणा-या गळतीमुळे झालेल्या नुकसानीबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. सावित्री नदीमधून तेथील जनतेला शुध्द पाणी मिळावयास पाहिजे याबाबत शासन गंभीर आहे. यासाठी तेथील उद्योजक व परिसरातील लोकांच्या वारंवार बैठका घेण्यात येतात, बऱ्याच बैठकांना मी सुध्दा जात असतो, त्या बैठकांमध्ये सूचना दिल्या जातात, तेथील अधिकारी हे सक्षम आहेत, ते सदर कार्यक्रमावर योग्य नियंत्रण ठेवत आहेत, भविष्यामध्ये सावित्री नदीतून जनतेला शुध्द पाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2....

श्री. गणेश नाईक...

देण्यासाठी शासन कार्यवाही करीत आहे. त्या परिसरामध्ये स्पेशल ऑफिसरची गरज नाही. बऱ्याच वेळा विधानमंडळामध्ये अशी चर्चा होते की, खूप अधिकारी झाले, अनेक गाडया झाल्यात, म्हणून येथे विशिष्ट अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची गरज नाही. यासंदर्भात नियोजन विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे त्यांची संमती मिळाल्यानंतर इतर अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला पाहिजे ते उत्तर दिलेले नाही, ते वेगळेच पुराण येथे सांगत आहेत, नदीच्या पाण्याच्या शुध्दीकरणासाठी काय योजना करणार आहात याची माहिती त्यांनी दिलेली नाही.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी येथे पुराण सांगत नसून वस्तुस्थिती सांगत आहे, त्यास पुराण म्हणणे योग्य नाही.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, आपण या ठिकाणी निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे सांगितले आहे की, शेतकऱ्यांची जी नुकसान भरपाई झाली ती त्यांना देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो प्रश्न विचारला त्यास उत्तर आलेले नाही.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक...

अशाप्रकारे पाईप गळती होऊ नये यासाठी आपण तो प्लँट नीट केला पाहिजे. सावित्री नदीचे पाणी शुध्द राहिले पाहिजे याकरिता तेथील नागरिकांनी सातत्याने धरणे धरले होते. त्याकरिता आपण प्रिव्हेंटीव्ह मेजर्स कोणते स्वीकारणार आहात याची याठिकाणी चर्चा झाली तर ती फलद्रुप होईल.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. मोडक यांनी माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या प्रश्नाचा संदर्भ घेऊन भविष्य काळामध्ये आपण कोणती उपाय योजना करणार असे विचारले? तांत्रिक बिघाडामुळे जर सांडपाणी प्रक्रिया थांबणार असेल तर ती गंभीर बाब आहे. त्याबाबतीत तेथील अधिकाऱ्यांनी स्टँडबाय मोटर, जनरेटर लाऊन ती यंत्रणा कार्यान्वित केली पाहिजे. आणि म्हणून जर एका मशिनरीमध्ये बिघाड झाल्यानंतर ती यंत्रणा थांबणार असेल तर ती बाब दुर्लक्षून चालणार नाही. म्हणून त्यासाठी तेथील अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी ज्या फुटणाऱ्या पाईप लाईन आहेत त्यांचे रुपांतर न फुटणाऱ्या पाईप लाईनमध्ये करण्याबाबत अभ्यास सुरु असून योग्य कालखंडानंतर त्यासंबंधी कारवाई करण्यात येईल.

डॉ. अशोक मोडक : याचा अर्थ आतापर्यंत काहीही कारवाई झालेली नाही. मघापासून प्रश्न विचारीत आहोत की, आपण त्याठिकाणी अधिकारी नेमला काय? पाईपलाईनची गळती थांबविण्यासाठी आपण उपाय योजना केली आहे काय? सहा मार्चला त्या लोकांनी मोर्चा काढला त्या अगोदर दोन महिने महाड मधील लोक दूषित पाणी पित होते...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यात आल्यानंतरच्या कालखंडामध्ये सांडपाणी तेथील खाडीमध्ये जाऊन मासे मेले नाहीत, किंवा शेतकऱ्यांचे नुकसान झाले नाही. त्या अगोदर घडलेल्या घटनेबाबत एम.आय.डी.सी. मार्फत नुकसान भरपाई दिली आहे. त्यामुळे नुकसान झाले नाही हे आम्ही नाकारले नाही, ते आम्ही कबूल केले आहे. अशाप्रकारची आमची भूमिका असल्यामुळे खोटे बोलून मला सांगता आले असते, परंतु तसे करण्याची माझी इच्छा नाही. माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या भावनेप्रमाणे तेथील जनतेला नदीचे शुध्द पाणी मिळाले पाहिजे याच्याशी शासन सहमत आहे. भविष्य काळात त्या ठिकाणी शुध्द पाणी मिळण्यासाठी शासन जागरुक राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, बंदर अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी जाऊन चौकशी केली. नदीचा आणि या अधिकाऱ्यांचा संबंध काय? मंत्रिमहोदयांना विचारु इच्छितो की, आज सावित्री नदीचे पाणी शुध्द आहे काय? ते पाणी पिण्यासाठी लायक आहे काय?

श्री. गणेश नाईक : ज्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा उद्‌भव आहे तो भाग आणि पाईपलाईनचा मार्ग वेगळा आहे. वरच्या भागामध्ये कुठेतरी सांडपाण्याचा पाईप लिक होऊन त्या पाण्यामध्ये बिघाड झाला होता. परंतु तो बिघाड आता थांबलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दारव्हा तालुक्यातील रॉकेल पुरवठयात झालेल्या अफरातफरीबाबत लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली तक्रार

मु. शी : दारव्हा तालुक्यातील रॉकेल पुरवठयात झालेल्या अफरातफरीबाबत लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली तक्रार यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य श्री. दिवाकर रावते यां-ी दिलेली ल‌वेधी सूच-ा.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनि‌ महत्वाच्या बाबी‌डे स-मा-ा-ीय अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे ल‌ वेधू इच्छितो आ‌ त्याबाबत त्यां-ी -िवेद-ा ‌रावे, अशी वि-ंती ‌रतो.

"दारव्हा तालुक्यातील (जि.यवतमाळ) नोव्हेंबर व डिसेंबर, 2005 मध्ये रॉकेल पुरवठ्यात सुमारे 43,900 लिटर्सची झालेली अफरातफर नुकतीच उघडकीस येणे, याबाबत दारव्हा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राजू ठाकरे यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे दिनांक 16 फेब्रुवारी, 2006 रोजी वा त्या सुमारास तक्रार दाखल केली असता दारव्हा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष राजु ठाकरे यांना उप विभागीय अधिकारी विजय भाकरे यांनी बयानासाठी बोलावून त्यांना केलेली दमदाटी व फौजदारी गुन्हे दाखल करण्याची दिलेली धमकी, त्यामुळे पत्रकारांमध्ये तसेच जनतेत पसरलेले संतापाचे वातावरण, यामुळे जनतेच्या मनात प्रशासनाविरुद्ध निर्माण झालेली चीड व जनतेची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, सदर प्रकरणांची चौकशी करुन दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री. सुनील तटकरे(अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : अध्य‌ महाराज, ल‌वेधी सूच-ेसंबंधीच्या -िवेद-ाच्या प्रती मा-ा-ीय सदस्यां-ा आधीच वितरीत ‌ल्या असल्यामुळे मी ते -िवेद-ा आपल्या अ-ुमती-े सभा‌ृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : -िवेद-ा सभा‌ृहाच्या पटलावर ठेव‌यात आले आहे.

-िवेद-ा

(प्रेस : येथे सोबतचे -िवेद-ा छापावे.)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाने निवेदनात म्हटले आहे की, "चौकशीत गैरव्यवहाराच्या तक्रारीत तथ्य असल्याचे आढळून आले". पुरवठा व्यवस्थितपणे व्हावा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे यादी देण्यात येते. ही यादी संपूर्ण महिन्यासाठी देण्यात येते. नोव्हेंबर व डिसेंबरसाठी यादी दिल्यानंतर एका पुरवठादाराला दोन वेळा पुरवठा करण्यात आला. परंतु श्री. सोळंकी या पुरवठादाराला पहिला पुरवठा कमी झाल्याचे यादीमध्ये दाखविण्यात आले. याबाबत श्री. राजू ठाकरे या पत्रकारांनी तक्रार केल्यानंतर व ती वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर पुरवठा यादीमध्ये सुधारणा करण्यात येऊन नोव्हेंबरमध्ये 24 हजार लिटर व डिसेंबरमध्ये 31 हजार 600 लिटर असे एकूण 45 हजार 00 लिटर खुल्या बाजारातील केरोसीन पळविण्यात आले. ही बाब पत्रकारांनी उघडकीस आणल्यानंतर पुरवणी यादी निर्माण करण्यात आली. ती बेकायदेशीर असल्यामुळे त्यानंतर सर्व प्रकरणामध्ये किरकोळ यादी धारकांनी आम्हाला पुरवठा मिळाला नाही असे प्रतिज्ञापत्र बनवून दिले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

किरकोळ यादीधारकांना वेठीस धरलेले आहे. एकंदरीत 44,00 लिटरचा काळाबाजार झाल्याचे सिध्द झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, या प्रकरणी श्री.भाकरे यांची बदली करुन विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिनांक 17-04-2006 रोजी देण्यात आले." श्री. भाकरे यांची बदली झालेली आहे काय ? मुळामध्ये काळाबाजार झाला हे सिध्द झालेले आहे, त्याबाबत संबंधितावर कोणती कारवाई प्रपोज केलेली आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, गैरव्यवहाराच्या तक्रारीत तथ्य असल्याचे आढळून आले. या संदर्भाने सभागृहात चर्चा झाली, त्याप्रमाणे त्याबाबतची पूर्ण माहिती घेऊन संबंधितांची बदली करण्याबाबत महसूल विभागाला कळविण्यात आलेले आहे. या संबंधित अधिकाऱ्यांची चौकश्ी विभागीय आयुक्तांमार्फत करण्याचे सुचविलेले आहे. त्यांनी एक महिन्यात चौकशी करावयाची आहे. त्यानंतर चौकशीच्या अनुषंगाने पुढील कारवाई निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : 45,600 रॉकेलचा गैरव्यवहार झालेला आहे. असे एक प्रकरण नाही तर 50 प्रकरणे आहेत. हे एका प्रकरणामध्ये उघडकीस आलेले आहे. मूळ मागणी 100 लिटरची असतांना 1600 लिटर रॉकेलचे वितरण करण्यात आल्याचे दाखविले, काही ठिकाणी 1200 लिटरची मागणी असतांना त्या ठिकाणी 1800 लिटर रॉकेलचे वितरण केल्याचे दाखविलेले आहे अशाप्रकारच्या तफावती निर्माण झालेल्या आहेत. त्यांची फक्त बदली करुन चालणार नाही तर त्यांना निलंबित करुन त्यांची चौकशी व्हायला पाहिजे. त्यांच्यावर निलंबनाची कारवाई आपण करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : ते महसूल विभागाचे अधिकारी असल्यामुळे त्यांची ताबडतोब बदली करावी म्हणून महसूल विभागाला पत्र दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : विधानसभेमध्ये वेगळे सांगितले आणि आता 1 महिन्यात चौकशी करणार असल्याचे सांगितले जात आहे.

श्री.सुनील तटकरे : पुन्हा या चर्चेच्या अनुषंगाने महसूल विभागाला कळविण्यात येईल.

श्री.नारायण राणे : महसूल विभागाला मंत्री महोदयांनी कळविले असेल तर माझ्या कार्यालयाकडून याबाबतची माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्याची त्वरित बदली करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/ MAP/ SBT/

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, चोर सोडून सन्यासाला फासावर देण्याचा प्रकार चाललेला आहे. या ठिकाणी रॉकेल पुरवठ्यात 43,900 लिटर्सची अफरातफर झालेली आहे. त्या ठिकाणचे तहसिलदार आणि पुरवठा अधिकारी हे दोन अधिकारी या संबंधात काम करतात. या प्रकरणात एस.डी.ओं.ची इन्क्वायरी केली जात आहे, परंतु त्यांचा यामध्ये काही संबंध नाही. पुरवठा अधिकारी आणि संबंधित तहसिलदार यांची चौकशी करणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : या प्रकरणी सगळयाच अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येईल आणि दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, उप विभागीय अधिकारी हे केरोसिनचे वाटप करत नाहीत. 43,900 लिटर्स रॉकेलचा फ्रॉड झालेला आहे. याला संबंधित दोन अधिकारी जबाबदार आहेत. उप विभागीय अधिकाऱ्यांची चौकशी सुरु केलेली आहे. परंतु तक्रारदार आणि त्यांच्यामध्ये वाद झाला, म्हणून त्यांची आपण बदली करत आहात. खऱ्या अर्थाने ज्यांनी भ्रष्टाचाराला साथ दिली ते जिवंत आहेत. जोपर्यन्त या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होत नाही तोपर्यन्त विभागीय अधिकाऱ्यांची बदली करणे, हे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे. जोपर्यन्त या प्रकरणामध्ये वरिष्ठ पातळीवरुन चौकश्ी होत नाही, तोपर्यन्त या अधिकाऱ्यांची बदली करण्यात येऊ नये, तशी कार्यवाही शासन करणार आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : श्री.राजू ठाकरे या पत्रकारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केलेली आहे. त्या संबंधातील चौकशी करण्यासाठी उप विभागीय अधिकाऱ्यांना सूचना दिली होती. उप विभागीय अधिकाऱ्यांनी त्याप्रमाणे चौकशी करणे आवश्यक होते, ती त्यांनी केली नाही. उलट त्यांनी संबंधित पत्रकारांना बोलाविले. त्यांच्याकडे कोणताही पुरावा नसल्यामुळे चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही, असे उप विभागीय अधिकाऱ्यांनी कळविले. त्यानंतर उप विभागीय अधिकाऱ्यांच्याबाबतीत आक्षेप उपस्थित झाल्यानंतर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी याबाबत चार पथके नेमून चौकशी केली. त्यांनी केलेल्या चौकशीमध्ये 43,900 लिटरचा अपहार झाला हे निदर्शनास आले.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार 18:00 वा.

श्री. सुनील तटकरे ....

त्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी योग्यरितीने चौकशी करणे ही त्यांची वैधानिक जबाबदारी होती. त्यांनी ती जबाबदारी पार पाडली नाही. म्हणून त्यांची बदली करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, जे पुरवठा निरीक्षक असतील, जिल्हा पुरवठा अधिकारी असतील त्या सर्वांची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी केली जाईल आणि त्यामध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. ज्यांचे परवाने आहेत त्यांचे परवाने सुध्दा निलंबित केले जातील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "झ ोपडपट्टया बांधून गरजूंची फसवणूक करणाऱ्या झोपडपट्टी दादांविरुध्द करण्यात यावयाच्या कारवाईबाबत" या विषयासंबंधी श्री. मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी दिनांक 12 एप्रिल, 2005 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहामोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. दिलीप वळसे-पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भातील 20 टक्के सिकलसेलग्रस्त रुग्णांबाबत शासन गंभीर नसणे व सिकलसेलग्रस्तांसाठी नवीन धोरण राबविणे" या विषयासंबंधी श्री. सागर मेघे व इतर वि. प. स. यांनी दिनांक 10 एप्रिल, 2006 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवीत आहे.

उपसभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली माहिती छापावी)

--

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आज सभागृहाची बैठक रात्री 8.00 वाजता संपली पाहिजे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य म्हणत असतील त्या वेळेत सभागृहाची बैठक संपवू परंतु त्याआधी विधेयके मंजूर करुन द्यावीत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, नियम 260 अन्वये आम्ही प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर चर्चा व्हावयाची आहे. त्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असले पाहिजेत.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : चिमाजी आप्पा स्मारक व वसईच्या किल्ल्याचे नूतनीकरण व बांधकाम करण्यास पुरातत्व विभागाने केलेली मनाई

मु. शी. : चिमाजी आप्पा स्मारक व वसईच्या किल्ल्याचे नूतनीकरण व बांधकाम करण्यास पुरातत्व विभागाने केलेली मनाई याबाबत श्री. अनंत तरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"ठाणे जिल्ह्यातील वसई तालुकयातील चिमाजी आप्पा स्मारकास व वसईच्या किल्ल्यास पुरातत्व विभागाने नुतनीकरण व बांधकाम करण्यास केलेली मनाई, परिणामी चिमाजी आप्पा स्मारक तसेच वसईचा किल्ला यास जीर्णावस्था आली असणे, पुरातत्व वास्तूकडे लक्ष घालण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, त्या ठिकाणी 1994 पासून 1997 पर्यंत वसई नगरपालिकेच्या माध्यमातून सुमारे 25 लाख रुपये खर्च करुन काही भाग सुशोभित करण्याचा प्रयत्न झाला. सभापती महोदय, आपण सुध्दा त्या भागातून निवडून आलेला आहात. माननीय पालकमंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. केंद्रीय पुरातत्व खात्याच्या माध्यमातून वसई नगरपालिकेला जे पत्र आलेले आहे त्यामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारचे विकास काम करण्याला बंदी घातलेली आहे. गेली नऊ वर्षे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे विकास काम होऊ शकलेले नाही. आज त्या ठिकाणी 300 मीटरच्या आत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये असे केंद्रीय पुरातत्व विभागाचे निर्देश आहेत. ते निर्देश न

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

श्री. अनंत तरे .....

पाळता त्या ठिकाणी मोठमोठे तीन हॉटेल्स होत असताना त्यांना सगळी परवानगी मिळते परंतु चिमाजी आप्पा स्मारक आणि वसईचा किल्ला यांच्याबाबतीत कोणतीही परवानगी मिळत नाही. म्हणून आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, चिमाजी आप्पा स्मारक आणि वसईचा किल्ला यांची डागडुजी करण्यासाठी, सुशोभिकरण करण्यासाठी केंद्रीय पुरातत्व खात्याच्या माध्यमातून प्रयत्न करावा. मी तेथील काही फोटो आपल्याकडे पाठवून देतो. त्या ठिकाणी गवत साफ करण्याची परवानगी सुध्दा मिळत नाही. माननीय पालकमंत्री या ठिकाणी बसलेले आहे. यासंदर्भात शासनाने लक्ष घालावे अशी विनंती करतो.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांना मी असे म्हटले की, अधिवेशन संपल्यानंतर आपण तेथील गवत साफ करु. मी हे गंभीरपणे सांगत आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 18:05

पृ.शी.: श्रीमती कल्पना भोसले या महिला पोलिसाने गुंडाचा पाठलाग करुन त्याला जेरबंद करणे

मु.शी.: श्रीमती कल्पना भोसले या महिला पोलिसाने गुंडाचा पाठलाग करुन त्याला जेरबंद करणे याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"कुरार व्हिलेज येथील संजयनगर येथे ईद निमित्त काढलेल्या मिरवणुकीतील महिलेला गुंडाच्या मोटारसायकलीची ठोकर बसल्याने संतप्त झालेल्या नागरिकांना गुंड रिव्हॉल्व्हर रोखून धमकावत असल्याची माहिती मिळताच श्रीमती कल्पना भोसले या महिला पोलीस मोटारसायकलवर बसून तातडीने घटनास्थळी गेल्या व पाठलाग करुन गुंडाला जेरबंद केले. गुंडाला ताब्यात घेतल्याने संभाव्य संघर्षही टळला. एका महिला पोलिसाने दाखविलेले धाडस गौरवास्पद आहे. म्हणून महिला पोलीस श्रीमती कल्पना भोसले हिला प्रोत्साहनात्मक एखादा पुरस्कार देऊन तिचा गौरव करण्यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे सूचना करीत आहे.

सभापती महोदय, अलिकडे आरोपी सगळयांच्या डोळ्यासमोर दिसत असतानाही त्याच्यावर कारवाई होऊ शकत नाही अशा प्रकारचे प्रसंग वारंवार नजरेस पडतात. अशा वेळी मुंबईतील मालाड (पूर्व) येथील महिला पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती कल्पना भोसले व पोलीस कॉन्स्टेबल श्री. दत्तात्रय होडगे यांनी राहूल सुरवाडे या गुन्हेगाराचा पाठलाग करुन त्याला पकडले. राहूल सुरवाडे या गुन्हेगाराने संजय नगर येथील मोठया मश्शिदीपाशी एका स्त्रीवर हल्ला केला असता जमावाने त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याने जमावाला पिस्तुलाचा धाक दाखवून मोटारसायकलवरुन पळ काढला. या सुरवाडे गुन्हेगाराला या पूर्वी खुनाबाबत शिक्षा झालेली होती आणि तो भायखळा जेलमध्ये सजा कापत होता. नंतर तो पॅरोलवर असताना पुन्हा गुन्हा करण्यासाठी आलेला होता. झोन 12 मधील महिला कॉन्स्टेबल श्रीमती कल्पना भासले यांना ही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे ...)

बातमी समजताच त्या स्कूटरवर स्वार झाल्या आणि त्यांनी पोलीस कॉन्स्टेबल श्री. होडगे यांना आपल्या बरोबर घेतले आणि त्या दोघांनी सुरवाडे याचा पाठलाग केला आणि श्रीमती कल्पना भोसले या महिला कॉन्स्टेबलने सुरवाडे या गुंडाला जेरबंद केले. या गौरवास्पद कामगिरीबद्दल मी श्रीमती कल्पना भोसले हिचे अभिनंदन करते. शासनाने देखील तिला तसे कळवावे अशी मी विनंती करते.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: किन्हीखूर्द , ग्रामपंचायत अड्याळ ता. भीवापूर, जि.नागपूर या गावाचे पुनर्वसन मौजा अड्याळाफाटा येथे करण्याबाबत

मु.शी.: किन्हीखूर्द , ग्रामपंचायत अड्याळ ता. भीवापूर, जि.नागपूर या गावाचे पुनर्वसन मौजा अड्याळाफाटा येथे करण्याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

गोसेखूर्द प्रकल्पामध्ये (ता. भीवापूर, जि. नागपूर) किन्हीखूर्द हे गाव बुडीत क्षेत्रामध्ये दाखविले आहे. सदर गाव अड्याळ ग्रामपंचायतीमध्ये येत असून संपूर्ण गट ग्रामपंचायतीचे क्षेत्र बुडीत क्षेत्रामध्ये येत असताना अड्याळचे पुनर्वसन अंभोरा रोडवर करण्यात आले तर किन्हीखूर्द या गावाचे पुनर्वसन गावापासून तीस कि.मी. लांब अंतरावर केले आहे. उपविभागीय अधिकारी, उमरेड यांनी पर्यायी गावठाणासाठी जागा निश्चित करण्याबाबत एक पत्र दिले होते. क्र. सिरस्तेदार-4 व.शि. उपविभागीय अधिकारी कार्यालय, दिनांक 24.4.1989च्या पत्रानुसार ग्रामपंचापयतीला ठराव मागितला होता. ग्रामपंचायतीने ठराव घेऊन तीन गाव दर्शविले होते. त्यापैकी एकही जागा राजस्व विभागाने निश्चित केली नाही.

किन्हीखूर्द या गावाचे पुनर्वसन त्या वेळचे तहसिलदार श्री. सुंकखार यांनी जातीच्या आधारावर गावामध्ये अनुसूचित जातीच्या लोकांचे वास्तव्य असल्याकारणाने तीस कि.मी. अंतरावर करुन अन्याय केला असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाला केली आहे.

किन्हीखुर्द गावामधील फक्त 35 टक्के शेती बुडीत क्षेत्रात येत असून 65 टक्के शेती बुडीत क्षेत्रात येत नाही. स्थानिक लोकांना शेती करणे सोयीचे व्हावे यासाठी वरील गावाचे

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

पुनर्वसन गावापासून तीस कि.मी. अंतरावर न करता अड्याळफाटा येथे करावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

...5..

अस्थुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: तलासरी येथील चेक नाका चालू ठेवून लाखो रुपयांचा केलेला अपहार

मु.शी.: तलासरी येथील चेक नाका चालू ठेवून लाखो रुपयांचा केलेला अपहार याबाबत श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उललेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्रीमती सुधा जोशी यांनी एक विशेष उललेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

हरियाणा, गुजरात, राजस्थान इत्यादी राज्यातून म्हशी, बैल, शेळया, मेंढ्या इत्यादी कत्तलीसाठी व विक्रीसाठी ट्रक आणि टेम्पोद्वारे मोठ्या प्रमाणात मुंबईत आणल्या जातात. तलासरी, जि. ठाणे येथील चेक नाक्यावर सदर प्राण्यांची पशुसंवर्धन खात्यामार्फत तपासणी करुन प्रमाणपत्र दिले जाते. तसेच तपासणी पोटी सेवाशुल्क आकारले जाते.

तलासरी येथील चेक नाका, खात्याच्या पुनर्रचने अंतर्गत दिनांक 25.5.2004च्या शासन निर्णयाद्वारे बंद करण्यात आला होता.

...नंतर श्री कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ श्री. शिगम नंतर 18:10

श्रीमती सुधा जोशी...

काही अधिकाऱ्यांनी स्वत:च्या अधिकारात शासन निर्णय डावलून अनधिकृतपणे दिनांक 30.6.2005 पर्यंत चेक नाका चालूच ठेवून जमा होणाऱ्या सेवाशुल्कातून लाखो रुपयांचा अपहार केल्याचे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. याप्रकरणी दिनांक 25.5.04 ते 30.6.2005 या कालावधीत मागील 3-4 वर्षात जमा होणाऱ्या सेवाशुल्काची रक्कम काढून किती रकमेचा अपहार करण्यात आलेला आहे याची सखोल चौकशी करुन संबंधितांकडून व्याजासह रक्कम वसूल करावी आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाकडे मागणी करीत आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: दाभोळ येथील ग्रामस्थांना होणारा दूषित पाणी पुरवठा

मु.शी.: दाभोळ येथील ग्रामस्थांना होणारा दूषित पाणी पुरवठा याबाबत श्री. अरविंद सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सावित्री नदीच्या संदर्भात मी मागील अधिवेशनात चर्चा उपस्थित केली होती आणि लक्षवेधी सूचना सुध्दा दिली होती. सावित्री आणि गांधारी नदीच्या पात्रातील पाणी सातत्याने दूषित होत आहे. त्यामुळे तेथील मासे मरत आहेत आणि याचा परिणाम शेजारी गावातील विहिरींच्या पाण्यावर होत आहे. वर्षभर दुथडी भरुन वाहणाऱ्या सावित्री नदीच्या किनारी राहणाऱ्या दाभोळ येथील ग्रामस्थांना गेली दहा वर्षे पिण्याच्या पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. या गावाची सुमारे तीन हजार लोकवस्ती आहे आणि 6 दुर्गम वाडया आहेत. या गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी माणगांव तालुक्यातील लोणेरे येथे धरण बांधण्यात आलेले आहे. लोणेरे येथून पिण्याच्या पाण्यासाठी जी पाईप लाईन टाकलेली आहे ती गेली 2/3 वर्षे नादुरुस्त झालेली आहे. त्यामुळे लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. बोअरींग घेतले तरी विहिरींमधून दूषित पाणी येत आहे. माझी शासनाला या विशेष उल्लेखाद्वारे विनंती आहे की या गावासाठी जी पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन आहे तिची तातडीने दुरुस्ती करावी. विशेष उल्लेखाचे पत्र दिल्यानंतर शासनाकडून कळविण्यात येते की, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात कोणाचीही तक्रार नाही,शेतकऱ्यांची तक्रार नाही,कोणीही आजारी पडलेले नाही. परंतु ही सगळी खोटी माहिती दिली जाते. दाभोळ गावाला पिण्याचे जे दूषित पाणी मिळत आहे त्याचे मूळ कारण प्रदुषण हेच आहे. म्हणून याकडे शासनाने जातीने लक्ष द्यावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करतो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

पृ.शी.: राज्यात 341 प्रा.शाळा अनधिकृत आढळून येणे.

मु.शी.: राज्यात 341प्रा. शाळा अनधिकृत आढळून येणेबाबत

श्री. संजय दत्त यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"341 प्राथमिक शाळा अनधिकृत आढळून आल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. कारण संबंधित विभागातील शिक्षणाधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असा इशारा शालेय शिक्षण विभागाने दिला आहे. अशा शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये म्हणून नजिकच्या मान्यता प्राप्त शाळांमधून या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाते. ज्या संस्थांनी यापुढे अनधिकृतपणे शाळा सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश मार्च 2006 मध्ये काढलेल्या एका परिपत्रकाद्वारे शासनाने दिले आहेत. परिणामी या शाळांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. याबाबत सार्वजनिक हिताच्या आणि अत्यंत महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेख देत आहे".

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: रोहा तालुक्यातील भातसई येथील आदर्श ग्रामयोजनेअंतर्गत कामामध्ये झालेला भ्रष्टाचार.

मु.शी.: रोहा तालुक्यातील भातसई येथील आदर्श ग्रामयोजनेअंतर्गत कामामध्ये झालेला भ्रष्टाचार यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" रायगड जिल्हयामधील रोहा तालुक्यातील भातसई येथील आदर्श ग्रामयोजनेअंतर्गत कामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचे प्रकरण शासनाच्या निदर्शनास आणले होते. त्यानुसार मला दिनांक 11 जुलै 2005 रोजी कृषी संधारण व खार जमीन मंत्री मा.ना.श्री.बाळासाहेब थोरात यांनी उत्तर दिले. त्या उत्तरात त्यांनी कळविले आहे की, रायगड जिल्हयातील मौ.भातसई,ता.रोहा येथील झ ाालेल्या भ्रष्टाचाराबाबत तत्कालीन मंत्री श्री.बाबासाहेब धाबेकर यांनी दिनांक 7 जून 2004 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.रायगड यांना अपहारीत रक्कम वसूल करुन संस्थेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यास आदेशीत केले होते.

मंत्रीमहोदयांनी संस्थेकडून अपहारीत रक्कम वसूल करुन कारवाई करण्याचे आदेश दिले असताना विभागीय अधिकाऱ्यांनी पुन्हा चौकशीचे आदेश शासन स्तरावरुन देणारे अधिकारी कोण? हे संबंधित मंत्रीमहोदयांपेक्षा मोठे आहेत काय ?

असे आदेश देणाऱ्या शासन स्तरावरील अधिकाऱ्यांविरुध्द त्वरीत कारवाई करावी व मंत्रीमहोदयांनी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्याने या विषयासंबंधी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे."

नंतर भारवि

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अंधेरी (पूर्व) येथील कोंडविसा गुंफा (बौध्द लेणी) व जोगेश्वरी (पूर्व) येथील जोगेश्वरी गुंफा या परिसरातील अवैध बांधकाम व खोदकाम थांबविणे.

मु.शी.: अंधेरी (पूर्व) येथील कोंडविसा गुंफा (बौध्द लेणी) व जोगेश्वरी (पूर्व) येथील जोगेश्वरी गुंफा या परिसरातील अवैध बांधकाम व खोदकाम थांबविणेबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

माननीय अधीक्षक पुरातत्त्व विभाग (मुंबई प्रदेश कार्यालय, सायन) यांना अंधेरी पूर्व येथील कोंडविसा गुंफा (बौध्द लेणी) व जोगेश्वरी पूर्व येथील जोगेश्वरी गुंफा या परिसरात अवैध पध्दतीने होत असलेले बांधकाम आणि खोदकाम थांबविण्यासाठी दिनांक 14.3.2006 रोजी सामाजिक संघटनेच्यावतीने तसेच लोकप्रतिनिधींनी सविस्तर निवेदन सादर केले आहे. कोंडविसा गुहेच्या परिसरात जवळपास पश्चिम दिशेला पाच मीटरपर्यंत व मुख्य गुहेच्या पूर्व भागाला 15 मीटरपर्यंत अवैध पध्दतीने 100 च्या वर नवीन झोपडया तिथे असलेल्या पुरातत्त्व विभागाच्या केअरटेकरच्या उपस्थितीत उभारण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे मुंबई मेट्रोपॉलिटन रिजनल डेव्हलपमेंट अथॉरिटीच्यावतीने मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्राजेक्टच्या अंतर्गत होणाऱ्या कामासाठीसुध्दा गुहा परिसरात खोदकाम करण्यात येत आहे. तसेच, जोगेश्वरी गुहेच्या परिसरात सर्वच बाजूने निवासी आणि व्यवसायासाठी झोपडया बांधलेल्या असून अत्यंत कमी प्रमाणात मोकळी जागा त्याठिकाणी शिल्लक आहे. या बौध्दगुहेच्या आत एका हिंदू देवताचे मंदिरही बांधण्यात आले आहे. सदर प्रकारामुळे समस्त बौध्द जनतेच्या भावना दुखावलेल्या आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सन 1858 च्या पुरातन स्मारक व पुरातत्त्व परिसर कायदा व 1959 भारत सरकार, सांस्कृति विभाग दिनांक 16 जून 1992 रोजी निर्गमित करण्यात आलेल्या नियमान्वये संरक्षित स्मारकाच्या 100 मीटर पर्यंत व त्यानंतरच्या 200 मीटर परिसरामध्ये कोणत्याही प्रकारच्या खोदकामास व बांधकामास मनाई आहे. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन कोंडविसा बौध्द गुहा व जोगेश्वरी गुहेच्या 200 मीटर परिसराच्या आत करण्यात आलेले अवैध बांधकाम त्वरित तोडण्याची तसेच खोदकाम थांबविण्याची महाराष्ट्र शासनाने कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिक्षण मंडळावर शासकीय सदस्यांची नियुक्ती न होणे.

मु.शी.: कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिक्षण मंडळावर शासकीय सदस्यांची नियुक्ती न होणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा. सदस्य श्री. मोते यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिक्षण मंडळाच्या निवडणुका होऊन तीन महिने झाले आहेत. मात्र, दोन शासकीय सदस्य नियुक्त न झाल्याने शिक्षण मंडळाचे काम ठप्प झाले आहे. याबाबत शासनाचे ध्यानाकर्षण करण्यासाठी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून एका महत्त्वाच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधत आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक होऊन शिक्षण मंडळाची निवडणूक झाली. शिक्षण मंडळावर 16 सदस्य असणे आवश्यक आहे. 16 सदस्यांपैकी 14 सदस्यांची पदे भरली असून अद्यापी दोन पदे रिक्त आहेत. सभापतींची निवड होऊ न शकल्यामुळे अनेक प्रशासकीय कामे सभापतींच्या मान्यतेअभावी बंद पडलेली आहेत. जून महिन्यामध्ये शाळा सुर होणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेष देणे, फर्निचर, शाळा दुरूस्तीसह जवळ जवळ रुपये 60 लाखांच्या कामांना शिक्षण मंडळाची मान्यता मिळणे आवश्यक आहे. 24 जानेवारी 2006 रोजी 14 सदस्यांची निवड झ ाली असून दोन सदस्यांची निवड होणे बाकी आहे. तेव्हा या दोन सदस्यंची तातडीने निवड करून शिक्षण मंडळाचे कामकाज कसे सुरू होईल याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना येथे मांडली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मालाड (पूर्व) विभागातील चंद्रभागा विद्यामंदिराच्या संस्था चालकांकडून सुरु असलेला मनमानी कारभार.

मु.शी.: मालाड (पूर्व) विभागातील चंद्रभागा विद्यामंदिराच्या संस्था चालकांकडून सुरु असलेला मनमानी कारभार याबाबत श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"मुंबई उपनगरातील मालाड (पूर्व) भागातील चंद्रभागा विद्या मंदिर येथील संस्था चालकांनी गेली अनेक वर्षे मनमानी गैरकारभार चालू ठेवला, त्या संदर्भात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शासनाकडे वारंवार तक्रार केल्यामुळे दिनांक 5/10/2005 रोजी शासनाने प्रशासकाची नियुक्ती केली. परंतु प्रत्यक्षात प्रशासक या शाळेमध्ये महिन्यातून एखादया वेळेसच येतात, व या शाळेत अजूनही संस्था चालकांचा हस्तक्षेप सुरु आहे. या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गेली अनेक महिने मुख्याध्यापक नसल्यामुळे पगार मिळालेला नाही व येथील प्रयोग शाळा अनेक महिने बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रयोग परीक्षा अन्य शाळांत घ्याव्या लागल्या, शाळेच्या वर्ग खोल्याही संस्था चालकांनी बंद ठेवल्या आहेत. त्यामुळे जून 2006 मध्ये नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश कसा द्यायचा या चिंतेत शिक्षक व पालक वर्ग आहे, त्यासाठी सदर बाब मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करु इच्छित आहे.

महोदया, पश्चिम उपनगरातील मालाड (पूर्व) येथील चंद्रभागा विद्या मंदिर येथे संस्था चालकांचा गैरकारभार सुरु होता. त्यामुळे एक वर्षापूर्वी त्या ठिकाणी प्रशासक नेमण्यात आला परंतु ते प्रशासक महिन्यातून एकदा त्या ठिकाणी येतात किंवा एखादा विशेष कार्यक्रम असला तरच येतात. संस्था चालकाचा प्रशासनामध्ये अजूनही हस्तक्षेप सुरुच आहे. माझ्या मते जोपर्यंत त्यांच्या मुलीला सेवाज्येष्ठता डावलून, मुख्याध्यापक पदी नेमले जात नाही तो पर्यंत हा त्रास थांबणार नाही. त्या शाळेतील प्रयोगशाळा बंद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना बाहेरच्या शाळेत नेऊन त्यांची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर....

प्रात्यक्षिक परीक्षा घ्यावी लागली. तेथील शिक्षकांचे तीन महिन्यांपासून पगार नाहीत. वास्तविक पाहता त्या ठिकाणी प्रशासक असताना त्यांनी पगार करण्यास काहीच हरकत नव्हती. परंतु त्यांनी त्या शिक्षकांचे पगार केले नाही. विद्यार्थ्यांचे पेपर तपासण्याची काहीच व्यवस्था नाही. शिक्षकांना बसण्याची सुध्दा जागा नाही. इयत्ता 5 वी, 6 वी, 7 वी चे वर्ग झाल्यानंतर खोल्या बंद केल्या जातात. शिक्षक आजारी असला तरी त्याला शाळेमध्ये कसल्याही प्रकारची बसण्याची व्यवस्था नाही. तशी परवानगी सुध्दा नाही. जून महिन्यामध्ये प्रवेश पक्रिया सुरु होणार आहे. परंतु त्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही सुरु झालेली नाही. त्यातच त्या शाळेवर शिक्षक कमी आहेत. ही एकमेव मराठी शाळा आहे. त्यामुळे ती शाळा जगली पाहिजे. संस्था चालकावर कडक कारवाई करुन, ती शाळा कशी वाचेल याची चिंता आम्हाला आणि विद्यार्थ्यांच्या पालकांना आहे. त्यामुळे शासनाने या संदर्भात तातडीने लक्ष घालून चंद्रभागा विद्या मंदिर ही मराठी शाळा वाचवावी एवढीच या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी.: कराराने कसायला देण्यात आलेली जमीन त्यांचेकडून अचानक काढून घेणे.

मु.शी.: कराराने कसायला देण्यात आलेली जमीन त्यांचेकडून अचानक काढून घेणे याबाबत प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मांगी इरिकेशन टँक, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील पाटबंधारे खात्याच्या मालकीची असलेली अतिरिक्त जमीन 1983 सालापासून त्याच गांवातील भटक्या जमातीच्या 16 कुटुंबांना 11 महिन्याच्या कराराने कसायला देण्यात आलेली होती. तेव्हापासून दरवर्षी कराराचे नुतनीकरण करुन घेऊन आजतागायत हे शेतकरी जमीन कसत आहेत. सन 2004-2005 या वर्षासाठीही पाटबंधारे खात्याने या शेतक-यांशी करार केलेला आहे. या सर्व नागरिकांना उपजीविकेचे दुसरे कोणतेही साधन नाही. असे असताना जमिनीशी कोणताही हितसंबंध नसलेल्या गावातील काही वजनदार आसामी या जमिनीत गरीब शेतक-यांना अडथळे आणत आहेत. जमिनीमध्ये गहू, हरभरा, रताळे व अन्य पिके सदर शेतकरी घेतात. त्यावर त्यांच्या कुटुंबांची उपजीविका चालत आहे. त्यामुळे सदर जमिनीवरच त्यांच्या कुटुंबाचे सर्व आर्थिक व्यवहार होत असतानाच त्यांचेकडून अचानकच जमीन काढून घेणेबाबतची आलेली पाळी त्याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नेरळ (जि.रायगड) येथे खांडा मैदानाच्या प्रश्नावर चालू असलेले जन आंदोलन.

मु.शी.: नेरळ (जि.रायगड) येथे खांडा मैदानाच्या प्रश्नावर चालू असलेले जन आंदोलन याबाबत डॉ.अशोक मोडक, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : महोदया, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"नेरळ (जि.रायगड) येथे खांडा मैदानाच्या प्रश्नावर चालू असलेले जन आंदोलन व पोलिसांची दडपशाही."

महोदय, रायगड जिल्हयातील नेरळ येथे खांडा मैदान या नावाने ओळखल्या जाणारा जो परिसर आहे त्याच्या बचावासाठी गेल्या तीन वर्षापासून जन आंदोलन सुरु आहे. त्या मैदानाला वाचविण्यासाठी व मोकळा श्वास घेण्यासाठी त्या परिसरातील हितचिंतक आंदोलन करीत आहेत. परंतु ते आंदोलन दडपण्यासाठी मुंबई शहरातील रामपालसींग सेठी नावाची व्यक्ती देव पाण्यात बुडवून बसली आहे. त्यांनी त्या लोकांवर दडपण आणले आहे. आंदोलन करणारे लोकच गुन्हेगार आहेत हे सिध्द करण्यासाठी राजपालसींग सेठी ही व्यक्ती नेरळ ग्रामपंचायतीतील रावजी सिंगवा या आदिवासी सदस्यावर विकृत दडपण आणत आहे. या सदस्याला आंदोलन करणाऱ्यांच्या विरुध्द तक्रार करण्यास आणि खटले दाखल करण्यास भाग पाडले जात आहे. माझ्याकडे 50 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर त्या आदिवासी सदस्याने निवेदन दिलेले आहे. त्याने म्हटले आहे की, वास्तविक पाहता मला अशा स्वरुपाची काहीही तक्रार करावयाची नाही. उलट मी आंदोलकांच्या बाजूला आहे. असे असूनही दुर्दैवाने या राजपालसींग सेठी याच्या नादी लागून जनहितदक्ष नागरिकांवर खटले भरण्यात आले आहेत.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक ....

सभापती महोदय, त्या गावच्या नागरिकाचे निवेदन मला आलेले आहे. त्यातील काही मुद्दे माझ्या दृष्टीने रेलेव्हन्ट आहेत. सभापती महोदय, या निवेदनातील शेवटचा परिच्छेद मी आपणास वाचून दाखवितो. " वरीलप्रमाणे परिस्थिती असताना केवळ पैशाच्या जोरावर पोलीस निरपराध लोकांवर गुन्हा दाखल करणार असतील तर त्यामुळे प्रामाणिक कार्यकर्ते कधीही गावासाठी काम करायला तयार होणार नाही. ज्यांनी पैशाच्या जोरावर गुन्हा दाखल करण्याचे बेकायदेशीर कृत्य केलेले आहे, त्या राजपालसिंग सेठी याला, सेठी याच्या नेरळ गावातील एजन्टांना तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना योग्य ते शासन झाले पाहिजे, त्यासाठी या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी व्हावी. " सभागृहात मांडलेल्या विशेष उल्लेखाचा माननीय मंत्रिमहोदयांमार्फत कॉग्निजन्स घेतला जातो. यासंबंधी तीन महिन्यांत कार्यवाही होऊन उत्तर मिळते. तरी, माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, याची विशेष दखल घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : रोजगार हमी योजनेतील फलोत्पादन योजनेंतर्गत जट्रोपा आणि करंजायांची लागवड करण्याबाबत

मु.शी. : रोजगार हमी योजनेतील फलोत्पादन योजनेंतर्गत जट्रोपा आणि करंजा यांची लागवड करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये जट्रोपाच्या लागवडीपासून बायोडिझेल निर्मिती यासंबंधी चर्चा झाली. जट्रोपा हे अल्प उत्पन्न गटातील लोकांना आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एक वरदान ठरणार आहे. सुदैवाने नॅशल मिशनने 50 हेक्टरमधील महाराष्ट्राच्या प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. माननीय केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांनी देखील केंद्रीय अर्थसंकल्पातून 30 टक्के सबसिडी देण्याची योजना जाहीर केलेली आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या अर्थसंकल्पामध्येही अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी या गोष्टीचा खास उल्लेख करुन, रोजगार हमी योजनेंतर्गत जट्रोपा लागवडीला प्रोत्साहन देण्याचे मान्य केले आहे. रोजगार हमीच्या फलोत्पादन योजनेंतर्गत जट्रोपा व करंजा लागवड करण्याकरिता खालच्या सभागृहामध्ये ता.प्र.क्र. 13235 हा दिनांक 24 मार्च, 2006 रोजी विचारण्यात आला होता. त्यावर माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी, जट्रोपा लागवड करण्यासंदर्भात 8 दिवसांमध्ये शासन आदेश देईल व त्या संदर्भातील जी.आर. काढण्यात येईल असे आश्वासन दिले होते. सभापती महोदय, आज 8 दिवसांपेक्षाही जास्त दिवस झालेले आहेत. जट्रोपाची लागवड ही ठाणे जिल्ह्यात फार मोठ्या प्रमाणावर होते. या संदर्भात आपण आदेश द्यावेत. तसेच जट्रोपाची लागवड करण्याकरिता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळेल अशा गोष्टी त्वरेने अंमलात आणाव्यात, अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्कासंबंधी

मु.शी.: मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शुल्कासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सामाजिक न्यायाच्या घोषणा करणाऱ्या सरकारने कशापध्दतीने विद्यार्थ्यांचे धिंडवडे काढले आहेत, हे आपणच पहा. शासनाने विद्यार्थ्यांचे काढलेले धिंडवडे, दिनांक 16 मार्च, 2006 रोजी "भीख माँगो " आंदोलन करुन विद्यार्थ्यांनी शासनाला दाखविले. सन 2005-06 या शैक्षणिक वर्षात बी.एड. मागासर्गीय विद्यार्थ्यांचे शुल्क 11,575/- रुपये एवढे शासनाने मंजूर केले पण उर्वरित रक्कम संस्थांचालकांनी विद्यार्थ्यांकडून वसूल करावी असे आदेश दिले. सभापती महोदय, याचा परिणाम म्हणून, खाजगी संस्थाचालकांनी बी.एड. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेठीस धरले. उर्वरित किती शुल्क भरावे याचा कुठलाही कागदोपत्री पुरावा न देता, मागासवर्गीय बी.एड. विद्यार्थ्यांना लुटण्याचेच प्रकार संस्थाचालकांकडून सुरु आहेत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी..

त्यामध्ये दलित पँथरच्या 15 ते 20 विद्यार्थ्यांनी आघाडीच्या वतीने बी.एड.च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना "भीक मांगो" आंदोलन केले. त्यांच्या आदेशानुसार शासन वैद्यकीय महाविद्याल्यामध्ये 1,71,000/- रुपये फी आकारते, त्यामुळे परीक्षेच्या काळामध्ये मुलांनी फी गोळा करावयाची की त्यांचा अभ्यास करावयाचा यामध्ये विद्यार्थ्यांचा वेळ जात आहे, म्हणून पुढील वर्षाच्या फी च्या संदर्भातील निर्णय शासनाने लवकर घेऊन बजेटरी प्रोव्हीजन करणे आवश्यक आहे. शासन वैद्यकीय शिक्षण धेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना 100 टक्के शैक्षणिक शुल्क देते, मात्र बी.एड. च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केवळ 11,575/- रुपये मंजूर करते हा भेदभाव आहे, यामुळे राज्यातील खाजगी/विनाअनुदानित बी.एड. संस्था चालकांचे फावले असून हे संस्था चालक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वेठीस धरीत आहेत व धमक्या देत आहेत, त्यामुळे कदाचित विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही, व ही चिंताजनक बाब आहे, शासनाने तातडीने सर्व शुल्क भरण्याबाबत कारवाई करणे गरजेचे आहे, ही बाब मी आपल्या माध्यमातून सरकारच्या निदर्शनास आणून देत आहे, बी.एड. मागसवर्गीय शिक्षकांवर अन्याय होणार नाही यासाठी यावर शासनाने लेखी निवेदन करावे व त्याची एक प्रत पँथर विद्यार्थी आघाडीला देतांना एक प्रत आम्हाला सुध्दा द्यावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: समुद्रात पोहतांना होत असलेले मृत्यू

मु.शी.: समुद्रात पोहतांना होत असलेले मृत्यू याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेश उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबईतील अनेक समुद्रकिनारे पोहण्यासाठी असुरक्षित असल्याने तसेच गेटवे, नरिमन पॉईंट, भाऊचा धक्का, हाजीअली, आक्सा, जुहू, दादर आणि गिरगाव येथील समुद्र किनाऱ्यांवर अत्यंत अल्पप्रमाणात जीवनरक्षक तैनात करण्यात आल्याने तसेच तेथे केवळ पोलीस गस्तीसाठी ठेवण्यात आल्याने बऱ्याच जणांचा पोहायला गेल्यानंतर समुद्रात बुडून मृत्यू झाले आहेत, या सर्वच किनाऱ्यांवर अधिक जीवनरक्षक वैद्यकीय सुविधा, रुग्णवाहिका इत्यादी विविध पाळयांमध्ये नेमण्यात यावेत, पोहायला गेलेल्या लोकांचे समुद्रात बुडून मृत्यू होऊ नये, त्यांना वेळीच वाचविण्यासाठी तातडीने सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, या सार्वजनिक हिताच्या आणि अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत विशेष उल्लेख देत आहे.

......3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, आज जो 260 चा प्रस्ताव दिलेला आहे त्यावर आज चर्चा होणार आहे की, तो पुढे ढकलणार आहात.

तालिका सभापती : तो विषय अजून पुढे आहे आता सुरुवातीला शासकीय विधेयके आहेत, विधेयके झाल्यानंतर जेव्हा तो विषय येईल तेव्हा त्याचा विचार करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, आज कामकाज पत्रिकेवर 5 विधेयके दाखविण्यात आलेली आहेत, कामकाज सल्लागार समितीमध्ये दोनच विधेयके घेण्याचे ठरले होते. आज आम्ही 10 वाजेपासून येथे आलेलो आहोत.

तालिका सभापती : आपण विधेयकावर चर्चा सुरु करावी आपण विधेयकावर बोलावे.

श्री. मधुकर सरपोतदार : आपण जर ही सर्व विधेयके पास करुन टाकणार असतील तर आम्ही विधेयकांवर बोलणार नाही, आपण विधेयके पास करुन टाकावीत. नाही तरी असेच चालले आहे.

तालिका सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर पाच विधेयके दाखविण्यात आलेली आहे, त्यासाठी किती वेळ लागतो ते आपण पाहू, आपण विधेयकावर बोलू शकता.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, या सभागृहाला काही नियम नाहीत काय ? सभागृह कीती वेळ चालवावे यास नियम नाहीत काय ? सकाळी 10 पासून रात्री 10 पर्यंत आम्ही येथे बसायचे काय ? दोन विधेयके घेण्यास आमची हरकत नाही.

........4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. अविघटनशील कचरा (नियंत्रण) विधेयक.

मु.शी.:

L.A. BILL NO.XIV OF 2006.

(A BILL TO PREVENT THROWING OR DEPOSITING NON-BIODEGRADABLE GARBAGE IN PUBLIC DRAINS, ROADS, WETLAND, WASTELAND, WATER BODIES, PLACES OPEN TO PUBLIC VIEW; TO REGULATE THE USE OF NON-BIODEGRADABLE MATERIAL AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 14 सार्वजनिक नाले, रस्ते, पाणथळ जमीन, पडीत जमीन, जलाशय, लोकांना दिसेल अशी जागा, यांमध्ये अविघटनशील कचरा फेकण्यास किंवा साठवण्यास प्रतिबंध करण्यासाठी, अविघटनशील पदार्थाचा वापर विनियमित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 14 सार्वजनिक नाले, रस्ते, पाणथळ जमीन, पडीत जमीन, जलाशय, लोकांना दिसेल अशी जागा, यांमध्ये अविघटनशील कचरा फेकण्यास किंवा साठवण्यास प्रतिबंध करण्यासाठी, अविघटनशील पदार्थाचा वापर विनियमित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 14 सार्वजनिक नाले, रस्ते, पाणथळ जमीन,पडीत जमीन, जलाशय, लोकांना दिसेल अशी जागा, यांमध्ये अविघटनशील कचरा फेकण्यास किंवा साठवण्यास प्रतिबंध करण्यासाठी, अविघटनशील पदार्थाचा वापर विनियमित करण्यासाठी अणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदया, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने दिनांक 2 सप्टेंबर 1999 रोजी सुधारीत 17 जून 2003 च्या अधिसूचनेव्दारे प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या जाडीवर निश्चितपणे मर्यादा ठेवावी अशाप्रकारचा कायदा संमत केला. पिशव्यांच्या वापरावर, विक्रीवर, हाताळण्यावर, वहातुकीवर, उत्पादनावर पर्यावरण संरक्षण कायदा 1986 च्या तरतुदीनुसार निर्बंध घातले. त्या तरतुदीन्वये घातलेले निर्बंध व त्यावर नियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्तांकडे सोपविण्यात आली. मुंबईमध्ये जुलै 2005 मध्ये अतिवृष्टी झाली. त्यावेळी मुंबईसह महाराष्ट्राच्या अनेक भागामध्ये मोठया प्रमाणात महापूर आला. प्रामुख्याने मुंबई शहर हे बेटांचे बनलेले असल्यामुळे समुद्राच्या पाण्याला भरती आली त्यावेळी मोठया प्रमाणामध्ये मुंबईमध्ये पाणी तुंबले. मोठया प्रमाणात पाणी तुंबल्यानंतर त्या पाण्याचा निचरा कां होऊ शकला नाही याचे सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यानंतर असे लक्षात आले की, मुंबईतील गटारे व नाल्यांमध्ये मोठया प्रमाणात प्लॅस्टीकचा खच साचल्यामुळे ते पाणी वाहून जाऊ शकले नाही. त्यामुळे 26 जुलै 2005 च्या झ ाालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र हे प्लॅस्टीक मुक्त क्षेत्र जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यापूर्वी महाराष्ट्रातील जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यावेळी सुमारे 5 हजार लोकांनी आपल्या हरकती नोंदविल्या. त्या हरकती नोंदविल्यानंतर माजी मुख्य सचिव श्री. रंगनाथन यांच्या नेतृत्वाखाली अन्य भागातील काही माननीय सदस्यांची समिती गठीत करण्यात आली. त्यामध्ये 50-100 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टीकच्या पिशव्यांवर बंदी घालण्याची शिफारस करण्यात आली. त्यावेळी काही प्लॅस्टीक उत्पादकांनी आमचे उद्योग बंद पडतील अशी भीती व्यक्त केली. परंतु बहुतांशी लोकांनी प्लॅस्टीकच्या पिशवीचा वापर बंद करावा अशी भूमिका स्वीकारली. आणि जर वापर बंद करता येत नसेलतर 50, 70, 100 मायक्रॉनपर्यतच्या जाडीच्या पिशव्यांसबंधी माहिती विचारात घेतल्यानंतर 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असता कामा नये असा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक...

निर्णय घेतला. त्याकरिता अध्यादेश काढण्यात आला व काढलेल्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी विधानसभेने या विधेयकाला मान्यता दिली. त्यामुळे विधानपरिषदेमध्ये मान्यतेसाठी हे विधेयक शासनाच्या वतीने मांडण्यात आले आहे.

सभापती महोदया, अतिशय पातळ जाडीच्या असलेल्या या पिशव्या रस्त्यावर पसरल्यानंतर जे चित्र आपल्याला दिसायचे. त्यामुळे ते शहराचे किंवा खेडेगावाचे दारिद्रय दाखविणारे चित्र असायचे. काही लोकांनी असेही सांगितले की, प्लॅस्टीकच्या पिशव्यापासून क्रुड ऑईल, डिझेल सुध्दा तयार होते ही गोष्ट खरी आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पुढे सुरु...

परंतु अतिशय पातळी पिशव्या उचलणारे मजूर असतात, ते त्या पिशव्या उचलत नाहीत. कारण त्यासाठी मोठयाप्रमाणावर मेहनत करावी लागते. तेवढी मेहनत केल्यानंतर किमान वेतनाएवढे सुध्दा पैसे मिळत नाहीत. म्हणून जाडया पिशव्यांचे उत्पादन करावे, त्यांचा 8 X 12 चा आकार असावा. त्या पिशव्यांचे किती उत्पादन झाले याबाबतची सगळी माहिती द्यावी, त्याचबरोबर पर्यावरण विभागाने कोणत्या रजिस्टरने त्यांना मान्यता दिली ते देखील नमूद करावे. अशा पिशव्या रिसायकल करुन पुन्हा पुन्हा तयार केलेल्या नसाव्यात. ग्रॅन्युअल पासून पांढऱ्या कलरमध्येच पिशव्या निर्माण कराव्यात, अशाप्रकारच्या या कायद्यामध्ये अटी घातलेल्या आहेत. एकूणच राज्याच्या आरोग्याच्या दृष्टीने येणारे संकट आहे हे ओळखून, तसेच एकूण नाले, रस्ते, उद्याने, मैदाने अशा सर्व ठिकाणी प्लॅस्टीक पसरलेले होते. प्लॅस्टीकच्या अवास्तव निर्मितीमुळे त्या ठिकाणांना बेरंगपणा आलेला होता. त्या ठिकाणी निश्चितपणे चांगले स्वरुप आणण्याच्यादृष्टीने कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे. रिसायकल करताना 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टीच्या पिशव्यांचे उत्पादन करण्यात येऊ नये,या दृष्टीने कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे. मी विधेयकाचे स्वरुप मांडलेले आहे. तेव्हा या विधेयकाचे कायद्यामध्ये रुपांतर करण्यासाठी हे विधेयक मंजूर करावे, अशी सदनाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी जे विधेयक मांडलेले आहे, ते स्वागतार्ह आहे. या विधयकाला पाठिंबा देत असतांना खेदाने नमूद करावेसे वाटते की, या प्लॅस्टीकच्या अव्यवस्थेच्या संदर्भात शासनाच्या उशिरा लक्षात आले. संपूर्ण महाराष्ट्रातील जमिनीवर प्लॅस्टीक पसरलेले आहे. मला आठवते की, आम्ही लहानपणी पहात आलेलो आहोत की, महाराष्ट्राची एक संस्कृती होती. खेड्यातील माणसे असोत की, शहरातील असोत. घरातील कर्ता पुरुष घराच्या बाहेर पडला, की हातात कापडी पिशवी घेऊनच बाहेर पडत होता. बाजारामध्ये काही घ्यायचे असो किंवा नसो. कापडी पिशवी तो बाळगत होता. त्यानंतर प्लॅस्टीकच्या पिशव्यांचा जमाना सुरु झाला. त्याच्या हातात प्लॅस्टीकची पिशवी आली. आता आपण 50 मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांवर बंदी घालणार आहात. सर्वसामान्य माणसांच्या हातामध्ये प्लॅस्टीकच्या पिशव्या होत्या, परंतु त्या मोठ्या, सुबक डिझाईन असलेल्या होत्या. त्या हळूहळू कमी होऊन प्लॅस्टीकच्या उद्योजकांनी आपला धंदा कसा वाढेल या दृष्टीने लहान लहान वस्तू नेण्यासाठी कमीतकमी जाडीच्या पिशव्यांचे उत्पादन सुरु केले. या पिशव्यांचा वापर कसा होईल, या दृष्टीने यंत्रणा उभी केली. त्यानंतर असे लक्षात आले की, 50 मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांचे उत्पादन केले की हजारो पिशव्या एका बल्कमध्ये पॅक होतात...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

भाजीपाला, फळे वगैरे पदार्थ प्लास्टीकच्या पिशव्यांमध्ये भरुन घेऊन जातात. लोक हातामध्ये चार चार प्लास्टीकच्या पिशव्या घेऊन जात असतात. यासंदर्भात ग्रामीण भागामध्ये जे जागरुक समाजसेवक आहेत किंवा समाज कार्यकर्ते आहेत त्यांना जाणीव होती की, काहीतरी घडत आहे. सहा सात वर्षापूर्वी एक बातमी आली होती. जिजामाता उद्यानात लोक आपल्या लहान मुलांना पशूपक्षी दाखवण्यासाठी येतात. त्यांच्याकडे प्लास्टीकच्या पिशव्यांमध्ये खाद्यपदार्थ आणलेले असतात. खाद्यपदार्थाच्या पिशव्या पिंजऱ्यामध्ये फेकल्यानंतर त्या पिशव्या खाऊन हरणे मेल्याची बातमी सहा सात वर्षापूर्वी वर्तमानपत्रात आली होती. त्यानंतर सुध्दा त्याबाबत गांभीर्याने दखल घेतली असती तर ते थांबले असते. हरणे मेली आणि ती बातमी संपली. जनावरे प्लास्टीकच्या पिशव्या खातात आणि त्या पिशव्या जनावराच्या पोटामध्ये साचून ती जनावरे मृत्यू पावतात. त्यावेळी तज्ज्ञांनी त्याची नोंद घेतली असती, त्यासंदर्भात जागृती निर्माण करण्यासाठी लेखमाला आल्या असत्या, सूचना आल्या असत्या तर योग्य झाले असते. पण तसे झाले नाही. प्लास्टीकचा प्रसार फार वाढला आहे. आज सुध्दा ग्रामीण भागामध्ये रस्त्याने जाताना साधे लहान गाव असले तरी गावाच्या बाहेर प्लास्टीकचा ढीग पसरलेला दिसतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

पृ.शी./मु.शी.: सभागृहाच्या कामकाजासंबंधी.

उपसभापती : आपण विधेयकावरील चर्चा या ठिकाणी सुरु केलेली आहे. नियम 260 अन्वये दिलेला जो प्रस्ताव आहे तो माननीय मुख्यमंत्री उपस्थित नसल्यामुळे पुढे ढकलत आहोत. त्यानंतर अशासकीय कामकाजामध्ये अशासकीय ठराव आहेत तेही पुढे ढकलण्यात येत आहे. ते कधी घेणार याबाबत आता मी निर्णय घेऊ शकत नाही. उद्या सकाळी साडेदहा वाजता सभागृहाची बैठक घेण्यास तयार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ते चालेल.

उपसभापती : आज दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा उद्या घेण्यात येतील. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेली जी विधेयके आहेत त्यामध्ये 2006 चे वि. प. वि. क्र. 15, सन 2006 चे वि. प. वि. क्र. 14 तसेच सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 10 ही विधेयके उद्या घेण्यात येतील. सुरुवातीची जी दोन विधेयके आहेत ती आता घेण्यात येतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अविघटनशील कचरा (नियंत्रण) विधेयक.

L.A. BILL NO.XIV OF 2006.

(A BILL TO PREVENT THROWING OR DEPOSITING NON-BIOGRADABLE GARBAGE IN PUBLIC DRAINS, ROADS, WETLAND, WASTELAND, WATER BODIES, PLACES OPEN TO PUBLIC VIEW; TO REGULATE THE USE OF NON-BIODEGRADABLE MATERIAL AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे चालू)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या प्लास्टीकने एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये सर्वसामान्य लोकांच्या मनामध्ये स्थान निर्माण केलेले आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांकडून प्लास्टीकचा वापर होतो. महाराष्ट्रामध्ये असे एकही घर मिळणार नाही की, ज्या घरामध्ये प्लास्टीकची कोणतीही वस्तू नाही. आम्ही ग्रामीण भागमध्ये फिरत असताना असे लक्षात आले की, प्रचंड प्रमाणावर त्या ठिकाणी प्लास्टीक जमा होते. या प्लास्टीकमुळे जनावरे, गुरेढोरे आजारी पडावयास लागली. कचऱ्यात टाकलेले प्लास्टीक सुध्दा जनावरे खावयास लागली. कारण त्या प्लास्टीकला खाद्यपदार्थांचा सुगंध असतो त्यामुळे जनावरे त्या पिशव्या खावयास लागले आणि ग्रामीण भागामध्ये जनावरांच्या या आजारामुळे शेतकऱ्यांसाठी फार मोठी नुकसानीची परिस्थिती निर्माण झाली. याबाबतीत आपल्याला काय करता येईल यादृष्टीने आम्ही विचार केला. विदर्भामध्ये प्लास्टीक मुक्तीच्या संदर्भात आम्ही एक आठवडा चार पाच जिल्ह्यांमध्ये अभियान राबवले. त्या अभियानामध्ये आमच्या सर्व शिवसैनिकांनी गावागावांमधून सगळे प्लास्टीक जमा करण्याचा प्रयत्न केला.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

त्या भागातील सर्व प्लॅस्टिक आम्ही एका आठवड्यामध्ये जमा करण्यामध्ये यशस्वी झालो. हे प्लॅस्टिक जिल्ह्याच्या एका ठिकाणी जमा करण्यात आले. या जमा झालेल्या प्लॅस्टिकची कशी विल्हेवाट लावायची असा प्रश्न आमच्या पुढे होता. प्लॅस्टिक जाळण्याला कायद्याने बंदी आहे त्यामुळे तसे करता येत नव्हते. मला सांगण्यास आनंद वाटतो की, त्यावेळी श्रीमती मनिषा म्हैसकर हया वर्धा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी होत्या. त्यांना मी भेटून या बाबतीत मार्ग काढण्यास सांगितले. त्यांनी आम्हाला एक उत्तम मार्ग सुचविला. अकोला महापालिकेच्या आयुक्तांनी सांगितले की, महापालिकेच्या जागेवर एक मोठा खड्डा तयार करुन त्यामध्ये ते प्लॅस्टिक भरुन त्याठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स उभे करता येईल. जिल्हाधिकारी श्रीमती मनिषा म्हैस्कर यांनी सांगितले की, बाबा आमटे यांच्या आनंदवन आश्रमामध्ये कुष्ठ रोग्यांच्या उदरनिर्वाहासाठी विविध उद्योग सुरु केलेले असून त्याठिकाणी प्लॅस्टिक इंडस्ट्रीही निर्माण केलेली आहे. त्याठिकाणी अशा प्रकारचे प्लॅस्टिक स्वच्छ करुन त्यापासून गाद्या आणि उशा बनविल्या जातात, असे त्यांनी सांगितले. मग हे सर्व गोळा केलेले प्लॅस्टिक आनंदवन आश्रमामध्ये कसे न्यायचे असा प्रश्न आमच्यापुढे उभा राहिला. त्यावेळी जिल्हाधिका-यांनी आम्हाला सांगितले की, पर्यावरणाचे फार मोठे काम तुम्ही केलेले आहे. हे सर्व प्लॅस्टिक शासकीय खर्चाने आनंदवन आश्रमामध्ये आम्ही पोहोचवू. त्याप्रमाणे ते प्लॅस्टिक बाबा आमटेंच्या आश्रमामध्ये पोहोचविण्यात आले. एवढया मोठ्या प्रमाणावर प्लॅस्टिक जमा करणे ही साधी गोष्ट नाही. आमच्या सर्व जिल्हाप्रमुखांना बाबा आमटेंनी स्वतःच्या सहीचे पत्र पाठवून या कामाबद्दल त्यांचे कौतुक केले आणि त्यांना मनापासून धन्यवाद दिले. हे सामाजिक काम करीत असताना एका जागतिक किर्तीच्या समाजसेवकाने केलेल्या कौतुकाचे पत्र आमचे कार्यकर्ते अनेकांना दाखवित असतात. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या छोट्या मोठ्या शहरातून जमा होणारा कचरा आणि लोकसंख्या याबाबत संपूर्ण आकडेवारी माझ्याकडे आहे. पण ती देऊन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. कोकणातील आंब्यासाठी प्लॅस्टिकचे खोके चालत नाहीत. पुठ्ठयाचे खोक्यांना होल पाडून त्यामधून ते पाठविले जातात.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ MAP/ SBT/ श्री.शिगम नंतर 18:55

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, माझ्याकडे या विषयातील जी आकडेवारी उपलब्ध आहे ती अत्यंत महत्वाची आहे. या आकडेवारीनुसार या महाराष्ट्रामध्ये एकूण किती कचरा जमा होतो आणि त्यापासून काय काय निर्माण केले जाते याचा अभ्यास केलेला आहे. या बिलावर बोलत असताना कित्येक तास बोलू शकतो इतकी माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ही माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे त्याचप्रमाणे ती शासनाकडे सुध्दा उपलब्ध आहे. याच माहितीच्या आधारावर संबंधित खात्याच्या सचिवांनी जे परिपत्रक काढले आहे ती मी वाचणार आहे. शासनाकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यामध्ये मी आणखी काही भर टाकावी अशातला भाग नाही. एकंदरीत यासंदर्भात जो अभ्यास झालेला आहे त्यानुसार जो कचरा जमा होतो त्या कचऱ्यामध्ये 15 टक्के प्लॅस्टीक असते. 40 टक्के डिग्रेडेबल ऑर्गेनिक असतात. जी ऑर्गेनिक नष्ट करता येतात आणि त्यापासून खताची निर्मिती होते. इथेनॉल कंपोस्ट खत आणि बायोकल्चर निर्माण होते. 30 अक्के ओलावा म्हणजे पाणीसदृश कचरा असतो. 15-20 टक्के जो कचरा असतो त्यामध्ये दगड,लोखंड,इत्यादी पदार्थांचा समावेश असतो. महाराष्ट्रातील विविध पाहणी गटांतून याचा अभ्यास केलेला आहे. या प्लॅस्टीकचे काय करावयाचे याचा जागतिक पातळीवर अभ्यास झालेला आहे आणि अनेक प्रकल्प उभे केलेले आहेत. जागतिक पर्यावरणाचा संदर्भ देऊन प्लॅस्टीक जाळता येते आणि किती टेंपरेचरला हा कचरा जाळावा याचा एक मोठा अभ्यास आहे. या प्लॅस्टीकपासून वीज निर्माणकरता येते अशा प्रकारचे संशोधन झाले आहे. 1000-5000 से.ग्रे.तापमानाला प्लॅस्टीक जाळले तर त्यापासून गॅस निर्माण होऊन त्याच्यावर टर्बाइन चालतात आणि त्यापासून वीज निर्माण होते अशा वीज निर्मितीचा शोध लागलेला आहे. महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मुंबईमध्ये मसाल्याचे ओले पदार्थ 15 टक्के आहेत. जगात इतर शहरांमध्ये हे प्रमाण 50 टक्के आहे. लोकसंख्येची तुलना केली तर आपल्याकडे वापरले जाणारे प्लॅस्टीक आणि त्याचा उपयोग हा प्रचंड प्रमाणात आणि भयावह आहे. आपल्याकडे जे प्रमाण 15 टक्के असले तरी जगातील इतर देशांची तुलना केली तर हे प्रमाण 70 ते 80 टक्के होईल. प्लॅस्टीकपासून वीज निर्मिती करण्याचे जगामध्ये अनेक प्रकल्प चालू आहेत. प्लाझ्मा टेक्नॉलॉजी हा प्लॅस्टीकला निर्माण झालेला शेवटचा पर्याय आहे. यापासून वीज निर्मिती करता येते. प्लॅस्टीक नष्ट होते. 1000-5000 डिग्री तापमानाला जर हे प्लॅस्टीक जाळले तर त्यापासून जो गॅस तयार होतो त्याच्यावर टर्बाइन चालतात आणि त्यापासून वीज निर्मिती करता

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

येते. या वीज निर्मिती प्रकल्पातून जी राख निर्माण होते त्याचा सुध्दा वापर करता येतो. परळी येथील वीज प्रकल्पामध्ये या राखेचा उपयोग करता येईल. प्लॅस्टीक टेक्नॉलॉजी इंडस्ट्री जगामध्ये मोठया प्रमाणावर क्रांती घडवत आहे. निर्माण झालेले प्लॅस्टीक नष्ट करावयाचे आणि त्यामधून जास्तीत जास्त काय उपयुक्त असे निर्माण करता येईल अशी टेक्नॉलॉजी निर्माण झालेली आहे. या प्लॅस्टीकपासून पेट्रोल निर्मिती करण्याचा प्रकल्प विदर्भातील आमच्या एका महिने सुरु केला आहे. या प्रकल्पाला चांगल्या प्रकारचे यश आलेले आहे आणि त्याला मान्यता सुध्दा मिळालेली आहे.

यानंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आपण 100 टक्के प्लास्टिकवर बंदी आणली आहे काय ? प्लास्टिक कशापासून तयार होते हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पेट्रोलजन्य पदार्थापासून आणि स्टार्चपासून प्लास्टिकची निर्मिती होते. मकापासून तयार होणारे प्लास्टिक हे स्वस्त असते. स्टार्चपासून तयार होणारे प्लास्टिक हे भयावह नसते. स्र्टार्चपासून तयार होणारे प्लास्टिक हे वर्ष-दोन वर्षामध्ये नष्ट होते. मात्र, पेट्रोलजन्य पदार्थापासून तयार होणारे प्लास्टिक हे नष्ट होत नाही. राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणली तरी स्टार्चपासून तयार होणाऱ्या प्लास्टिकला शासनाने मान्यता दिली तर शेतकऱ्यांच्या एका बायो प्रोजेक्टला चालना दिल्यासारखे होईल. स्टार्चपासून नष्ट होणारे प्लास्टिक निर्माण होऊ शकते. यापासून 50 मायक्रोन पेक्षा जास्त जाडीचे प्लास्टिक निर्माण होते व ते आपोआप नष्ट होते. सध्याच्या युनिटमध्ये यातून उत्पादन घेता येऊ शकेल. स्टार्चपासून पास्टिक पिशव्याची निर्मिती केली तर कृषि उत्पादनाला आधार मिळू शकेल. यास आपण मान्यता दिली तर बेकारी देखील दूर होईल. तसेच स्टार्च प्लास्टिक बनविण्यासाठी येणारा खर्च ही देखील एक परवडणारी बाब आहे. आज जगामध्ये प्लास्टिकच्या विविध संकल्पना वावरत आहेत. त्यामुळे स्टार्च प्लास्टिकला प्रमोट करता येईल काय ? हे देखील पाहिजे पाहिजे. 50 मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरल्यामुळे जुलै 2005 मध्ये मुंबई तुंबली हे बरोबर आहे. 25 जुलैच्या प्रकोपाचा फटका मुंबई शहराला बसला नाही. मुंबई उपनगराला बसला. याला कारण बेकायदेशीरपणे झालेले अतिक्रमण हे आहे. त्या खोलामध्ये मी जाऊ इच्छित नाही. त्यामुळेच मिठी नदी हा चर्चेचा विषय झाला आहे. मुसळधार पाऊस पडल्यामुळे मुंबईत हाहाकार उडाला. आपण कल्पनेच्याबाबतीत दरिद्री आहोत, नियोजनामध्ये किती दरिद्री आहोत हे सांगतो. आपल्या नवीन संकल्पना वरवर कधीच येत नाही. मी आपल्याला एक मूर्तिमंत उदाहरण देणार आहे. समजा मुंबईमध्ये 26 जुलै रोजी जी स्थिती निर्माण झ ाली होती, तसा फटका बसला नसता तर हे शहाणपण आपल्याला सुचलेच नसते. संकट आल्यानंतर धावपळ करणारे आपण आहोत. हे चुकीचे आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यास कोणती अडचण आहे ? आठ दिवसांपूर्वीच मी ई टी.व्ही.वर एक छान बातमी पाहिली. चंद्रपूर सारख्या जिल्हयामध्ये स्वयंसेवी संघटनेच्या महिला एकत्र आल्या व त्यांनी घरोघरी जाऊन जुन्या साडया गोळा केल्या व त्यापासून पिशव्या तयार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ कानडे. 19:00

श्री.दिवाकर रावते.

केल्या. या पिशव्या त्यांनी एक रुपयाला विकल्या. या कापडी पिशव्यांचा वापर आज तेथील अनेक लोक रोजच्या वापरासाठी करीत आहेत. शासनाने येथे विधेयक आणले असले तरी देखील प्लास्टिक पिशव्या बंदीचा परिणाम लोकांवर झालेला आहे. प्लास्टिक पिशवीच्या बंदीची अंमलबजावणी ही कधीच सुरू झालेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 19:05

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

श्री.दिवाकर रावते....

कायद्याची अंमलबजावणी होत असताना मी आव्हानात्मक सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदय ज्या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत त्या जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये फिरावयास मी तयार आहे. मी निश्चितप्रकारे सांगू इच्छितो की, त्या भागामध्ये या प्लास्टीक पिशव्यांवर म्हणावा तसा नर्बंध आलेला नाही. महाराष्ट्रातील इतर भागातही म्हणावे तसे निर्बंध आलेले नाहीत. मुंबईतील सबर्बन भागामध्ये यंत्रणांकडे असलेला स्टाफ आणि पोलीस यंत्रणेची जागरुकता यामुळे बऱ्याख अंशी प्लास्टीक पिशव्यांवर निर्बंध आलेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या पिशव्या बंद झाल्या आहेत. आज या ठिकाणी रस्त्यांवर 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या पिशव्यातून काहीही दिले जात नाही. परंतु ग्रामीण भागात मात्र या पिशव्यांवर बंदी आणण्यासाठी कोणत्याही यंत्रणेचा प्रभाव नाही. राज्यातील इतर जी शहरे आहेत, त्यामध्ये सुध्दा 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या पिशव्यांवर बंदी आणणारी यंत्रणा नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर ज्या अकोला जिल्हयामध्ये राहतात त्या ठिकाणी सुध्दा अशी बंदी असल्याचे आढळून येत नाही. त्या ठिकाणी सुध्दा अजून निर्बंध आलेले नाहीत. मुंबई शहरामध्ये जसा या पिशव्यांवर वापर करण्यासंदर्भात वचक निर्माण झालेला आहे तसा वचक ग्रामीण भागामध्ये वा अन्य शहरी भागांमध्ये झालेला नाही. हा कायदा करीत असताना 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या पूर्ण: बंद करण्यासाठी कोणती यंत्रणा राबविणार आहात ? ती कशी राबविणार आहात याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये खुलासा करावा. या बाबतची जबाबदारी आपण कोणावर टाकणार आहत ? त्या यंत्रणांकडे असलेली कार्यकक्षा पाहता, त्यांना आपण कोणते मनुष्यबळ देणार आहात ? किंवा उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा वापर कसा करणार आहात ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

महोदया, ग्रामीण भागामध्ये पाऊस पडल्यानंतर ज्या ठिकाणी प्लास्टीक तुंबून असते त्या ठिकाणी मी कार्यकत्यांना घेऊन जात असतो. महोदया, ज्या ठिकाणी प्लास्टीक पडलेले असते त्याच्या खाली गवत उगवत असते, परंतु वरुन प्लास्टीक असल्यामुळे ते पूर्णत: उगवत नाही. कारण वरच्या बाजूने प्लास्टीक असल्यामुळे वारा, ऊन, सूर्यप्रकाश त्या गवताला मिळत नाही. शिवसेनेने प्लास्टीकच्या संदर्भात जो प्रयोग केला होता त्याला कार्यकर्त्यांनी चांगली साथ दिली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 19:05

श्री.दिवाकर रावते....

होती. महोदया, केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर संभाजी नगरच्या आजूबाजूच्या ग्रामीण भागामध्ये शेतात खत म्हणून कचरा टाकला जात असे. परंतु नंतर शेतकऱ्यांच्या असे लक्षात आले की, कचऱ्यातून फार मोठया प्रमाणावर प्लास्टीक येत आहे आणि प्लास्टीक वेचण्यासाठी मजूर लावावे लागत आहेत. त्यामुळे आता कचरा टाकणे सुध्दा बंद केले गेले आहे. महोदया, केवळ 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचेच नव्हे तर पूर्णतच: प्लास्टीक बंद केले पाहिजे. महोदया, बाजारात वस्तुंच्या सोबत जी प्लास्टीकची पिशवी दिली जाते, त्या पिशवीची किंमत वस्तूच्या किंमतीमध्ये समाविष्ट केलेली असते. ही पिशवी घेतल्यानंतर कोणालाही ती बाळगण्याची हौस नसते. आपले काम झाले की, चार-आठ दिवसानंतर किंवा महिन्यानंतर ती फेकून दिली जाते. हे खरे आहे की, 50 मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या ज्या पिशव्या आहेत त्या कचऱ्यामध्ये मोठया प्रमाणावर येत नाहीत. परंतु त्या मागे-पुढे येणारच आहेत. परंतु 50 मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या पिशव्यांवर बंदी न आणल्यामुळे, असेच म्हणावे लागेल की, आजचे मरण उद्यावर ढकलले आहे. मुंबई शहरामध्ये दररोज अडीच ते तीन टन प्लास्टीकचा वापर विविध माध्यमातून होतो. मग तो वापर पॅकींगच्या माध्यमातून असो की, पिशव्यांच्या माध्यमातून असो. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज दुधाच्या पिशव्या प्लास्टीकच्या आहेत. पूर्वी हेच दूध काचेच्या बाटलीतून मिळत असते. त्या बाटलीचा वापर झाल्यानंतर ती परत दिली जात असे. नंतर ती बाटली पुन्हा वापरात येत असे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, मला आठवते की, पूर्वी सभागृहात प्लास्टिकवर बंदी घालण्याची घोषणा करण्यात आली होती. महाराष्ट्रातील संपूर्ण दूध सोसायट्या, सहकारी तत्वावर असलेला दुधाचा व्यापार पूर्णत: कॉँग्रेसच्या हातामध्ये आहे. सभापती महोदय, या विधेयकावर कॅबिनेटमध्ये देखील 4 वेळा चर्चा झाली आहे. या ठिकाणी प्लास्टिकच्या संदर्भात अनेक गोष्टी सांगितल्या आहेत की, ब्लड ठेवण्यासाठी देखील प्लास्टिकच्या पिशव्या लागतात, औषधांसाठीही प्लास्टिकच्या पिशव्या लागतात, त्याचप्रमाणे सलाईनची बाटली देखील प्लास्टिकची असते. सभापती महोदय, प्लास्टिक जसे फायदेशीर आहे, तसे पर्यावरणाला मारकही ठरले आहे. सर्वसामान्य लोक प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. सभापती महोदय, मला आपल्याला एक गोष्ट सांगावीशी वाटते की, आपण प्लास्टीकच्या पिशव्यांबाबत 50 मायक्रॉनचा निकष न लावता सर्व प्लास्टिकवरच बंदी आणली तर बरे होईल. कारण त्यातून एक फायदा होईल की, भविष्यात प्लास्टिकचा कचरा येणार नाही. सभापती महोदय, मला आठवते की, आम्ही दादरमध्ये वाड्यावाड्यांमध्ये फिरायचो. त्यावेळी पाटावर जुन्या पेपरच्या कागदाच्या पिशव्या बनविणाऱ्या महिला असायच्या. त्या महिला त्या कागदाच्या पिशव्या करुन वाण्यांना विकत असत आणि त्या कागदाच्या पिशव्यांमधूनच वाणी आपल्याला माल देत असत. हे पूर्वापार चालत आले होते. कदाचित यामुळे होम इंडस्ट्रीला महत्व आले. माझे तर मत आहे की, आपण स्टार्चच्या पिशव्या बनविण्याचे कायदेशीर बंधन आणा. त्याचप्रमाणे पिशव्या बनविण्यासाठी असे प्लास्टिक वापरा की जे वर्ष-दोन वर्षांनी नष्ट होईल. सभापती महोदय, परदेशात अतिशय चांगल्याप्रकारच्या कागदाच्या पिशव्या आहेत, ज्यामध्ये वजन घेतले तरी तुटत किंवा फाटत नाहीत. सभापती महोदय, पेपरच्या पिशव्या केल्याने पेपर इंडस्ट्रीला महत्व येईल. पर्यावरणवाले कसल्या विचारांचे आहेत हे मला माहित नाही. कारण प्लास्टिक आणल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होईल म्हणून बोंब मारतात आणि कागदाच्या पिशव्या आणण्याबाबत सांगितले तर झाडांचा, जंगलांचा ऱ्हास होईल असे सांगितले जाते. पण प्रॅक्टिकली हिताचे काय आहे, हे पाहणे गरजेचे आहे. या संदर्भातील मुंबईचा प्रश्न फार गंभीर झालेला आहे. सभापती महोदय, प्लास्टिक हे पाण्यापुरते गंभीर झालेले नाही. या कचऱ्यांमुळे आपली ठिकाणे डम्पिंग

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

ग्राऊंड होतील. आपल्या शहरामध्ये सातशे ते साडे सातशे टनाचा रोजचा कचरा आहे. मुंबईचा दिवसांचा पाणीपुरवठा हा महाराष्ट्राच्या सर्व शहरांच्या वर्षाच्या पाणीपुरवठ्याएवढा आहे. कचराही तेवढ्याच प्रमाणात निर्माण होतो. यावरुन आपल्याला मी सांगतो त्या गोष्टीची कल्पना येईल. मी महापौर असताना एकदा मुलाखत देताना या संदर्भात एक स्टेटमेंट केले होते. सभापती महोदय, मुंबईतील कचरा अगदी सहजपणे निर्माण होतो. मुंबईच्या रस्त्यावरील लोकसंख्या अंदाजे 20 ते 25 लाख आहे. फुटपाथवर चालणारे 7-8 हजार लोक उगाचच मनात आले की, झाडाचे पान तोडतात आणि रस्त्यावर टाकतात, बसमधुन उतरले की, तिकीट फाडतात व रस्त्यावरच टाकून देतात. सभापती महोदय, मुंबईतील सिगारेटच्या खपाच्या संदर्भात जरी विचार केला तर आपल्याला दिसून येईल की, सिगारेटची थोटके तीन टनाची असतात. म्हणजे आपणच विचार करा की, हा सिगारेटचा खप किती आहे ? मी स्टॅन्डिंग कमिटीमध्ये असताना, कचऱ्याला कसे तोंड द्यावे, याबाबत सांगितले होते. त्यावेळी साडे तीनशे कॉम्पॅक्टर निर्माण करण्यात आले. सभापती महोदय, त्यावेळी श्री. व्यंकटाचारी हे कमिशनर होते. ते कामाच्या बाबतीत अत्यंत कडवट होते. सभापती महोदय, मुंबईमध्ये आज नेहमी साडे चार हजार ट्रक कचरा जमा केला जातो.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ SBT/ प्रथम श्री. कांबळे... 19:15

श्री. दिवाकर रावते...

"Solid Waste Management "हा माझा विषय होता, आता 20 टक्के कचरा हा कम्पॅक्ट होतो, अगोदर 5 टन कचरा निघत होता, तो कचरा आता 20 टक्के कम्पॅक्ट होतो, परंतु तो यंत्रणेला उचलता येत नाही अशी परिस्थिती आहे. यामध्ये हॉस्पिटलचा कचरा खूप मोठया प्रमाणात असतो. मी नगरसेवक असतानाची गोष्ट मला आठवते. त्यावेळी तिनईकर हे महापालिका आयुक्त होते. हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन केल्यानंतर तेथील कचरा मोठया प्रमाणात कचरापेटीमध्ये आणून टाकण्यात येतो. काही वेळा कचरा पेटीमध्ये मुलांचे हात मिळतात. तेव्हा तिनईकर मला म्हणाले की याबाबत तुम्हाला काय वाटते. त्यावेळी हॉस्पीटलचा कचरा हा मोठया प्रमाणात निर्माण होत होता. छोटया छोटया नर्सिंग होममध्ये बराच कचरा निर्माण होत होता. केईएम हॉस्पिटलमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा आहे, तेथेच कचरा जाळला जातो. परंतु सर्व हॉस्पिटलमध्ये अशी सोय नाही. त्यावेळी हॉस्पिटलने एक योजना तयार केली की रात्री 12.00 नंतरच हॉस्पिटलचा कचरा जमा करण्यात यावा. कारण हॉस्पिटलचा कचरा मोठया प्रमाणात ओला असायचा. आता सर्व कचरा हा वरळी येथे केन्द्रावर जमा करण्यात येत आहे. मुंबई महालिकेच्या आयुक्तांचे मी अभिनंदन करेन की, तो सर्व कचरा एका ठिकाणी गोळा करुन तो जाळण्यात येतो व त्यातून वीज निर्मिती करण्यात येते व ती वीज त्यांच्या कार्यालयांना वापरण्यात येत आहे. मुंबईमध्ये असे प्रकार होत असतांना आज मुंबईच्या कचऱ्या संदर्भातील हा विषय नाही तर मुंबईमध्ये प्लॉस्टिक कचरा जास्त निर्माण होत आहे, त्यासंदर्भातील हा कायदा आणलेला आहे. आपल्या मुंबई व ठाण्याच्या डंपिंग ग्राऊंडची क्षमता आता संपलेली आहे. पूर्वी डंपिंग ग्राऊंडवरील कचरा काही दिवसानंतर खाली बसायचा म्हणजे त्या कचऱ्याची माती होऊन कचरा हा खाली बसायचा व त्या डंपिंग ग्राऊंडवर आणखी कचरा सामावून घेण्यात येत होता. आता जो कचरा डंपिंग ग्राऊंडवर येतो तो खाली बसतच नाही, त्याला प्लॉस्टिकचा कचरा कारणीभूत आहे. कारण प्लॉस्टिकचा कचरा हा सडत नाही, त्याची माती होत नाही. मुंबई व ठाण्यातील डंपिंग ग्राऊंडची क्षमता 10 वर्षात संपलेली आहे. तेथे कचरा टाकणे तातडीने बंद करावा लागणार आहे. आता दुसरा एक नवीन कचरा आता निर्माण होत आहे मोठमोठया नेत्यांची प्लॉस्टिकचे होर्डिंग लावण्यात येत आहे, कारण ती 7 रुपये स्क्वेअर फुटाप्रमाणे मिळतात व स्वस्त पडतात, त्यावर लिहायला सुध्दा खूप सोपे जाते. कारण हे सर्व बोर्ड फ्लेक्झ ी आहेत. परंतु या प्लॉस्टिकचे

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिवाकर रावते....

परिणाम फार गंभीर होणार आहे. यासंदर्भात अजूनही विचार केलेला नाही. यासंदर्भात सुध्दा अभ्यास झालेला नाही, त्याची आकडेवारी सुध्दा उपलब्ध नाही. यामध्ये मंत्री महोदयांनी अभ्यास करण्याची गरज आहे, मुंबई व ठाणे जिल्हयामध्ये प्लॉस्टिकचा कचरा फार मोठया प्रमाणात येत आहे. नाक्यानाक्यावर मोठे प्लॉस्टीकचे बोर्ड लावण्यात येत आहेत, मी अजूनही माझे छायाचित्राचे होर्डिंग लावलेले नाही व पुढे सुध्दा लावणार नाही, कारण त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो.म्हणून मी या बाबी करीत नाही. एका ठिकाणी राम गणेश गडकरी यांचा पुतळा आहे, त्या पुतळयाच्या चारही बाजूने मोठमोठे बोर्ड, होर्डिंग लावलेले आहेत. मला असे वाटते की तेथे असा बोर्ड लावावा की "आपण मला पाहत आहात, आता मला आपणाला पहावयाचे आहे". कारण बोर्ड व होर्डिंगमुळे राम गणेश गडकरी यांचा पुतळा मुळीच दिसत नाही.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

काही कळत नाही. सिध्दी विनायकाच्या मंदिरामध्ये सिध्दी विनायकाचे दर्शन घेण्याकरिता येणाऱ्या हजारो भाविकांना त्याचे दर्शन घडण्याऐवजी अनेक राष्ट्रवादी नेत्यांचे दर्शन घडत आहे. सिध्दी विनायकाला बघावयाचे की त्यांना बघावयाचे असा प्रश्न आहे. त्यावर टीका करण्यासाठी मी बोलत नाही. राम गणेश गडकऱ्यांचा पुतळा आमच्याकडूनही झाकला जाणार असेल तर ते बरोबर होणार नाही. या प्लॅस्टीकच्या वापरावर बंदी आणणाऱ्या विधेयकावर चर्चा करीत असतांना राम गणेश गडकऱ्यांना आपण त्या पडद्यामधून त्यांना मुक्त करावे. आजच्या चर्चेच्या माध्यमातून ओघाने हा विषय पुढे आला आहे. आपल्या माध्यमातून मुंबईतील सर्वच पदाधिकाऱ्यांना विनंती करतो की, राम गणेश गडकरी एवढे श्रेष्ठ होते की, आमचे कै. दत्ताजी साळवी तर पूर्ण मुखोदगत गडकरी होते. त्यांच्या कवितांचा संग्रह माझ्या बॅगेमध्ये आहे. तो मी मुद्दाम माझ्याजवळ ठेवला आहे. हा संग्रह 1938 सालचा असून तो यासाठी ठेवला आहे की, त्यावेळी त्यांनी लिहिलेले महाराष्ट्र गीत त्यामध्ये आहे. ते गीत एवढे मोठे आहे की, त्यामध्ये त्यांनी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यापासून साधूसंतापासून वर्णन केले होते. त्यावेळी संत तुकाराम महाराज कोण होते हा एक नवीन वाद निर्माण झाला होता. ते कोणत्या जातीचे होते, लोक त्यांची जात शोधायला लागले. "तुकारामाची जात" हे गीत त्यामध्ये त्यांनी लिहिले आहे. तो विषय मी आता वाचत नाही. म्हणून राम गणेश गडकरी यांना मोकळे ठेवावे अशी त्यांना नम्र विनंती आहे. इतकेच नव्हेतर आचार्य अत्रे यांचाही पुतळा वरळी नाक्यावर झ ाकल्याबद्दल माझ्या मनाला क्लेष होत आहे. आपण लोकशाहीमध्ये कुणालाही थांबवू शकत नाही. परंतु या सदनामध्ये प्रगल्भता असलेल्या सर्व राजकीय पक्षाच्या मंडळींनी अंगामध्ये शिस्त बानून घेतली पाहिजे असे मला वाटते. तेव्हा किमानपक्षी राम गणेश गडकरी व आचार्य अत्रे यांचे तरी पुतळे आपण मोकळे ठेवले पाहिजेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, यामधून असा मुद्दा निर्माण होतो की, हे निर्माण होणारे प्लॅस्टीक आहे त्याची नष्टता काय किंवा त्याचे रिसायकलिंग काय? ते कुठे जाते? ते सर्वत्र पसरले तर वाईट आहे. या निमित्ताने डंपिंग ग्राऊंडची परिस्थिती अतिशय बिकट झाली आहे. आज नवीन टेक्नॉलॉजी आली आहे. आपण या सभागृहामध्ये फुगलेल्या डंपिंग ग्राऊंडची चर्चा करीत होतो त्यावेळी मला या नवीन टेक्नॉलॉजीचे ओझरते ज्ञान झाले? जग कुठे चालले आहे आणि आम्ही किती मागे आहोत हे विचाराने आणि कृतीने कळते.आम्ही रोज भांडतो, सर्व चालू राहते त्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

दिवस जातो. एकमेकांवर हेत्वारोप करुन ओरखडे काढण्यासाठी आमचे जीवन व्यापलेले असते. आज केले आता उद्या काय करायचे या चिंतेमध्ये असतो. आज याला बदनाम केले, उद्या त्याला बदनाम करावयाचे यामध्ये असतो. जग यामध्ये अडकले नाही. नवीन टेक्नॉलॉजी पुढे चालेले आहे. आज आमचे डंपिंग ग्राऊंड प्लॅस्टीकमुळे सर्व फुगलेले आहे. ते आता खाली जाण्याची आशा नाही. नवीन टेक्नॉलॉजीमध्ये ज्याप्रमाणे आपण पाण्यासाठी जमिनीत बोअर करतो, पाईल्स फाऊंडेशनसाठी बोअर मारतो अशाप्रकारे नवीन टेक्नॉलॉजीमध्ये बोअर मारल्यानंतर खाली जमा झालेल्या गॅसमधून वीज निर्माण होते. तो गॅस कमी झाल्यानंतर व हवेचे प्रेशर कमी झाल्यानंतर ते डंपिंग ग्राऊंड खाली जाणार आहे. आपण जमा झालेले प्लॅस्टीक नष्ट करु शकत नाही. कित्येक मीटर खाली गेलेले प्लॅस्टीक उपसून काढू शकत नाही. अशा वेळी या टेक्नॉलॉजिचा वापर करुन आहे ते डंपिंग ग्राऊंड आणखी खाली दबले कसे जाईल हा विषय आहे. माझ्याकडे यासंबंधी सचिवांचे आलेले पत्र वाचून दाखवितो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे... 19:25

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

नगर विकास सचिवांनी याबाबत पत्र काढलेले आहे महाराष्ट्र शासनाचे दिनांक 22 सप्टेंबर 2004 चे पत्र आहे. एरंडोल महानगरपालिकेच्या निमित्ताने त्यांनी सगळया आयुक्तांना, सर्व मुख्याधिकाऱ्यांना घन कचरा व्यवस्थापनाच्या बाबतीमध्ये पंजाबराव कृषी विद्यापीठाची माहिती देऊन पत्रक काढलेले आहे. महोदया, प्लॅस्टीक पिशव्यांवर बंदी घालण्याचा निर्णय शासनाने उशीरा घेतला असला तरी आपण मंत्री महोदय योग्य काम करता, म्हणून मी मनापासून आपल्याला धन्यवाद देतो. या संबंधात निर्णय घेण्यास जरी उशीर झाला असला तरी त्याबाबतचा निर्णय घेण्यामध्ये आपण मागे पडलो असलो तरी आपल्यामध्ये इच्छाशक्ती नाही काय ? केवळ राजकारणामध्ये, एकमेकांची धोबी पछाड करतो. परंतु सर्वांनी एकत्र बसून, जनसामान्यांच्या जीवनामध्ये क्रांती धडविण्याचा निर्णय सरकारने करण्याची गरज असते. मला खात्री आहे की, सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी काही चागल्या अधिकाऱ्यांच्या संबंधात या सभागृहात आपले मत सांगितले. त्यांचे ऐकले जात नाही, अशी परिस्थिती आहे. यामध्ये जबाबदारीचा प्रश्न आहे. काही न ऐकणारे लोक आहेत ? कोणी राजकीय असतील, आर्थिक व्यवहारामधील अससतील. जोपर्यन्त फायदा होत नाही तोपर्यन्त काम करणार नाही, असे म्हणणारेही लोक आहेत. मी जबाबदारीने हे शब्द वापरलेले आहेत. मी नोटीस दिली नाही, म्हणून मी त्या मंत्र्यांचे नाव घेणार नाही. परंतु हातामध्ये यंत्रणा आल्यानंतर माझ्या हातामध्ये एवढे एवढे विक्रीचे सेंन्टर्स निर्माण झाली पाहिजेत, तो माझा अधिकार आहे असे म्हणून बेकायदेशीररित्या आपल्या भावाला "प्रमोट" करुन, जबरदस्तीने पदार्थ विकण्यात येत आहेत. मला महानगरपालिकेच्या आयुक्तांवर कारवाई करु नका, असे सांगण्याची पाळी आलेली आहे. माझा यात फायदा काय ? हे जोपर्यन्त डोक्यातून बाहेर जात नाही, तोपर्यन्त सक्षम अधिकाऱ्याची सक्षम यंत्रणा राबविणे अशक्य आहे. मंत्री महोदयांच्याबद्दल कदाचित माझा रोष असू शकेल. परंतु त्यांच्या कामाच्या संदर्भाने माझे काही चांगले मत असू शकेल,त्याबाबत मंत्री महोदयांच्या परफॉर्मन्सबद्दल कौतुक करायला मी मागे रहाणार नाही. तसेच ज्यांच्याशी माझे चांगले संबंध असतील आणि त्यांच्या कामामध्ये काही दोष असतील तर ते दोष दाखविण्यासाठी सुध्दा मी मागे रहाणार नाही. सरकारच्या दारुच्या धोरणामुळे आम्ही सदस्य अस्वस्थ होतो. सन्माननीय सदस्य,श्री.विनोद तावडे आणि मी लॉबीमध्ये बोलत असतांना, या दारुच्या धोरणा संबंधाने काहीतरी केले पाहिजे असे विचार येत होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेतेही म्हणत असत की, या संबंधाने आपण सर्व मिळून काही तरी करु या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

परंतु हा विषय सभागृहात कसा आणायचा हा आमच्यासमोर प्रश्न होता. जेव्हा या विषयाच्या संबंधात, एक लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली. त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, "होय, हे माझे खाते आहे, माझ्याकडे आता माहिती नाही. पण त्या अधिकाऱ्यांनी माहिती न देता अर्थमंत्र्यांनी धोरण जाहीर केले असेल तर ती माझी जबाबदारी आहे. माननीय मंत्री महोदयांनी या सगळया गोष्टीला स्टे दिला. कोणतेही समोर निवेदन नसताना, आपण स्टे दिला, त्याबाबत आपण नक्कीच अभिनंदनास पात्र आहात. यापुढे नवीन लायसन्स देणार नाही, असे सांगितले. म्हणजे मंत्र्यांची इच्छा असली तर चांगले निर्णय होऊ शकतात. अर्थमंत्री महोदयांबरोबर वाद असताना देखील जे काय असेल ते पाहून घेईल, असे यामध्ये पाहिले गेले. सदनाच्या माध्यमातून न्याय मिळवायचा झाला तर चांगले निर्णय होऊ शकतात. जनतेमध्ये चांगला मेसेज जाऊ शकतो. मला माहीत आहे की, मंत्री महोदयांच्या हे अवाक्यातील नाही.

सभापती महोदया, दिनांक 22 सप्टेंबर 2004 च्या पत्रामध्ये असे म्हटलेले आहे की, "माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचे नियम व कार्यप्रणाली यापूवीच आपणा सर्वांना वितरीत करण्यात आलेली आहे.....

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपणाकडूनही त्यादृष्टीने कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असेलच अशी अपेक्षा आहे." म्हणजे यामध्ये अपेक्षा आहे असे म्हटले आहे. म्हणजे खात्री वाटत नाही. पुढे असे म्हटले आहे की, " आपणांस विदित आहेच की, या संबंधात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे डिसेंबर 2000 पूर्वी याबाबत कार्यवाही करण्याची मर्यादा निश्चित करण्यात आली होती. बहुतेक सर्व महानगरपालिका / नगरपालिकांनी याबाबत अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली नाही ही अतिशय चिंतेची बाब आहे. याबाबत आपल्या महानगरपालिका / नगरपालिकेला तसेच आपणांस वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल याचा पुनरुच्चार करण्याची गरज नाही." संबंधित खात्याचे मंत्रीमहोदय या ठिकाणी उपस्थित नाहीत. आपल्या माध्यमातून हे करावे अशी अपेक्षा आहे. मी पुन्हा ते वाक्य वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "आपणास वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल याचा पुनरुच्चार करण्याची गरज नाही." यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, " मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी न करणे यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकतो हे आपण जाणून घेण्याची गरज आहे. याबाबत न्यायालयाचा अवमान झाल्यास आपली महानगरपालिका / नगरपालिका व आपण न्यायालयाच्या अवमानास पात्र आहात हे स्पष्ट करण्यात येत आहे. आपण करीत असलेल्या कार्यवाहीमध्ये पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला यांनी घनकचऱ्यापासून कंपोस्ट खत तयार करण्यासाठी अकोला महानगरपालिका येथे प्रकल्प राबविलेला आहे. या प्रकल्पाचा तांत्रिक व प्रशासकीयदृष्ट्या अभ्यास करण्याची गरज आहे असे मला स्पष्टपणे सुचवावेसे वाटते. याबाबत आपण पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथील प्राध्यापक डॉ. राव यांचेशी संपर्क साधून या प्रकल्पाबाबत आपण सविस्तर माहिती मिळविण्यासाठी तात्काळ प्रयत्न करावे. हा प्रकल्प खाजगी उद्योजकांमार्फत कोणत्याही महानगरपालिका / नगरपालिकांना अनुदान न देता रबविण्यात येतो व तो आर्थिकदृष्ट्या अत्यंत व्यवहार्य ठरलेला प्रकल्प आहे. आपण या प्रकल्पाची पाहणी करुन आपल्या महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रामध्ये याबाबत निश्चित काय करता येईल याचा सखोल अभ्यास करावा व याबाबतचा अहवाल या महिन्याअखेर मला सादर करावा असे आपणास स्पष्ट आदेश देण्यात येत आहे. आपला, ना. बा. पाटील, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन" सभापती महोदय, श्री. नाना पाटील यांची शासनामध्ये फार वट आहे. त्यांनी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. दिवाकर रावते ......

सर्क्युलर काढल्यानंतर सुध्दा 20 टक्केही अंमलबजावणी झाली नाही. प्लास्टिकचा कचरा नष्ट करण्यासाठी विविध योजना घेणे, कंपोस्ट खत तयार करणे अणि कचरा बाजूल काढून डम्पींग ग्राऊंड उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी चांगले कंपोस्ट खत तयार होते. प्रधान सचिवांनी हे पत्र पाठविलेले आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये याबाबतीत थोडी मूव्हमेंट घेतलेली आहे. ज्या महानगरपालिकेमध्ये हे होत नाही त्या ठिकाणी कारवाई करण्यात येईल असे सर्क्युलरमध्ये म्हटले असले तरी तेथील आयुक्तांना, तेथील मुख्याधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी. अशा प्रकारचे पत्र दिल्यानंतरही याबाबत कार्यवाही केली नसेल तर त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली पाहिजे. हे आय.ए.एस. अधिकारी भविष्ययामध्ये अडथळा निर्माण करु शकतात याची जाणीव ठेवावी. आपण जर यासंदर्भात प्रामाणिक असाल तर घनकचरा व्यवस्थापनामध्ये आपल्याला शासकीय पातळीवर ठामपणे, निर्धाराने पाऊल उचलावे लागेल. महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्रामध्ये आपण किती झाडे लावतो यापेक्षा कचऱ्याच्या बाबतीत व्यवस्थापन कसे करतो यावर महाराष्ट्राचे आरोग्य अवलंबून आहे. जी गटारे किंवा नाले असतात त्या ठिकाणी आपण गेलो तर नाकावर हात धरुन जावे लागते. आता आपल्या नाकालाही सवय झालेली आहे. आता नाकावर हात धरावा लागत नाही. मी अकोल्याच्या हॉस्पिटलमध्ये गेलो होते. त्या ठिकाणी असे दिसले की, पहिल्या मजल्यावर संडासचा पाईप नाही. त्या ठिकाणी रुग्ण जे काही टाकतात ते उघड्यावर पडलेले होते. मी तेथील डीनला ते दाखवले आणि तुम्ही काही करीत नाही काय ? असे विचारले. मी त्या ठिकाणी गेलो म्हणून मला ते समजले. आकोटच्या नगराध्यक्षावर हल्ला झाला होता म्हणून मी त्या ठिकाणी गेलो होतो. मी तेथील डीनला सांगितले. त्यांनी सांगितले की, संध्याकाळपर्यंत काही तरी करतो. अशी प्रशासनाची परिस्थिती आहे. तुमच्या समोरील काम अवघड आहे. तुम्ही 10 टक्के जरी अंमलबजावणी केली तरी आनंद वाटेल अशा पध्दतीचे प्रशासन खालच्या पातळीवर आहे. या बिलातील प्रत्येक क्लॉजवर बोलावयाचे म्हटले तर आणखी दीड तास जाईल. या बिलामध्ये सार्वजनिक जागा म्हणजे काय ? इत्यादी बाबतीत काही व्याख्या केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे बारीकसारीक गोष्टींवर भाष्य करतील. सार्वजनिक जागा म्हणजे काय ? पाणथळ जमीन म्हणजे काय ? याबाबत बिलामध्ये व्याख्या केलेल्या आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

या प्लॅस्टिकमुळे मलनिस्सारणाला कशी हानी पोहोचते, आणखी कोणकोणत्या गोष्टींना बाधा पोहोचते याबाबत उहापोह करुन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. प्लॅस्टिक मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी शासनाने हे विधेयक आणलेले आहे. परंतु या विधेयकातील तरतुदींची अंमलबजावणी हे शासन ख-या अर्थाने करणार आहे काय ? याचे कारण असे की, या शासनावर आता आमचा विश्वास राहिलेला नाही. या सभागृहामध्ये मुंबईवरील प्रश्नाच्या संदर्भात झालेल्या चर्चेमध्ये मी मुद्दाम भाग घेतला नाही. मुंबईचे प्रश्न सोडविण्यासाठी माननीय मुख्यमंत्री आश्वासने देतात. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे आम्हीचे प्रमुख आहोत अशा प्रकारची प्रतिमा निर्माण करतात. आम्हाला असा अनुभव येत आहे की, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री हे जे जे काही बोलतात त्याप्रमाणे ते करत नाहीत. पदपथावरी बेकायदेशीर झोपड्या हटवून पदपथ मोकळा करु असे त्यांनी सांगितले. परंतु तसे कोठेही केल्याचे दिसत नाही. बेकायदेशीर झोपडी झाली तर त्याबाबतीत विभागीय अधिका-यावर कारवाई करण्यात येईल असेही सांगितले गेले. परंतु तशी कारवाई कोणावर झालेली नाही आणि बेकायदेशीर झोपड्यांची संख्या वाढतच आहे. मी नोटीस दिलेली नसल्यामुळे मला याठिकाणी मंत्र्यांचे नाव घेता येत नाही. मिठी नदीच्या पात्रातील झ ोपडीधारकांना पर्यायी जागा देण्यात येईल असे म्हटल्यानंतर दीड महिन्यापूर्वी मिठी नदीच्या पात्रामध्ये झोपड्या बांधल्या गेल्या. याबाबतीत कोणतीही कारवाई झालेली नाही. मग आम्ही कोणावर आणि कशासाठी विश्वास ठेवायचा ?

तालिका सभापती : माननीय सदस्यांना बोलण्यासाठी आणखी किती वेळ लागेल ? कामकाजपत्रिकेवर असलेले पुढील कामकाज आपण करु शकणार आहोत की नाहीत याचा अंदाज घेण्यासाठी मी माननीय सदस्यांना विचारणा केलेली आहे.

श्री. विनोद तावडे : मी देखील या विधेयकावर बोलणार आहे.

श्री. दिवाकर रावते : मला अनेक गोष्टी याठिकाणी मांडायच्या आहेत. त्यासाठी आणखी एक दीड तास लागेल. माननीय सभापती महोदया, माननीय मंत्री महोदय हे कडवट आहेत. त्यांच्यावर टीका केली तर त्यांचा स्वाभिमान दुखावेल आणि त्यांच्या हातून चांगले काम होईल या उद्देशाने मी मंत्री महोदयांवर टीका केली.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 19:40

श्री. दिवाकर रावते ...

सभापती महोदय, आमच्यासमोर जी उदाहरणे होती ती सभागृहामध्ये मांडलेली आहेत. माननीय मंत्रीमहोदयांनी दीड वर्षापूर्वीचे भाषण मला यानिमित्ताने आठवत आहे. ते म्हणाले होते की "रावते साहेब 70 माणसे मेल्यानंतर तुम्ही ज्या तडफेने भाषण केले ते माझ्यासमोर आहे". सभापती महोदय, मंत्रीमहोदयांची सुध्दा घुसमट होत आहे. ग्राऊंड लेव्हलला काम करणारा कार्यकर्ता आहे. आता मंत्री झाले असले तरी कार्यकर्ता म्हणून त्यांचे मन धडपडते आहे त्यांना वेदना होत आहेत. अपयशाचे खापर त्यांच्या माथी का ? आबा पाटील सुध्दा चांगले काम करीत आहेत. त्यांनाही बदनाम करण्याचा प्रयत्न होतो. डान्सबार बंदीबाबत आजही आणि उद्याही आम्ही त्यांच्याबरोबर आहोत. चुका होत असतील त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, प्लॅस्टीकवर बंदी आणल्यानंतर त्याची अंमलबजावणी कशी करणार हा महत्वाचा प्रश्न आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे आणि कर्तव्य आहे ते पार पाडले पाहिजे. हे बिल चांगले आहे. परंतु कायद्याचा अंमल झाला पाहिजे. खात्याचे प्रधान सचिव पत्ररुपाने लिहितात की कारवाई करण्यामध्ये आम्ही सक्षम राहिलो नाही. याचा खुलासा होणे आवश्यक आहे आणि त्यांना जाब विचारणारे पत्र तरी गेले पाहिजे. ही जबाबदारी सचिवांची आहे. प्रेमपत्र लिहून सरकारमध्ये काम होत नाही. जेवढा काही विषय मला थोडक्यात मांडता आला तो मी मांडला आहे. या विषयातील फक्त 5 टक्के भागच मी मांडला आहे. हे सर्व करीत असताना छोटी इंडस्ट्री चालली पाहिजे. कृषी उत्पन्नाला एक वेगळे असे स्थान आहे. प्लॅस्टीकवरील बंदी आणताना कोणत्या मेजर स्टेप घेणार ते महत्वाचे आहे. कारवाई कशी करणार हाही महत्वाचा मुद्दा आहे. बंदी आणणे अपरिहार्य आहे आणि त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे आहे. हे करीत असताना कोण छोटे आणि कोण मोठे याचा विचार न करता या कायद्याची अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे. हे बिल आणून शासनाने चांगला निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो आणि या निर्णयाची अंमलबजावणी यशस्वीपणाने व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. प्लॅस्टीक या विषयाचा अभ्यास करण्यासाठी आपण खूप दौरे करा. आपल्याला क्रेडीट मिळेल. गावोगाव प्लॅस्टीक पसरले आहे त्याचा अभ्यास करावा लागेल. यासाठी एक मोठे अभियान राबवावे लागेल. राज्यामध्ये आज लाखाच्यावर मुले आहेत. साडेतीन ते चार लाख प्राथमिक शाळातील विद्यार्थी आहेत आणि तेवढेच इतर वर्गातील विद्यार्थी आहेत. हे चिमुकले हात प्लॅस्टीक जमा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

करण्यासाठीउ वापरता येतील. यासाठी अभियान निर्माण करा. जमा होणारे प्लॅस्टीक बाबा आमटे यांच्याकडे पाठवून दिले तर कुष्ठरोग्यांना किमान 5 वर्षासाठी तरी रोजगार मिळेल. असलेले प्लॅस्टीक नष्ट करणे आणि नवीन प्लॅस्टीक येणार नाही यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणे अशा दोन्ही गोष्टी शासनाला कराव्या लागतील. पुन्हा एकदा हे बिल आणल्याबद्दल मंत्रीमहोदयांना मनापासून धन्यवाद देतो आणि त्यांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सभागृहासमोर वि.स.वि.क्रमांक 14 हे जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्याबद्दल शासन खरोखरच अभिनंदनास पात्र आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपली विसृत विचार मांडले आहेत. त्यांनी आपल्या भाषणातून सर्व मुद्दांना स्पर्श केला आहे. 26 जुलैच्या अतिवृष्टीचा फटका मुंबईला देखील बसला. 26 जुलैच्या अतिवृष्टीमुळे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे न झाल्यामुळे मुंबई तुंबली होती. मुंबई शहरामध्ये सगळीकडे पाण्याने हाहाकार माजविला होता. यात अनेक लोक वाहून गेले होते. प्लास्टिक पिशव्यांच्या अतिवापरामुळे मिठी नदीचे नाल्यामध्ये रूपांतर झाले. या प्लास्टिक पिशव्यांमुळेच पाण्याचा निचरा होऊ शकला नाही. त्यामुळेच शासनाने प्लास्टिकवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. आज मुंबईत हजारो टन वेगवेगळया प्रकारचा कचरा वेगवेगळया भागातून जमा होतो. भाजीपाला, मच्छीमार्केट, रुग्णालये,इत्यादी वेगवेगळया माध्यमातून कचरा गोळा होतो. सोसायटीमधून जमा होणारा कचरा कुंडीमध्ये कशा पध्दतीने टाकला जातो हे सर्वांना माहिती आहे. अर्धा कचरा हा कुंडीत असतो, तर अर्धा कचरा हा बाहेर असतो. शासनाने प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. असे जरी असले तरी 50 मायक्रोन पेक्षा जाडीच्या पिशव्यांचा वापर छोटया दुकानदांराकडून होताना दिसून येत आहे. तूप, दूध, ताक, श्रीखंड, सरबत इत्यादी आजही प्लास्टिक पिशव्यांमधून मिळते. तेच प्लास्टिक पुन्हा कचऱ्यात जाते. सार्वजनिक ठिकाणीसुध्दा तीच अवस्था आहे. गोरेगाव येथे छोटा काश्मिर आहे. तेथे अनेक चित्रपटांचे शुटींग होते. शुटींग संपल्यानंतर तो परिसर पहावा. तेथे प्लॅस्टर ऑफ पॅरिस, बिसलेरीच्या बाटल्या व तत्सम प्लास्टिक कचरा पडलेला असतो. यासाठी देखील काही निर्बंध, नियंत्रण असणे आवश्यक आहे. ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवावा असे आवाहन केले असले तरी देखील ओला व सुका कचरा कोणीही वेगवेगळा ठेवत नाही. ओला व सुका कचरा एकत्रितपणे डंपिंग ग्राऊंड नेला जातो. सहा महिन्यापूर्वी मुलुंड डंपिग ग्राऊंडसंबंधातील एक बातमी आली होती. डंपिंग ग्राऊंडवर ओला व सुका कचरा टाकण्यात येत असल्यामुळे तिथल्या कुत्र्यांनी एका मुलावर हल्ला चढवून त्याला ठार केले होते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे....

त्यामुळे डंपिंग ग्राऊंडवर सुध्दा कचरा टाकताना विचार होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागामध्ये उकिरडा हा एक प्रकार असतो. त्यामध्ये जनावरांचा कचरा असेल, घरातील कचरा असेल तो टाकला जातो आणि जमा झालेला कचरा खत म्हणून शेतीमध्ये वापरले जाते.

महोदया, या विधेयकाच्या अनुषंगाने मुंबईसारख्या महानगरामध्ये प्लास्टीकवर बंदी आणली आहे. परंतु ही बंदी पूर्णपर्ण आणलेली नाही. महोदया, सोसायटी आणि झोपडपट्टी यांच्यामध्ये फार अंतर नसते. परंतु अनेकदा असे होते की, सोसायटीमधून कम्पाऊंडच्या वरुन बाहेरच्या बाजूला कचरा टाकला जातो. आपण जर सोसायटयांच्या आजूबाजूंची पाहणी केली तर अनेक ठिकाणी प्लास्टीकच्या पिशव्या पहावयास मिळतील. वास्तविक पाहता हे विधेयक चांगले आहे. परंतु याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली पाहिजे. त्यामुळे या संदर्भात कडक निर्बंध आणले पाहिजेत. जो कोणी प्लास्टीकचा वापर करेल, त्याच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. खरे म्हणजे या प्लास्टीकमुळे मुंबईतील पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. त्यामुळे हा समतोल राखण्याच्या दृष्टीकोनातून कडक उपाययोजना केली पाहिजे. अनेक मुद्दे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेले असल्याबद्दल मी त्या मुद्यांचा पुनरुच्चार करीत नाही. सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, या विधेयकाच्या संदर्भात आपली जी राजकीय इच्छाशक्ती आहे त्यामध्ये आम्ही सुध्दा आपल्या बरोबर आहोत. ही बंदी आणत असताना आपण मुंबईकरांमध्ये एक जाणीव निर्माण केली पाहिजे की, मुंबई माझी आहे आणि मुंबईची काळजी घेणे हे माझे कर्तव्य आहे. बाथरुमच्या खिडकीतून जो कचरा बाहेर टाकला जात आहे ते योग्य नाही. महोदया, सुशिक्षीत व्यक्तीकडून सुध्दा गाडीतून जात असताना काच खाली करुन, बिसलेरीची बाटली बाहेर टाकली जाते. त्यामुळे या संदर्भात नागरिकांना वळण आणि शिस्त लावणे आवश्यक आहे. माझे घर आणि माझा परिसर स्वच्छ ठेवण्याचे सर्वांनीच ठरविले तर, हे विधेयक खऱ्या अर्थाने अंमलात आणले जाईल. आपली वस्तू म्हटली की, काळजी घेतली जाते. त्यामुळे मुंबई ही आपली आहे असे गृहीत धरुन, सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. शिवाजी महाराज गेल्यानंतर, मोठे सेनापती असताना सुध्दा औरंगजेबाला शिवाजी महाराजांचे राज्य जिंकता आले नाही. कारण शिवाजी महाराजांनी जनतेला असे सांगितले होते की, हे तुझे राज्य आहे आणि ते तुला टिकविले पाहिजे. त्यामुळे सर्वजण हे आपले राज्य आहे असे समजून, लढले. तशाच प्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 4A-2

SJB/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.भारवि.... 19:50

श्रीमती कांता नलावडे...

हे माझे आरोग्य आहे आणि प्लास्टीकच्या पिशव्या माझ्या आरोग्यास घातक ठरु शकतील असा विचार आपण केला पाहिजे. त्यामुळे या संदर्भात जनजागरण करण्यासाठी सेमिनार आयोजित केले पाहिजेत, वा अन्य कार्यक्रमाच्या माध्यमातून ही बाब निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे. आज प्लास्टीक बंदी असूनही प्लास्टीकचा वापर होत असेल तर वापर करणाऱ्यांवर कडक कारवाई केली पाहिजे. प्लास्टीकवर बंदी आणत असताना कापडी पिशव्यांचाही जास्तीत जास्त प्रचार आणि वापर झाला पाहिजे, एवढीच या निमित्ताने मागणी करते व माझे दोन शब्द पुरे करते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, माननीय मंत्री महोदयांनी अतिशय चांगले विधेयक या ठिकाणी आणलेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मी सुध्दा या विधेयकावर बोलण्यासाठी नाव दिलेले आहे. त्यामुळे...

तालिका सभापती : आपण जर अगोदरच नावे दिली असती तर, कोणाला अगोदर बोलू द्यावयाचे व कोणाला नंतर बोलू द्यावयाचे हे ठरविणे सोयीस्कर झाले असते.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, एखाद्या विधेयकावर चर्चा करीत असताना, प्रथा अशी आहे की, सदस्यांनी पक्ष प्रतोदांमार्फत आपल्याकडे नावे द्यावयास पाहिजेत. ऐनवेळी हात वर करुन सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदया, आम्ही आपणास विधेयकावर बोलण्यासंदर्भातील नावे दिली आहेत, हे आपण मान्य करावे.

तालिका सभापती : होय. आता माझ्याकडे नावे आलेली आहेत. या संदर्भातील गोष्ट अशी आहे की, आपण विधेयकावर बोलण्यासाठी नावे दिली तरच ते सोयीस्कर होणार आहे. खरे म्हणजे, हात वर केला तर बोलायला सांगावयाचे, बिलावर कितीही बोलता येते या गोष्टी मी या सभागृहातच ऐकल्या आहेत. या संदर्भात अशी प्रथा असेल तर आपण ती प्रथा मानू. परंतु सोयीस्कर प्रथा काय आहे, हे देखील सर्वांनी पहावे. म्हणूनच मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना, ते किती वेळ बोलणार आहेत याबाबत विचारले. कोणी किती बोलावयाचे याबद्दल मी बोलत नाही. परंतु इतर सन्माननीय सदस्यांवर त्यामुळे बंधने येतात. यावर कधीतरी बंधन घालण्याची गरज आहे. बिलावर कितीही बोलावे हे मी या सभागृहामध्ये तसेच संसदेमध्येही ऐकलेले नाही. बिलासाठी नेमून दिलेले तास असतात. त्यामुळे त्यावर महत्वाचे असे बोलावयाचे असते. या ठिकाणी आपण सातत्याने सभापतींना सांगत असता की, बेल वाजवावयाची नाही. कितीही वेळ बोलू द्यायचे, असा आपला नियम आहे. या संदर्भात मी एवढेच नमुद करु इच्छिते की, अशा प्रकारांमुळे इतर सन्माननीय सदस्यांवर अन्याय होतो. आपण विधेयकावर कितीही वेळ बोलण्याचा नियम बदलला तरी हरकत नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी अतिशय वेगळे व अप्रतिम असे भाषण केले आहे. त्यांचे मायक्रो भाषण मायक्रॉनवर होते. या विषयासंदर्भात काही बोलावयाचे राहिले असेल असे मला काही वाटत नाही. परंतु तरीही मी या ठिकाणी 2-3 मुद्दे मांडणार आहे. सभापती महोदया, "ब्लेसिंग्ज इन डेव्हिल". संकटांमध्ये ब्लेसिंग्ज असतात. संकटावर मात करण्याचा अनुभव या बिलामुळे आला. सभापती महोदया, या ठिकाणी मिठी नदीचाही उल्लेख झाला. या सर्व गोष्टींतून दिसून आले की, आपण दैनंदिन जीवनात प्लॅस्टिकचा उपयोग खूप प्रमाणात करतो. सभापती महोदया, 50 मायक्रॉनचे गणित सर्वसामान्य माणसाला कळणारे नाही. आज दुधापासून देवाच्या फुलांपर्यंत सर्व प्लॅस्टिकच्या पिशवीतून दिले जाते. बिस्कीट, चॉकलेट, गुटखा यांचे कंटनेरही प्लॅस्टिकचेच असतात. सभापती महोदया, ते प्लास्टिक पाण्यामध्ये सहजासहजी डिझॉल्व्ह होत नाही. त्यामुळे हे अविघटनशील पदार्थ कचऱ्यामध्ये येतात. तरी, त्याचाही विचार आपण केला पाहिजे. एअरलाईन्समध्ये देण्यात येणाऱ्या चॉकलेट्सची रॅपर्सही प्लॅस्टिकचीच असतात. तीही पाण्यामध्ये नष्ट होत नाहीत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी फ्लॅक्झी बोर्डचा उल्लेख केला तो खरोखर योग्य आहे, पुढे त्या बोर्डाचे काय होणार आहे हे कोणालाही सांगता येणार नाही. प्रत्यक्षात प्लॉस्टिकचा वापर खूप मोठया प्रमाणात होत असतांना त्यांचा निपटारा कसा करावयाचा याचा कोठेही उल्लेख नाही. मी मागे विशेष उल्लेखाच्या संदर्भात पन्हाळगडाचा उल्लेख केला होता, सगळे गड व किल्ले तसेच समुद्र किना-यांवर मोठया प्रमाणात प्लॉस्टिकचे पाऊच, पाण्याच्या बाटल्या, चॉकलेटचे प्लॉस्टिक, बिस्कीटांचे प्लॉस्टिक, जिकडेतिकडे प्लॉस्टिक पडलेले आढळून येत आहे. हे प्लॉस्टिक एवढे घातक आहे की, ते जेथे पडले तेथे गवत उगवत नाही, सूर्याची किरणे जमिनीवर पडत नाही, त्यातून पाणी परक्युलेट होत नाही यामुळे सर्व प्रकारचे नवीन प्रश्न निर्माण झालेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, संपूर्ण प्लॉस्टिकवर बंदी आणावी पण हे कितपत साध्य होते हे माहिती नाही. कारण प्लॉस्टिकच्या चपला, बांगडया, खुर्च्या, टिपॉय, प्लॉस्टिकचे टर्मिनल, प्लॉस्टिकचे टम्बरेलस, तसेच आता दारु व व्हिस्कीसुध्दा प्लॉस्टिकच्या बाटल्यामध्ये मिळत आहे. या कोणत्याही प्लॉस्टिकचा ऱ्हास होत नाही. आपण सांगत आहात की, 50 मॉयक्रानच्या वर पिशव्या वापराव्यात परंतु ते कोणालाही कळत नाही, त्यासंदर्भातील तक्रार कोठे करावी याचा विधेयकात कोठेही उल्लेख नाही, दंड आकारण्यात येईल असे आपण सांगितले आहे, प्लॉस्टिक वापरावर बंधन घालण्यापेक्षा त्याच्या निर्मितीवरच बंधन घालणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे अनेक प्लॉस्टिकची पाऊच इकडे तिकडे टाकलेली आपणास दिसत आहेत, आम्ही उटीला बघितले की, तेथे प्लॉस्टिक वापरावर पूर्णपणे बंदी आहे, तेथे कागदाच्या पिशव्या दिल्या जातात. तेथे कोणत्याही वस्तूसाठी कागदाच्या पिशव्या वापरण्यात येतात. म्हणून यासंदर्भात दंड, प्लॉस्टिक निर्मिती व तक्रार या तीनच विषयाच्या अनुषंगाने मला बोलायचे आहे, त्याची अंमलबजावणी आपण कशी करणार आहेत ? याबाबत आपण काय निर्णय घेणार आहत ? कारण तक्रार कोणाकडे करावी हे सर्वसामान्य माणसाला ताबडतोब कळले पाहिजे एवढे सोपे ते असणे आवश्यक आहे. शेवटी प्लॉस्टिक निर्मितीवर बंदी आणावी असे आमचे म्हणणे आहे, या बिलाचे स्वागत करुन मी माझे भाषण संपवितो.

.....2...

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदया, या विधयकावर अनेक सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत, परतु काही गोष्टी मांडणे गरजेचे आहे म्हणून मी या विधेयकावर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदया, 20 ते 25 वर्षापूर्वी आम्ही जेव्हा बाजारामध्ये जात होतो तेव्हा कापडी पिशवी घेऊनच जात होतो. अलिकडच्या काळामध्ये हातामध्ये पर्स घेतली की हात हालवत बाजारामध्ये महिला जात असतात, कारण तेथे सर्वच मिळते, भाजी घेतांना प्रत्येक भाजीसाठी वेगळी पिशवी मागण्यात येते, मिरचीसाठी वेगळी पिशवी, कोथिंबीरसाठी वेगळी पिशवी व भाज्या प्लॉस्टिक पिशवीमध्ये घेतल्यावर ती पिशवी तुटू नये म्हणून आणखी त्यासाठी दुसरी पिशवी घेण्यात येते. 26 जुलैला महापूर आल्यानंतर यामध्ये थोडी जागृती निर्माण झाली व प्लॉस्टिकवर तात्पुरती बंदी आणण्यात आली. त्यासाठी प्लॉस्टिक हे एकच कारण होते असे मला वाटत नाही.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) 4D 1

DGS/ MHM/ KGS/ 20:05

श्रीमती संजीवनी रायकर...

अनेक कारणांपैकी हे एक कारण असल्यामुळे त्याच्या वापरावर बंदी आणली त्यावेळी बरे वाटले. परंतु नंतर एक महिन्यापूर्वी पुन्हा बंदी उठविल्यामुळे बाजारामध्ये पुन्हा पिशव्या दिसावयास लागल्या आहेत. अलिकडे धान्य, तेल, तूप इत्यादी जीवनावश्यक वस्तूंसाठी प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा वापर करण्याशिवाय गत्यंतर नाही. आपण आपल्या राहणीमानामध्ये आधुनिकता जोपासली पाहिजे याकरिता सरसकट प्लॅस्टीकवर बंदी घालणे कठीण आहे. प्लॅस्टीकच्या पिशव्या कुठेही टाकल्या जातात. त्यामुळे त्या गुरे-ढोरे खातात. प्लॅस्टीक ही खाण्याची बाब नाही असे त्यांना कळत नाही. त्यांच्या पोटामध्ये 25 ते 30 किलो प्लॅस्टीक गेल्यानंतर ते फुगते, त्यामुळे त्यांना ऑपरेशन करावे लागते. या संदर्भात अनेक पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या आहेत. प्लॅस्टीक पोटामध्ये गेल्यामुळे अनेक मुक्या जनावरांना आपले प्राण गमवावे लागत आहेत याचाही आपण विचार केला पाहिजे. मध्यंतरी ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा ठेवण्याबाबत मोहीम सुरु करण्यात आली होती. परंतु त्या मोहीमेचे पुढे काय झाले समजत नाही. रस्त्यावर कचरा कुंडया ठेवलेल्या असतात त्या इतरत्र हलविता येत नाहीत. त्यामुळे लोक लांब अंतरावरुन कचरा टाकीत असतात. त्यामुळे तो कचरा कुंडीमध्ये न पडता आजूबाजूला पडून पसरतो. अशाप्रकारे गोळा झ ालेला कचरा वेळेवर उचलण्यासाठी महानगरपालिकेच्या गाडया येत नाहीत. त्या कचरा कुंडीच्या ठिकाणी मांजर, कुत्री, उंदीर-घुशी यांचे साम्राज्य निर्माण होत असते. आज मुंबई शहरामध्ये डुकरे नाहीत परंतु उपनगरामध्ये त्यांची पिलावळ कचऱ्यावरुन फिरत असते. त्याठिकाणी जी दुर्गंधी साचलेली असते तिचे वर्णन करणे कठीण आहे. आपण या विधीमंडळामध्ये कायदा केल्यामुळे कायद्याप्रमाणे वागले पाहिजे अशी लोकांची मानसिकता असते. परंतु तरीसुध्दा आपणच आपल्यावर बंधने घालून घेतली पाहिजेत असे कुणालाही वाटत नाही. प्लॅस्टीकची पिशवी कधीही घेऊन जाणार नाही अशाप्रकारचे बंधन मी मात्र स्वत:वर घालून घेतले. गेल्या पाच वर्षापासून बाजारात गेल्यानंतर मी प्लॅस्टीकची पिशवी दुकानदाराकडून घेत नाही. दुकानदाराला माहीत झालेले असते की, या बाई प्लॅस्टीकची पिशवी घेणार नाहीत त्यामुळे तो नोकराला सांगतो की, या बाईंना प्लॅस्टीकची पिशवी देऊ नको. मला ज्या वस्तू घ्यावयाच्या आहेत त्या घेण्यासाठी मी घरामधून कॅरी बॅग घेऊन जाते. परंतु लोकांना प्लॅस्टीकची फार आवड आहे. दुकानदार म्हणतो की, तुमच्या सारखे इतर लोक प्लॅस्टीक पिशवी नको असे कधी म्हणत नाहीत. उलट त्यांना प्लॅस्टीकची पिशवी न देता कागदी पिशवी दिली तर ते दुकानदारावर डाफरतात. मघाशी याठिकाणी एक

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) 4D 2

DGS/ MHM/ KGS/ 20:05

श्रीमती संजीवनी रायकर...

उदाहरण देण्यात आले. सुरुवातीच्या काळात गवळी दूध घालायचे त्यावेळी प्लॅस्टीकच्या पिशव्या नव्हत्या. त्यानंतर दूधाच्या बाटल्या आल्या. आणि आता प्लॅस्टीकशिवाय गत्यंतर नाही.

सभापती महोदया, मध्यंतरी ई-टी.व्ही. वर मी एक मुलाखत बघितली. ही मुलाखत श्री. राजू परुळेकर यांनी घेतली होती. "कचरा मुक्त घर" या विषयावर ती मुलाखत एका व्यक्तीची घेण्यात आली होती. त्यामध्ये घरातील कचऱ्याचे विघटन कसे करावयाचे आणि हा कचरा पुन्हा कसा उपयोगात आणावयाचा अशाप्रकारची एक योजना तयार केली होती. तशाप्रकारची योजना जर अंमलात आणली तर बराचसा कचरा कमी होईल. सभापती महोदया, पावसाळा आल्यानंतर नेमका झाडूवाल्यांचा संप सुरु होतो आणि मग रोगराई पसरते. त्याकरिता मी सांगितलेल्या योजनेची शासनाने माहिती करुन घेऊन ती अंमलात आणावी. ही योजना घरोघरी अंमलात आणणे आवश्यक आहे, त्यासाठी जास्त खर्च येत नाही. परदेशामधील लोक रस्त्यावर कुठेही कचरा टाकीत नाहीत. मी ऑस्ट्रेलियाला एका प्रशिक्षणासाठी गेले होते. त्या ठिकाणी सुटीच्या दिवशी स्टडी टूरसाठी बाहेर जावे लागायचे, त्यावेळी एके ठिकाणी कचरा व्यवस्थित गोळा करुन ठेवला जायचा.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.गुरुनाथ कुलकर्णी)

श्रीमती संजीवनी रायकर (पुढे सुरु...

ही सवय सगळयांना लागलेली होती. येथे आल्यानंतर...

(वेळ संपत आल्याची घंटी वाजविण्यात येते.)

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, विधेयकावर बोलत असतांना बेल वाजवायची नाही अस ठरलेले होते.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : विधेयकाच्या संदर्भात पॉईंटेड बोलावे, त्याच्या अनुषंगाने बोलू नये अशी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : ठीक आहे. आज समुद्र किनाऱ्यावर गेलात तर त्या ठिकाणी काहीही कचरा टाकलेला असतो, हे दिसून येईल. तशी लोकांना सवय लागलेली आहे. ही सवय मोडली पाहिजे. आपण जसे परदेशामध्ये गेल्यानंतर वागतो, त्याप्रमाणे येथे वागले पाहिजे, तर अशाप्रकारची बरीचशी दुखणी कमी होतील. हे विधेयक आणल्याबद्दल शासनाचे मी अभिनंदन करते आणि सनमाननीय सदस्यांनी स्वत:पासूनच सुरुवात करावी, अशी विनंती करुन माझे बोलणे संपविते.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय....

तालिका सभापती : माझ्याकडे एक सूचना आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी यापूर्वी सभागृहाला विनंती केलेली आहे की, आता रात्रौ 8-00 वाजता अनुशेषाच्या संदर्भाने बैठक आहे, त्या बैठकीला सदस्यांना उपस्थित रहाण्यासाठी लवकर कामकाज संपवावे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर दुसरे महत्वाचे विधेयक चर्चेसाठी घेऊन मंजूर करावयाचे आहे त्यानंतर आजचे कामकाज संपवायचे आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी कमीत कमी वेळ घ्यावा, अशी त्यांना विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विधेयकामध्ये उद्देश आणि कारणे नमूद करण्यात आलेली आहेत. या विधेयकावर बोलत असतांना मंत्री महोदयांचे लक्ष वेधायचे आहे. अनेक दिवसापासून पर्यावरणवादी मागणी करत होते. परंतु ते एक फॅड आहे, आपल्या देशाचा काही संबंध नाही, अशा पध्दतीने त्याकडे आपण दुर्लक्ष करत होतो. श्री. मथाई यांनी एक मुद्दा मांडलेला होता की, श्रीमंत देशामध्ये "युज ॲन्ड थ्रो" अशी पॉलिशी चालू शकते. परंतु विकसनशील देशासाठी तीन "आर" महत्वाचे आहेत. सर्क्युलेशनमध्ये ज्या ज्या वस्तू आपण वापरत असतो त्याबद्दलचे तीन मुद्दे विकसनशील देश जवळजवळ विसरलेले आहेत. शांतपणे आपण या मुद्यांचा विचार केला तर तीन "आर" पैकी पहिल्या आरमध्ये "रिपेअर" आहे....

(तालिका सभापतींना उद्देशून)

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी माझे भाषण येथे थांबवून लेगवर उभी राहू काय ?

तालिका सभापती : आपल्याला हे विधेयक आजच संपवायचे आहे. सभापती महोदयांनी हे विधेयक आज पास करण्यास सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे या विधेयकावर विस्ताराने बोललेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांनी त्या कराव्यात. 8 वाजता अनुशेषाच्या संबंधातील बैठकीसाठी सन्माननीय सदस्यांना जावयाचे असेल तर पुढचे विधेयकही आता घ्यावे लागेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : या विधेयकावर कितीही वेळ बोलू शकतो...

तालिका सभापती : कितीही वेळ बोलू शकतो, हे मला माहीत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते बोलण्यासाठी उभे आहेत. त्यांना काऊंटर न करता त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

तालिका सभापती : त्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : आपण या विधेयकावर थोडक्यात बोला, अजून पुढची विधेयके संपवायची आहेत, अशा पध्दतीने आपण निर्देश देत आहात.

तालिका सभापती : सन्माननीय श्री.नितीन गडकरी साहेबानीच बैठकीला उपस्थित रहावयाचे असल्यामुळे लवकर कामकाज संपवावे असे सुचविलले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : ज्यांना बैठकीला जावयाचे आहे ते सन्माननीय सदस्य गेलले आहेत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण विधेयकाच्या बाबतीत असे बंधन आणू शकत नाही.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : विधेयकावर सन्माननीय सदस्य कितीही वेळ बोलले तरी मी अडचण निर्माण केलेली नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना दोन दोन मिनिटे बोलू द्यावे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना दोन दोन मिनिटे बोलू द्यावे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे बोलत असताना त्यांनीच मला विचारले की, या विधेयकाच्या चर्चेच्या बाबतीत आता काय करणार आहात ? मी त्यांना कोणताही निदेश दिलेला नव्हता. आपण बोलू नका असे मी त्यांना सांगितले नव्हते. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रिपेअर, रिसायकल आणि रिजनरेशन या तीन कार्यपध्दती विसरल्यामुळे आपण अनेक वस्तूंचा फार मोठा कचरा सातत्याने जमा करीत असतो. श्रीमती वांगार मथाई यांनी हेच मांडले होते. विकसनशील देशाने आपल्याला या वस्तू दुरुस्त करण्याची साधने कशी उपलब्ध करुन देता येतील, ज्या वस्तूं रिसायकल करु शकतो, ज्या वस्तू परत परत वापरल्या जाऊ शकतात अशा वस्तू आपण कशा वापरामध्ये ठेवावयाच्या ? रिजनरेशन म्हणजे जुन्या वस्तूंपासून नवीन वस्तूंची निर्मिती कशी करता येईल ? याचा विचार केला पाहिजे. याबाबतीत अमेरिका किंवा इतर विकसित देशांचा आदर्श न ठेवता आपण वेगवेगळया धोरणांमध्ये आधीपासूनच या मुद्यांचा अंतर्भाव केला असता तर अशी परिस्थिती उद्‌भवली नसती. पुढच्या कालखंडमध्ये काम करीत असताना मला शासनाल सूचना करावयाची आहे. रिपेअर, रिसायकल आणि रिजनरेशन याची अंमलबजावणी कशा प्रकारे करु शकू यासंदर्भात विचार झाला पाहिजे. शासनाकडून असे सांगण्यात येते की, विघटनशील कचऱ्याच्या संदर्भातील मुद्दा हे विधेयक येण्याच्या आधीच अंमलात आणलेला आहे आणि आता त्याला कायद्याचे स्वरुप देत आहोत. आपण मनोरा

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आमदार निवासमध्ये राहतो किंवा माननीय मंत्रिमहोदय ज्या बंगल्यामध्ये राहतात, त्या दक्षिण मुंबईमध्ये कोठेही ओला कचरा आणि सुका कचरा असा वेगबेगळा कचरा कोणत्याही घरातून दिला जात नाही. मनोरा आमदार निवासमध्ये ओला कचरा आणि सुका कचरा यासाठी वेगळ्या कुंड्या का नाहीत ? माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या घरामध्ये विचारावे की, ओला आणि सुका कचरा वेगळा दिला जातो काय ? दक्षिण मुंबईमध्ये एकत्रच कचरा दिला जातो. इतर मुंबईकरांना जो नियम लावला तो आपण आमदार निवासला लावत नाही, ही गोष्ट चांगली नाही. आपण यामध्ये टाकाऊ पदार्थांची यादी दिलेली आहे. या टाकाऊ पदार्थांमध्ये बंद पडलेले मोबाईल्स आहेत. बंद पडलेल्या मोबाईल्सची संख्या फार वाढत चालली आहे. बंद पडणारे मोबाईल्स इलेक्ट्रॉनिक टाकाऊ पदार्थामध्ये घेऊ शकतो असे सांगावे. बंद पडलेल्या मोबाईल्सचा कचरा कोठे टाकावा यासंदर्भात मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याचा विचार करावयास पाहिजे. आपण या विधेयकामध्ये असा कचरा टाकणाऱ्या लोकांसाठी फार मोठी शिक्षा दिलेली आहे. परंतु काही नगरपालिका क्षेत्रात आणि विशेषत: तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी आणि थंडहवेच्या ठिकाणी हा कचरा उचलल जात नाही. त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर कचरा सातत्याने फेकला जतो. तीर्थक्षेत्र आणि थंडहवेच्या ठिकाणी हा कचरा उचलण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी तेथील नगरपलिका आणि पर्यावरण विभागामध्ये विशेष यंत्रणा उभी करावी लागेल. सभापती महोदय, महालक्ष्मी देवस्थानच्या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित होतो. त्या ठिकाणी हजारो प्लास्टीकच्या पिशव्या येतात. त्यांना वेगळ्या तऱ्हेचा पर्याय कसा देता येईल यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. आपण गटारे आणि खासकरुन मलनि:सारण मार्गाच्या संदर्भात प्लास्टीक पिशव्या मुक्त क्षेत्र घोषित करण्याचे ठरविले आहे. ती चांगली गोष्ट आहे परंतु त्या ठिकाणी देखरेख करण्याची जबाबदारी कोणाची राहणार आहे ? नाही तर बऱ्याच ठिकाणी हे हप्ता घेण्याचे साधन होऊ शकते. यांसदर्भात मॉनिटरींग करणारी यंत्रणा तेवढी सक्षम नसते. ही बाब अमलात आणण्यासाठी प्लास्टीकच्या संदर्भात समाजामध्ये प्रबोधन करुन त्याचा उपयोग कशा पध्दतीने करता येईल याचा विचार झाला तर जास्त फायदा होऊ शकतो. एवढे बोलून मी माझे भाषण संपवते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड

20:20

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय तालिका सभापती महोदय, सन 2006चे वि.स.वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मला केवळ दोन-तीन मुद्देच आग्रहाने मांडायचे आहेत. आज सभागृहामध्ये सावित्री नदीच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली होती. त्यावेळी नियोजन विभागाकडे जागेची मागणी करण्यात येईल, सक्षम अधिका-याची नेमणूक करुन जागा वाढवून घेण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. याचा अर्थ प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे जागा कमी आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सुरुवातील पाण्याची बाब होती. त्यानंतर त्यांच्याकडे वारा, ध्वनी या बाबी देण्यात आल्या. आता प्लॅस्टिकची बाब देखील त्या मंडळाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्या मंडळामध्ये केवळ 700 ते 800 कर्मचारी आहेत. हे कर्मचारी कोणकोणत्या गोष्टी करणार ? या सर्व गोष्टी करण्यासाठी विशेष प्रावधान केलेले आहे काय, हा खरा प्रश्न आहे. प्रदुषण मंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी वर्ग वाढणार नसेल तर नुसता कायदा करुन आणि वृत्तपत्रामध्ये त्याला प्रसिध्दी देऊन भागणार नाही. कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. तेव्हा प्रदुषण मंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी वर्ग वाढविण्याच्या संदर्भात बजेटमध्ये तरतूद करण्याची आवश्यकता आहे. या प्लॅस्टिकचा प्रादुर्भाव आता केवळ शहरापुरता मर्यादित न राहाता तो खेडयापाड्यापर्यन्त पोहोचला आहे. आमच्या कोकणामध्ये प्लॅस्टिकच्या पिशव्यातून भेटी पोहोचतात. तेव्हा प्लॅस्टिकच्या निर्मूलनासाठी ग्रामपंचायतींना देखील सहभागी करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. हे प्लॅस्टिक आपल्याला रिसायकल करावे लागणार आहे. प्लॅस्टिकचे रिसायकलिंग करण्यासाठी शासनाने महानगरपालिका, नगरपालिका यांना स्वत:चे प्लॅण्ट उभे करण्यास सांगितले पाहिजे आणि त्यासाठी शासनाने त्यांना सबसिडी दिली पाहिजे. नगरविकास खात्यावरील चर्चेच्या वेळी मी सांगितले होते की, मुंबईमध्ये जे मोठमोठे टॉवर्स उभे राहात आहेत तेथील पाणी रिसायकल करुन वापरले गेले पाहिजे. आता मिठी नदीतील गाळ काढून तो कांजूरमार्ग येथील मॅनग्रोव्हच्या ठिकाणी टाकला जात आहे. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, प्लॅस्टिक रिसायकल करण्याचे युनिट ठिकठिकाणी काढली जावीत यासाठी शासनाने काही स्कीम राबविली पाहिजे. त्याबाबतीत इन्सेण्टिव्हज दिले पाहिजे. कर्नाटक राज्यामध्ये रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी प्लॅस्टिकच्या वापराचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे पुढे सुरु...)

प्रयोग केला जात असल्याची माझी माहिती आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चर उभे रहात आहे. त्यासाठी प्लॅस्टिकचा उपयोग होऊ शकेल काय याचा सायण्टिफिक अभ्यास केला गेला पाहिजे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री.शिगम नंतर 20:25

श्री. विनोद तावडे ....

ज्याप्रमाणे मघाशी माननीय सदस्य श्री. रावते यांनी सांगितल्याप्रमाणे एका बाजूला प्लॅस्टीकवर बंदी आणि दुसऱ्या बाजूला त्यासाठी पर्याय अशा दोन्ही गोष्टींचा विचार शासनाला करावा लागणार आहे. पर्याय मोठया प्रमाणात पुढे आणला पाहिजे. चांगल्या प्रकारच्या कापडी पिशव्या सावंतवाडी सारख्या भागात तयार केल्या जातात. जुन्या साडयांपासून पिशव्या तयार केल्या जातात. महिला बचत गटांना हे काम दिले आहे आणि ते सावंतवाडी येथे यशस्वी झालेले आहे. दुसरे पर्याय वेगाने आणल्याशिवाय बंदी यशस्वी होऊ शकणार नाही. एका बाजूला बंदी करीत असताना दुसऱ्या बाजूला वेगाने पर्याय पुढे आले पाहिजेत. नाही तर हा निर्णय एकांगी होईल. ज्याप्रमाणे हुंडाविरोधी कायदा केला परंतु तो कागदावरच राहिला तसे या कायद्याचे होईल. म्हणून पर्याय यशस्वी करावयाचा आहे. माननीय सदस्य श्री. रावते यांनी सांगितल्याप्रमाणे शाळेतील मुलांचा सुध्दा मोठया प्रमाणात उपयोग होऊ शकेल. मोठया प्रमाणात रॅग पिकर्स म्हणजे कचरा उचलणारी मुले पहाटे 3-4 वाजता जाऊन कचरा कुंडीमधून कचरा गोळा करतात. या ऑर्गनायझेशन सेक्शनचा चांगला उपयोग होऊ शकेल. एनजीओ यांना एकत्र करुन प्लॅस्टीक गोळा करणारी जी मुले आहेत त्यांचा उपयोग होऊ शकेल. पहाटे 3-4 वाजता ही मुले कचरा गोळा करतात आणि कचरा गोळा करताना हात कापतात,हाताचे आजार होतात,स्कीन डिसीजी होतात याचा विचार वेगळया पध्दतीने केले तर नॉन एम्प्लॉईड ऑर्गनायझेशन नेटवर्कमधून या गोष्टीचा उपयोग होऊ शकेल. जी इच्छा आणि मनिषा 26 जुलै 2005 रोजीच्या भयावह पुरामधून निर्माण झाली आणि लोकांमध्ये जागरुकता आलेली आहे त्यातून प्लॅस्टीकवर बंदी आणली आहे. परंतु लोखंड गरम असताना घाव घातला तर योग्य तो शेप येतो. त्याप्रमाणे आपण प्लॅस्टीक बंदीचा हा कायदा यशस्वी करु शकू आणि तो केला पाहिजे असे मला वाटते. धन्यवाद.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शासनाने जे बिल आणले आहे ते फक्त मुंबई डोळयासमोर ठेवून या बिलाची रचना केलेली आहे असे वाटते. ज्यावेळी या बिलाचे कायद्यात रुपांतर होईल त्यावेळी असे वाटेल की फक्त 26 जुलै 2005 रोजीचा मुंबईमध्ये झालेला महापूर डोळयासमोर ठेवून हे बिल आणले आहे. प्लॅस्टीक विषयासंबंधीच्या अडचणी काय आहेत आणि त्याचे फायदे काय आहे याचा विचार न करता येथे फक्त एकच गोष्ट डोळयासमोर ठेवून आणि ती म्हणजे 26 जुलै रोजी पडलेला पाऊस लक्षात घेऊन त्यातून झपाटलेल्या पध्दतीने ही प्लॅस्टीकबंदी आणण्यात आली आहे. या बिलातील त्रुटी काय आहेत आणि त्याचे साईड इफेक्ट काय आहेत यावर की प्रकाश टाकणार आहे. पहिला साईड इफेक्ट म्हणजे पान 6 वरील पृष्ठ क्र. 5 मध्ये जो मुद्दा आहे त्यामधून आपल्या लक्षात येईल. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "अविघटनशील कचरा तात्पुरता टाकण्यासाठी किंवा गोळा करण्यासाठी योग्य व सोईस्कर ठिकाणी सार्वजनिक कचरा कुंडया ठेवणे,आगारे किंवा ठिकाणे निश्चित करणे आणि त्यांची तरतूद करणे". सभापती महोदय, स्थानिक प्राधिकरणाचा उल्लेख करण्यात आला आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला अशा कुंडया तयार केल्या पाहिजे. किमान 100 मिटर अंतरावर कचरा कुंडीमध्ये जाऊन कचरा टाकला पाहिजे. म्हणजे एक प्लॅस्टीक पिशवी टाकायची असेल तर 100 मिटर पेक्षा जास्त अंतर जावे लागेल. इतकी पायपीट छोटी माणसे करणार नाहीत. कचराकुंडयांची संख्या विचारात घेतली तर 30-40 लाख कचराकुंडया ग्रामीण भागामध्ये लागतील. तालुक्याच्या ठिकाणी मोठया प्रमाणात कचरा कुंडया लागतील. 40 लाख कचराकुंडया लागतील. विघटनशील आणि अविघटनशील कचऱ्यासाठी या कुंडया लागतील. याचा खर्च कोण सोसणार आहे ?

यानंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

हा कार्यक्रम राबवित असताना कणकवली, उमरगा येथील खेडी डोळयासमोर ठेवून अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय ? एखाद्याने चुकीने प्लास्टिकची पिशवी रस्त्यावर फेकली तर आमचा पीएसआय लगेच त्याला दंड करणार. म्हणजे त्यांना एक नवीन दुकान उघडून दिल्यासारखे आहे. पाच हजार रुपये दंड भरला नाही तर अटक करण्यात येईल असे आमच्या पीएसआयकडून सांगण्यात येईल. ज्याच्याकडून प्रथम गुन्हा घडले त्याला सुरूवातीला रुपये पाच हजार इतका दंड द्यावा लागेल व त्याने पुन्हा गुन्हा केला तर दहा हजार रुपयाचा दंड द्यावा लागेल. आमच्या उमरग्याचे पर कॅपिटा इन्कम हे नऊ हजार रुपये आहे. समजा एखाद्याने प्लास्टिक कचरा बाहेर फेकला तर त्याने दंड भरण्यासाठी पैसे कोणाकडून आणावयाचे ? तेव्हा जे वास्तविक आहे, त्याकडे शासनाने लक्ष द्यावे. मुंबईसाठी कायदा तयार करीत असताना यातून ग्रामीण भागाला सूट द्यावी अशी माझी विनंती आहे. मूळात जी प्लास्टिक पिशव्यांची निर्मिती होत आहे, त्यावर नियंत्रण ठेवण्यासंबंधीचा विचार शासन का करीत नाही ? प्लास्टिकवर बंदी आणण्यासाठी कायदा करीत असताना चांगले प्रशासन देण्याचा विचार देखील करायला पाहिजे होता. मी आपले लक्ष पान क्रमांक 10 वरील खंड 18 (3) (एक) कडे लक्ष वेधू इच्छितो. यात नमूद केले आहे की, "जे उत्पादक, वितरक, आणि अन्य व्यक्ती, वस्तू तयार करतात किंवा तया हाताळतात त्यांच्यावर कलम 4, पोट-कलम (2) अन्वये, वस्तूंचा प्रकार, आकार, जाडी, त्यावरील खूणचिठ्ठी आणि त्यातील घटकद्रव्ये याबाबतीत आवष्टेनसामग्रीचा वापर व विल्हेवाट तसेच पदार्थांची विघटनशीलता व पुनर्चक्रीकरण याबंधातील मानके व प्रमाणत तत्त्वे याबाबतीतील अत्यावश्यक बाबी किंवा अटी निर्धारित करणे". हा सगळा विचार पॅकिंगसंबंधीचा आहे. आज ग्रामीण भागामध्ये पीव्हीसी पाईप वापरले जातात. एखाद्याने पीव्हीसीचा पाईप टाकला तर त्याला पकडून जेलमध्ये टाकणार आहात काय ? प्लास्टिक पिशव्यांना प्रतिबंध केला पाहिजे या विषयी दुमत नाही. पण आज प्लास्टिकचा वापर ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स गुडस्, डोमेस्टीक परपजसाठी होत आहे. येथे फक्त 16 प्लास्टिक प्रकाराचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु, त्यापेक्षा जास्त प्रकार मार्केटमध्ये येत आहेत. ते या सूचीमध्ये आलेले नाहीत. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की दोन लाख संख्येची जी शहरे आहेत तेथे पहिल्यांदा या कायद्याची अंमलबजावणी करण्यात यावी. तेथे शिस्त

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण ग्रामीण भाग हा शेवटी शहरांचे अनुकरण करीत असतो. तसेच, एखाद्या जिल्हा परिषदेच्या सर्कलला प्लास्टिक रिकायलनीसंबंधीचे छोटसे युनिट करता येते का? हे देखील तपासून पहावे. जे प्लास्टिक मटेरियल मिळेल त्याचे प्लॉस्टिक ग्रॅन्युअलमध्ये रुपांतर कसे करता येईल याचा विचार केला पाहिजे. असा प्रयोग वालसावंगी धावडा,भोकरदन येथे करता येईल का ? हे देखील तपासून पाहिजे पाहिजे. सवंग लोकप्रियतेसाठी कायदा केल्यानंतर त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी परमेश्वरावर टाकणे बरोबर नाही असे मला वाटते. मुंबई प्लास्टिक मुक्त करू शकलो तर ती फार मोठी यशस्वीता ठरेल. या निमित्ताने मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 20:35

श्री.श्रीकांत जोशी....

प्लास्टीक मटेरियलच्या माध्यमातून ज्या पिशव्या महाराष्ट्रात तयार होतात त्यांची संख्या किती आहे ? याबाबतचा उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात करावा. रफ पेपरच्या, वेस्ट पेपरच्या पिशव्या प्लास्टीकला व्हायबल उत्तर होऊ शकतात. दिवसाला जर 1 कोटी प्लास्टीकच्या पिशव्या लागत असतील आणि युज्ड पेपर आणि युज्ड क्लोथच्या माध्यमातून मग त्यामध्ये साडी असो त्यातून 10 लाख पिशव्या तयार होत असतील तर, 90 लाख पिशव्यांचे मटेरिअल आपण कोठून आणणार आहात ? त्यामुळे कॉटन बेस्डच्या प्लास्टीकला प्रोत्साहन देता येईल काय ? याबाबत देखील विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे चांगले प्रोडक्ट करावयाचे असेल तर त्या पिशव्यावंर अमूक एवढा टॅक्स लावावा की जेणेकरुन, कापडांच्या पिशव्या व्हायबल होऊ शकतील. त्यामुळे याचा उपयोग जास्त झाला तर, ग्रामीण भागात कॉटन मार्केटिंग आणि ग्लोबल मार्केटिंगला मार्ग मिळू शकेल. कारण दरवर्षी पिशव्या घ्यावयाच्या आणि फेकावयाच्या आणि त्यासाठी कायदा करावयाचा असा हा प्रकार सुरु आहे. मला वाटते ही बंदी करुन, हवालदारांना हप्ते घेण्यास दारे खुली गेली आहेत. मला वाटते ही बंदी आणून जनतेचे प्रश्न काही सुटणार नाहीत. पुन्हा 10-20 वर्षांनी 26 जुलैची परिस्थिती उद्‌भवल्यानंतर आपण हीच भाषणे करणार. माझ्या मते हे विधेयक अत्यंत घाईगडबडीने मांडलेले आहे. त्यामुळे या विधेयकाला अल्टरनेट पर्याय देऊन, योग्य प्रकारे कॉंक्रीट योजना आणली पाहिजे. आज अनेक मॅन्युफॅक्चरींग इंडस्ट्रीज रजिस्टर नाहीत. It has colour, it has density. It has best strength to carry the material. त्यामुळे निरनिराळया गोष्टींचा वापर योग्य प्रकारे करुन, अल्टरनेटीव्ह मटेरियल देण्याचा कार्यक्रम स्टेप-बाय-स्टेप दिला पाहिजे. त्यामुळे या मुद्यांचा विचार करुन उत्तर देणे आवश्यक आहे. त्यामुळे सहा महिन्यांच्या आत या दृष्टिकोनातून दुसरी कॉंक्रीट योजना आणली पाहिजे. So that in reality the plastic can be controlled and cotton-based material can be utilised. त्यामुळे याही बाबतीत विचार केला पाहिजे, एवढी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-14, महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

या विधेयकावर माझे मनोगत व्यक्त करीत असताना, "Prevention is better than cure" दुसऱ्या बाबतीत म्हणावयाचे झाले तर, "तहाण लागल्यावर विहिर खोदणे" असा हा प्रकार आहे. परंतु काही का असेना हे करणे आवश्यक होते. या पूर्वी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत, त्यामुळे मी त्या मुद्यांचा पुनरुच्चार करणार नाही. या विधेयकामध्ये आपण नमूद केले आहे की, राज्यातील नागरिकांकडून 5 हजार हरकती नोंदविल्या गेल्या आहेत. मग त्यामध्ये कोणत्या स्वरुपाच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत ? सूचना काय केल्या आहेत ? याची माहिती सभागृहात सांगितली तर बरे होईल. कारण त्या माध्यमातून नागरिकांच्या किमान अपेक्षा तरी समजू शकतील. तसेच असाही उल्लेख केला आहे की, हिमाचल प्रदेश अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम 1995 च्या धर्तीवर एक विशेष कायदा करणे शासनास इष्ट वाटले. त्यामुळे 1995 सालातील हिमाचल पदेशचा कायदा काय आहे ? या विधेयकाशी संलग्न आहे किंवा कसे याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती देणे आवश्यक आहे. आज प्लास्टीकचा मोठया प्रमाणावर वापर करणे जीवनाचा अविभाज्य घटक झालेला आहे. हा वापर करणाऱ्यांना झारीतील शुक्राचार्य म्हटले तर वावगे होणार नाही. महाराष्ट्रात या कायद्याची अंमलबजावणी करीत असलो तरी, खास करुन मुंबईच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर, मुंबई महापगरपालिकेचा एक कायदा आहे. ज्या ज्या ठिकाणी घरगल्ल्या आहेत किंवा या शहरात जेवढी नाले आहेत त्यांची साफसफाई फेब्रुवारी-मार्च महिन्यामध्ये करण्यात येते. त्यात जवळजवळ 50 ते 60 टक्के कचरा हा प्लास्टीकचा असतो. आपल्याकडे Nuisance detector म्हणजेच एन.डी. ची पोस्ट आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट ....

ती पोस्ट आता काळाच्या पडद्याआड गेलेली आहे. सभापती महोदय, भविष्यामध्ये प्लास्टिकवर आवर घालावयाचा असल्यास, महानगरपालिकेने ज्याप्रमाणे केले, त्याप्रमाणे न्यूसेन्स डिटेक्टरच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेला हे काम दिले पाहिजे. तरच त्यास निश्चितपणे आळा बसेल. आपण या कायद्याची अंमलबजावणी दिनांक 27 फेब्रुवारीपासून केली. आता जवळजवळ दीड महिन्यांचा कालावधी झाला. यामध्ये आपल्याला किती अनुभव आले ? या संदर्भातील अंमलबजावणी करत असताना, ज्यांनी कायद्याचे उल्लंघन केले असेल अशांच्या बाबतीत आपल्याकडे किती केसेस आल्या आणि अशाप्रकारे दंडाच्या माध्यमातून आपण या गोष्टीवर किती बंधन आणले, याची माहिती या ठिकाणी मिळणे आवश्यक आहे. सभापती महोदय, शेवटी याचे उत्पादन थांबलेले नाही. प्रचार आणि प्रसार म्हणूनच फक्त दुकाने व हॉटेलमध्ये सूचना फलक लावले जातात की, या ठिकाणी प्लास्टिकची पिशवी मिळणार नाही. येताना कागदाची किंवा कापडाची पिशवी आणावी. सभापती महोदय, गिरगांव, दादर, जुहू या ठिकाणी ओहोटीच्या वेळी पाहिल्यास आपल्याला दिसून येईल की, अजुनही मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा वापर होत आहे. याचा अर्थ अजुनही मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचे उत्पादन होत आहे. तरी, या संदर्भात प्लास्टिकला कशाप्रकारे आळा घालण्यात येणार आहे, याचेही उत्तर येथे येण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी करावयाची असल्यास एजन्सी नेमण्याची गरज आहे. या संदर्भातील जबाबदारी आपण स्थानिक स्वराज्य संस्थांवर टाकली तर ते होऊ शकेल. आपण 1 ते 16 मध्ये सगळ्यांत महत्वाचे असे अविघटनशील पदार्थ दिले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी थर्माकोलचा वापर होत असल्याचा उल्लेख केला. सभापती महोदय, उत्सवांमध्ये थर्माकोलचा वापर जास्त होतो. तरी, यावर आपण बंदी कशी काय आणाला ? राष्ट्रीय महामार्गावर आपण गेलात तर आपल्याला दिसेल की, थर्माकोलचे ग्लासेस प्रचंड प्रमाणात रस्त्यांवर पडलेले असतात. तसेच रेल्वेच्या प्रत्येक स्टेशनमध्ये असे ग्लासेस पडलेले असतात. तरी, याबाबतही आपण कोणती कार्यवाही करणार आहात, याची माहिती देण्याची आवश्यकता आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकातील दोन विसंगती मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. पृष्ठ क्रमांक 8 वर, कलम 9 (1) (क) मध्ये असे सांगण्यात आले आहे की, " पहिल्या अपराधासाठी, पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल " आणि (1) (ख) मध्ये असे सांगण्यात आले आहे की, " दुसऱ्या अपराधासाठी, दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल. " तसेच सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 9 वरील कलम 12 मध्ये असे लिहिण्यात आले आहे की, " राज्य शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास जिने या अधिनियमाखालील अपराध केला आहे किंवा जिने या अधिनियमाखालील, पहिला वा दुसरा अपराध केल्याचा जिच्यावर वाजवी संशय आहे अशा कोणत्याही व्यक्तीकडून अपराध आपसात मिटविण्यासाठी खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे रक्कम स्वीकारता येईल. " सभापती महोदय, या दोन्ही गोष्टी विसंगत आहेत. येथे भ्रष्टाचाराला फार मोठी जागा ठेवली आहे, असे माझ ो मत आहे. तरी, माननीय मंत्रिमहोदयांनी या संदर्भात स्पष्टीकरण करावे. तसेच कोणत्या कायद्याखाली संबंधित व्यक्तीस फायन केले आहे याचाही उल्लेख त्या ठिकाणी केला पाहिजे. सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 6 वरील कलम 6 (दोन) मध्ये असे म्हटले आहे की, " जमिनीवरील व इमारतीमधील सर्व प्रकारचे अविघटनशील टाकाऊ पदार्थ गोळा करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांनी विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या रीतीने विघटनशील कचरा गोळा करण्यासाठी ठेवलेल्या व वापरल्या जाणाऱ्या कचराकुंड्या व कचरापेट्या यांच्या व्यतिरिक्त, स्वतंत्र कचराकुंड्यांची तरतूद करणे आणि अशा कचराकुंड्या किंवा कचरापेट्या सुस्थितीत ठेवणे. " सभापती महोदय, याचा अर्थ असा आहे की, महाराष्ट्रामध्ये 50 टक्के शहरीकरण झाले आहे. नगरपालिका देखील आहेत, त्यांना आपण हे काम करण्यासाठी आर्थिक तरतूद देणार आहात का ? सभापती महोदय, महानगरपालिकेने इमारतीच्या मालकांना अटी घातलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

VVK/ MHM/ KGS/ प्रथम श्री. कांबळे.. 20:45

श्री. मधुकर चव्हाण....

महानगरपालिकेतर्फे इमारतींना ऑक्युपेशन सर्टिफिकेटस् देतांना यासंदर्भातील अटी आपण त्यांना घालणार आहात काय ? दुसरी गोष्ट अशी आहे की, या बिलामध्ये ज त्याचा उल्लेख नसला तरी व या विधेयकाच्या अखत्यारीत तो विषय येत नसला तरी ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात गावाच्या बाहेर कचरा गोळा होत असतो, कोकणामध्ये हा कचरा गोळा करुन जाळण्यात येतो म्हणून हा कचरा जाळण्यात यावा याबाबत ग्रामपंचायतींना सर्क्युलर काढून या गोष्टींची सक्ती करण्यात येईल काय ? याचाही मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये उल्लेख करावा. मी या बिलाचे अभिनंदन करतो यामध्ये 16 गोष्टी सांगितलेल्या आहेत, त्यामध्ये पीव्हीसी पाईप लावण्यास बंदी असावी असे मला म्हणायचे नाही, परंतु पीव्हीसी पाईपचे तुकडे हे योग्य ठिकाणीच टाकले गेले पाहिजेत. सुरुवातीला आपण ज्या 16 बाबी सांगितल्या आहेत त्या योग्य आहेत, यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, कायदा करणे सोपे असते परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी करणे महत्वाचे असते, या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपणाकडे आवश्यक तेवढे मनुष्यबळ आहे काय ? त्यासाठी बजेटरी प्रोव्हीजन आहे काय ? हया सगळया बाबी पुढील 3 महिन्यात करणे आवश्यक आहेत, या कायद्याचा प्रसार व प्रचार आपण टीव्हीच्या माध्यमातून, जाहिरातीचे बोर्ड लावून, वेगवेगळे पोस्टर लावून करणे आवश्यक आहे. या काद्यान्वये दंड करतांना आपण गेल्या दोन महिन्यात किती दंड वसूल केलेला आहे याची माहितीही देणे आवश्यक आहे. आपण दारुबंदी कायद्याची अंमलबजावणी योग्यरितीने करतात, यासंदर्भातील उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केलेला आहे. मुंबई शहरासाठी हा अत्यंत महत्वाचा असा कायदा आहे या कायद्याची अंमलबजावणी योग्यरीतीने होणे महत्वाचे आहे. आपण या कायद्याच्या संदर्भात सुध्दा प्रत्येक महिन्याला आढावा बैठक घेऊन काही शहरामध्ये कमिशनर, काही चिफ ऑफिसर यांच्यावर जबाबदारी सोपवून कायद्याची अंमजबजावणी करणे आवश्यक आहे." शपथ लेना तो सरल है, साधना का पथ कठिन है " म्हणून या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी अशी आग्रहाची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

.....2...

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) 4L-2

श्री. अनंत तरे (स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. नाईक साहेबांनी अतिशय महत्वाचे विधेयक आणलेले आहे. त्यांची उद्देश व कारणे अतिशय चांगली आहेत. प्लॉस्टिकच्या वापरावर बंदी घालण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अत्यंत विस्तृत असे भाषण केलेले आहे. महाराष्ट्र राज्य व मुंबई शहरात प्लॉस्टिकवर बंदी आणणे आवश्यक असतांना चोर सोडून संन्याशाला फाशी होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात कोणती काळजी घेणार आहेत याचा उल्लेख करण्यात आलेला नाही, तसेच प्लॉस्टिकच्या रॉ मट्रेलचे काय करणार याबाबत सुध्दा विचार होणे गरजेचे आहे. ज्या कंपन्या हा माल इम्पोर्ट करतात त्यांच्या लायसन्सवर आपण निर्बंध लादणार आहात काय ? कंपन्यावर निर्बंध बसवून 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्या ज्या दुकानदारांनी वापरल्या आहेत, जे दुकारदार अशा पिशव्या विकत घेत आहेत, त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय ? आपणाला माहिती असेल की दुकानांमध्ये फोरेन लिकर हे प्लॉस्टिकच्या पिशवीमध्ये मिळत आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

कोठून तरी त्याला आणावयास सांगतात. आणि मग तो प्लॅस्टीकच्या पिशवीतून देतो. सभापती महोदय, योगायोगाने माननीय मंत्र्यांकडे दारुबंदी खाते सुध्दा आहे. यापूर्वी विक्रोळी येथे विषारी दारुच्या सेवनामुळे 100 लोक मृत्यू पावले, त्यानंतर दारुवर थोडीशी बंदी आली होती..

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : दारुबंदी हा चर्चेचा विषय नाही.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, राज्यामध्ये दारुबंदी लागू करण्यात आली. त्यामधून किती लोकांवर शिक्षा झाली हा देखील संशोधनाचा विषय आहे. आपण राज्यामध्ये प्लॅस्टीकवर बंदी आणीत असतांना ज्याच्या हातामध्ये पिशवी मिळेल त्याला आपण शिक्षा करणार. परंतु ज्याच्या कडून पिशवी विकत घेतली जाईल त्याला आपण सोडणार काय? ती पिशवी तयार करणाऱ्यांना आपण सोडणार काय? त्यांच्यावर कोणती कारवाई करणार याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. माझी अशी सूचना आहे की, या ठिकाणी इंपोर्ट लायसन्स देत असतांना त्यांच्यावर निर्बंध लादले गेले पाहिजेत. कायद्याने त्यांच्यावर अटी लादल्या गेल्या पाहिजेत.आपण गुटख्यावर बंदी आणली होती, तरीही बाहेरच्या राज्यातून मुंबईमध्ये गुटखा येत होता. त्याप्रमाणे अशाप्रकारच्या पिशव्या बाहेरच्या प्रांतामधून येणार नाहीत यावर शासनाने निर्बंध घातले पाहिजेत. सभापती महोदय, मुंबईमध्ये नाले दिसत नाहीत. परंतु आमच्या ठाण्यामध्ये अनेक ठिकाणी नाले आहेत. त्या नाल्यामध्ये पिशव्या टाकणाऱ्या किती लोकांना आपण पकडणार आहात? आणि कुणाला शिक्षा करणार आहात? माझ्या घरासमोर जर कुणी प्लॅस्टीकची पिशवी आणून टाकली तर तुम्ही मला शिक्षा करणार काय? या ठिकाणी कायदा करणे सोपे आहे परंतु त्याची अंमलबजावणी करणे सोपे नाही. म्हणून कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी कशी होईल याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, महाराष्ट्रातील किनारपट्टीवरील मच्छिमार गेली तीन-चार वर्षे बोंबाबोंब करीत आहेत. त्यांच्या जाळयामध्ये मासे येण्याऐवजी प्लॅस्टीकच्या पिशव्या येत आहेत. त्याबाबत त्यांनी अर्ज विनंत्या केल्या तरीसुध्दा शासनाने त्याची दखल घेतली नाही. अशाप्रकारची दखल वेळीच घेतली असती तर 26 जुलै रोजी महाराष्ट्रामध्ये प्रलय झाला तो कदाचित झाला नसता. तेव्हा या ठिकाणी कायदा मोडणाऱ्यांना शिक्षा करण्याची गरज आहे ती कशाप्रकारे करणार यासंबंधी खुलासा करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ट्रेनमधून खिडकीची काच उघडून पाण्याची बाटली बाहेर फेकून दिली जाते असे सांगितले. या गोष्टीला आपण कशाप्रकारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

अटकाव करणार आहात? महाराष्ट्रातील लोकसंख्या 10 कोटींच्यावर गेली आहे. अशा परिस्थितीत लोकांवर लक्ष ठेवण्यासाठी आपल्याला खूप मोठी यंत्रणा लागणार आहे याचा आपण विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, विधेयकाच्या पाचव्या कलमामध्ये रस्त्यावरील बांधकामासंबंधी तरतूद केली आहे. मुंबई व ठाणे येथील रस्त्यावरुन आपण चालत जातो त्यावेळी आपल्याला रस्त्यावर दगड व मातीचे ढिगारे दिसतात. महानगरपालिकेने कायदा केला आहे की, रस्त्यावर कुणीही थुंकेल त्याला 500 रुपये दंड आकारण्यात यावा. याबाबत आपणाकडून खुलासा झाला पाहिजे की, महानगरपालिकेच्या माध्यमातून आतापर्यंत किती लोकांवर आपण दंड आकारला आहे. आणि म्हणून केवळ कायदा करुन हे राज्य प्लॅस्टीक पिशवी मुक्त होणार नाही. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्याप्रमाणे याबाबत जनजागृती होण्याची गरज आहे. याबाबत लोकांना समज देण्याची गरज आहे. तरच राज्याचा उद्देश सफल होणार आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 14 महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) विधेयक संमत करण्यात यावे.

सभापती महोदय, 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टीकच्या पिशव्यांवर बंदी आणलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी अतिशय मौलिक विचार मांडलेले आहेत. मला एक गोष्ट सुरुवातीलाच स्पष्ट करावयाची आहे की, या विधेयकावर सर्व सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पोटतिडकीने विचार मांडलेले आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेश त्यांनी आणलेला नाही. हे राज्य सुंदर व्हावे, या राज्यातील जनतेचे आरोग्य चांगले रहावे ही त्यांची या मागची भावना आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी प्लॅस्टीकचा वापर हा चित्रपटांचे शुटींगच्या वेळी जास्त केला जातो. शुटींग झाल्यानंतर प्लॅस्टीकच्या पाण्याच्या बाटल्या, प्लॅस्टीकच्या बॅगा वगैरे वस्तू इतस्ततः पसरलेल्या दिसतात, याबाबत सांगितले. ही गोष्ट खरी आहे की, समाजातील बरेचसे घटक या गोष्टीमध्ये स्वारस्य नसल्याचे दाखवितात. एकूणच कायदा करण्याचे उद्दिष्ट हे फक्त मुंबई शहरासाठी नाही तर महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका, त्यानंतर टप्प्याटप्प्याने अ वर्ग, ब वर्ग, क वर्ग नगरपालिकांपर्यन्त या काायद्याची अंमलबजावणी करणार आहोत. त्यानंतर अन्य ज्या 16 बाबी आहेत, त्याला आपण स्पर्श केलेला नाही, त्याकरिता निश्चितपणे यंत्रणा काम करेल. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी प्लॅस्टीकच्या बॅगांची निर्मिती करणे, त्याची साठवणूक करणे, विक्री करणे याबाबत सांगितले. आपीसीएल आणि रिलायन्स ही रॉ मटेरियलची निर्मिती करते. या राज्यामध्ये प्लॅस्टीकवर पूर्णपणे निर्बंध घालण्याचा निर्णय केला तर त्याचे दुष्परिणाम देखील आपल्याला भोगावे लागतील. या उद्योगामध्ये काम करणारे कामगार बेकार होतील. दुसरे असे की, 50 मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या पिशव्यांचे रिसायकलिंग करण्यासंबंधातील उल्लेख सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी केला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी पूर्वीच्या काळी कचरपट्टीचे डंपिंग केले जात होते. त्यावेळस प्लॅस्टीक नव्हते. त्यामुळे तो कचरा त्याच ठिकाणी दबला जात होता. वर्षानुवर्षे त्या ठिकाणच्या कचरपट्टीची जागा तशीच रहात होती. परंतु प्लॅस्टीकच्या कचऱ्यामुळे थर जमा झाले, कुजण्याची प्रक्रिया बंद झाली, त्यामुळे ते ढीगारे वाढत गेले. नव्याने कचरा कोठे टाकावा असा प्रश्न महानगरपालिकेला पडलेला आहे. पूर्वीच्या काळी प्लॅस्टीक नसल्यामुळे कचऱ्या पासून कंपोस्ट

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ SBT/ MHM/ MAP/

श्री.गणेश नाईक (पुढे सुरु......

खत तयार केले जात होते. प्लॅस्टीकचा वापर करण्याकरिता श्री.उमेश घाडगावकर आणि त्याच्या पत्नीने क्रूड डिझेल तयार करण्यास सुरुवात केलेली आहे. श्री.घाडगावकर हे नागपूरचे रहाणारे आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक....

त्यानंतर प्लाझ्माचा उल्लेख करण्यात आला. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा उल्लेख करण्यात आला. टी.व्ही. खराब झाला तर तो कोठे टाकावयाचा ? संगणक खराब झाल्यानंतर तो कोठे टाकावयाचा ? मोबाईल फोन कोठे टाकावयाचा ? प्लाझ्मा यंत्रणेमध्ये त्यांचा फार मोठ्या प्रमाणावर वापर होणार आहे. अतिशय उष्ण तापमानामध्ये त्याचे ज्वलन होईल. त्यामुळे ध्वनीचे प्रदुषण होणार नाही. कोणत्याही प्रकारचे प्रदुषण होणार नाही. या प्रकल्पाचा जपान, अमेरिका इत्यादी देशांमध्ये वापर होतो. टोकियो सारख्या शहरामध्ये या प्रकल्पाचा वापर होतो. त्यामध्ये धूर होत नाही, आवाज होत नाही. 70-80 कोटी रुपयांचा प्रकल्प आहे. त्यातून 15 मेगावॅट वीज तयार होते. त्यातील 4 मेगावॅट वीज त्या संयत्रासठी लागते आणि 10 ते 11 मेगावॅट वीज सरप्लस होते. त्याचा जर आपण वापर केला तर पाच ते सात वर्षामध्ये केलेली गुंतवणूक भरुन निघू शकते. भविष्यकाळाच्या अनुषंगाने यांचे विघटन कसे करावे, रिसायकल कसे करावे याचा विचार केला जाणार आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी रिपेअर, रिसायकल आणि रिजनरेशन या तीन गोष्टी सांगितल्या. त्या अनुषंगाने शासनाची पावले पडत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी एमपीसीएलच्या कर्मचाऱ्यांबाबत सांगितले. त्या ठिकाणी कर्मचारीवर्ग कमी आहे. या ठिकाणी महापालिका आयुक्त तसेच नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्याकडून टप्प्याटप्प्याने ते नियंत्रणात येणार आहे. अंतिम टप्प्यामध्ये एमपीसीएल आणि जिल्हाधिकारी ही कार्यवाही होत आहे की, नाही हे पाहणार आहेत. एमपीसीएलचे अधिकारी आणि ही संपूर्ण यंत्रणा हे काम करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी एस.टी.पी. चा उल्लेख केला. महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर असे पाणी तयार होते त्याचा पुनर्वापर का करीत नाही ? असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. गोव्यामध्ये श्री. मनोहर पर्रीकर यांच्या कालखंडामध्ये अतिशय कमी जागेमध्ये दीर्घ काळासाठी परिणामकारक होईल अशी एस.टी.पी. योजना सुरु केली. नवीन मुंबईमध्ये पाच ठिकाणी त्याचा उपयोग होणर आहे. त्यामध्ये 80 टक्के पाणी रिसायकल होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या एस.टी.पी.चा उल्लेख केला ते करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्यंनी अशी सूचना केली की, रस्ते तयार करताना ज्यावेळी डांबर गरम करतो त्यावेळी प्लास्टीकचा वापर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ SBT/ MHM/

श्री. गणेश नाईक .....

करावा. तसा प्रयोग करण्याचे पर्यावरण विभागाने ठरविले आहे. पथदर्शक योजना म्हणून रस्ता तयार करणार आहोत. त्यातून कशा प्रकारचा रिझल्ट येतो ते बघणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी एक सूचना केली. हे केवळ मुंबईसाठी नाही. पुढे याची अंमलबजावणी खेडेगावपर्यंत होईल. सन्माननीय सदस्यांनी ओल्या आणि सुक्या कचऱ्याच्या कचराकुंडीचा उल्लेख केला. आम्ही कायदा केला म्हणजे 100 टक्के यशस्वी झालो असे या क्षणी म्हणणार नाही. असे म्हणणे म्हणजे न केलेल्या कार्याची हमी देण्यासारखे आहे. परंतु भविष्यामध्ये निश्चितपणे सुधारणा करणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी हप्त्याच्या बाबतीत सांगितले. 10 हजार रुपये दंड असेल तर त्या ठिकाणी ॲडजस्टमेंट करण्याची संधी आहे. प्रत्येक ठिकाणी आपण हे पाहतो. परंतु हे वाईटच आहे या भावनेतून आपण बघू नये. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या बाबतीत जसे आपण एकत्रितपणे त्या ठिकाणी गेलो आणि त्यामुळे जसे चित्र उमटले तशा प्रकारे प्लास्टीकच्या बाबतीत सुध्दा आपण ज्या भावनेतून बोलला ती भावना टिकली तर समाजातील नालायक लोकांनाही वाटेल की, आपल्यावर सुध्दा जबाबदारी आहे आणि आपण जबाबदारीने वागले पाहिजे. मी नम्रपणाने सांगेन की, ज्या भावनेतून आपण या ठिकाणी बोलत आहात ती भावना निश्चितपणे रुजविण्याचा प्रयत्न होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितले की, एका ठिकाणी पाच हजार रुपये दंड आणि दुसरीकडे कंपाऊंडेबल किंवा मांडवली आहे. याबाबत मी नंतर सांगतो.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गणेश नाईक...)

सन्माननीय सदस्य श्री. विलास अवचट यांनी 5 हजार हरकती आल्याचे सांगितले. उद्योग प्रतिनिधींकडून कमी हरकती आलेल्या होत्या. प्लॅस्टिक बंद करु नये असे त्यांचे म्हणणे आहे. कामगारांच्या प्रतिनिधींनी देखील असे सांगितले की, प्लॅस्टिक बंद केले तर आम्हाला नोकरीला मुकावे लागेल. 50 मायक्रोच्या पिशव्या वेचणारे जे लोक आहेत त्यांना त्यापासून रोजगार मिळणार आहे. कारण 50 मायक्रोच्या प्लॅस्टिकचे रिसायकलींग होणार आहे. प्लॅस्टिकच्या पातळ पिशव्या ह्या अतिशय घातक असून त्यापासून कॅन्सरसारखा रोग होतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जनजागरण झाले पाहिजे असे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील कर्मचारी वर्ग आणि निधीचा उल्लेख केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, प्रदुषण नियंत्रण मंडळाला स्वत:चे फंडस् आहेत. त्यांना शासनाच्या निधीची आवश्यकता भासत नाही. विविध घटकांकडून त्यांना फीच्या स्वरुपात निधी मिळतो. भविष्यकाळात हा निधी वाढणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे प्लॅस्टिकमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक शाळा, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्याची आवश्यकता आहे. मी 15 दिवसांपूर्वी शेगाव येथे गेलो होतो. शेगांव येथील संस्थानावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. मल्टी नॅशनल कंपन्यामध्ये जे व्यवस्थापन होऊ शकणार नाही अशा प्रकारचे व्यवस्थापन शेगाव येथील संस्थानामार्फत होत आहे. त्याठिकाणी 100 कोटी रुपये खर्च करुन आनंदसागर नावाचे अतिशय सुंदर गार्डन केलेले आहे. त्याठिकाणचे सौंदर्य आणि एकूणच सेटअप पाहिल्यानंतर त्या ठिकाणी लोक स्वयंस्फूर्तीने आणि श्रध्देने काम करीत असल्यामुळेच हे शक्य झालेले असल्याचे दिसून येते. जेथे श्रेध्देने काम केले जाते त्याठिकाणी पावित्र्य असते आणि त्यातूनच चांगल्या गोष्टींची निर्मिती होते. मला एक गोष्ट याठिकाणी नमूद केली पाहिजे की, केवळ सरकारच या सर्व गोष्टी करु शकणार नाही. यासाठी सर्व स्तरातील घटकांच्या मदतीची गरज आहे. माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी मच्छिमारांच्या बाबतीत सांगितले. आपण दोघेही त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच झटत असतो. पॉली प्रॉपलीन आणि पॉली इथेलिन या दोन घटकापासून निर्माण झालेल्या गोष्टींचे विघटन होत नसल्यामुळे त्यावर बंदी आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये कचरा कुठे ठेवावा आणि कुठे ठेवू नये हे बंधनकारक केलेले आहे. हा कचरा एकत्र करुन तो रिसायकलिंगसाठी पाठविला जाईल.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक ...

मघाशी मी सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकांमध्ये आयुक्त,नगरपरिषदांमध्ये मुख्याधिकारी आणि जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण राहील. उत्पादनावर प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि उद्योग विभाग यांचे नियंत्रण राहील. पहिल्या गुन्हयासाठी 10 हजार रु. दंड दुसरा गुन्हा केला तर 3 महिन्यांचा कारावास आणि 25 हजार रु. दंड केलेला आहे. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी पातळ पिशव्यांचा उल्लेख केला. या पिशव्या अतिशय पातळ आहेत आणि त्यामध्ये थॅलेड नावाचे केमिकल आहे ज्यामुळे कॅन्सर होतो. या घटकावर अतिशय मोठया प्रमाणावर नियंत्रण ठेवण्याचे ठरविण्यात आलेले आहे. अशा प्रकारच्या घटकाला सोडायचे नाही. मानवाच्या जीवनामध्ये एक प्रकारे विष कालविण्याचे काम हे घटक करीत आहेत. आपल्या राज्यामध्ये महाबळेश्वर,माथेरान आणि पाचगणी या तीन ठिकाणी नगरपालिकेने प्लॅस्टीक पिशव्या वापरण्यावर बंदी घातलेली आहे. इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या बाबतीत कशा प्रकारे विघटन होईल याबाबत सध्याची प्लाझमा टेक्नॉलॉजी आहे त्यातून हे विघटन होणार आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी शिक्षेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. खंड 9 मध्ये याबाबत उल्लेख करण्यात आला आहे. पहिल्या अपराधासाठी 5 हजार रुपयापर्यंत दंड आकारण्यात येईल. दुसऱ्या अपराधासाठी 10 हजार रु.दंड आकारण्यात येईल. खंड 12 मध्ये आपापसात अपराध मिटविण्यासाठी रक्कम स्वीकारता येईल. ही रक्कम कंपाउंडींग करण्याचे ठरविलेले आहे. यामध्ये पोलीस खात्यामध्ये जे नियम आहेत त्यामध्ये अशी तरतूद आहे की दंड किंवा अधिक शिक्षा किंवा शिक्षेच्या जागी दंड अशी तरतूद आहे. कोर्टातील प्रकरणे निकाली काढण्यासाठी न्यायाधीश पुरु शकत नाहीत. म्हणून सक्षम अधिकाऱ्याला अधिकार दिलेले आहेत....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अधिकाऱ्यांना ज्या डिस्क्रीशनरी पॉवर्स दिलेल्या आहेत त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. एखाद्याला पकडल्यानंतर दंड किंवा मांडवली करण्याचा अधिकार त्याच्याकडे राहणार आहे. तो म्हणेल की, It is in my hand. I can misuse that power.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, एखाद्या गोष्टीवर नियंत्रण आणणे म्हणजे भ्रष्टाचाराला एक्सपोज करण्यासारखे आहे. थर्माकोलचाही यामध्ये समावेश आहे. लोखंड,लाकूड सर्व पदार्थ डिझ्ॉल केले आहेत. सभापती महोदय, 13.3.2006 ते 28.3.2006 या कालावधीत

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ...

86950 तपासण्या करण्यात आल्या. त्यातून एकूण 4586 प्रकरणे करण्यात आली तसेच एकूण 7 टन 147 कि.ग्रॅ.प्लॅस्टीक प्राप्त झाले आणि एकूण 14 लाख 15 हजार 30 रु. दंड वसूल करण्यात आला. त्याचप्रमाणे 13.3.06 ते 31.3.06 या कालावधीत राज्यात धडक मोहीम घेण्यात आली आणि त्यातून 10769 तपासण्या करण्यात आल्या त्यातून एकूण 5070 प्रकरणे करण्यात आली आणि त्यतून 7 टन 343 कि.ग्रॅ.प्लॅस्टीक प्राप्त करेण्यात आले. अशा प्रकारे एकूण 15 लाख 18 हजार 680 रु. दंड आकारण्यात आला.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 19, (दोन्ही सम्मिलित),अनुसूची विधेययकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.गणेश नाईक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 14 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 14 संमत झाले आहे.

...

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL No.XLIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958.)

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 43 - मुंबई मुद्रांक अधिनियम 1958, यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले.

श्री.नारायण राणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 43 - मुंबई मुद्रांक अधिनियम 1958, यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 यात आणखी सुधारण्या करण्याकरिता हे विधेयक मांडण्यात आले आहे. मुंबई मुद्रांक शुल्क 1958 च्या 52 व्या कलमामध्ये सुधारणा केलेली आहे. दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्याचा विचार करून राज्य सरकारने सवलती दिलेल्या आहेत. वडिलोपार्जित मालमत्तेवरील हक्कमागणी सोडून देण्यासाठी पूर्वी मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या 1 टक्का मुद्रांक शुल्काचा दर होता. तो आता रुपये 200 करण्यात आलेला आहे. सन 2004-2005 पूर्वी असलेले 10 टक्के पर्यंतचे मुद्रांक शुल्क दर 5 टक्के पर्यंत कमी केले आहेत. उद्योगधंदे, व्यापार उभारणीसाठी व चालविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या गहाण खताचे दरही 0.5 टक्के पर्यंत आणले आहेत. या सोबतच काही नवीन बाबी मुद्रांक शुल्क आकारणीच्या कक्षेत आणलेल्या आहेत. नागरिकांना मुद्रांक जलदगतीने उपलब्ध व्हावे म्हणून बँकांमार्फत मुद्रांक विक्री चालू केलेली आहे. पूर्वी रुपये 1 लाख किंमत असलेल्या सहकारी संस्थेतील सदनिका/भूखंडास मुद्रांक शुल्क आकारणी पासून सवलत होती, ही सवलत आता रुपये अडीच लाख मूल्यास लागू करण्यात आली आहे. म्हणजेचे पूर्वी रुपये अडीच लाखापर्यंत 0.5 टक्के (रुपये 1250 पर्यंत) मुद्रांक शुल्क आकारले जायचे ते आता रुपये 100/- इतके आकारले जाईल.

यानंतर श्री.बोर्डे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

यासोबतच रुपये 5 लाख किंमत असलेल्या घरासाठी/भूखंडासाठी रुपये 8750/- मुद्रांक शुल्क देय होते. ते आता रुपये 7,600 या रकमेपर्यंत कमी करण्यात आले आहे. तसेच डिपॉझिट ऑफ टायटल डिड व हायपोथीकेशन डिड या गहाणखताच्या दस्तावर 0.5 टक्के मुद्रांक शुल्क देय होते व यासाठी उच्चतम मर्यादा रुपये 10 लाख करण्यात आलेली होती. आता हे दर 0.1 इतके कमी करण्यात येत आहे व उच्चतम मर्यादा देखील रुपये 5 लाख इतकी कमी केलेली आहे. लिव्ह अँड लायसन्सवर पूर्वी 10 लाखापर्यंतच्या मूल्यांसाठी रुपये 3 हजार इतके मुद्रांक शुल्क देय होते. ही 10 लाखाची मर्यादा आता रुपये 20 लाख करण्यात येत आहे. बांधा-वापरा-हस्तांतरित करा या पध्दती खालील प्रकल्प तसेच पथकर वा फी वसुली करण्याचा हक्क यासबंधीच्या दस्तऐवजावर 0.1 टक्के दराने किमान रुपये 100/- व जास्तीत जास्त रुपये 5 लाख करण्याचा प्रस्ताव आहे. वर्कस् कॉन्ट्रॅक्ट (कार्यकंत्राट) दस्तऐवजावर पहिल्या 10 लाखांपर्यंत रुपये 100/- व पुढच्या प्रत्येक लाखाला रुपये 100/- या दराने मुद्रांक शुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. याची किमान मर्यादा रुपये 5 लाख असेल.

अशा प्रकारे विविध सवलती देणारे हे विधेयक आहे. यामध्ये कर लागणार नाहीत. गेल्या वर्षी याच मुद्रांक विभागाने 4500 कोटी रुपयांचे उद्दीष्ट ठेवले होते. परंतु उद्दीष्टांपेक्षा 800 कोटी रुपये जास्त तिजोरीत टाकले आहे. तब्बल 5300 कोटी रुपये उत्पन्न या विभागाने तिजोरीत टाकले आहे. त्यामुळे लोकांना सवलती दिलेल्या आहेत. सुटसुटीत कराचे धोरण असावे म्हणून हे विधेयक आणलेले आहे. हे विधेयक सवलतीचे आहे. मध्यमवर्गीयांना आणि गरीबांना उपयुक्त असे हे विधेयक आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा द्यावा एवढीच या निमित्ताने विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक-43, मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

महोदय, मुंबई मुद्रांक अधिनियम-1958 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे. या विधेयकामध्ये सवलती दिल्या आहेत. आजकाल अशी परिस्थिती आहे की, मुद्रांक म्हटले की, छाती धडधडायला लागते. तेलगीने साऱ्या महाराष्ट्राला आणि महाराष्ट्र शासनाला खाऊन टाकले आहे. हे प्रकरण सध्याच्या मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात मांडले होते. त्यामुळे हे प्रकरण किती मोठे आहे याची त्यांना चांगलीच माहिती आहे. याबाबत निदान आम्ही तरी त्यांना काही सांगण्याची गरज नाही. या धोटाळयामुळे राज्याची बदनामी झाली आहे. काही अधिकाऱ्यांना तुरुंगवास सुध्दा झालेला आहे. या घोटाळयामुळे देशामध्ये महाराष्ट्राची बदनामी झालेली आहे. हा घोटाळा महाराष्ट्राला पुरुन उरणारा आहे.

महोदय, मुद्रांकामध्ये सवलती दिल्या जात असल्याबद्दल बरे वाटत आहे. या सवलती समाजातील कमजोर घटकांतील लोकांसाठी आहेत. ज्यांना दोन-चार-दहा लाखांचे घर मिळणार आहे त्यांच्यासाठी आहेत. मुंबई-पुणे वा अन्य शहरांमध्ये या मुद्रांक सवलतीचा उपयोग होणार आहे. या विधेयकावर बोलत असताना विधेयकाच्या उद्देश व कारणे यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

विधेयकातील उद्देश व कारणे यातील (ख) मध्ये असा उल्लेख आहे की, "अधिनियमाच्या अनुसूचीमधील अनुच्छेद 5 (ह) (अ) (चार) अन्वये आकारणीयोग्य असलेल्या अप्रतिभूत कर्जांच्या संलेखांवरील मुद्रांक शुल्क 60 टक्क्यांनी कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे." तसेच "ग" मध्ये असा उल्लेख आहे की, "बांधा, वापरा व हस्तांतरित करा या प्रकल्पांना उत्तेजन देण्यासाठी, मुद्रांक शुल्काचे दर कमी करुन अशा करारनाम्यांना स्वतंत्र कायदेशीर दर्जा देण्याचे प्रस्तावित केले आहे." महोदय, आज नवीन टेंडंसी "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" निघाली आहे. अनेक प्रकल्प या प्रकारामध्ये येत आहेत. त्यांना सुध्दा मुद्रांक शुल्काच्या सवलती मिळाल्यामुळे अनेक व्यक्ती अशी कामे हाती घेण्यासाठी पुढे येतील आणि निश्चितच त्यांचा त्यांना फायदा मिळेल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, या ठिकाणी उद्देश व कारणे यामध्ये, " हक्कलेख - निक्षेप, हडप " असा उल्लेख केलेला आहे. हा " हडप " शब्द या ठिकाणी का वापरला आहे ? हडप केलेली प्रॉपर्टी, घर किंवा जमीन यांवर आपण काही सवलत देणार आहात का ? हे आम्हाला माहित नाही. सभापती महोदय, " हडप " या शब्दाचा अर्थ मला नीट समजलेला नाही. तरी, आपण आपल्या उत्तरामध्ये याबाबत सांगितले तर बरे होईल. हडप करणाऱ्यांना सवलत मिळावी, असे आमचे मत नाही. सभापती महोदय, त्यामध्येच पुढे असे लिहिले आहे की, " तारण किंवा तारणगहाण संलेखांच्या अंमलबजावणीस उत्तेजन देण्यासाठी उक्त अनुसूचीमधील अनुच्छेद 6 अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क 80 टक्क्यांनी कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे आणि अशा संलेखांवरील कमाल दहा लाख रुपयांच्या मुद्रांक शुल्काची रक्कम पाच लाख रुपयांपर्यंत कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे. " त्याचप्रमाणे 2 (ड) मध्ये असे देण्यात आले आहे की, " समान्य नागरिकांचे स्वत:च्या मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यास सहाय्य करण्याकरिता, निवासी जागांच्या संबंधातील अभिहस्तांतरणपत्रावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क (अनुच्छेद 25(ड)) पहिल्या 2,50,000 रुपयांकरिता 0.5 टक्कयांवरुन ते शंभर रुपये इतके कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे. " सभापती महोदय, 2,50,000 ला 0.5 टक्क्यांवरुन ते शंभर रुपये आकारमान लावलेले आहे. त्याचप्रमाणे 2(च) मध्ये असे देण्यात आले आहे की, " उक्त अनुसूचीतील अनुच्छेद 52 खालील वडिलोपार्जित मालमत्तेतील हक्कमागणी सोडून देण्याच्या संबंधातील परिमोचनपत्राच्या संलेखावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क 1 टक्क्यांवरुन दोनशे रुपये इतके कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे. " शेवटी 2(छ) मध्ये असे सांगण्यात आले आहे की, " कार्यकंत्राटाच्या संबंधातील संलेखांवर मुद्रांक शुल्क बसविण्याची तरतूद करण्याकरिता, उक्त अनुसूचीमध्ये नवीन अनुच्छेदाचा समावेश करण्याचे प्रस्तावित केले आहे. " सभापती महोदय, अशा विविध पध्दतीने मुद्रांक शुल्काची जी आकारणी केली जाते, त्यामध्ये सवलत देण्यासाठी माननीय मंत्रिमहोदयांनी हे विधेयक आणले आहे. पूर्ण जगातील टॅक्स स्ट्रक्चर तपासून पाहिले तर आपल्याला दिसेल की, महाराष्ट्रातील टॅक्स स्ट्रक्चरमुळे लोकांचे जीवन खूप असह्य होत आहे. उदाहरणार्थ इंकम टॅक्स.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

कर्मचाऱ्यांच्या पगारावर घेण्यात येणाऱ्या करासंबंधी महाराष्ट्रात अनेक तक्रारी आहेत. सभापती महोदय, विधेयकाचा याच्याशी काही संबंध नाही. सभापती महोदय, मी या ठिकाणी आपल्याला वाचून दाखविले आहे. या ठिकाणी पूर्वी काय होते ? आणि आज काय आहे ? याचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. त्यानंतर या विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 9 वर असे लिहिण्यात आले आहे की, " भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207 अन्वये राज्यपालांची शिफारस (महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत) " भारताच्या संविधानच्या अनुच्छेद 207 याच्या खंड (1) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक, 2006 विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत. " " सभापती महोदय, या ठिकाणी आणखी काही गोष्टींवर प्रकाश टाकता येईल. परंतु अडचण अशी झालेली आहे की, मघापासून आपण बोलायला लागले की बेल वाजविता. मी मघापासून काही बोललो नाही. अनेक सन्माननीय सदस्य या विधेयकावर बोलायला उभे राहिले होते. सन्माननीय सदस्य बोलायला थांबत असताना देखील माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी, दोन मिनिटांत बोला हे सांगणे बरोबर नाही.

तालिका सभापती : मी आपल्याला तसे सांगितले नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी माननीय सभापतींना सभागृहामध्ये विनंती केली होती की, 8 वाजता बैठक आहे, त्यामुळे मी असे सांगितले होते. बिलावर किती बोलायचे, हा आपला प्रश्न आहे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक अत्यंत महत्वाचे आहे, हे विधेयक आणतांना महसूल मंत्री महोदयांनी सांगितले आहे की या विधेयकाच्या माध्यमातून शासनाला 800 कोटी रुपयांचा महसूल मिळालेला आहे. अनेक बाबी यामध्ये मंत्री महोदयांनी सांगितलेल्या आहेत, या सगळया गोष्टी सांगत असतांना त्यामध्ये आम्हाला काही सूचना करावयाच्या आहेत, त्या सूचनांमधून जर महाराष्ट्रातील महसूलामध्ये आणखी काही भर पडत असेल व मुद्रांक शुल्क कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये काही बदल घडत असतील तर ते योग्य होईल. आता साडेनऊ वाजले असतांना या बिलावर सविस्तर बोलणे शक्य नसल्यामुळे, एका चांगल्या वातावरणात जर ही चर्चा घडवून आली तर चांगले होईल, म्हणून हे विधेयक ऑनलेग ठेवावे व या विधेयकावर उद्या चर्चा घ्यावी, अशी माझी माननीय सभापती महोदयांना विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची अत्यंत चांगली अशी सूचना मांडलेली आहे, विधानसभा व विधानपरिषद या सदनामध्ये कायदा करणे हे अत्यंत महत्वाचे काम आहे, कायदा करीत असतांना चर्चेसाठी भरपूर वेळ मिळावयास पाहिजे. मी संसदेमध्ये असतांना व विधानसभेमध्ये असतांना असेच घडत आलेले आहे, कारण विधेयकावर भरपूर चर्चा करण्यास वेळ मिळत नाही. माननीय महसूल मंत्री विरोधी पक्षनेते असतांना त्यांनी अनेक विधेयकांवर भाषणे केलेली आहेत. या विधेयकामध्ये काही सुधारणा करतांना त्या विचारपूर्वक व घाईघाईने करणे योग्य होणार नाहीत. आपण या सभागृहामध्ये डान्सबार बंदीचा कायदा मंजूर केलेला आहे. तेव्हा आमच्या काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते की, हा कायदा अपुरा आहे, या कायद्याच्या विरोधात जर कोणी कोर्टात गेले तर ती केस बोर्डावर टीकणार नाही, शेवटी तेच झालेले आहे, विधानमंडळात कायदा पास झाला, परंतु तो आता परत आलेला आहे. हे असे होऊ नये म्हणून Mr. Chairman, Sir, one should be in a position to apply his mind while speaking on the provisions of the Act. विधेयकावर नीट पध्दतीने व तपशीलवार चर्चा करुन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असते, म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना येथे मांडलेली आहे, ती अत्यंत योग्य अशी आहे. Sir, my humble request to you and to this august House is that if we keep this Bill tomorrow for discussion then I will be on my legs tomorrow. Let us keep

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

this Bill tomorrow. Sir, we will continue this Bill tomorrow. This is my suggestion. But, it does not mean that we are reluctant to pass this Bill. That is not the case. या विधेयकाकडे त्या दृष्टीकोनातून पाहतांना हे विधेयक विधानसभेने संमत केलेले आहे ते आता विधानपरिषदेमध्ये पास होणारच आहे, परंतु यासंदर्भात जर काही विस्तृतपणे चर्चा करता आली तर योग्य होईल. मी या विधेयकाचे अभिनंदन करीत आहे. परंतु सकाळी 10 वाजल्यापासून रात्री 12 वाजेपर्यंत कामकाज करणे योग्य नाही, लोकप्रतिनिधींना आपण वेठबिगार समजत आहात काय ? नेहमीच विधेयकाच्या संदर्भात असेच होते, शेवटी विधेयके घेण्यात येतात व वेळ कमी असल्यामुळे घाईघाईने विधेयके पास करण्यात येतात, कारण सकाळी 10 पासून रात्री 12 पर्यंत कामकाज करावे लागत आहे. तरी या सुचनेचा आपण विचार करावा. या दृष्टीकोनातून मला हे सांागावयाचे होते, मी आता जास्त भाषण न करता माझे बोलणे थांबवितो.

.....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये असे म्हटलेले आहे की, सन 2006-2007 या वर्षाकरिता माननीय वित्त मंत्र्यांनी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केल्याप्रमाणे... खरे तर या भाषणाचा येथे उल्लेख का करावा लागला तर जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गते ज्या पाच गोष्टी सांगितलेल्या आहेत त्यातील ही एक गोष्ट आहे म्हणून हे विधेयक येथे आणलेले आहे.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

परंतु या सरकारने गेल्या दोन वर्षामध्ये काही केले नाही. यू.आर.एम. आय. चा मुद्दा आला त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला स्टँप डयुटीमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. मी या ठिकाणी दोन-तीन मुद्दे मांडणार आहे. मुद्रांक व न्यायालयीन शुल्कामुळे महाराष्ट्राच्या तिजोरीमध्ये 12 टक्के महसूल जमा होतो. विक्री करानंतर खऱ्या अर्थाने मोठया प्रमाणामध्ये महसूल यामधून जमा होतो व तो आपल्याला विकासाच्या कामासाठी वापरावयास मिळतो. सभापती महोदय, कलम 52(अ) मध्ये स्टँप डयुटीमध्ये सवलत देण्यासंदर्भात मंत्रिमहोदयांनी सांगितले. त्यांनी 10 लाखापर्यंत अप्पर मुद्रांक नियंत्रकाला अधिकार दिले आहेत. हा अधिकार दिल्यानंतर त्याबाबतच्या निर्णयाची फाईल त्यांच्याकडे आल्यानंतर त्यावर निर्णय घेण्यासाठी काही दिवसाचे बंधन घातले पाहिजे. कारण दहा लाखापर्यंतची अमाऊंट मोठी असल्यामुळे आपण वेळेचे बंधन घातले पाहिजे. आणि ती फाईल अमूक इतक्या दिवसात क्लिअर झाली पाहिजे . यासाठी आपण वेळेचे बंधन घातले तर भ्रष्टाचाराचा स्कोप कमी होईल.

सभापती महोदय, कलम 3(3) मध्ये "मुख्य नियंत्रक महसुली प्राधिकारी, असा अर्ज मिळाल्यावर, अशी सवलत द्यावी किंवा कसे याबाबत गुणवत्तेनुसार निर्णय घेईल आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यावर आदेश देईल आणि तो आदेश अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात आक्षेप घेता येणार नाही" असे म्हटले आहे. सभापती महोदय, मला वाटते की, अशी कोणतीही गोष्ट असू नये की, त्याला आपले म्हणणे मांडण्यासाठी स्कोप नाही. त्यासाठी केवळ राज्य महसूल प्राधिकरणाकडे किंवा वरच्या ॲथॉरिटीकडे अपिलाचे अधिकार ठेवले आणि आपण त्यांची दारे बंद करुन टाकली तर त्याच्यावर अन्याय झाल्यामुळे त्यांनी न्याय कुठे मागावयाचा याचा विचार केला पाहिजे?

माननीय महसूल मंत्र्यांनी म्हटले की, गरीब आणि मध्यमवर्गासाठी आलेले हे विधेयक आहे हे खरे आहे. झोपडपट्टीमध्ये रहाणाऱ्या माणसाने जर अडीच लाखाचे घर घेतले तर त्याला 5 हजार रुपये स्टँप डयुटी भरावी लागणार होती त्याऐवजी त्याला 100 रुपये भरावी लागणार आहे. माझी याबाबत आग्रहाची मागणी आहे की, किमान मुंबई, पुणे व नागपूरमध्ये आज मध्यमवर्गीय माणूस किमान 500 चौरस फूटाचे घर 15 लाखापर्यंत घेतो. त्याला जर आपण या सवलतीमध्ये आणले तर सरकारचा मूळ उद्देश गरिबांना मदत करण्याचा आहे हे सिध्द होईल. आज मध्यमवर्गीय माणसाला सवलत मिळाली पाहिजे असे आपल्याला वाटते. सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणूस खऱ्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

अर्थाने आपल्या तुटपुंज्या पगारामध्ये कसेबसे जीवन जगत आहे. आज शहरामध्ये नवरा-बायको दोघे नोकरी करीत असतात. त्यातील एकाच्या पगारामध्ये कर्जाचे हप्ते भागविले जातात तर दुसऱ्याच्या पगारामध्ये मुलांचे शिक्षण, डोनेशन, घरखर्च इत्यादी गोष्टींसाठी खर्च केला जातो. या दृष्टीने शहरातील मध्यमवर्गीय गरिबांना खऱ्या अर्थाने आपल्याला मदत करावयाची असेल तर आपण अडीच लाखाचे सिलिंग काढून ते 15 लाखापर्यंत नेऊ शकलो तर खऱ्या अर्थाने या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये व्यक्त केलेला मनोदय समर्पक होईल. त्यादृष्टीने हे विधेयक मंजूर करीत असतांना असा विचार करावा असे मी आग्रहाने या ठिकाणी विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये जाहीर केले होते त्याप्रमाणे मध्यमवर्गीयांना खूप सवलती मिळतील असे वाटले होते. त्यादृष्टीने हे विधेयक स्वागतार्ह वाटले तरी त्या बाबतीत खूप अपेक्षा आहेत, या विषयावर वेगवेगळया प्रकारे खूप चर्चा होऊ शकते. सभापती महोदय, आपण सुध्दा ॲडव्होकेट आहात, आणि मी देखील सामाजिक क्षेत्रामध्ये काम करीत असते याची आपल्याला कल्पना आहे. या विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रतीमधील एका शब्दाचा अर्थबोध होत नाही. विधेयकाच्या मराठी प्रतीमधील उद्देश व कारणांमधील (घ) कॉलममध्ये "हडप" असा शब्दप्रयोग आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु..

"हडप" च्या संदर्भात आदरणीय महसूल मंत्र्यांकडून स्पष्टता झाली तर बरे होईल. हडप केलेल्या जागांच्या संबंधात वैधता कशी मानायची ? इंग्रजीमध्ये "पॉन" असा शब्द वापरलेला आहे. Sir, the Statement of Objects and Reasons of this Bill, it has been mentioned that: "For inspiring execution of the instruments of deposit of title deeds, pawn, pledge or hypothecation. etc., etc" यामध्ये "तारण, तारण गहाण" असे म्हटलेले आहे. मराठीचा अभिमान बाळगतो, परंतु मराठी भाषा अवघड वाटायला लागलेली आहे. "पॉन" या इंग्रजीमधील शब्दाला मराठी प्रती शब्द "हडप" असा केलेला आहे. आपण इंग्रजीची भाषा करायला लागलेलो आहोत. यातून 'बेकायदेशीर' असा अर्थ काढला किंवा 'जागा गिळंकृत केली' असा सुध्दा अर्थ लावला जाऊ शकतो. अशाप्रकारचा अर्थ लावून त्याबाबतचा निर्णय दिला गेला तर अनर्थ ओढवू शकतो. आता रात्रीचे पावणे दहा वाजत आलेले आहे, दिवसभर सन्माननीय सदस्यांनी काम केलेले आहे. त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. परंतु महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये "हडप" अशाप्रकारच्या शब्दाचा समावेश व्हायला लागला तर या सदनाबद्दल बाहेर काय मत होईल ? याचा विचार केलेला बरा. आपले राजकीय मतभेद असले तरी यामध्ये जो "हडप" शब्द घातलेला आहे तो काढून टाकावा,अशी विनंती आहे. त्या ऐवजी मराठीमध्ये जो काही प्रती शब्द असेल तो यामध्ये टाकावा. या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी याबाबतचे स्पष्टीकरण करावे. कारण कब्जेदार असतो त्याचा विचार केला पाहिजे. अभ्यासपूर्ण विश्लेषणाची अपेक्षा करतो. या शब्दाच्या संदर्भात पुनर्विचार करावा.

सभापती महोदय, 1994 साली महिलांना फीमध्ये माफी देण्याचा निर्णय केलेला होता. त्यानंतर कोणीतरी याबाबत हायकोर्टामध्ये चॅलेंज केले. मला वाटते, दिल्ली शहरामध्ये महिलांसाठी 1 टक्के कमी मुद्रांक शुल्कामध्ये सवलत दिलेली आहे. या संबंधातही विचार व्हावा आणि "हडप" या शब्दाच्या बाबतीत माननीय महसूल मंत्री महोदयांनी अभ्यासपूर्ण प्रकाश टाकावा अशी विनंती आहे.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही) 4W-2

SKK/ MAP/ SBT/

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकाचे स्वागत करत असतांना काही गोष्टी जाणीवपूर्वक नमूद करणे आवश्यक आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी 5 हजार कोटी रुपयाचा महसूल मिळाल्याचे सांगितलेले आहे. अजूनही तो वाढेल. परंतु आजही रजिस्ट्रेशन कार्यालयाकडून माहिती घेतली तर वर्षानुवर्षे रजिस्ट्रेशन केली जात नाहीत असे दिसून येईल. त्या ठिकाणी पैसे दिल्याशिवाय काम होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. याबाबत कोठेतरी निर्बंध आणले पाहिजेत. कालच सकाळी मला एका व्यक्तीचा फोन आला. त्यांनी मी रजिस्ट्रेशनसाठी अर्ज केलेला आहे, परंतु अजून ते काम झालेले नाही. तरतूद अशी आहे की, वडिलोपार्जित मालकी असलेल्या भागाच्या संबंधात मग भाऊ, बहिणी, मुलगा, मुलगी यांचे नाते संबंध असेल, मृत पावलेला मुलगा किंवा मुलगी असेल त्यांचा हक्क सोडून दिलेला असेल, वडिलांचे, आईचे नाते संबंध असेल त्यांचे कायदेशीर वारस म्हणून नोंदणी केली जात असेल तर त्याबाबत तरतूद आहे. या व्यक्तीच्या भावाने त्याला फ्लॅट बक्षिस दिला त्याची नोंदणी करण्यासाठी अर्ज दिलेला आहे परंतु एक महिना झाला तसेच पडून आहे. सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, मी एका विषयाच्या संबंधाने उल्लेख केला होता. नाशिक येथील निवृत्त उपजिल्हाधिकारी पदावर काम केलेल्या व्यक्तीने जागा कोणाच्या मालकीची आहे, या संबंधात माहिती घेतली.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

1922 पासूनची कागदपत्रे दाखवली. ते उपजिल्हाधिकारी होते. गेली दहा वर्षे त्यांना महसूल खात्याकडून उत्तर मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु यासंदर्भात या बिलामध्ये काहीही तरतूद नाही. दिलेल्या कोणत्याही कामाचा कालावधी किती असावा याबाबत बिलामध्ये काहीही दिलेले नाही. कलम 52 अ मध्ये अशी तरतूद केली आहे की, "कलमे 47, 50, 51 व 52 यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम 10 च्या पोट-कलम (3) किंवा कलम 10 अ किंवा कलम 10 ब अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, मुद्रांकाव्दारे किंवा रोखीने शुल्क भरले असेल आणि भरण्यात आलेल्या शुल्काची रक्कम 1 लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, संबंधित जिल्हाधिकारी, खराब झालेल्या किंवा गैरवापर केलेल्या किंवा वापरासाठी आवश्यक नसलेल्या मुद्रांकाच्या बाबतीत किंवा चलानांव्दारे भरलेल्या रोख रकमेच्या बाबतीत सवलत देणार नाही. परंतु, तो, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, त्यावरील आपल्या शेऱ्यासह असा अर्ज (अ) मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा यांमध्ये काम करीत असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी हाताळलेल्या प्रकरणांकरिता, अपर मुद्रांक नियंत्रण याच्याकडे पाठवील " ते किती दिवसात पाठविणार आणि त्यांच्याकडे किती दिवस राहील ? याबाबत यामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही. म्हणजे किती दिवसात पाठवावयाचे हे तो त्याच्या मर्जीनुसार ठरवणार तसेच त्याच्याकडे ते किती दिवस ठेवावयाचे हे त्याच्या मर्जीवर अवलंबून असेल. मी यातील आणखी एक कलम वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "मुख्य नियंत्रक महसुली प्राधिकारी, असा अर्ज मिळाल्यावर, अशी सवलत द्यावी किंवा कसे याबाबत गुणवत्तेनुसार निर्णय घेईल आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यावर आदेश देईल आणि तो आदेश अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात आक्षेप घेता येणार नाही" हा जो क्लॉज आहे त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी विश्लेषण करावे. हा क्लॉज सद्हेतूने कसा वापरला जाईल याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल माझ्याकडे आहे. मुद्रांक शुल्क कसे कमी केले आणि शासनाच्या तिजोरीतून त्यांनी कशी लूट केली आणि त्यातून कशी तूट आली याबाबत त्यातील एकच प्रकरण मी वाचून दाखविणार आहे. यामध्ये अनेक विषय

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. अरविंद सावंत.....

दिलेले आहेत पण मी एकच प्रकरण वाचून दाखवणार आहे. यामध्ये गहाणपत्र विलेखांवर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी यासंदर्भातील बाब सन 2003 मध्ये मुद्रांक महानिरीक्षक पुणे यांनी निदर्शनास आणली आणि नंतर यासंदर्भात यांनी कारवाई केली आणि वसुली केली. यामध्ये आणखी जे विषय दिलेले आहेत त्यामध्ये मालमत्तेच्या न्यून मूल्यांकनामुळे मुद्रांक शुल्काची कमी आकारणी, भाडेपट्टा विलेखांवर मुद्रांक शुल्काची कमी वसुली, बाजार मूल्याच्या चुकीच्या निर्धारणामुळे मुद्रांक शुल्काची कमी वसुली, भाडेपट्टा विलेख्यांवर चुकीच्या मुद्रांक शुल्काचे निर्धारण असे विषय आहेत. यातील शेवटचे प्रकरण मी वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "अधिनियमानुसार, भाडेपट्टा कालावधीवर अवलंबून असणाऱ्या भाडेपट्टा विलेख्यांवरील मुद्रांक शुल्काची आकारणी, भाडेपट्टीतील भाडे, अग्रीम, दिलेले अधिमूल्य आणि पट्टेदाराने भरलेले इतर प्रभार जसे शासकीय महसूल, उपकर, नगरपालिकांची पट्टी किंवा कर जे कायद्याप्रमाणे पट्टेदाराकडून वसुलीयोग्य आहेत यांचा अंतर्भाव असलेल्या एकूण मोबदल्यावर, आधारलेली असते. बांद्रा मुंबई येथील अंधेरी उपनोंदणी-1 शाखेत, जानेवारी, 2003 मध्ये एक भाडेपट्टा विलेख, 80 वर्षाच्या कालावधीकरिता, रु.112.34 कोटी अधिमूल्याकरिता निष्पादिला गेला. मोबदल्याची एकूण रक्कम ठरविताना पट्टेदाराने द्यावयाचे जमीन भाडे वगळण्यात आले. याप्रमाणे जमीन भाडे धरुन मोबदल्याच्या एकूण रु. 143.73 कोटीवर रु. 14.37 कोटीचे मुद्रांक शुल्क आकारावयाचे होते. त्याऐवजी रु. 120.30 कोटीच्या मोबदल्यावर रु. 12.03 कोटी आकारणी केली गेली. परिणामी, मुद्रांक शुल्काची रु. 2.34 कोटी ने कमी आकारणी झाली. डिसेंबर, 2004 मध्ये हे निदर्शनास आणून दिल्यानंतर मुद्रांक महानिरीक्षक, पुणे यांनी एप्रिल, 2005 मध्ये लेखापरीक्षेचे आक्षेप स्वीकारले आणि उपनिबंधक यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे अनुदेश दिले. वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही. ही बाब मे, 2005 मध्ये शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही." या गोष्टीचा मी मुद्दाम उल्लेख करतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 21:50

(श्री. अरविंद सावंत......)

अशा प्रकारे अडीच कोटी रुपयांची तूट महालेखाकारांनी निदर्शनास आणून देखील त्याबाबतीत अजून कारवाई झाली नाही. त्याबाबतीत काही सांगितले जात नाही. अशा पध्दतीने हे काम चाललेले आहे. म्हणून अशा गोष्टींकडेही शासनाचे लक्ष असले पाहिजे. आपण काही अधिकार दिलेले आहेत त्यामुळे आपल्या मर्जीप्रमाणे काम चालेल. ही जी कायद्यामध्ये पळवाट दिसते त्यावर माननीय मंत्री महोदयांनी कृपा करुन प्रकाश टाकावा.

सभापती महोदय, एकाच क्रमांकाचे दोन मुद्रांक असतील तर त्याबाबतीत काय कारवाई करणार असा प्रश्न मी विचारलेला होता. तो प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला येऊ शकला नाही. परंतु त्याबाबतीत पुढे काय कारवाई झाली ते समजलेले नाही. अडीच लाखा पर्यन्तच्या फ्लॅटच्याबाबतीत 100 रुपये मुद्रांक शुल्क आकारण्यात येणार आहे. आता संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कुठेही अडीच लाखाला फ्लॅट मिळत नाही. मुद्रांक शुल्काची मर्यादा 8700 रु. वरुन 7700 रु. केलेली आहे. यामध्ये फार मोठा रिलिफ दिला अशातला भाग नाही. मध्यमवर्गाला यामुळे फायदा होईल असे वाटत नाही. तेव्हा मध्यमवर्गाला आपण कोणती सवलत दिलेली आहे यावर माननीय मंत्री महोदयांनी प्रकाश टाकावा. रजिस्ट्रेशन वेळेत झाले नाही तर त्याबाबतीत आपण कोणती कारवाई करणार आहात, यासंबंधीचा उल्लेख या विधेयकामध्ये करण्यात आलेला नाही. तेव्हा मी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांवर माननीय मंत्री महोदयांनी प्रकाश टाकावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2006चे वि.स.वि. क्रमांक 43, मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958, यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक या ठिकाणी सादर करण्यात आलेले आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदारसाहेब तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. हे विचार मांडत असताना सन्माननीय सदस्यांनी सुरुवातीला या विधेयकाचे स्वागत केल्या बद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदारसाहेबांनी विधेयकाच्या उद्देश व कारणे यामधील काही मुद्यांबाबत विचारणा केली आहे. खरे म्हणजे मी सुरुवातीलाच काही गोष्टी स्पष्ट केलेल्या आहेत. वडिलोपार्जित मालमत्तेतील हक्कमागणी सोडून देण्याच्या संबंधातील परिमोचनपत्राच्या संलेखावर आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क 1 टक्क्यावरुन दोनशे रुपये इतके कमी केलेले आहे. तसेच "बांधा, वापरा व हस्तांतरित करा" अशा प्रकल्पांना उत्तेजन देण्यासाठी मुद्रांक शुल्काचा दर किमान 100 रुपये आणि जास्तीत जास्त 5 लाख रु.पर्यन्त करण्यात आलेला आहे. "बांधा वापरा हस्तांतरित करा" अशा प्रकल्पांच्या बाबतीत कर सुटसुटीत होऊन जास्तीत जास्त कर भराला जावा हा उद्देश आहे. याठिकाणी असे सांगण्यात आले की राज्यामध्ये आता कुठेही अडीच लाखापर्यन्त फ्लॅट मिळत नसल्यामुळे त्यामुळे त्याबाबतीतील मर्यादा वाढविण्यात यावी. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी, अर्बन रिन्युअलच्या माध्यमातून हे विधेयक येथे आणलेले आह, असे सांगितले. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. या विधानसभा आणि विधानपरिषदेच्या सभागृहामध्ये माननीय सदस्यांनी वेळोवेळी ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्या विचारात घेऊन नागरिकांना मुद्रांक शुल्काच्या बाबतीत सवलत मिळावी या स्तुत्य हेतुने हे विधेयक आणलेले आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, या राज्याला वेगवेगळया रुपाने कर मिळतो. सेल्स टॅक्सच्या रुपाने,मुद्रांक शुल्काच्या रुपाने हा कर मिळतो आणि तो राज्यामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक आहे. उत्पन्नाशिवाय राज्याचा विकास होऊ शकणार नाही. मुद्रांक शुल्क विभाग हा राज्याला उत्पन्न देणारा दुसरा किंवा तिसरा विभाग आहे. मागील वर्षी मुद्रांकाच्या माध्यमातून उत्पन्न मिळविण्याचे जे उद्दिष्ट होते ते साडेचार हजार कोटी रुपयांचे होते. वेळोवेळी या विभागाकडे लक्ष दिल्यामुळे तसेच काही ठिकाणी भेटी दिल्यामुळे त्याचप्रमाणे प्रॉपर्टी रजिस्टर होत नाही आणि मुद्रांक शुल्क चुकविले जाते हे लक्षात घेऊन गेल्या वर्षी जे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते ते पार करण्यात आले आणि 800 कोटी रुपये अधिक उत्पन्न शासनाला प्राप्त झाले. अशा वेळी शासनाला वाटले की अधिक उत्पन्न वाढवावयाचे असेल तर उपाययोजना केली पाहिजे. केंद्र शासनाचे किमान 5 टक्के स्टॅम्प डयूटी आकारली जावे असे आदेश होते. तरी सुध्दा शासनाने याबाबतीत विचार केला आणि ही सवलत दिलेली आहे. सुटसुटीत मुद्रांक शुल्क आकारले जावे आणि कॉन्ट्रॅक्टरना,पलॅट धारकांना विविध वर्गातील लोकांना सवलत कशी देता येईल आणि कर अधिक कसा जमा होईल त्याचप्रमाणे नागारिकांचे शोषण कसे होणार नाही यादृष्टीने कायदा केला आहे. यामध्ये पळवाट नाही. काही प्रशासकीय अमेंडमेंड आहेत. न्यायालयात जाण्याची संधी दिलेली नाही असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी युतीच्या काळात देखील महसूल मंत्री होतो. सेल्सटॅक्सच्या माध्यमातून जो कर मिळतो त्यासंदर्भातील न्यायालयात असलेली पेंडींग प्रकरणे पाहिली तर शासनाचे किमान 8 ते 10 हजार कोटी रुपये अडकून पडले आहेत. ही परिस्थिती परत येऊ नये आणि शासनाचे उत्पन्न कसे वाढेल याचा विचार करण्यात आला आहे. सरकार जर चालवायचे असेल आणि विकास करावयाचा असेल तर उत्पन्न हे यायलाच पाहिजे. सगळाच कर माफ केला तर सरकार चालणार कसे आणि विकास कसा होणार? काही गोष्टी या राज्याच्या हिताचा विचार करुन केलेल्या आहेत. कायद्यामध्ये अमेंडमेंड केलेली आहे. आतापर्यंतचा जो अनुभव होतो त्या अनुभवापोटी हे केलेले आहे. कोणाला अधिकार देऊन त्या अधिकारांचा गैरफायदा होईल अशा सवलती दिलेल्या नाहीत हे प्रामाणिकपणे सांगणे आवश्यक आहे. मी अनेक माननीय सदस्यांची भाषणे ऐकलेली आहेत. विधानसभेमध्ये माननीय सदस्य श्री.एकनाथ खडसे यांनी जी सूचना मांडली होती त्यासंदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा करुन कसा

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

रिलीफ देता येईल हे पाहिले आहे. विरोधी पक्षांनी केलेल्या सूचना देखील लक्षात घेऊन या सवलती अतिशय प्रामाणिकपणाने दिलेल्या आहेत. माननीय सदस्यांनी 15 लाखापर्यंत ही सवलत द्यावी अशी सूचना केलेली आहे. अडीच लाख ही काही शेवटची रक्कम नाही. पुढील काळामध्ये अडीच लाखाच्यावर ही रक्कम वाढविता येईल काय याचा विचार जरुर केला जाईल. शासनाने स्वत:हून हे विधेयक आणलेले आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी हडप या शब्दाचा अर्थ याठिकाणी विचारला आहे. हायपोथिकेशन असा अर्थ आहे. हा शब्द आजच आला नाही. 1958 चा कायदा आल्यापासून हा शब्द अस्तित्वात आहे...

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : पॉन या शब्दाचा अर्थ हायपोथिकेशन असा अर्थबोध होऊ शकतो काय ? तसेच यामध्ये काही डॉक्युमेंटरी एव्हीडन्स रायटींगमध्ये असेल तर त्याचा इफेक्ट ॲल्युमिनीसारखा असतो.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मुव्हेबल प्रॉपर्टीसाठी हा शब्द वापरण्यात आला आहे. यंत्रसामुग्री,वाहने यासंबंधी बॅकेमध्ये गहाण ठेवण्यासाठी हा शब्द वापरला जातो. त्यानुसार मुद्रांक शुल्क आकारले जाते.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

'हडप' या शब्दाचा अर्थ 'प्रॉपर्टी हडप करणे' असा नाही. 'हडप तारण' या नुसार तो शब्द वापरला आहे. यंत्रसामुग्री, वाहन गहाण ठेवले जाते, त्यावेळी सदर शब्द वापरला जातो. 'हडप तारण' हा शब्द नवीन नाही. या शब्दाचा अर्थ चांगल्या कामासाठी, चांगल्या दृष्टिकोनातून वापरलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी देखील काही मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांना सांगू इच्छितो की, एखाद्या प्रकरणातील वसुली झाली नसेल तर आय.जी.आर.यांच्याकडे अपील करता येते. तरी सुध्दा त्यांनी जी माहिती दिलेली त्यासंबंधीची संपूर्ण माहिती घेण्यात येईल. जास्तीत जास्त मुद्रांक शुल्क गोळा करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे कोणालाही सूट-सवलत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या विधेयकाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत, मार्गदर्शन केले आहे, त्याचा जरूर विचार करण्यात येईल. सदर विधेयकास सभागृहाने पाठिंबा देऊन विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.नारायण राणे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 43 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 43 संमत झाले आहे.

.....

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 19 एप्रिल 2006 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत विशेष बैठकीत शासकीय विधेयके घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अशासकीय कामकाज सकाळी घेण्याचे ठरले होते.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आपणाला सकाळी 10.30 वाजता सभागृहाची बैठकच घ्यावयाची असेल तर प्रश्नोत्तराच्या तासासह नियमित बैठक घ्या. मला वाटते कोकणचा प्रस्ताव घ्यावा म्हणून तुम्ही सकाळी कामकाज दाखविले आहे.

तालिका सभापती : कोकणचा ठराव नियमित बैठकीमध्ये घेण्याचे ठरले आहे. या सभागृहातील सर्व विधेयके विधानसभा सभागृहात पाठवावयाची आहेत. मी जो कार्यक्रम सांगितला आहे त्याबद्दल जर कोणाला सुधारणा करावयाची असेल तर त्यांनी माननीय सभापती महोदयांना.....

श्री.दिवाकर रावते : असे असेल तर आम्ही सभापतींचा निषेध करतो. हे काय चालले आहे ? या ठिकाणी मनमानी चालली आहे काय ?

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची विशेष बैठक उद्या बुधवार, दिनांक 19 एप्रिल, 2006 रोजी सकाळी 10.30 ते 1.00 वाजेपर्यंत घेण्यात येईल. या बैठकीमध्ये शासकीय विधेयके घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 1.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 10 वाजून 06 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 19 एप्रिल, 2006 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही